प्र. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ११५०

# घर आणि अंगण

REFBK-0009751

विमलाबाई देशपांडे

आगरकरांच्या काळांतलें मराठी स्त्रीचें चित्र आतां पार बदलून गेलें आहे. मराठी स्त्री सुरक्षित झाली आहे. जुन्या रूढींच्या बंधनांतून मुक्त झाली आहे, समाजांत प्रतिष्ठा मिळवूं लागली आहे—इतकेंच काय, पण आर्थिक स्वातंत्र्याच्या दिशेनेंहि ती वाटचाल करूं लागली आहे.

—फक्त, ती अजून सुखी झालेली नाहीं.

सा डे ती न रु प ये

# घर आणि अंगण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व.
अनुक्रम २३९९८ वि: १ नोव्हें ९१
क्रमांक ९१.५० नों दि: २५।११।९

# घर

आणि

# अंगण

विमलाबाई देशपांडे

REFBK-0009751

बहुरूपी प्रकाशन
९ सनीसाइड, जिमखाना रोड, माटुंगा
मुंबई १९

प्रथमावृत्ती
विजयादशमी
२१ ऑक्टोबर, १९५८

मुद्रक
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी
मुंबई ४

प्रकाशक
ह. वि. मोटे
द. ग. गोडसे
९ सनीसाइड
जिमखाना रोड
माटुंगा, मुंबई १९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम २३८८५ विः
क्रमांक ९९५८ नों: दि: २४९९
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ८८५१

# घर आणि अंगण

१९४७ च्या १५ ऑगस्टनंतर स्वराज्यसंपादनाचा आनंद थोडाथोडा ओसरूं लागला. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीची तीच महागाई, तेच नित्य जीवनाचे त्रासदायक प्रश्न लोकांना बेचैन करूं लागले. गेलीं पंचवीस वर्षें स्वराज्याच्या तंतूवर लटकत ठेवलेल्या अपेक्षा व आकांक्षा उफाळून येऊं लागल्या. स्वराज्यप्राप्तीनंतरच्या जीवनाचें काल्पनिक रम्य चित्र आणि प्रत्यक्ष भकास परिस्थिति यांच्यांतील वाढतें अंतर असंतोष निर्माण करूं लागलें. वाढत्या असंतोषाच्या भरांत आम्ही सरकारवर वेळींअवेळीं निर्बुद्ध व निर्दय टीका करूं लागलों. आणि त्या टीकेचा कांहीं परिणाम होतांना न दिसल्यामुळें आम्ही अधिकाअधिक चरफडूं लागलों.—आम्ही कुणावर चडफडतों आहोंत ? कुणावर टीका करीत आहोंत ? कुणाकडून या अफाट अपेक्षा करीत आहोंत ? आमच्या सरकारकडून—जनतेच्या सरकारकडून. पण सरकारचें स्वरूप तुम्हां-आम्हां सर्वांच्या स्वरूपाहून वेगळें राहील ही कल्पनाच मुळांत चुकीची नाहीं का ? तुमचे-आमचे जे सारे गुणदोष तेच सरकारमध्यें प्रकट होणार. पण आमच्यांत कांहीं दोष आहेत ही गोष्ट, परकीय राज्यकर्त्यांना दोष देण्याच्या सवयीनें आम्ही विसरून गेलों होतों. म्हणूनच आतां परकीयांविरुद्ध रोखलेल्या या टीकेच्या तोफा आम्हीं आतां आपणांकडे वळविण्याची संवय केली पाहिजे. जी जी सुधारणा, जे जे बदल व जो जो विकास आम्ही करूं इच्छीत होतों, तो करण्यासाठीं भूमि साफसूफ करून घेतली पाहिजे व मनांतील काळोख नाहींसा केला पाहिजे.

अंतर्मुखतेचा हा प्रकाशझोत आपल्या जीवनावर पाडला कीं, प्रथम कांहीं दृष्टीस पडत असेल, तर ती आपल्या नैतिक पातळीची घसरगुंडी. वैयक्तिक जीवनांत, कौटुंबिक संबंधांत किंवा नागरिक कर्तव्यांत आमचीं मूल्यें रसातळास चाललेलीं दिसत आहेत. कां ? काय बिघडलें आहे ? कशाची उणीव भासत आहे ? कशाची धारणाशक्ति कमी कमी होत चालली आहे ? आमच्या घराची, आमच्या कुटुंबाची. घरांतलें स्नेहपूर्ण वातावरण नाहींसें होत चालल्यामुळें आणि कुटुंबांतील स्नेहबंध सैल होत असल्यामुळें व्यक्तिव्यक्तींचीं जीवनमूल्यें जपणारें व विकसविणारें हें स्थान निष्प्रभ होत चाललें आहे.

काल-परवांपर्यंत आम्ही पाश्चात्यांशीं स्वातंत्र्यासाठीं झगडत असलों, तरी पाश्चात्यांचीं जीवनमूल्यें कळत-नकळत आत्मसात् करीत होतों. व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तीचे हक्क, दलितांचे हक्क, स्त्रियांचे हक्क—येथून तेथवर हक्कांच्या घोषणांनीं आमचें सामाजिक जीवन निनादित झालें होतें. हक्कांच्या या कोलाहलांत कर्तव्याचा मंद स्वर आमच्या कानीं पडेनासा झाला होता. कर्तव्याचे व स्नेहाचे बंध सैल होत चालले होते. निरनिराळ्या हक्कांच्या लाटेबरोबर घरांतील एकेक व्यक्ति संपूर्णपणें बाहेर वाहावत जाते कीं काय, अशी भीति अनेक सुधारलेल्या घरांतून निर्माण झाली होती. गेल्या पंचवीस वर्षांत जो शिक्षणप्रसार झाला, त्यामुळें लहानमोठ्या गांवांत घरांघरांतून शिक्षित व अर्धशिक्षित मुली लग्न होऊन संसारांत पडूं लागल्या. आणि शिक्षणाचा उपयोग बऱ्याच अंशीं केवळ कादंबऱ्या वाचण्याकडेच होत असल्यामुळें, संसारी जीवनाचीं रम्य पण अवास्तव कल्पनाचित्रें या कादंबऱ्यांतून तरुणींच्या मनांत कोरलीं जाऊं लागलीं. या सर्व प्रकाराला चित्रपटांची साथ तर प्रमाणाबाहेर मिळाली. प्रत्यक्ष जीवनाच्या जाणिवेपासून, कर्तव्यापासून व कष्टांपासून व्यक्तीला जितकें दूरदूर नेतां येईल, तितकें दूरदूर नेण्याचा बहुतांश कादंबऱ्यांचा प्रयत्न असल्यामुळें तरुणांचें, तरुणींचें व प्रौढांचेंहि जीवन पुष्कळ प्रमाणांत दुभंगल्यासारखें झालें. नेहमींचें जीवन कसें तरी ओढीत न्यावयाचें आणि कादंबऱ्यांनीं किंवा चित्रपटांनीं चितारलेलें काल्पनिक जीवन कल्पनेनेंच जगण्यांत जीवनाचें सुखसर्वस्व समजावयाचें, अशा तऱ्हेची विलक्षण परिस्थिति थोड्याबहुत शिक्षित समाजांतहि निर्माण झाली. तथाकथित सुशिक्षित स्त्रीपुरुषांच्या जीवनांत तर या दुभंगलेल्या जीवनानें एक प्रकारचा दुबळेपणा आणि निष्क्रियता

निर्माण केली. असमाधान, हुरहुर किंवा बेजबाबदारपणा व आप्पलपोटेपणा हेच विशेष तेथें ठळकपणानें दिसून येऊं लागले. आमचें वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक जीवन या दोषांमुळें आज नासून गेल्यासारखें झालें आहे.

येथून आपणाला पुढें जावयाचें आहे. या निराशाजनक परिस्थितींत आपणाला बदल घडवून आणायचा आहे. म्हणूनच साऱ्या सामाजिक गुणदोषांचें निर्मिति-केंद्र जें घर व कुटुंब, त्याची प्रकृति आपण तपासून पाहिली आणि वेळींच उपाय करण्याचा प्रयत्न केला, तर समाज सुधारण्यासाठीं कांहीं वेगळे यत्न करावे लागणार नाहींत. व्यक्तिस्वातंत्र्याच्या पराकोटीला गेलेल्या व सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांतील विचारवंतहि पुन्हा घराकडे व कुटुंबाकडे परतले आहेत. नैसर्गिक स्नेहबंधनांनीं निर्माण झालेला हा कुटुंबाचा घटक एकसंध राहून सर्वांच्या विकासाला मदत करणारा असा कशा तऱ्हेनें घडवितां येईल इकडे आमच्याहि विचारवंतांचें लक्ष वेधलें पाहिजे.

आज कांहीं सुखी व भाग्यवान अपवाद सोडले, तर घराचें घरपण राहूं नये, कुटुंबाचें कुटुंबत्वच नाहींसें व्हावें, असेच आघात कुटुंबांवर चहूंकडून होत आहेत. कांहीं आघात बाहेरचे आहेत, पण कांहीं आंतूनच घराच्या भिंती हादरवीत आहेत. बाहेरचे आघात नाहींसे करण्यासाठीं संघटित समाजिक प्रयत्न करावा लागेल. राहण्याच्या जागेची कमतरता, खाण्याच्या वस्तूंची महागाई आणि एकंदरीनें कष्टाचें होत चाललेलें नित्य जीवन, या बाबतींतील सुख हळूहळू व बऱ्याच नेटाच्या प्रयत्नांनंतर साध्य होऊं शकेल. पण हे उघड आघात आहेत. त्यामुळें त्यांचें निवारण करण्यास काळ लागला, तरी ते घराची व कुटुंबाची तितकी हानि करूं शकत नाहींत.

याच्या उलट, घरावर व कुटुंबावर आंतून होणारे आघात हे गुप्त असल्यामुळें निवारण्यास कठिण असतात. असे आघात होत आहेत हें कबूल करण्यासच बरेच लोक तयार नसतात. म्हणून या आघातांचें स्वरूप स्पष्ट करणें, हीच आघातांचें निवारण करण्याची पहिली पायरी होऊं शकते.

घराच्या व कुटुंबाच्या घटकांत वडील, आई, मुलें व इतर नात्याची मंडळी हीं सर्व येत असलीं, तरी कुटुंबाचा सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे कुटुंबांतील स्त्री, माता हीच असते. अनेक कुटुंबांचा इतिहास आपण क्षणभर चित्रपटाप्रमाणें

नजरेसमोरून सरकविला, तरी हें सहज लक्षांत येईल, कीं सामान्यतः कुटुंबाच्या विकासाला किंवा विनाशाला, सुसंस्कृततेला किंवा हीनतेला, वैभवाला वा दारिद्र्याला कारणीभूत होणारी व्यक्ति जर कोणी असेल, तर ती घरांतील स्त्री—माता हीच असते. पण दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं, आजच्या बहुतांश अर्धशिक्षित किंवा सुशिक्षित स्त्रिया ही गोष्ट विसरल्या आहेत किंवा विसरूं इच्छीत आहेत. घर सोडून दुसऱ्या कोठेंहि चमकण्याची, झळकण्याची त्या आकांक्षा बाळगीत असतात. घर सोडून इतर कोठेंहि आपल्या गुणांचें व कर्तबगारीचें तेज पाडण्यास त्या उत्सुक असतात. घर सोडून दुसरीकडे कोठेंहि आपली कलात्मकता उधळण्यास त्या उत्कंठित झालेल्या असतात. आपलीं मुलें सोडून त्या इतर साऱ्या विद्यार्थीवर्गांचें मार्गदर्शन करण्यास तयार झालेल्या असतात.

ही वस्तुस्थिति अतिशय खेदाची आहे खरी. पण खेदाची म्हटल्यानें काम संपत नाहीं. उलट ती अधिकच लक्ष वेधून घेते. अधिकच विचाराला चालना देते. घरांत, समाजांत, वातावरणांत, विचारांत, भावनांत, मूल्यांत कोठें बिघाड झाला आहे म्हणून ही खेदजनक परिस्थिति निर्माण व्हावी ? खासच या सगळ्यांत कांहीं तरी बिघडलें असल्याशिवाय गृहिणीला घराबाहेर आत्मविकासासाठीं दृष्टि फेकण्याचें कारण पडलें नसतें. पण खरोखरच किती दोष निर्माण झाला आहे याचाहि विचार केला पाहिजे. आणि नुसतें दोषदर्शन करूनहि भागणार नाहीं. घर हें कुटुंबांतील सर्व व्यक्तींच्या विकासाचें स्थान कसें बनेल याचाहि विचार करावा लागेल. दोष केवळ दाखविल्यानें कधींच नाहींसा होत नसतो. आणि गुणाचें नुसतें वर्णन केल्यानें तो अंगीं बाणत नसतो. दोषाचा तिटकारा वाटण्यासारखी परिस्थिति आणि गुणांचें कौतुक होण्यासारखी परिस्थिति निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल, तरच घराच्या घरकुलांतूनहि सूर्यमालेच्या केंद्रस्थानीं असलेल्या सूर्याप्रमाणें गृहिणी घराबाहेरील जीवनावर प्रभाव पाडूं शकेल. गृहजीवन विकासक्षम व सुखदायक करतां आलें, तरच त्याच्या द्वारां संपूर्ण विशाल समाज विकसित व सुखी होऊं शकेल.

*न गृहं गृहमित्याहुः गृहिणी गृहमुच्यते ।*
*गृहं तु गृहिणीहीनं कांतारादतिरिच्यते ॥*

"नुसत्या विटामातीच्या किंवा सिमेंटच्या घराला घर म्हणत नाहींत. गृहिणी हीच खरें घर आहे. ज्या घरांत गृहिणी नाहीं, तें घर अरण्यालाहि मागें टाकतें." या अर्थाचें जें सुभाषित वारंवार कानीं पडतें, तें किती सार्थ आहे हें आतांच विशेष अनुभवास येत आहे. गृहिणी चोवीस तास घरांत होती, त्या काळांत गृहिणीचें महत्त्व कदाचित् तितकेंसें ध्यानांत आलें नसेल. पण घराचें आकर्षण गृहिणीला कमीकमी वाटूं लागलें आहे अशा सध्याच्या वेळीं गृहिणीचा घरावरील भलाबुरा प्रभाव केवढा मोठा असूं शकतो, याची कल्पना अधिकाधिक येऊं लागली आहे.

गृहिणीला घराचें आकर्षण कमीकमी कां वाटूं लागलें आहे? घराबाहेरील कोणत्या मूल्यांनीं, कोणत्या गोष्टींनीं तिचें मन बाहेर ओढलें जात आहे?—या ठिकाणीं मला हें स्पष्ट केलें पाहिजे कीं, आज हिंदुस्थानांत काय किंवा महाराष्ट्रांत काय, प्रत्येक घराघरांतील गृहिणी बाहेर पडत आहेत, असें माझें अर्थातच म्हणणें नाहीं. परंतु बहुतांश सुशिक्षित किंवा अर्धशिक्षित स्त्रिया मात्र अधिकाधिक प्रमाणांत घराबाहेरच्या व्यवसायांनीं किंवा गोष्टींनीं आकर्षित होत आहेत आणि घरांतील अत्यंत आवश्यक व अतिशय मौल्यवान् गोष्टींकडेहि बऱ्याच वेळां त्यांचें दुर्लक्ष होत चाललें आहे, ही गोष्ट नाकबूल करणें कोणत्याहि जागरूक स्त्रीला शक्य होणार नाहीं. संख्येनें पाहिलें, तर थोड्याच स्त्रिया घराबाहेर दृष्टि वळवूं लागल्या आहेत. पण स्त्रियांचें नेतृत्व करण्याच्या दृष्टीनें पाहिलें, तर या सुशिक्षित स्त्रियाच आपल्या आचारविचारांनीं नव्या पिढीचीं मूल्यें बनवीत असतात—मग ते आचारविचार व्यक्तिहिताला व समाजहिताला पोषक असोत कीं घातक असोत. म्हणून आज जरी संख्येनें थोड्याच स्त्रियांचा आचारविचारप्रवाह घराला दुर्लक्षून आणि तुच्छ लेखून घराबाहेर वाहत चाललेला दिसत असला, तरी त्याबद्दल वेळींच विचार न झाल्यास अधिकाधिक स्त्रिया घराला दुर्लक्षून घराबाहेर पडूं इच्छितील. आणि मग हा प्रवाह थोपवून धरणें कठिण होईल.

बऱ्याच सुशिक्षित स्त्रियांना घराचा कां कंटाळा येत चालला आहे? आपल्या गुणांचें चीज कोठें होईल तर तें घराबाहेरच, असें बऱ्याच जणींना कां वाटूं लागलें आहे? आपल्या कर्तबगारीला कोठें वाव मिळणार असेल, तर तो घराबाहेरच असें त्यांना कां जाणवूं लागलें आहे? आपल्या स्वतःच्या मुलांचें लालन-

पालन करण्यांत आनंद व कर्तबगारी न मानतां घराबाहेरच्या मुलांच्या शिक्षणांतच त्यांना धन्यता कां वाटूं लागली आहे?—केवळ घराचा कंटाळा करावा किंवा उगीच घराबाहेर धावावें अशा तऱ्हेचें या स्त्रियांचें वर्तन अर्थातच नसतें. परंतु आज समाजांत ज्या गोष्टींना मूल्य प्राप्त झालें आहे, त्या गोष्टींच्या मागेंच स्त्रिया किंवा पुरुष यांनीं जाण्याचा प्रयत्न करावा हें साहजिकच आहे. गेल्या पंचवीस वर्षांत स्वातंत्र्यसंग्रामाच्या नाना लहानमोठ्या आंदोलनांत ज्या ज्या स्त्रियांनीं तुरुंगवास भोगला, लाठीहल्ला किंवा हालअपेष्टा सहन केल्या, विशेषतः लोकांना आंदोलनांत भाग घेण्यासाठीं उत्तेजित करण्यासाठीं ज्यांनीं प्रभावी भाषणें केलीं, त्यांच्याविषयीं सर्वसामान्य स्त्रियांना विशेष आदर वाटूं लागला. त्यांच्या कीर्तीचा व मोठेपणाचा हेवा वाटूं लागला. त्याचप्रमाणें ज्या ज्या स्त्रियांनीं शिक्षिका, प्राध्यापिका, डॉक्टर, समाजकार्यकर्त्या, वक्त्या इत्यादि नात्यांनीं समाजांत थोडाबहुत मान मिळविला, त्यांच्याविषयींहि आदराची व हेव्याची भावना सामान्य स्त्रियांत निर्माण झाली. घरांघरांतील संभाषणांत, समारंभांत व वृत्तपत्रांतहि या स्त्रियांचीं नांवें झळकूं लागलीं किंवा त्यांच्या कार्यांचा बहुमान होऊं लागला. स्वयंपाकघरांत काम करीत असलेल्या स्त्रियांच्या कानीं या गोष्टी पडूं लागल्या. त्यांच्या पुरुषांच्या मुखांतून या स्त्रियांविषयीं गौरवपर उद्गार वारंवार बाहेर पडूं लागले. आणि "जीवन असावं तर असं असावं; नाहीं तर आमचं 'रांधा, वाढा, उष्टीं काढा' हें जीवन काय कामाचं?"..."आमचा सारा जन्म चुलींतच जाणार. पोरांच्या खस्ता खातांखातांच आमचे डोळे मिटणार."..."आम्हांला शिकायला मिळलं असतं, तर अशा केरावारीं आम्ही गेलों नसतों..." अशा तऱ्हेचे प्रतिउद्गार जुन्या व न शिकलेल्या स्त्रियांच्या मुखांतून बाहेर पडूं लागले. जुन्या व अशिक्षित स्त्रियांची वृत्ति जेथें वरीलप्रमाणें व्यक्त झाली, तेथें अर्धशिक्षित स्त्रियांना काय वाटत असावें याचें फारसें वर्णन करण्याची गरज नाहीं. जुन्या अशिक्षित स्त्रियांना तें जीवन लाभणें शक्य नव्हतें, परंतु थोड्याबहुत शिकलेल्यांना त्या जीवनाकडे जाण्याची अधिकाधिक उत्कंठा वाटूं लागली.

समाजाचा असा अनुभव आहे कीं, पुरुषांकडून स्त्रियांतील ज्या ज्या गुणांचें कौतुक केलें जातें, ते ते गुण किंवा त्या त्या गोष्टी अंगीं आणण्याचा प्रयत्न स्त्रिया करीत असतात. विशेषतः उपवर मुलींमध्यें ते गुण किंवा त्या गोष्टी उत्पन्न

करण्याचा प्रयत्न करीत असतात. मुलांना सुशिक्षित वधू पाहिजे असल्या कीं मुलींचें शिक्षण झपाट्यानें वाढत जातें. त्यांना कार्यकर्त्या किंवा मिळवत्या वधू पाहिजे असल्या, तर कार्यकर्त्या व मिळवत्या मुलींचें प्रमाण वाढूं लागतें.

येथें एक महत्त्वाची गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. मुलांना सुशिक्षित वधू पाहिजे असते, कोणकोणाला कार्यकर्ती किंवा मिळवती स्त्री पाहिजे असते. परंतु या सुशिक्षित, कार्यकर्त्या वा मिळवत्या पत्नीनें जुन्या तऱ्हेच्या पत्नीप्रमाणेंच आपलें घर उत्तम तऱ्हेनें चालवावें व आपल्या मुलांबाळांचें योग्य पालनपोषण व शिक्षण करावें अशी या सर्व उपवधू मुलांची व त्यांच्या मातापित्यांची अपेक्षा असते. पण प्रत्येक उपवर वधू सुशिक्षित, कार्यकर्ती आणि उत्तम गृहिणी अशी सर्वगुणसंपन्न झाली असती, तर तिच्या किंवा तिच्या पतीच्या आकांक्षाभंगाचा वा आशाभंगाचा प्रश्न उत्पन्नच झाला नसता, आणि घरांत व बाहेर सारखेंच लक्ष ठेवणारी व सारखेंच समाधान मानणारी गृहिणी निर्माण झाल्यानें कोणत्याच समस्या उभ्या ठाकल्या नसत्या.

पण पुरुषांच्या स्त्रियांसंबंधींच्या ज्या अपेक्षा आहेत त्या जरी स्पष्ट झाल्या असल्या, तरी त्या सर्व अपेक्षांची पूर्ति बहुतांश स्त्रियांकडून व्हावी, अशी परिस्थिति अजूनहि दृष्टिपथांत आलेली नाहीं. सुशिक्षित पत्नी पुरुषाला पाहिजे, अशी मागणी वाढत चालल्यामुळें मुली शिकविल्या जाऊं लागल्या. पण शिक्षणाबरोबर स्त्रियांची दृष्टीहि फाकत चालली. त्यांच्या आशाआकांक्षा व अपेक्षा वाढत चालल्या. आणि या सर्व आशाअपेक्षा उराशीं बाळगून नवविवाहित तरुणी जेव्हां नव्या घराच्या उंबरठ्यांत येऊन पोंचूं लागली, तेव्हां तिच्या आशाअपेक्षां-वर एकामागून एक आघात होऊं लागले. आकाशांत भराऱ्या मारणाऱ्या, लकेऱ्या घेणाऱ्या स्वच्छंद पाखराला सोन्याच्या पिंजऱ्यांत अडकवावें, तशी स्थिति बऱ्याच नवोढा तरुणींची होऊं लागली आहे. शाळेच्या किंवा विद्यालयाच्या मोकळ्या व विकासपोषक वातावरणांतून विवाह होतांक्षणीं जेव्हां ती श्वशुरगृहीं जाते, तेव्हां तिच्या बऱ्याच प्रवृत्तींवर, हौशींवर व स्वातंत्र्यावर, दिसण्यांत लहान पण भासण्यांत फार मोठीं अशीं बंधनें साहजिकच पडूं लागतात. पण या बंधनांचा आणि आपल्या प्रवृ-त्तींचा, हौशींचा व स्वातंत्र्याचा सुखकारक समन्वय कसा करावा, हें समजण्याइतकें तिचें वय प्रौढ नसतें व बुद्धि परिपक्व नसते. माहेरच्या व शाळा-कॉलेजच्या प्रेमळ

व मोकळ्या वातावरणांतून सासरच्या बंदिस्त व बऱ्याचशा निर्बंधमय वातावरणांत एकदम जाऊन पडावें लागल्यामुळें जुळवून घेण्याच्या व मिळवून घेण्याच्या तिच्या शक्तीवर फारच मोठा ताण पडतो. आणि हा ताण प्रत्येक नवोढा तरुणीला कमींत कमी जाणवावा अशा तऱ्हेचें सासरचें वातावरण फार क्वचित् ठिकाणीं आढळतें. यामुळेंच संघर्षाचें, असमाधानाचें व असंतोषाचें बीजारोपण नकळत केलें जातें.

पूर्वीच्या काळीं निर्बंधांनीं गजबजलेल्या सासरीं जाणारी प्रत्येक मुलगी सामान्यतः मनानें व शरिरानेंहि तयार असे. तिला हा सासरमाहेरचा फरक अगोदरच पूर्ण परिचित असल्यानें व सासरीं जाण्यावांचून गति नाहीं हेंहि पूर्णपणानें माहीत असल्यानें ती या नव्या जीवनांतील सुखदुःखांसाठीं अगोदरच तयार असे.

आजच्या मुलींची स्थिति पुष्कळ वेगळी आहे. आजच्या शाळाकॉलेजांत जाणारी तरुणी, लग्न करणें हेंच केवळ आपलें भवितव्य नाहीं हें जाणते. शिकून, नोकरी करून आपण आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र होऊं शकूं अशी तिला खात्री वाटते. आणि म्हणूनच विवाहित जीवनाचे निर्बंध व सासरचें बंदिस्त वातावरण ती सहजतेनें आत्मसात् करूं शकत नाहीं. तिला वैवाहिक जीवनाची इच्छा असते. सुखाचा संसार करण्याची तिला आवड असते. परंतु त्यासाठीं सतरा-अठरा वर्षांपर्यंत बनविलेल्या स्वभावाला, प्रवृत्तींना व आवडींना फार मोठीं बंधनें घालून घेण्यास ती तयार नसते. इकडे मुलींची ही वृत्ति असते, आणि तिकडे पाहावें तर सुशिक्षित व कार्यकर्ती पण गृहदक्ष पत्नी पुरुषाला हवी असते.

तरुणींतील व तरुणांतील वृत्तीच्या या विरोधामुळेंच वैवाहिक जीवनांतील असंतोषाला प्रारंभ होतो. या असंतोषाचा परिणाम जीवनांतील लहान लहान गोष्टींवरहि होतो आणि जीवन दुःखी बनवून टाकतो.

या अवस्थेंतून आपोआप बाहेर पडतां येणार नाहीं. परिस्थितीवरील उपाययोजनेचा नीट विचार करून ती आपल्या स्वतःच्या घरांत व भोवतालच्या समाजांत अंमलांत आणली जावी, यासाठीं दृढनिश्चयानें व तळमळीनें प्रारंभ केल्याशिवाय सध्याच्या सुन्न, कुंठित अवस्थेंतून आपण बाहेर पडूं शकणार नाहीं, या गोष्टीची पुरेपूर जाणीव आपण करून घेतली पाहिजे. आपोआप प्रश्न सुटणार नाहींत. आपोआप होण्यासाठीं आपण थांबलों, तर आपोआप अवस्था बिघडत मात्र जाईल. नुसतें शरीर सैल सोडलें कीं, घसरणीवरून आपण खालीं जातों; पण

वर चढायचें असलें कीं नेटाचा प्रयत्न करावा लागतो. या नेटाच्या प्रयत्नासाठीं जीवनांतलें शैथिल्य व प्रवाहपतितता आपण प्रथम भिरकावून दिली पाहिजे. अनेक समंजस, विचारवंत व तळमळीच्या स्त्रियांनीं एकमेकींच्या सहकार्यानें व सहभावनेनें एक जोराचा प्रयत्न करून हें शैथिल्य दूर फेकल्याशिवाय या कार्याला आरंभच होणार नाहीं.

आज विचारांची, कल्पनांची व नव्यानव्या सूचनांची उणीव नाहीं. उणीव आहे ती नेटाच्या व तळमळीच्या स्त्रीकार्यकर्त्यांची; आपले संसार चांगल्या तऱ्हेनें सांभाळून कार्य करणाऱ्या स्त्रियांची. म्हणून मागच्याच पिढींतील कार्यकर्त्या स्त्रियांना ही नवजीवनाच्या नव्या आंदोलनाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेण्यास सांगण्यावांचून गत्यंतर नाहीं; शिवाय संसाराच्या दररोजच्या लहानलहान जबाबदाऱ्यांपासून त्या बऱ्याच प्रमाणांत मुक्त झालेल्या असल्यामुळें हें काम नेटानें करणें त्यांनाच चांगलें जुळेल. स्त्रीजीवनांत आणि पर्यायानें सर्व कुटुंबांत व समाजांत एक नवजीवन आम्ही आणूं अशा स्फूर्तीनें शपथबद्ध झालेल्या उत्साही स्त्रिया जेव्हां हें काम हातीं घेतील, तेव्हांच हें जीवनाला अगदीं चिकटून बसलेलें प्रवाहपतितत्व नाहींसें करून टाकण्याचें कार्य त्या यशस्वी करूं शकतील.

# कणखर व्यक्तित्वाची साधना

स्त्रीजीवनांवरील आंतरिक आघातांचा विचार करूं लागलें म्हणजे त्यांतले कांहीं दोष एकदम समोर उभे राहतात. परिस्थितीमुळें अविभक्त कुटुंबपद्धति बरीचशी मोडली व विभक्त कुटुंबें दिसूं लागलीं. पण सासूसासऱ्यांचा, जावादीरांचा व नणंदांचा त्रास जरी यामुळें आपण नाहींसा करतों असें विभक्त कुटुंबांतील स्त्रीला प्रथम वाटलें, तरी आतां आपणांवर केवढ्या जबाबदाऱ्या पडणार आहेत, याची नीटशी कल्पना तिला असत नाहीं. आतां आपण स्वतंत्र झालों, जें म्हणूं तें करूं शकूं या आनंदांत विभक्त कुटुंबांतील स्त्री असते. परंतु अविभक्त कुटुंबांत सासू, जाऊ आदि स्त्रियांकडून दररोजच्या कामांत जी मदत मिळत होती ती आतां मिळणार नाहीं आणि महागाईमुळें नोकर ठेवणें परवडणार नाहीं, तेव्हां आतां आपणासच सर्व कामें कमी वेळांत, कमी त्रासांत पण जास्त चांगल्या तऱ्हेनें करण्यास शिकलें पाहिजे, ही गोष्ट ती विसरते.

ज्या समंजस मुली ही गोष्ट विसरत नाहींत, त्या घरकाम, मुलांचें काम व एकंदर गृहव्यवस्था यांची संवय प्रथमपासूनच करून घेतात किंवा त्यांच्या समंजस माता त्यांच्याकडून अशी सवय करवून घेतात. पण त्या बिचाऱ्या मातांनाहि हीं कामें मुलीकडून करवून घेणें कठिण होऊन बसलें आहे. आज लहान खेडीं सोडलीं, तर सर्व लहानमोठ्या गांवांतील मध्यमवर्गीय मुली शाळेंत जातात. अकरा ते साडेचार शाळा, जाण्यायेण्याचा वेळ व घरचा अभ्यास

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 23908 वि: ........
क्रमांक 9945 ........ नों: दि: ........



या सर्वांची बेरीज एकंदर सात तासांवर भरतें. सात तास काम करणाऱ्या मुलीला आणखी घरकाम करण्यास लावणें हें आईला यामुळेंच कठिण होऊन बसतें. पण प्रत्येक मुलीला गृहव्यवस्थेच्या प्रत्येक अंगाची चांगली माहिती असणें व सवय असणें हें तर अत्यंत अवश्यक असतें—मग ती मोठेपणीं केवळ घरांतलें काम करीतच राहो, शिक्षिका, प्राध्यापिका, नर्स, डॉक्टर होवो, किंवा सरकारी नोकरी किंवा इतर कांहीं घराबाहेरचा व्यवसाय करो.

पण निव्वळ गृहव्यवस्थेची माहिती व सवय यांकडेच आजच्या स्त्रीला व मुलीला लक्ष देणें शक्य नाहीं. संसाराला आर्थिक हातभार लावण्यासाठीं अनेक मध्यमवर्गीय स्त्रियांना कोणती तरी नोकरी किंवा व्यवसाय करणें भाग पडत आहे. तेव्हां या नोकरीसाठीं किंवा व्यवसायासाठीं जें शिक्षण अवश्य आहे तें घेणें तिला भागच पडतें. सात तास शालेय शिक्षणांत घालवून आज तिला भलीबुरी नोकरी मिळूं शकते खरी. पण घरकामाकडे योग्य तें लक्ष देतां न आल्यामुळें तिला पुढें घरकाम कंटाळवाणें व कष्टाचें वाटतें. याच्या उलट, घरकाम बरेंच असल्यास घरकाम व शाळा दोन्ही केल्यामुळें शालेय जीवनाच्या काळांतच अनेक मुलींची प्रकृति बिघडते व त्यामुळें पुढच्या जीवनांत घरकामाची सवय असूनहि प्रकृति बिघडल्यामुळें त्यांना कष्ट होतात.

परिस्थितीच्या या कोंडींतून मार्ग काढणें आज अशक्य झालें आहे. एक तर मुलींच्या शाळांचा वेळ कमी केला पाहिजे. शाळांत विषय अनेक असल्यामुळें व अभ्यासक्रमांत तपशील बराच असल्यामुळें प्रत्येक विषयाचें जें कमींत कमी पण पक्कें ज्ञान पाहिजे तेवढेंहि सर्वसामान्य मुलींना अवगत होत नाहीं. अभ्यासक्रमाचा पूर्ण विचार होऊन या बाबतींत सुधारणा करणें हें अतिशय तातडीचें होऊन बसलें आहे. पण हा प्रश्न शिक्षणखात्यावर अवलंबून असल्यामुळें या बाबतींत प्रचार करणें व लोकमताचें दडपण खात्यावर पडेल असा प्रयत्न करणें, एवढेंच शिल्लक राहतें. तेव्हां सध्याची शिक्षणपद्धति ही कांहीं काळ तरी अशीच राहणार हें गृहीत धरून काय करतां येईल तें पाहिलें पाहिजे.

आजच्या मुली सांसारिक जीवनांत पडल्यावर त्यांना ज्या ज्या अडचणी येतात, त्याच डोळ्यांपुढें ठेवून त्यांचें निवारण करण्याचा प्रयत्न करणें शक्य आहे. त्याचप्रमाणें उद्यां संसारांत पडणाऱ्या मुलीला जी पूर्वतयारी अवश्य आहे ती तिला

मिळवून देण्याचा प्रयत्न करणें हेंहि शक्य आहे. आज संसारांत पडलेल्या अनेक मुलींच्या बाबतींत अशक्त शरीरप्रकृति हीच पहिली धोंड आढळून येते. शालेय जीवनाचा ताण पडल्यामुळें किंवा वाढत्या महागाईच्या परिणामीं पुरेसें पोषक अन्न न मिळाल्यामुळें किंवा योग्य तो आहार व व्यायाम, शक्य असूनहि न घेतल्यामुळेंच सामान्यतः मुलींची शरीरप्रकृति बिघडलेली आढळते. शालेय अभ्यासक्रमाचे तास कमी करणें किंवा अभ्यासक्रम थोडा सुलभ करून घेणें हें आज तरी होणें शक्य नाहीं. तो कालावधीचा प्रश्न आहे. पण शाळेला निघाल्यापासून घरीं येईपर्यंत जो सहा तासांचा वेळ जातो, त्यांत मधल्या सुटींत मुलींनीं कांहीं तरी खाण्यास आणलेंच पाहिजे असा जर कडक नियम प्रत्येक शाळेंत केला गेला, तर अभ्यासामुळें शरीरावर पडणारा ताण बऱ्याच प्रमाणांत कमी होईल हें निःसंशय आहे. मधल्या वेळच्या खाण्याबाबत मधून मधून पुष्कळ प्रयत्न होतात. पण ते नेहमींच अल्पजीवी ठरतात. तेव्हां या बाबतींत नेटानें प्रयत्न केल्यास कमींत कमी मुलींच्या शाळांत खाणें नियमानें सुरू करतां येईल. प्रत्येक शाळेंतील कांहीं मुलींची परिस्थिति घरून खाणें आणण्याएवढी नसते. अशा मुलींसाठीं स्त्रीसंस्थांनीं व्यवस्था केल्यास कठिण होणार नाहीं. शालेय जीवनामुळें पडणारा ताण अशा तऱ्हेनें कांहीं अंशीं तरी आपणांस कमी करतां येईल.

वाढत्या महागाईमुळें विकसत्या वयांत जें पोषक अन्न हवें तें आईबापांना पुरवितां न आल्यामुळें पुष्कळ मुलींची प्रकृति बिघडलेली दिसून येते. आहे याच पैशांत जास्त पोषक आहार कसा बसवितां येईल या दृष्टीनें प्रयत्न व्हावयास पाहिजेत. पुष्कळदां माहिती नसल्यामुळें व जिभेच्या चोचल्यामुळें, असलेल्या पैशांत अधिक पोषक आहार देणें शक्य असूनहि तो दिला जात नाहीं. मुलांमुलींना फळांपेक्षां चिवडाच अधिक आवडतो व तऱ्हतऱ्हेच्या भाज्यांपेक्षां बेसन किंवा पिठलेंच अधिक बरें लागतें. तेव्हां या दृष्टीनें मध्यमवर्गीय कुटुंबांत अधिक शोध व अधिक प्रचार झाल्यास आणि शरीरपोषक आहार कोणता व तो न घेतल्यास काय दुष्परिणाम होतात याबद्दल मुलींमध्यें प्रचार केल्यास पुष्कळ काम होऊं शकेल. आम्ही अर्धे पैशांनीं मरतों व अर्धे अज्ञानानें मरतों अशी आपली आजची स्थिति आहे.

मुलींची प्रकृति बिघडण्याचें तिसरें कारण म्हणजे योग्य तो आहार व व्यायाम शक्य असूनहि न घेणें. त्यालाहि वरीलप्रमाणेंच उपाय करतां येईल. आहाराविषयीं

वर सांगितलेंच आहे. योग्य ते व्यायाम मुलींनीं दररोज नेमानें घ्यावे यासाठीं दहा-पंधरा घरांमधील मुलींनीं दररोज एकीच्या घरीं जमून सांघिक रीतीनें हे व्यायाम करण्याची पद्धत पाडली पाहिजे. दहा-पंधरा घरांचा एकेक विभाग पाडणें, कोणत्या घरीं, कोणत्या वेळीं व कोणते व्यायाम करावयाचे हें ठरविणें व हा क्रम बरोबर चालला आहे किंवा नाहीं याची तपासणी करणें या गोष्टी शिक्षिका, पालक व स्त्रीसंस्थांतील उत्साही कार्यकर्त्या यांच्या सहकार्यानें करतां येण्यासारख्या आहेत.

अजून संसारांत न पडलेल्या मध्यमवर्गीय मुलींसाठीं वर सुचविल्याप्रमाणें उपाययोजना अंमलांत आणली गेली, तर त्या मुली संसारांत पडल्यानंतर प्रकृति ठीक नसल्याची त्यांच्यापुढें जी मोठी धोंड उभी राहते, तिच्यांतून त्या बहुतांश मुक्त होतील अशी माझी खात्री आहे. ‘शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्’ या वचनाप्रमाणें तरुण मुलींच्या प्रकृतीकडे याप्रमाणें लक्ष दिल्यास त्यांच्या ज्या इतर अडचणी आहेत, त्यांच्याशीं सामना देणें अधिक सुलभ जाईल. सुदृढ प्रकृतीच्या मुलीला घरकामहि अधिक चांगलें व अधिक सुलभतेनें करतां येईल आणि अभ्यासहि तिला जास्त पेलेल.

घरकाम, गृहव्यवस्था, शिशुसंगोपन, आजाऱ्यांची शुश्रूषा इत्यादि, भावी जीवनांत पदोपदीं लागणाऱ्या बाबतींत शाळांत गृहशास्त्राच्या द्वारां कांहीं थोडेंबहुत शिकविलें जातें. परंतु यासाठीं अवश्य असणारी विस्तृत प्रयोगशाळा क्वचितच शाळांना लाभते. त्यांतहि शिकणाऱ्यांची संख्या पुष्कळ असल्यामुळें या प्रयोगशाळेंत कोणत्याहि गोष्टीची संवय होणें हें अशक्यच आहे. भावी आयुष्यांत एकेकट्या मुलीला आपल्या घरांत ज्या ज्या गोष्टी एकामागून एक क्रमानें, अवधान ठेवून कराव्या लागतात, त्यांपैकीं एखादी, अनेक मुलींच्या घोळक्यांत, थोडयाबहुत प्रमाणांत व शाळेच्या मोठ्या खोलींत करण्यास मिळते. अशानें वारंवार करण्यामुळें जी सवय व जी सुलभता यावयास पाहिजे ती कशी येणार ? खो खो, हुतुतू, बॅडमिंटन इत्यादि खेळांसाठीं चमूमधील मुलींना किती तरी वेळां खेळावें लागतें, बरोबर आखलेल्या क्रीडाक्षेत्रावर ठराविक वेळांत खेळण्याची सवय करावी लागते. आणि हें सारें कशासाठीं ? तर कधीं कधीं खेळावयाच्या मॅचसाठीं. आणि मुलींना ज्या गोष्टी भावी आयुष्यांत सतत व सुलभतेनें करतां यावयास पाहिजेत, त्यांच्यासाठीं शाळेंत व घरांत काय केलें जातें ?

शाळांत त्या त्या विषयाचें तात्त्विक शिक्षण देणेंच शक्य आहे हें मान्य करणें भाग आहे. पण या तात्त्विक शिक्षणाला नित्याच्या प्रयोगांची जोड मिळाली नाहीं, तर तें नुसतें डोक्यांतच राहतें. हे प्रयोग वस्तुतः घरामध्येंच व्हावयास पाहिजेत. ते व्हावेत तसे होत नाहींत, ही वस्तुस्थिति आहे. तेव्हां या बाबतींत काय अड-चणी येतात त्यांचा सहानुभूतीनें विचार केला पाहिजे. मुलींचा सामान्यतः सहा-सात तास वेळ शाळेंत व शाळेच्या कामांत गेल्यावर त्यांना घरकाम सांगणें आईला कठिण वाटतें व मुलींनाहि ती सबब पुरेशी वाटते. पण या वृत्तीनें भागणें शक्य आहे का याचा आतां अवश्य विचार झाला पाहिजे. मागच्या पिढींतील कांहीं स्त्रिया शिकलेल्या असल्या, तरी जुन्या सवयीमुळें व जबाबदारीच्या कल्पनांमुळें त्या घरकामांत प्रवीण होण्याची दक्षता बाळगीत होत्या. त्यामुळें घरकाम सांभाळून बाहेरचें थोडेंबहुत काम करणें त्यांना शक्य होई. आजच्या मुलींना घरकामाचा कंटाळा येतो, शिरावर पडलें म्हणजे त्या कशा तरी धकवून नेतात एवढेंच. त्यांत व्यवस्था, नीटसपणा, हौस यांचें नांवहि दिसत नाहीं. नुसती कादंबरी हातांत घेऊन दिवसभर बिछान्यावर लोळत वाचावयास मिळालें कीं, त्या खूष असतात. घराबाहेर पडावयाचें तें सिनेमा पाहण्यासाठीं किंवा नाटक पाहण्यासाठीं. कधीं कोणत्या सभेला, चर्चेला किंवा निदान खेळण्यासाठीं किंवा दूर फिरण्यासाठीं त्या निघालेल्या क्वचितच दिसतात.

ज्या वाढत्या, विकसत्या, तरुण वयांत नवनवीन गोष्टी आंतल्या उसळीनेंच मुलींना कराव्याशा वाटाव्या, त्याच वयांत हा आळस, ही उदासीनता, हा निरु-त्साह कां दिसून येतो याचा खोल विचार केला पाहिजे. माझें तर या बाबतींतील निदान असें आहे कीं, गेल्या सातआठ वर्षांतील महागाई व सकस अन्नधान्याची दुर्मिळता यांमुळें शाळांत शिकतांना मुलींना अवश्य तें पोषण न मिळाल्यामुळें व शाळेच्या अभ्यासाचा त्यांतच ताण पडल्यामुळें त्या शारीरिक दृष्ट्या दुर्बल राहिल्या. शरीर दुर्बल असल्यावर कोणत्याहि शारीरिक किंवा मानसिक गोष्टींबद्दल उत्साह वाटणें कठिण आहे हें खरें आहे. परंतु शारीरिक दुर्बलता एवढेंच या निरुत्साहाचें कारण नव्हतें. गेल्या सात-आठ वर्षांत महायुद्ध, ऑगस्ट क्रांति व नंतर स्वातंत्र्याच्या आसपासचा अनिश्चित अस्थिर काळ या सर्व अत्यंत झपाट्यानें बदलणाऱ्या व परस्परविरोधी परिस्थितीमुळें नुसत्या भौतिक जीवनांतच नव्हे, तर

विचारांच्या व भावनांच्या मूल्यांमध्येंहि एक प्रकारची अनिश्चितता व अस्थिरता आली होती. आजहि ती चालूच आहे. या अनिश्चित काळांत जे स्पष्ट, स्थिर विचार व मूल्यें शालेय जीवनांत डोळ्यांपुढें असणें अवश्य आहे त्यांचा संपूर्ण अभाव होता. आईबाप पाठवतात म्हणून शाळेंत जावयाचें, मास्तर अभ्यास लादतात म्हणून तो करावयाचा अशीच शिक्षणाविषयींची भावना मुलांमुलींत बहुतांशीं रूढ झाली होती. शिक्षणाचें मूल्य कवडीमोल होत चाललें होतें. तेव्हांचें सरकार व कॉंग्रेसप्रणीत आंदोलन यांच्या परमविरोधामुळें शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्याध्यें अनादराची व अनास्थेचीच भावना वावरत होती. शिक्षकांविषयीं आदराची भावना असल्यावांचून खरें शिक्षण घेणें व शिक्षणाचा मनावर सुसंस्कार होणें अशक्य आहे. हें असलें शिक्षण म्हणजे निव्वळ पोपटपंचीच असते. पण क्वचित् कांहीं आदर्श शिक्षक वगळले, तर शिक्षक-विद्यार्थी यांच्यामधील भावना शिक्षणग्रहणाला विरोधी असल्यामुळें गेल्या सातआठ वर्षांत शिकलेल्या मुली मनानेंहि अस्थिर, अनिश्चित व उत्साहशून्य अशा राहिल्या.

खोलांत शिरून हें निदान करण्याचें कारण असें कीं, झालें त्याच्यावरून बोध घेऊन अनिष्ट गोष्टींची पुनरावृत्ति यापुढें तरी होऊं नये यासाठीं आपण कांहीं तरी प्रयत्न करावा. आज शाळेंत किंवा कॉलेजांत शिकणाऱ्या मुलींना पूर्वींच्या मानानें थोडी बरी परिस्थिति लाभली आहे. पण शिक्षकांविषयीं आदर व शिक्षणाविषयींची आवड या बाबतींत मात्र फारच मोठा पल्ला अजून गाठावयाचा आहे. शाळांतील परिस्थिति विशेष समाधानकारक नाहीं हें माहीत असूनहि प्रत्येक जाणत्या आईबापांना मुलींना शाळेंत पाठविण्यावांचून गत्यंतर नसतें. एक तर, या वाढत्या वयांतील मुलींना दिवसभर खरोखर चांगल्या व्यवसायांत गुंतविणाऱ्या अशा दुसऱ्या संस्था नाहींत. दुसरें असें कीं, शालेय शिक्षण व मॅट्रिकची परीक्षा या गोष्टींना समाजांत जी मान्यता आहे तिच्यामुळें मुलींना शाळेंत पाठविणें प्राप्त असतें. मुलगी तर शाळेंत जाणार, तेव्हां शाळेंत न मिळूं शकणाऱ्या पण भावी जीवनाला अत्यंत आवश्यक असणाऱ्या अशा शिक्षणाची सोय कशी करावयाची हा प्रश्न आपणांस सोडविला पाहिजे. शाळेंत गृहशास्त्र असलें, तरी उपयुक्ततेच्या व सवयीच्या दृष्टीनें त्याची किंमत फारच कमी आहे हें आपण पाहिलें. वस्तुतः घरोघर आईच्या देखरेखीखालीं स्वयंपाक व निरनिराळीं पक्वान्नें

करणें, कोठी सांभाळणें, घराची स्वच्छता इत्यादि गोष्टींचें शिक्षण मुलीला मिळालें तर तें उत्तम होईल. पण कित्येकदां माताच या बाबतींत कच्च्या असतात, किंवा घरांतील धबडग्यांत मुलीला जसें शांतपणें, व्यवस्थितपणें एकेका गोष्टीचें शिक्षण द्यावयास पाहिजे तसें देणें बऱ्याचशा मातांना अशक्य असतें. स्वतः सुगृहिणी व कर्तबगार असणाऱ्या माता मुलीला शिकविण्याच्या बाबतींत अयोग्य ठरतात. तेव्हां मला या बाबतींत पुढील सूचना करावीशी वाटते.

शाळेंत जाणाऱ्या आणि जवळ राहणाऱ्या आठ–दहा मुलींचा एकेक गट करावा. दर शनिवारीं व रविवारीं पूर्वींच्या भातुकलीप्रमाणें प्रत्येकीनें आपापला शिधा आणून एका घरीं संध्याकाळचा स्वयंपाक करावा. प्रत्येक कृति नीटनेटकी व्यवस्थित व घराच्या वातावरणांत शोभेल अशी झाली पाहिजे, यासाठीं एखाद्या शिकवूं शकणाऱ्या मातेनें अथपासून इतीपर्यंत देखरेख करावी व वेळोवेळीं उपयुक्त सूचना द्याव्या. कमींत कमी वेळांत सर्व पदार्थ व्हावेत यासाठीं अगोदर कार्य करावें, मागून काय करावें या सर्व गोष्टी मुलींच्या ध्यानांत आणून द्याव्या. साधा स्वयंपाक दोनतीन वेळांत आळीपाळीनें एकेकीवर मुख्य जबाबदारी टाकून करविल्यानंतर एकेक पक्वान्न दरवेळीं सुरू करावें. दिवाळींत किंवा मोठ्या प्रसंगीं आईच्या हाताखालीं करंज्या, चिरोटे, अनरसे, पुरणपोळ्या इत्यादि पदार्थांना मुली हातभार लावतात. परंतु प्रारंभापासून काय करावयाचें, कोणत्या चुका टाळावयाच्या हें त्यांना कधींच माहीत नसतें. एखादा पदार्थविज्ञानांतील किंवा रसायनशास्त्रांतील प्रयोग जसा करावयाचा, त्याच योग्यतेचा प्रयोग त्यापेक्षांहि नीटनेटकेपणानें आपण करीत आहोंत ही जाणीव वारंवार मुलींना करून द्यावी. देखरेख करणारी गृहिणी सुशिक्षित असेल, तर तिनें स्वयंपाकांतहि जेथें जेथें निरनिराळ्या शास्त्रांचा संबंध येत असेल, तेथें तेथें तो स्पष्ट करावा. आपण शास्त्रच शिकत आहोंत, त्याचाच महत्त्वाचा प्रयोग करीत आहोंत, 'निव्वळ घरकाम' या हेटाळणीच्या शब्दांनीं संबोधलें जाणारें काम हें नव्हे, हें मुलींच्या मनावर ठसविलें पाहिजे.

स्वयंपाकाच्या प्रयोगाबरोबरच आलटून पालटून घरांतील एकेका वस्तूची व निरनिराळ्या गोष्टींची स्वच्छता कशी ठेवावयाची त्याचेहि व्यवस्थित प्रयोग चालू ठेवावे. निरनिराळे डाग स्वच्छ करण्यासाठीं काय काय करावें याचेंहि प्रात्यक्षिक

करून घ्यावें. स्टोव्ह दुरुस्त करणें, अशासारखीं घरांत वारंवार करावीं लागणारीं दुरुस्तीचीं कामेंहि सशास्त्र पद्धतीनें करवून घ्यावीं. त्याचप्रमाणें थोडथोड्या गोष्टींतूनहि घराची सजावट कशी करावी याचेंहि शिक्षण प्रयोगरूपानें द्यावें.

शिशुसंगोपन व आजाऱ्यांची शुश्रूषा या गोष्टींचें प्रात्यक्षिक शिक्षण देण्यासाठीं मातांनीं सहकार्य केलें पाहिजे. घरांत स्त्री किंवा मूल आजारी असलें कीं, नर्स-प्रमाणें एकेका मुलीला काम करण्याची संधि द्यावी. म्हणजे घरांतील बाईचेंहि काम कमी होईल व मुलींनाहि शिक्षण मिळेल. जवळपासचीं घरें असलीं कीं, मुली एकमेकींकडे जाणाऱ्या असतात. त्यांच्या मातांचीहि एकमेकींशीं ओळख असते. नसली तर या निमित्तानें करून घेतली पाहिजे व एकमेकींच्या मुलींना गृहशिक्ष-णाच्या प्रयोगांचा लाभ घेऊं दिला पाहिजे. मुलींना घरकाम येईनासें झालें आहे, आम्हीं सांगितलें तर त्या लक्ष देत नाहींत, अभ्यासाची सबब सांगतात, अशी कुर-कुर बहुतेक मातांकडून ऐकूं येते. शाळेचें शिक्षण होतांच आपल्या मुलीला संसा-रांत पडावयाचें आहे हें त्या जाणतात व आज तिला सवय नाहीं झाली, तर पुढें कठीण जाईल हेंहि त्यांना समजतें. परंतु आज घरकाम व इतर जीवनोपयोगी कामाचा आपणांस अभ्यास असला, तरच पुढें घरकाम सांभाळून मनासारखीं इतरहि कामें करतां येतील, नाहीं तर नाहीं, हें तरुण मुलींना मात्र अजून समजूं लागलेलें नाहीं. हें त्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रथम प्रयत्न केला पाहिजे व मग त्यांच्या खुषीच्या सहकार्यानें गृहशास्त्राचा वर सुचविलेला प्रयोग व्यवस्थितपणें व कळकळीनें केला पाहिजे.

अर्थात् या सर्व गोष्टी प्रत्यक्षांत उतरविण्यापूर्वी मुलींच्या माता व मुली यांच्या-मध्यें पुष्कळच प्रचार करणें अवश्य आहे. कारण आजकाल सर्वांनाच जडलेल्या शैथिल्यांतून व प्रवाहपतित स्थितींतून मुलींना व स्त्रियांना बाहेर काढणें हें अतिशय चिकाटीचें काम होऊन बसलें आहे. आजच्या व भावी जीवनांत ज्यामुळें सुख लाभेल अशी गोष्ट करण्याकडे सामान्यतः माणसाची प्रवृत्ति असली पाहिजे असें आपण आजवर गृहीत धरून चालत होतों. परंतु दोन महायुद्धांच्या प्रचंड व सर्वजीवनव्यापी आघातांमुळें मनुष्यांतील स्वयंचलत्व जणुं बधिर होऊन गेलें आहे. म्हणूनच आज कोणतीहि लहानशी गोष्ट करण्यासाठींहि नेहमीं लागावी त्यापेक्षां दसपट शक्ति खर्च करावी लागते !

## . २ .

याच प्रचाराबरोबर मुलींमध्यें कणखर वृत्ति निर्माण करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. अशी वृत्ति जर त्यांच्यांत निर्माण झाली नाहीं, तर इतर सारी पूर्वतयारी लंगडी पडेल. म्हणून घरोघर जाणत्या मातांनीं या गोष्टीकडे कटाक्षानें लक्ष पुरविलें पाहिजे. गेल्या पिढ्यांची व सध्यांच्या शिकणाऱ्या मुलींच्या पिढीची थोडी तुलना केली म्हणजे आज कणखर वृत्तीचा इतका अभाव कां दिसून येतो याचीं कांहीं कारणें सांपडतील. आणि हीं कारणें हातीं लागलीं कीं, त्यांच्यावरचा उपायहि सापडूं शकेल. पंचवीस-तीस वर्षांपूर्वीं शिक्षणाचा प्रसार कमी असल्यामुळें सर्वसामान्य मुलगी आपलें भावी जीवन हें पत्नीचें, गृहिणीचें, मातेचें जीवन राहणार आहे हें गृहीत धरूनच चालत होती. अविभक्त कुटुंबें त्या वेळीं पुष्कळ मोठ्या प्रमाणांत अस्तित्वांत असल्यामुळें अशा कुटुंबांत लग्नानंतर आपणांस प्रवेश करावयाचा आहे हें ती जाणून होती. ती स्वतःहि अविभक्त कुटुंबांतच वाढलेली असल्यामुळें त्या कुटुंबांतील सुनेवर येऊन पडणारीं कर्तव्यें सतत तिच्या दृष्टीसमोरच असत. सासू-सासरा, दीर-जावा, नणंदा व इतर मंडळी या सर्वांच्या सहवासांत व सर्वांशीं मिळतें घेऊन आपणांस आयुष्य काढावयाचें आहे ही गोष्ट अगदीं तिच्या हाडींमांसीं भिनली होती. अपेक्षा कांहीं वेगळ्या व अफाट आणि प्रत्यक्ष जीवन मात्र या अपेक्षांशीं विसंगत अशा तऱ्हेची समस्या त्या वेळच्या मुलींच्या जीवनामध्यें फारशी कधीं निर्माण होत नव्हती. जें जीवन पुढें सासरीं घालवावयाचें त्याची थोडीबहुत व्यावहारिक व मानसिक पूर्वतयारी मुलीच्या माहेरीं होत असे. आणि अमुक कर्तव्यें आपणांस पार पाडलींच पाहिजेत ही गोष्ट, जाणिवेच्याहि कक्षेंत न येतां सहजप्रवृत्तीइतकी तिच्या मनांत बाणलेली असे.

पण नंतर शिक्षण आलें. पाश्चात्य जीवनांतून इकडे आलेल्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनांनीं मनें भारलीं गेलीं. स्त्रीचे अधिकार, स्त्रीच्या अपेक्षा हे शब्द प्रथमच कानांवर पडूं लागले. तरीहि जुनी जीवनरीत बहुतांश प्रमाणांत तशीच चालू असल्यामुळें पहिल्या-दुसऱ्या शिकलेल्या पिढींतील स्त्रियांच्या जीवनांत आजच्यासारख्या समस्या सामान्यतः निर्माण झाल्या नाहींत. पण आतां मात्र पाश्चात्यांकडून

आलेल्या, व आपल्या पांढरपेशा समाजानें बहुतांश पचनीं पाडलेल्या, अधिकार, व्यक्तिस्वातंत्र्य, इत्यादि कल्पनांचा पगडा प्रत्येक मुलीवर बसूं लागला. जुनी जीवनरीतहि बदलली आणि त्यामुळें या कल्पना व प्रत्यक्ष जीवन यांच्यांत अधिकाधिक विसंगति शिकलेल्या मुलीला आढळून येऊं लागली. वस्तुनिष्ठ दृष्टीनें सध्यांच्या परिस्थितीचा विचार केला तर व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनांनुसार जीवन जगतां येण्यास अधिकाधिक अनुकूल परिस्थिति आतां निर्माण झाली आहे. परंतु यासाठीं व्यक्ति जास्त कार्यक्षम, जास्त सुजाण, जास्त कणखर व जास्त व्यवहार-दृष्टीची बनणें अवश्य आहे. परिस्थितीची जी मर्यादा व्यक्तिजीवनावर पडते, ती ओळखण्यास व तिच्याशीं मिळतें घेऊन पुढें जाण्यास प्रत्येक व्यक्तीनें आतां शिकलें पाहिजे. शिक्षण घेण्याचा अधिकार, नोकरी किंवा उद्योग करून स्वतंत्रपणें पैसा मिळविण्याचा अधिकार—असे कितीतरी अधिकार आजच्या मुलींना प्राप्त झाले आहेत. पण हे अधिकार आपल्या सुखाच्या व समाजाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीनें वापरण्यासाठीं आजच्या मुलीला आपलें व्यक्तित्व अधिक जाणतें, अधिक कणखर आणि अधिक स्वाभिमानी करण्यास शिकलें पाहिजे.

विसाव्या शतकानें दिलेलें हें व्यक्तिस्वातंत्र्याचें शस्त्र आमच्या मुलींना पेलतां आलें पाहिजे. तरच त्यांचें जीवन समाधानी व स्वाभिमानी होऊं शकेल. पण नेमकी हीच तयारी करण्यास मुली कचरतात व आईबाप या तयारीकडे अजाणतेपणानें दुर्लक्ष करतात. जुन्या मातांना नवीन मुलींची श्रद्धाहीनता, निरुत्साह, कर्तव्यपालनाकडे दुर्लक्ष, सदैव असमाधानी वृत्ति—या गोष्टी समजतच नाहींत. मुलींनाहि या आपल्या व्याधीवर कांहीं उपाय केला पाहिजे याचीच जाणीव नसते. त्यामुळें मातेकडून त्यांना कांहीं मदत होत नाहीं आणि स्वतः कांहीं करावयास पाहिजे हें त्यांना माहीतच नसतें. आपण शाळेंत शिकत आहोंत तेव्हां परीक्षेची तयारी करणें हें आपलें कर्तव्य आहे, एवढेंच त्या जाणतात. शाळा व अभ्यास या गोष्टी कांहीं वर्षांनीं बंद होणार आहेत व एका नव्याच जीवनाला आपणांस प्रारंभ करावयाचा आहे, हें त्या शालेय व विद्यालयीन जीवनांत जणुं कांहीं विसरूनच जातात.

शिवाय शिकत असतांना निरनिराळ्या सुखवादी व विलासी कादंबऱ्यांच्या वाचनावरच बहुतेकींचें मानसिक जीवन पोसलें जातें. कादंबरींतील नायिकेच्या

ठिकाणीं साहजिकच स्वतःची स्थापना करण्याचा मनोधर्म असल्यामुळें, नायकासारखा पति भावी जीवनांत आपणांस मिळेल व जे प्रेमाचे नाजुक प्रसंग कादंबरींत रेखाटलेले असतात, तसेच जवळजवळ आपल्या जीवनांत घडतील अशा तऱ्हेची अपेक्षा नकळतच मुलीच्या मनांत बळावते. कठोर वस्तुस्थितीचें दिग्दर्शन करणाऱ्या व मनाला कणखर बनविण्याची शिकवण देणाऱ्या कादंबऱ्या मुलींना नकोशा वाटतात. या सर्व गोष्टींचा परिणाम असा होतो कीं, कादंबरींत वर्णिल्याप्रमाणें प्रीतिविवाह, नंतरचें प्रीतिजीवन व सुखपूर्ण वातावरण यासंबंधींच्या असंभवनीय अपेक्षा मुलीच्या मनांत दृढमूल होऊन बसतात. आणि प्रत्यक्ष विवाह करण्याची ज्या वेळीं वेळ येते त्या वेळीं स्वतःचा सहचर निवडण्यासाठीं थांबणें मुलीला जुळत नाहीं व तशी तिला संधीहि मिळत नाहीं. तेव्हां विवाहाच्या इच्छेमुळें ती आईबापांनीं शोधून आणलेल्या वराशीं विवाह करण्यास तयार होते. या विवाहांत साहाजिकच तिला कादंबरींतील प्रीतिविवाहाची उत्कटता व मधुरता अनुभवास येत नाहीं. त्याचप्रमाणें विवाहोत्तर जीवनांत कादंबऱ्यांतून वाचलेल्या गोड प्रसंगांचा अनुभव तिला फारसा येत नाहीं. सुखवादी कादंबऱ्यांतील नायकनायिकेच्या सुखपूर्ण जीवनांत सासूसासरा, दीरजावा, नणंदा किंवा दूरची नातेवाईक मंडळी यांची अडगळ कधीं नसते. पण प्रत्यक्ष जीवनांत मात्र बऱ्याच मुलींना पतीच्या या जवळच्या नातेवाइकांच्या सहवासांत मिळतें घेऊन राहावें लागतें. कादंबऱ्यांत मुलांमुळें जीवनांत निर्माण होणारे कष्ट व दगदग यांचें फारसें दिग्दर्शन नसतें. परंतु जीवनांत मात्र मुलीला उलटाच अनुभव येतो.

अशा तऱ्हेनें सुखवादी कादंबरीवाचनावर बऱ्याच मुलींचीं मनें पोसलीं जात असल्यामुळें तसेंच शारीरिक शिक्षण व आहार यांच्याकडील दुर्लक्षामुळें शरीरेंहि दुर्बल बनल्यामुळें आजच्या नवसंसारी गृहिणींचा, जीवनांत पावलापावलाला अपेक्षाभंगच झालेला आढळून येतो. एका स्वप्नमय जीवनाचें चित्र उराशीं बाळगणारी, शरीरानें व मनानेंहि दुर्बल आणि व्यावहारिक कामांची संवय नसलेली अशा तऱ्हेची आजची सर्वसामान्य गृहिणी आहे. अर्थात् कांहीं अपवादभूत मुली सांपडत नाहींत असें नाहीं. त्याचप्रमाणें संसारांत कसेंबसें जुळवून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करणाऱ्या गृहिणीहि आढळत नाहींत असें नाहीं. परंतु शरीरानें सुदृढ, हौशीनें, आनंदानें व कुशलतेनें संसार करणाऱ्या आणि पत्नी, गृहिणी

व माता या नात्यांनीं आपलें सांसारिक कार्य उत्तम पार पाडणाऱ्या स्त्रिया मात्र अधिकाधिक दुर्मिळ होत चालल्या आहेत. हें कटु सत्य आम्हांला दृष्टीआड करून भागणार नाहीं. संसारांतील दुर्लक्षाबरोबरच घराबाहेरील सामाजिक जीवनांत कार्य करण्याकडेहि नव्या स्त्रियांचें अधिकाधिक दुर्लक्ष होत असलेलें दिसतें, हेंहि विसरून चालणार नाहीं.

परिस्थितींतील सारी कठिणता ध्यानांत घेऊनहि आजच्या शिकणाऱ्या मुलींची वृत्ति जास्त कणखर, जास्त खेळकर व जास्त वस्तुनिष्ठ करण्याचे उपाय सांपडणार नाहींत असें नाहीं. एक तर सुखवादी कादंबऱ्या, सर्व सुखवादी चित्रपट व प्रेम-विव्हल व करुणविव्हल अशीं चित्रपटांतील भावगीतें यांचा मुलींच्या मनांवर चहूंबाजूंनीं होणारा प्रचंड वर्षाव कसा कमी करतां येईल हें पाहिलें पाहिजे. शाळांतील व इतर वाचनालयांतून सुखवादी कादंबऱ्या मुलींच्या हातीं जाणार नाहींत याबद्दलची काळजी यापुढें बाळगली पाहिजे. मुलींमध्यें बौद्धिक कुतूहल निर्माण करून त्याची पूर्तता करण्यासाठीं शाळांतून किंवा शाळांच्या बाहेर अभ्यासमंडळें किंवा कलाकौशल्य मंडळें काढून त्यांच्या द्वारा मुलींचा बौद्धिक विकास व कलाविकास होण्यास संधि मिळवून दिली पाहिजे. मुलींनीं जें वाचायचें तें विचारांना पोषक, भावनांना संस्कारी बनविणारें किंवा ज्ञानांत भर घालणारें असेंच राहील, इकडे शाळांतील शिक्षकांनीं व मातापित्यांनीं विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. त्याचप्रमाणें चित्रकला, संगीत, शिवण, विणणें, खेळ इत्यादींमध्यें मुलींना प्रवीणता मिळण्यासाठीं कलामंडळें काढणें अवश्य आहे. त्याचबरोबर घर ही गृहशास्त्राची प्रयोगशाळा करून गृहशास्त्रांतील प्रयोग मुलींना करतां यावेत याचीहि व्यवस्था झाली पाहिजे. अठरा वर्षांखालील मुलामुलींना, शैक्षणिक किंवा नुसते गंमतीचे असे चित्रपट सोडून इतर चित्रपट दाखविण्याची बंदी झाली पाहिजे. आणि यासाठीं लोकांनीं पुढाकार घेऊन अशी व्यवस्था घडवून आणली पाहिजे.

सुखवादी कादंबऱ्या व अतिभावनावादी चित्रपट यांचा मुलींच्या मनावर होणारा दुष्परिणाम नाहींसा करण्यासाठीं जोंवर लोकांकडून व विशेषतः मातांकडून कसो-शीनें प्रयत्न होणार नाहीं, तोंवर मुलींचीं मनें सुदृढ व कणखर बनविणें अशक्य होऊन बसेल. त्याचप्रमाणें जास्त जीवनोपयोगी कार्यांत मुलींचीं मनें गुंतविण्याचा

पद्धतशीर प्रयत्न जर झाला नाहीं, तर मुलींमधील आजचा स्वप्नाळूपणा व मानसिक दुर्बलता हीं नाहींशीं करणें अतिशय कठिण होऊन बसेल.

आजच्या मुलींचीं मनें कणखर, वस्तुनिष्ठ व जीवननिष्ठ बनविण्यासाठीं मातांनीं मुलींसाठीं काय करावें, कोणत्या गोष्टी टाळाव्या, कोणत्या व्यवसायांत विकसत्या तरुण मुलींचीं मनें व वेळ गुंतवून टाकावा हें सांगत असतांना मातांच्या व शिक्षकांच्या मार्गदर्शकत्वाखालीं मुलींनीं या सर्व गोष्टी करण्यास आवडीनें व हौशीनें पुढें सरसावलें पाहिजे, हें सांगणें क्रमप्राप्तच असतें. मातांच्या व शिक्षकांच्या प्रयत्नांशीं मुलींनीं सहकार्य करण्यांत कंटाळा केला किंवा नावड दाखवली, तर ते प्रयत्न कसे सफल होणार? म्हणून मुलींनींच परिस्थितीची जाणीव करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

परिस्थिति इतकी झपाट्यानें बदलत आहे कीं, या बदललेल्या परिस्थितींत आपलें स्थान, आपल्यापुढील कामें व भावी जीवनाचें साधारण स्वरूप या गोष्टींची जाणीव जर मुलींनीं करून घेतली नाहीं, तर प्रवाहपतिताप्रमाणें भलेंबुरें जीवन जगण्यावांचून त्यांना गत्यंतरच राहणार नाहीं. आणि कसें तरी जगावयाचें असलें, तर आठदहा वर्षें खर्च करून शिक्षण घेण्याची सुद्धां गरज वाटण्याचें कारण नाहीं. पण दुर्दैव हें आहे कीं, मध्यमवर्गीतील मुलींना शिक्षण हें आजकाल नेहमीच्या कपड्यालत्त्याप्रमाणें दिलें जातें. त्यासाठीं बराच खर्च केला जातो, एवढेंच नव्हे तर खाण्यापिण्याच्या अत्यावश्यक गोष्टींत काटकसर करून हें शिक्षण देणें आईबापांना आपलें कर्तव्य वाटतें. मात्र एवढें मोल देऊन दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा आपल्या मुलींना फायदा होत आहे किंवा नाहीं, इकडे आईबापांचें दुर्लक्ष होत आहे आणि एवढें भारी मोल देऊन आपणांस शिक्षण मिळत आहे, तेव्हां त्याचा पुरेपूर फायदा करून घेतला पाहिजे, याची जाणीव मुलींना असलेली दिसत नाहीं.

यासाठीं साधारणतः हायस्कुलांतील मुलींनीं आपणांस मिळणाऱ्या शिक्षणाचा जास्तींत जास्त फायदा करून घेण्यासाठीं आपापसांत चारसहा जणींचीं मिळून अभ्यासमंडळें काढलीं पाहिजेत. आपण जे विषय शिकत आहोंत त्यांचें आपणांस चांगलें ज्ञान व्हावें व त्या विषयांचा जीवनाशीं येणारा संबंध आपणांस स्पष्ट कळावा, यासाठीं एकेका विषयांत प्रवीण असणाऱ्या मुलीनें आपल्या इतर

सहाध्यायिनींना शनिवार-रविवारीं त्या त्या विषयांत तयार करावें. आपणांस समजलेला विषय दुसऱ्यास समजावून सांगतांना दोन तऱ्हेचा लाभ होत असतो. एक तर त्या त्या विषयाविषयींच्या आपल्या कल्पना जास्त जास्त स्पष्ट होत जातात, व त्यांतील तपशील जास्त रेखीव होत जातो. याशिवाय शिकविण्याचें आपलें कौशल्य कसाला लागतें व वाढत जातें. बुद्धिमान मुलींनीं आपल्या ज्ञानाचा फायदा आपल्या सहाध्यायिनींना अशा तऱ्हेनें देण्याचा उपक्रम सुरू केला कीं वर्गातील मुलींमध्यें एक प्रकारची आपुलकीची सहभावना निर्माण होते आणि या सहभावनेंतून परस्परसहकार्य, सहानुभूति व सुहृद्भाव हीं सहजपणें वाढीला लागतात.

आमच्या मध्यमवर्गातील मुली शिकत आहेत व वाढत्या प्रमाणांत शिकणार आहेत ही वस्तुस्थिति ध्यानांत घेतल्यावर हें शिक्षण जास्त लाभदायी कसें करतां येईल या गोष्टीकडेच लक्ष केंद्रित करणें योग्य होईल. म्हणून मुलींना मला जाहीरपणें विचारावेंसें वाटतें कीं, 'तुम्ही शिकत राहणार हें निश्चित आहे ना? मग ज्या शिक्षणावर तुम्ही दिवसांकाठीं सातआठ तास खर्च करणार, त्या शिक्षणाचें पुरेपूर माप आपल्या पदरांत पाडून घेण्यासाठीं झटणें तुम्हांला क्रमप्राप्तच वाटत नाहीं का?'—मी इतिहास शिकत असेन तर पुस्तकी इतिहास मला चांगला समजला पाहिजेच, पण इतिहासवाचनाचा जीवनावर काय परिणाम होतो तेंहि मला समजावून घेतलें पाहिजे आणि त्याचा चांगला परिणाम व्हावा यासाठीं मला प्रयत्न केला पाहिजे. भूगोल, विज्ञान, गणित, नागरिकत्व इत्यादि शास्त्रांचा असाच जीवनस्पर्शी अभ्यास करण्यास मीं लागलें पाहिजे. मानवांच्या जीवनावर या विषयांच्या ज्ञानाचा काय परिणाम होत आला आहे हेंहि मीं समजून घेतलें पाहिजे आणि माझ्या जीवनावर या विषयांच्या ज्ञानाचा काय परिणाम होतो तेंहि मीं पाहिलें पाहिजे.

शालेय जीवनांत असतांना मुलींना शाळेच्या अभ्यासांत व तदनुषंगिक गोष्टींतच सामान्यतः आनंद व हौस वाटते हें कधींहि विसरून चालणार नाहीं. भावी जीवनासाठीं त्यांची जी शारीरिक, बौद्धिक व भावनाविषयक तयारी व्हावयास पाहिजे, ती शालेय जीवनांतील अभ्यासांतून, इतर कार्यक्रमांतून व कुटुंबांतील नित्य जीवनांतूनच करणें आवश्यक आहे. भावी जीवनांत तुझ्यापुढें एवढे अडचणींचे डोंगर उभे राहणार आहेत, एवढ्या अपेक्षाभंगांना व

विफलतेला तुला तोंड द्यावें लागणार आहे, अशा तऱ्हेचें चित्र जर मुलीपुढें उभें केलें, तर एक तर त्यांना त्याचा अर्थबोधच होणार नाहीं, किंवा त्यांच्या उमलत्या मनावर त्याचा विपरीत परिणाम होईल. म्हणून मुलींच्या भावी जीवनांतील संभाव्य अडचणींची व परिस्थितीची जाणीव आम्हीं मातांनीं व शिक्षकांनीं बाळगावयास पाहिजे व त्यांतील थोडाथोडा भाग संधि येईल त्याप्रमाणें चातुर्यानें मुलींच्या मनावर बिंबविला पाहिजे.

मुलींचें काम एवढेंच कीं, त्यांनीं आपल्या कुटुंबांतील नेहमींच्या जीवनक्रमाकडे जरा जास्त लक्ष देण्यास शिकावें. आपल्या आईवर, बहिणीवर किंवा वहिनीवर कोणतीं कामें पडत आहेत व तीं कामें त्या कशा तऱ्हेनें पार पाडीत आहेत इकडेहि लक्ष असूं द्यावें. निव्वळ शाळेचा अभ्यास व मैत्रिणी यांच्यांतच मुली गुंग राहिल्या तर त्यांच्यांत स्वप्नाळूपणा, अव्यवहार्यता व शारीरिक श्रमांबद्दल नावड उत्पन्न होण्याचा संभव आहे. एवढ्यासाठीं घरांतील नित्याच्या कामांपैकीं एखादें-दुसरें काम तरी शाळेचा वेळ सांभाळून करण्याचा मुलींनीं निश्चय केला पाहिजे. बुद्धीला जसें लहान वयांतच वळण देणें अवश्य असतें, त्याचप्रमाणें शरीरालाहि कामाचें वळण देणें लहान वयांतच अवश्य असतें. सतरा-अठरा वर्षांपर्यंत शरीरश्रमाची व विशेषतः नित्याच्या कामाची संवय ठेवली नाहीं, तर पुढें आयुष्यांत श्रमाच्या कामांमुळें जास्त थकवा येतो आणि घरचें काम आणि इतर बौद्धिक व्यवसाय या दोन्ही गोष्टी साधणें मुलींना अशक्य होऊन जातें. शालेय जीवनांत एकेका विषयाच्या आवडीमुळें त्या त्या विषयांत रंगून जातांना मुलींनीं हा वरील इशारा अवश्य ध्यानांत ठेवावा. आज मला वाचनाची किंवा कोणत्या विशेष विषयाच्या किंवा कलेच्या अध्ययनाची आवड आहे, आणि पुढील जीवनांतहि थोडेंबहुत वाचन व अध्ययन मला चालू ठेवायचें आहे असें ज्या ज्या मुलीला वाटत असेल, तिनें तर शरीरश्रमाची सवय विशेष कटाक्षानें केली पाहिजे. दुर्बलशरीरी लोकांना पुढील आयुष्यांत दुर्बलबुद्धि व्हावें लागतें हें अशा मुलींनीं क्षणभरहि विसरतां उपयोगी नाहीं. भावी जीवनांत मी वाचन व अध्ययन चालू ठेवणार आहें, असें म्हणण्यापूर्वीं प्रत्येक मुलीनें यासाठीं आपणांस आज काय करावयास पाहिजे याचा पक्का विचार केला पाहिजे. वस्तुतः शरीर सुदृढ ठेवण्याची आवश्यकता प्रत्येकच मुलीला

आहे. परंतु जिला गृहिणीचें काम सांभाळून बौद्धिक व कलाविषयक कार्य पुढें चालू ठेवायचें आहे, तिला तर शरीरसुदृढतेची जास्तच गरज आहे.

सगळ्या शिकणाऱ्या मुलींना जाहीरपणें माझें असें सांगणें आहे कीं, 'शिक्षण घेतांना तुम्हांला आनंद वाटत असेल. आपल्या आईपेक्षां आपणांस कांहीं वेगळें जीवन मिळत आहे अशा खुषींत तुम्ही असाल. शिक्षण ही आहे खरीच भाग्याची गोष्ट. पण या शिक्षणाबरोबर आपल्या आईपेक्षां आपली जबाबदारी वाढलेली आहे हें मात्र तुम्ही विसरतां उपयोगी नाहीं. आईवर शिक्षणाचा भार पडला नसल्यामुळें व घरकामाची तिला संवय असल्यामुळें ती गृहिणीचा सामान्य भार सहज उचलूं शकली. शिक्षणासाठीं दिवसाकांठीं तुमचा सहासात तास वेळ जात आहे. तेव्हां उरलेल्या वेळांतच तुम्हांला घरकामाची सवय केली पाहिजे. तुमच्या आईपेक्षां तुमचा भार वाढला आहे. म्हणूनच तो सहजपणें पेलण्यासाठीं तुम्हांला शरीर अधिक सुदृढ केलें पाहिजे. आहार व व्यायाम यांचा योग्य तो उपयोग करून शरिराची शक्ति व काटकपणा हीं अधिक वाढवलीं पाहिजेत.'

शरीर सुदृढ व काटक करूनच भागणार नाहीं. भावनाहि जास्त सुदृढ व कणखर बनविल्या पाहिजेत. लहानसहान अडचणींनीं न डगमगतां, लहानसहान अपमानांनीं व्यथित न होतां, अडचणींवर मात करून पुढें जाण्याचें सामर्थ्य मनामध्यें निर्माण केलें पाहिजे, आणि अपमानापासून योग्य तो धडा घेऊन पुढें पाऊल टाकण्यास शिकलें पाहिजे. आणि ही जाणीव व वृत्ति मुलींमध्यें निर्माण व्हावी यासाठीं शाळांशाळांतील ज्या पुढारी व जाणत्या मुली असतील त्यांनीं आपापल्या वर्गापुरता हा उपक्रम सुरू केला पाहिजे. आईनें घरकाम सांगितलें कीं मुली दुर्लक्ष करतात. त्यांना वाटतें, न शिकलेल्या आईला कामावांचून दुसरें काय सुचणार ? पण वर्गातील बुद्धिवान पुढारी व विशेषतः श्रीमंत मुलीनें काम करण्याची प्रतिज्ञा केली कीं तिचें अनुकरण करण्यांत मुलींना कमीपणा वाटत नाहीं. शाळांशाळांमध्यें ज्या ज्या बुद्धिवान्, कर्तृत्ववान् व सुखवस्तु मुली असतील त्यांनीं जर या सर्व उपक्रमांचें नेतृत्व स्वीकारलें, तर शिकणाऱ्या मुलींच्या वृत्तींत व जीवनक्रमांत त्या खात्रीनें फार मोठें परिवर्तन घडवून आणूं शकतील. आईच्या, शिक्षिकेच्या किंवा मोठ्या पुढाऱ्यांच्याहि ज्या गोष्टी मुली ऐकणार

नाहींत, त्या त्यांच्याचमधील बुद्धिवान् व नेतृत्वकुशल मुलीनें सांगितल्या, तर त्या चटकन् अंमलांत आणल्या जातात.

. ३ .

माझ्या शालेय जीवनांत इतर मुलींचा अभ्यासाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा असे आणि आजच्या शालेय जीवनांत मुलींचा दृष्टिकोन कसा आहे याची मला बरीच कल्पना आहे. माझ्या काळीं फार थोड्या मुलींना शिकण्याची संधि मिळत असल्यामुळें मिळालेल्या संधीचा पुरेपूर उपयोग करून घेण्याची तळमळ त्या काळच्या मुलींमध्यें जास्त प्रमाणांत वसत असे. आज शिक्षण ही सर्वसामान्य गोष्ट होऊन बसल्यामुळें जशीं नित्याचीं कामें करणें आवश्यक आहे, तसेंच हें शिक्षण घेण्याचें काम करणें प्राप्त आहे, अशीच बहुतांश मुलींची धारणा झालेली दिसते. हा फरक क्षणभर बाजूस ठेवला, तर मात्र एकेका विषयाच्या ज्ञानाचा आपल्या जीवनाशीं संबंध जोडण्याचा प्रयत्न त्या काळच्या सर्वसामान्य मुली जशा करीत नसत, त्याचप्रमाणेंहि आजच्या मुली करीत नाहींत, असा माझा अनुभव आहे. अर्थात् याबद्दल मी शिक्षकांनाच मुख्यत्वें जबाबदार धरतें. इंग्रजी, मराठी, संस्कृत, गणित, इतिहास, भूगोल, नागरिकत्व, विज्ञान, गृहविज्ञान इत्यादि किती तरी विषय शाळांतून शिकविले जात आहेत. परंतु परीक्षेंत पास होण्यासाठीं विद्यार्थ्यांना तयार करणें यापेक्षां वेगळें कांहीं काम आपणांस करावयाचें आहे, याची शिक्षकाला जाणीवहि नसते. मग त्या दृष्टीनें प्रयत्न करणें तर दूरच. क्वचित् एखाददुसरा शिक्षक किंवा शिक्षिका मात्र या जाणिवेनें शिकवीत असतात.

या व्यवस्थेचा परिणाम असा होतो कीं, आईबापांनीं शाळेंत घातलें म्हणून शाळेंत जावयाचें आणि शिक्षक रागावतील किंवा शिक्षा करतील म्हणून नेमून दिलेला अभ्यास कसाबसा पार पाडावयाचा, एवढेंच काय तें मुलांमुलींना माहीत असतें. हा अभ्यासाचा डोंगर त्रासत कंटाळत कसाबसा पार केल्यावांचून घडगत नाहीं म्हणूनच मुलें तो पार करण्याचा प्रयत्न करतात. आवड, हौस, आनंद, रसग्रहण या गोष्टी तर सामान्यतः अभ्यासाच्या विषयापासून कायमच्या दूर झालेल्या दिसतात. मला वारंवार हा प्रश्न पडतो कीं, इतक्या रूक्षपणानें वर्षानुवर्षें हे विषय कां शिकविले

जातात आणि पिढ्यान्‌पिढ्या मुलें कंटाळत कंटाळत हे विषय कां शिकतात? शाळेंतील एकूणएक विषय शिक्षकानें आवड निर्माण करण्याच्या वृत्तीनेंच शिकविला पाहिजे आणि एकेका विषयाचा अभ्यास करतांना विद्यार्थ्यांना खेळाप्रमाणें हौस व आनंद वाटला पाहिजे. ही अत्यंत आवश्यक गोष्ट सर्वांनीं सोयिस्करपणें दृष्टीआड केलेली आढळून येते. कंटाळवाणीं व रूक्ष वाटतील अशींच पाठ्यपुस्तकें नेमणें आणि कंटाळा येईल अशाच पद्धतीनें प्रत्येक विषय शिकविणें हेंच आज सर्व-सामान्य शाळांचें लक्षण होऊन बसलें आहे.

शैक्षणिक संस्थांतील ही सध्यांची जीवनविघातक व विद्याविघातक परिस्थिति नाहींशी करण्यासाठीं मुख्याध्यापकांनीं व शिक्षकांनींच प्रथम पुढें सरसावलें पाहिजे. शाळेंत शिकविल्या जाणाऱ्या विषयांबद्दल मुलींनीं गोडी निर्माण करून घेतली पाहिजे आणि त्या त्या विषयांतील ज्ञानाचा संबंध आपल्या जीवनाशीं जोडला पाहिजे, असें सांगतां सांगतांच मुलींना सोडून मी शिक्षकांकडे कां वळलें असा प्रश्न कदाचित् कुणी करील. पण त्याचें उत्तर उघड आहे. प्रत्येक विषयाची एकदां तरी गोडी लावणारा शिक्षक जर मुलींना गवसला नाहीं, तर स्वतःच्याच बुद्धीनें अशी गोडी लावून घेणें हें काम फारच विरळा मुलगी करूं शकेल. पण मी सर्वसामान्य मुलींबद्दल बोलत आहें. म्हणूनच विषयाची गोडी लावणारा शिक्षक एखाद्या वर्गांत जरी लाभला, तरी त्यानंतर त्या विषयांतील गोडी कायम टिकविणें व वाढविणें हें काम मुलींना विशेष कठिण जाणार नाहीं.

गणित हा सामान्यतः विशेष कठिण विषय समजला जातो. परंतु गणिताचा जीवनाशीं पदोपदीं कुठेंकुठें संबंध येतो हें सांगणारा शिक्षक जर प्रारंभींच भेटला तर गणिताविषयीं एक वेगळ्याच प्रकारची गोडी व आपुलकी वाटल्या-वांचून राहत नाहीं. आपण पाहतों त्या प्रत्येक वस्तूला लांबी, रुंदी, उंची किंवा खोली असते. ती मोजायला लागलों कीं झाली गणिताला सुरुवात. त्रिकोण, चौकोन, वर्तुळ असे निरनिराळे आकार आपल्या ध्यानांत येऊं लागले कीं झाली भूमितीची सुरुवात. पाटी–पेन्सिली घेऊन नुसतीं काल्पनिक उदाहरणें करण्याऐवजीं भोवतालच्या वस्तु किंवा जीवनांतील व्यवहार घेऊन तेथल्या तेथें तयार केलेलीं गणितें जर मुलांना सोडविण्यास दिलीं, तर गणिताचा जीवनाशीं येणारा संबंध त्यांना समजतो, एवढेंच नव्हे, तर तो त्यांच्या मनांत कायमचा

दृढ होऊन जातो. अंकगणितांतील प्रत्येक विभागाचा जीवनव्यवहारांशीं असणारा संबंध तर शिक्षकाला थोड्या प्रयत्नानें समजावून सांगतां येईल. भूमिति व बीजगणित यांच्यांतील पुढचे विभाग सांगतांना मात्र शिक्षकाला भूमितीचा व बीजगणिताचा विज्ञानाशीं जो संबंध आहे तो स्पष्ट करावा लागेल. आम्ही ज्या रेषा व जीं वर्तुळें काढीत आहोंत व अक्षरांचे जे वर्ग व घन करीत आहोंत, त्यांचा महत्त्वाच्या शास्त्रांशीं संबंध आहे आणि त्यासाठीं आम्ही या उभ्या-आडव्या रेषा व लहानमोठीं वर्तुळें काढीत आहोंत हें जर विद्यार्थ्यांना सुलभतेनें समजावून सांगितलें, तर भूमितीचा व बीजगणिताचा अभ्यास ते निव्वळ यांत्रिक रीतीनें करणार नाहींत. महत्त्वाच्या शास्त्रीय विषयांचें हें प्रवेशद्वार आहे व एका विशिष्ट तऱ्हेचा या उभयतांचा संबंध आहे हें समजतांच विद्यार्थ्यांच्या जाणिवेचें, कल्पनेचें व कुतूहलाचें क्षितिज साहजिकच विस्तारत जाईल आणि आज पहिल्या वर्गांत पास झालेल्या विद्यार्थ्यांतहि खऱ्याखुऱ्या गणिती बुद्धीचा जो अभाव दिसून येतो तो कदापीहि आढळणार नाहीं.

केवळ स्वतःच्या बुद्धीवर विसंबून गणिताविषयीं आवड निर्माण करणें हें बुद्धिवान मुलींनाहि कठिण आहे हें मला मान्य आहे. म्हणूनच हें काम मुख्यतः शिक्षकांवरच सोपविणें भाग आहे. इतर विषयांच्या बाबतींत परिस्थिति अधिक अनुकूल असते. भूगोलासारखा विषय घेऊं. प्रांताचा असो, हिंदुस्थानचा असो कीं, जगाचा असो, एकदां भूगोल शिकण्यास सुरुवात झाली कीं, भोवतालच्या जीवनांत जेथें जेथें भूगोलांतील ज्ञानाची ओळख पटेल, तेथें तेथें ती सतत पटवीत गेलें पाहिजे. चंद्र, सूर्य, ग्रह, नक्षत्रें, ग्रहणें इत्यादि भाग तर घरबसल्या आकाशाचें अवलोकन करतां करतां पक्का होईल. कोठेंहि प्रवासाला निघालें कीं भोवतालीं दृष्टि फेकतांच भूगोलांतील एकेका भागाचीं प्रत्यक्ष उदाहरणें वाटेल तेवढीं सांपडतील. हा भूगोलांत पाठ केलेला डोंगराळ प्रदेश, हें मैदान, हें पठार, या नद्या, हे डोंगर हीं या विशिष्ट विभागांतील पिकें, या खाणी इत्यादि किती तरी गोष्टी प्रवासांत आपल्या ओळखीच्या म्हणून आढळतील. चार मंडळींत पीकपाण्याच्या गोष्टी निघाल्या कीं वऱ्हाडकडील माणूस जवारी, कापूस व तूर यांच्याबद्दल बोलेल, छत्तीसगडांतील माणूस धानाबद्दलचे अंदाज सांगेल आणि जबलपूर–सागरकडील माणूस गव्हाच्या पिकांबद्दल

समाधान व्यक्त करील. जेथें तेथें आपणांस शाळेंत शिकत असलेला भूगोल सांपडेल. पण ती दृष्टि तयार केली पाहिजे. शाळेंतील विषयांत शिकलेल्या गोष्टींची ओळख जीवनांत पटली पाहिजे आणि त्या त्या विषयांचा जीवनांत कोठें आढळ दिसला तें शाळेंत शिकतांना आठवलें पाहिजे.

हा दृष्टि तयार करण्याचा प्रश्न आहे. मला या ठिकाणीं 'रावबहादुर पर्वत्या' या विनोदी नाटकांतील एका प्रसंगाची आठवण द्यावीशी वाटते. रावबहादुर हे उलट्या अर्थानें विद्वान् होते. जवळ बाळगलेल्या शास्त्रीबोवानें गद्य व पद्य यांतील फरक स्पष्ट करून दाखवितांना कविता या पद्यांत असतात आणि इतर लिखाण व आपण नेहमी जें बोलतों त्याला गद्य म्हणतात, असें त्यांना सांगितलें. त्याबरोबर रावबहादुरांना मोठें आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, 'म्हणजे, आजपर्यंत मी गद्यांत बोलत होतों हें मला माहीतच नव्हतें. मीहि गद्यांत बोलतों तर!' जीवन व शैक्षणिक विषय यांची आपण नेहमींच सांगड घालीत राहिलों, तर असेच आश्चर्यांचे प्रसंग आपणांवर नेहमी येत राहतील आणि त्या आश्चर्या-बरोबर एक नवें गूढ उकलल्याचा आनंदहि आपणांस वाटत राहील. शाळेंत शिकलेल्या विषयाच्या माहितीचा कोणता कोणता भाग जीवनांत आढळतो या दृष्टीनें जर एकदां मुली जीवनाकडे पाहूं लागल्या तर गणित, भूगोल हेच विषय नव्हेत, तर पदार्थविज्ञान, रसायन, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र इत्यादि विषयांचीं प्रमेयेंहि त्यांना उठतां बसतां आढळतील. आणि जीवनांत तीं आढळल्यामुळें त्यांचा अभ्यासहि पक्का होईल.

भाषांच्या अभ्यासाची जीवनाशीं सांगड घालणें हें इतर विषयांच्या अभ्यासाच्या मानानें अधिक सहज व सुलभ आहे. तरीहि भाषांचा अभ्यास चालू असतांना ही सांगड घालण्याकडे शिक्षकांचें बऱ्याच ठिकाणीं दुर्लक्ष होत असल्यामुळें आणि मुलींनींहि सामान्यतः या दृष्टीनें भाषाविषयाकडे फारसें कधीं पाहिलेलें नसल्यामुळें ही सुलभ गोष्टहि कठिण झालेली आढळून येते. सामान्यतः मराठी, इंग्रजी व संस्कृत या क्रमानें भाषांचा अभ्यास होत असतो. प्राथमिक शाळांत भाषेसाठीं जीं पाठ्यपुस्तकें ठेवलीं जातात, तीं भाषेविषयीं व साहित्याविषयीं नावड उत्पन्न करण्यासच कारणीभूत होतात. कारण या पुस्तकांतील धडे हे, नेमून दिलेली माहिती त्या त्या धड्यांत समाविष्ट केली गेली आहे किंवा नाहीं, या गोष्टीकडेच

लक्ष देऊन लिहिले जातात. भाषेच्या द्वारा माणसांना सर्व विषयांचें ज्ञान करून घ्यावयाचें असतें हें कोणीहि मान्य करील. परंतु या ज्ञानाबरोबरच भाषेचें सौष्ठव व लालित्यहि दृष्टीसमोरून जात राहिलें व कानांवर पडत राहिलें, तर त्या भाषेविषयीं साहजिकच जास्त गोडी निर्माण होते. प्राथमिक शाळांत अनेक वर्षांपासून जीं पुस्तकें नेमलीं गेलीं आहेत, तीं या दृष्टीनें मुळींच समाधानकारक नाहींत.

हें झालें पाठ्यपुस्तकांविषयीं. प्रत्यक्ष धडा शिकवितांना, त्या धड्यांतील गोष्ट किंवा माहिती संपूर्णपणें ग्रहण व्हावी इकडे लक्ष न देतां धड्यावर येणारे प्रश्न मुलांना सोडवितां यावे या दृष्टीनेंच तो शिकविला जातो. ही पद्धत अर्थात् प्राथमिक व माध्यमिक शाळांतून बहुतांश शिक्षक अनुसरतात. यामुळें भाषाविषयाचे धडे मुलांना आनंददायक न वाटतां कंटाळवाणे वाटतात. पुष्कळ वेळां विनोदानें असें म्हटलें जातें कीं, "एखादी सुंदर कादंबरी किंवा नाटक नीरस करून टाकावयाचें असलें, तर तें अभ्यासक्रमांत नेमा. मुलांच्या मनांत नावड उत्पन्न करण्यासाठीं वेगळें कांहीं करावयास नको."

भाषाविषयाची गोडी मुलांच्या मनांत निर्माण करण्याआड, अशा तऱ्हेनें हे दोन डोंगर उभे असतातः चांगलीं सुरस पुस्तकें न नेमणें व नेमल्यास शिक्षकांनीं आपल्या शिकविण्याच्या पद्धतीमुळें त्यांची गोडी पार नाहींशी करून टाकणें. सुदैवानें माध्यमिक शाळांमध्यें पहिला डोंगर नाहींसा केला गेला आहे. दुसरा डोंगर नाहींसा करण्यासाठीं शिक्षकांनींच पुढें सरसावलें पाहिजे. मराठी ही आपली मातृभाषा असली, तरीहि मराठी विषयाचा कंटाळा करणाऱ्या किती तरी मुली सांपडतात. आणि याचें कारण एकच—चांगल्या शिक्षकांचा अभाव. मी जेव्हां माझ्या शालेय जीवनाकडे नजर फिरवितें तेव्हां मला या गोष्टीचा पुनःप्रत्यय येतो. सबंध शालेय जीवनांत एकच मराठीचे चांगले शिक्षक आम्हांस लाभले. पण त्यांनीं शिकविलेल्या अनेक धड्यांची व कवितांची स्मृति आजहि माझ्या मनांत ताजी आहे.

भाषेसाठीं नेमलेल्या पाठ्यपुस्तकांत जीवनाशीं निगडित असलेल्या किती तरी गोष्टींचा समावेश असतो. वारंवार आढळणाऱ्या मनुष्यस्वभावाचें चित्रण, भावना हेलावून टाकणाऱ्या उदात्त, करुण, अथवा आनंदपूर्ण प्रसंगांचें व्यक्तीकरण, मानवी

चारित्र्यावर ज्यांचा सखोल परिणाम व्हावा अशा व्यक्तींचीं चरित्रें व मानवी ज्ञानांत ज्यांच्यामुळें भर पडावी अशा विषयांचें सुरस वर्णन पाठ्यपुस्तकांतील धड्याधड्यांतून आढळतें. पण त्यांतील सौंदर्य पाहणारी दृष्टि आमच्याजवळ हवी, त्यांतील उदात्त भावनांचे संस्कार मनावर होण्यासाठीं आमचें हृदय संस्कार-क्षम हवें, त्यांतील जीवनस्पर्शी ज्ञान मनांत साठविण्यासाठीं ज्ञानाभिलाषी बुद्धि आमच्याजवळ हवी. चांगला शिक्षक भेटला आणि त्यानें पुस्तकांतील सादर्य आम्हांस दाखविलें, त्यांतील उदात्त भावनांचे संस्कार आमच्यावर घडविले आणि त्यांतील ज्ञानानें आमचीं मनें भरून टाकलीं तर उत्तमच. परंतु असे चांगले शिक्षक विरळा असतात हा माझा अनुभव आहे. म्हणून पाठ्यपुस्तकांतील उत्कृष्ट गोष्टी ग्रहण करण्यासाठीं आम्हीच आपली सौंदर्यदृष्टि, संस्कारक्षमता व ज्ञानाभिलाषा तयार केली पाहिजे. सर्वच मुलींना हें शक्य होणार नाहीं हें मी जाणून आहें. परंतु वर्गातील बुद्धिवान् व रसिक मुलींनीं आपल्या इतर सहाध्यायिनींना आपल्या रसग्रहणाचा लाभ करून दिला, तर पाठ्यपुस्तकांतील उत्तमोत्तम गोष्टींचा थोडा तरी ठसा त्यांच्या मनांवर उमटल्यावांचून राहणार नाहीं.

आज जो धडा अगर जें पुस्तक आपण वाचीत आहांत, त्याच्यावर येणारे प्रश्न आपणांस परीक्षेंत सोडवितां आले पाहिजेत, एवढ्याच दृष्टीनें जर आपण अभ्यास केला तर तो शेवटच्या परीक्षेनंतर तेथल्या तेथेंच थबकतो. जीवनांत आपण त्यांतून फारसें कांहीं बरोबर नेऊं शकत नाहीं. अभ्यासाची इतिश्री मॅट्रिकची परीक्षा पास होणें किंवा इंटर, बी. ए. इत्यादि परीक्षा पास होणें यांतच होते. पण या परीक्षा पास झाल्यानें आपण आयुष्याचा एक टप्पा तेवढा गांठतों. खऱ्याखुऱ्या आयुष्याला तर यानंतरच सुरुवात व्हावयाची असते. ही नुसती आयुष्याची पूर्वतयारी असते. म्हणून या पूर्वतयारीच्या काळांतून पुढील आयुष्यासाठीं जेवढें जेवढें आपण बुद्धींत साठवूं शकूं तेवढी खरोखर आपली तयारी झाली आहे असें आपणांस सार्थतेनें म्हणतां येईल.

यासाठीं धड्यांवरील प्रश्न सोडविण्यानें काम भागणार नाहीं. धडा वाचतांना त्यांत रंगून तो धडा किंवा ती कविता पूर्णपणानें ग्रहण केल्याशिवाय त्यांचा मनावर संस्कार होणार नाहीं. अर्थात् अशा वाचनानें त्या त्या धड्यांतील रस व आनंद मात्र पूर्णपणानें वाचणाराच्या वांट्यास येतो हेंहि विसरतां कामा

नये. भाषाविषयाच्या अभ्यासांतून जीं सौंदर्यस्थळें मनांत ठसतात त्यांचा पुढें जीवनांत किती तरी उपयोग होतो. शालेय व विद्यालयीन जीवनांत साहित्यांत व काव्यांत रमलेल्या मुलींना, साहित्यांतील सौंदर्यस्थलांचा जीवनांत किती व कसा उपयोग होऊं शकतो याची पुष्कळदां कल्पना नसते. शिक्षण पूर्ण झाल्यावर, वैवाहिक जीवनाला प्रारंभ केल्यावर दररोजच्या त्याच त्या गोष्टी करतांना आपण साहित्याच्या नंदनवनांतून रूक्ष सहारा वाळवंटांत येऊन पडलों आहोंत असें कांहीं जणींना वाटूं लागतें. कारण साहित्यांतील सौंदर्यस्थलांचा जीवनांत कोठें व कसा उपयोग होऊं शकतो हें त्यांना माहीत नसतें. लहानशा, अडचणीच्या घरांत राहत असतां व दररोजच्या ठरलेल्या कामामध्येंच वेळ घालवीत असतां कधींकधीं मनाला निराश वाटतें, सौंदर्याचें एकहि स्थल कुठें दृष्टीस पडत नाहीं म्हणून त्रासल्यासारखें वाटतें. अशा वेळीं खिडकींतून आकाशाचा निळाभोर तुकडा दिसावा किंवा दूरच्या पिंपळाच्या झाडाचीं सळसळणारीं पानें दिसावीं आणि निळ्या आकाशाच्या अथांगपणावरील एखादी सुंदर कविता आठवावी किंवा सळसळणाऱ्या पिंपळपानांवरील भावगीताच्या ओळी मनांत निनादूं लागाव्या आणि त्या काव्यांतील भावमाधुर्यानें मन आनंदून जावें—हा अनुभव आमच्या सुशिक्षित मुलींना येण्यास काय हरकत आहे ? तासन् तास कंटाळवाणीं कामें करतांना आपणांस आवडणारीं दीर्घकाव्यें गुणगुणण्यास जर आपण आरंभ केला, तर काव्याच्या प्रवाहांत कामाचा कंटाळवाणेपणा कोठल्या कोठें लोपून जातो.

ललित साहित्यांत किंवा काव्यांत सौंदर्याची लयलूट असते, तशी जीवनांत केव्हांहि अशक्यच असणार. परंतु साहित्याच्या वाचनानें व अभ्यासानें जर आपण आपली सौंदर्यदृष्टि तीव्र बनविली असली, तर जीवनांत आढळणाऱ्या सौंदर्य-कणांतूनहि आपणांस सौंदर्याचा व आनंदाचा लाभ झाल्यावांचून राहणार नाहीं. ही दृष्टि आम्हांला असली तर निसर्गसौंदर्याच्या लहान लहान दृश्यांतूनहि जसा आम्हांला आनंद होईल, त्याचप्रमाणें मानवी जीवनांतील लहान लहान पण भावसुंदर प्रसंगांतूनहि आम्हांला आनंद मिळवितां येईल. आमच्या मराठी शालेय पुस्तकांतून तुकाराम नामदेवादि संतकवींचे रसाळ अभंग, मोरोपंत-वामनादि विद्वान् कवींच्या दीर्घकाव्यांतील सुंदर विभाग, केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवि आदि आधुनिक कवींचीं वीणाकाव्यें कमी-अधिक प्रमाणांत प्रत्येक मुलीला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्वामित्व
अनुक्रम 23८८९० दि: ......
क्रमांक ......... नों: दि: ........


वाचण्यास मिळतात. त्याचप्रमाणें इंग्रजी पुस्तकांतून मिसेस हेमन्स, वर्डस्वर्थ, ग्रे इत्यादि कवींच्या मधुर कविताहि आढळतात. संस्कृत पाठ्यपुस्तकांतून कालिदास, भवभूति इत्यादि कवींच्या नाटकांतील किंवा काव्यांतील उत्तम सौंदर्यस्थळें विखुरलेलीं असतात.

जीवन जेव्हां जेव्हां कंटाळवाणें वाटतें व कामाच्या भाराखालीं जीव दडपून जातो, तेव्हां तेव्हां कंटाळा घालविण्यासाठीं व भार हलका करण्यासाठीं शालेय जीवनांत पाठ केलेल्या व आवडलेल्या कविता किती तरी साह्य करूं शकतात. लहान मुलांना अंगाईगीतें गातांना किती तरी कवितांची उजळणी करतां येते व मनाला किती तरी उल्हास वाटतो.

आयुष्यांत जेव्हां जवळच्या माणसांच्या मृत्यूसारखे प्रसंग किंवा इतर दुःखदायक आपत्ती येतात, त्या वेळींहि हें शालेय जीवनांत संचित केलेलें धन उपयोगी पडतें. पण या प्रसंगीं वेगळ्याच कवितांचा आश्रय घ्यावा लागतो. अत्यंत कठिण व दुःखदायक विपत्तीमुळें मन डगमगूं लागलें, हृदय भावनाघातामुळें सहस्रशः खंडित होऊं लागलें कीं, भगवद्गीतेंतील 'स्थितप्रज्ञस्य का भाषा' या शब्दांनीं प्रारंभ होणारे श्लोक सतत मनांत घोळवीत राहिल्यानें एक प्रकारचें विलक्षण धैर्य मनाला प्राप्त होऊं शकतें व एक प्रकारची शांति हृदयाला लाभते. पुढचा मार्ग हळूहळू दिसूं लागतो. 'असतो मा सद्गमय। तमसो मा ज्योतिर्गमय। मृत्योंमाऽमृतं गमय।'—अशांसारखीं कितीतरी स्फूर्तिदायी व धैर्यदायी वचनें आपणांस संस्कृत वाङ्मयांत सापडतील. शालेय पुस्तकांत तीं जरूर आलीं पाहिजेत असें माझें मत आहे. त्या वेळीं त्यांचा नीटसा अर्थ कळणार नाहीं हें मी जाणून आहें. पण त्यांचा जीवनांत काय उपयोग होऊं शकेल याची कल्पना जर शिक्षकानें सहृदयतेनें दिली, तर त्या वेळीं न समजलेला अर्थ पुढील आयुष्यांत योग्य वेळीं खात्रीनें समजेल असा माझा विश्वास आहे.

सारांश, शालेय जीवनांत जर भाषेच्या पाठ्यपुस्तकाचा मुलींनीं सहृदयतेनें व ग्रहणक्षमतेनें अभ्यास केला, तर पुढील आयुष्यांत लहानमोठ्या सर्वच कष्टांच्या व दुःखांच्या प्रसंगीं त्यांना तो मित्रासारखा उपयोगी पडल्यावांचून राहणार नाहीं. हा माझा अनुभव आहे आणि शिकणाऱ्या मुली जर आस्थेनें अभ्यास करूं लागल्या, तर त्यांनाहि हाच अनुभव आल्यावांचून राहणार नाहीं, अशी माझी खात्री आहे.

आज शाळेंत खेळल्या जाणाऱ्या खेळांतूनहि असेंच पुढें उपयोगी पडणारें धन आपणांस सहज सांठवून ठेवतां येईल.

आजकाल सर्व शाळांतून खो खो, हुतुतू, लंगडी, लगोऱ्या, बॅडमिंटन इत्यादि खेळ खेळले जातात. संमेलनांच्या किंवा अशाच दुसऱ्या निमित्तानें या खेळांच्या मॅचेस खेळल्या जातात आणि यांच्याचबरोबर धावण्याच्या शर्यती, पोत्यांतून पळण्याच्या शर्यती, रस्सीखेच इत्यादि इतरहि खेळांच्या शर्यती खेळल्या जातात. बहुतेक शाळांतून क्रीडांगणासाठीं पुरेशी जागा नसल्यामुळें हे वरील खेळ स्पर्धेमध्यें भाग घेऊं शकणाऱ्या मुलींपुरतेच मर्यादित झालेले दिसतात. शाळेचें शिक्षण एकूणएक मुलीला वेगवेगळ्या वर्गांतून भल्याबुऱ्या तऱ्हेनें दिलेंच पाहिजे हा जसा शाळेचा कटाक्ष असतो, तसा खेळांच्या बाबतींत मात्र मुळींच दिसून येत नाहीं. शाळेच्या वेळा, क्रीडांगणाची अपुरी सोय या अडचणी खेळांच्या आड असतात यांत शंका नाहीं. परंतु या अडचणी असतांहि शारीरिक शिक्षण व खेळ यांचें स्पर्धांक्षेत्रापलीकडील महत्त्व जर चालकांना पुरेपूर जाणवलेलें असलें, तर ते मुलींच्या खेळांकडे जास्त लक्ष पुरवूं शकतील हें निश्चित. केवळ मॅचेसमध्यें खेळण्यासाठीं विवक्षित मुली तयार करण्याचें धोरण सोडून, शाळेंतील सर्वच मुलींना-दररोज किंवा निदान आठवड्यांतून दोनतीनदां खेळण्याची संधि मिळालीच पाहिजे हें धोरण जर ठेवलें तर बहुतांश मुलींना आठवड्यांतून कांहीं दिवस तरी खेळण्याची संधी मिळाल्यावांचून राहणार नाहीं. पण खेळांचा शरीरावर होणारा सुपरिणाम व वृत्तीवर होऊं शकणारा सुपरिणाम यांचें महत्त्व बहुतांश शाळाचालकांना वाटत नाहीं. आणि वाटलेंच तरी प्रत्यक्ष कृतींत त्या महत्त्वाची जाणीव उतरविण्याचा प्रयत्न त्यांच्या हातून होत नाहीं हें खास.

खेळांकडे असणारें हें दुर्लक्ष व खेळांचा केवळ मॅचेसमध्यें उपयोग करण्याची ही प्रवृत्ति यांमुळें चालू असलेल्या खेळांचा शरीरावरहि चांगला परिणाम होत नाहीं; मग वृत्तीवर परिणाम होणें तर दूरच राहो. 'मॅचमध्यें आमच्या मुली जिंकोत कीं हरोत, खेळांचा त्यांच्या शरीरावर योग्य तो परिणाम झाला पाहिजे एवढें आम्ही पाहणार आणि त्याचबरोबर खेळांमुळें जे गुण मुलींमध्यें उत्पन्न व्हावयास पाहिजेत ते उत्पन्न करण्याकडेच आम्ही लक्ष पुरविणार,' असा जर निश्चय एखाद्या समंजस शाळाचालकानें केला, तरच खेळांचा शरीराला व

मनाला जो लाभ व्हावयास हवा तो होण्यासारखी परिस्थिति निर्माण होईल. मॅचेसवर भर देण्यांत आल्यामुळें एक अनिष्ट स्पर्धावृत्ति मुलींमध्यें निर्माण होते, खेळूं नये अशा वेळींहि खेळण्याची गरज निर्माण होते, शरीराला आवश्यक आहे त्यापेक्षां अधिक श्रम करण्याचा प्रसंग वारंवार येतो आणि मॅचमध्यें खेळणाऱ्या मुलींखेरीज इतरांना खेळण्यासाठीं क्रीडांगण मिळत नाहीं. या परिस्थितीच्या उलट जाऊन शाळेंतील सर्व मुलींना खेळण्यास मिळालें पाहिजे एवढा एकच हेतु नजरेसमोर ठेवून जर क्रीडांगणाचा लाभ सर्वांना देण्यांत आला तर योग्य तेवढा व्यायाम खेळाच्या द्वारां मिळून खेळांचा वृत्तीवर होणारा सुपरिणामहि हळुहळू होतांना दिसेल. एवढेंच नव्हे, तर आज मॅचेसमध्यें वारंवार खेळणाऱ्या बहुतेक मुलींची प्रकृति अतिश्रमामुळें बिघडून गेलेली जी दिसते ती दिसणार नाहीं आणि खेळांचा लाभ मात्र सर्वांच्याच पदरांत पडेल.

शाळकरी मुलींना वस्तुतः खेळ हे सहजच आवडले पाहिजेत. या वयांत क्रीडाप्रियता ही नैसर्गिकच आहे. परंतु शहरी जीवनांतील अनैसर्गिक राहणीमुळें साऱ्याच निरामय नैसर्गिक प्रवृत्ति नाहींशा होऊं लागल्या आहेत. तेव्हां शाळेच्या क्रीडांगणावर तरी पुन्हा मुलींच्या नैसर्गिक प्रवृत्ति जागविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. खेळांची निवडहि अशी केली पाहिजे कीं, ज्यांच्या द्वारां सहज सर्वांगीण व्यायाम होईल आणि खेळकरपणा व वृत्तीचा सुदृढपणा वाढेल. खेळांत जिंकलें कोण व हरलें कोण या गोष्टीला थोडेंहि महत्त्व न देतां चांगलें कोण खेळलें, व मनापासून कोण खेळलें या गोष्टीलाच महत्त्व राहील, इकडे कटाक्षानें लक्ष पुरविलें पाहिजे. शाळेंत एकेक विषय शिकत असतांनाहि मार्क किती मिळाले, व नंबर कितवा आला, यापेक्षां मीं ग्रहण काय केलें याकडे जसें मुलीनें अधिक लक्ष पुरविलें पाहिजे, त्याप्रमाणें खेळांतून मला आनंद किती वाटला, किती चांगला व्यायाम झाला व किती खेळकरपणा माझ्यांत निर्माण झाला हेंच मुलीनें पाहिलें पाहिजे. आणि खेळांवर लक्ष पुरविणाऱ्या शिक्षकांनींहि याच वृत्तीनें खेळांचें निरीक्षण व नियंत्रण केलें पाहिजे. आपल्या देखरेखीखालीं खेळणारी मुलगी मॅचमध्यें बक्षिस मिळवो कीं न मिळवो, पण आयुष्यांत मात्र तिची प्रकृति सुदृढ व वृत्ति खेळकर राहिली पाहिजे, याची जाणीव शिक्षकानें जरूर ठेवली पाहिजे.

शालेय जीवनांतील काळांत, खेळण्याची प्रवृत्ति सर्व मुलींमध्यें असली पाहिजे

ही नैसर्गिक स्थिति आहे खरी. पण शरीरप्रकृति सुदृढ नसल्यामुळें किंवा फॅशनच्या चमत्कारिक कल्पनांमुळें बऱ्याच मुली खेळण्याचा कंटाळा करतात व खेळण्याची सक्ति झाल्यास खेळ टाळण्यासाठीं नाना युक्त्या योजतात, ही गोष्ट मीं माझ्या शालेय जीवनांतहि पाहिली आहे व आजहि तीच दिसत आहे. मुलीला तात्कालिक आजार झालेला असला तर त्या वेळीं तिला खेळापासून सुटी द्यावीच लागते. किंवा कायमची व्याधि जडलेली एखादी मुलगी असली तर नेहमींसाठींच तिला खेळापासून सुटी देणें भाग असतें. पण एवढे अपवाद सोडले, तर प्रत्येक मुलीला दररोज कांहीं वेळ एखाद्या चांगल्या खेळांत भाग घेणें आवश्यक केलें पाहिजे. अर्थात् सक्ति न करतां खेळांचा शरीरावर व मनावर होणारा चांगला परिणाम मुलींच्या मनावर ठसवून मगच त्यांना खेळण्यास प्रवृत्त केलें पाहिजे. उत्तम गोष्टहि आवड उत्पन्न न करतां कोणाला दिली, तर ती त्याला अत्यंत अप्रिय वाटल्यावांचून रहाणार नाहीं. तेव्हां खेळांबद्दल आवड उत्पन्न करण्यावर शालेय जीवनांत चालकांनीं व शिक्षकांनीं भर दिला पाहिजे.

खेळ आवडून खेळायला लागल्यानंतर त्यांतून मनाला होणारा आनंद कांहीं वेगळाच असतो. असा खेळ व्यायामाच्या रूपानें शरीराला उपकारक होत असतोच. परंतु मनाला मिळणाऱ्या आनंदामुळें तो मनालाहि उपकारक होत राहतो. खेळ खेळतांना रंगून जाण्याची ज्यांची वृत्ति बनते त्यांना भोवतालच्या सर्व त्रासांचा व अडचणींचा पूर्ण विसर पडतो. आपलें सर्व बळ एकवटून खेळ खेळत राहिल्यानें एक प्रकारच्या तल्लीनतेचा व सामर्थ्याचा एकत्रित प्रत्यय येत राहतो. खेळांत प्रतिस्पर्धी जितक्या चांगल्या, तितक्या प्रमाणांत त्यांच्यावर मात करण्यासाठीं आपणांसहि आपली शक्ति व कौशल्य सतत वाढवीत राहावें लागतें. डाव हरण्याच्या बेतावर आला असतां मन शांत ठेवलें, तर डाव उलटवून जिंकतां येतो. या अनुभवामुळें प्रतिकूल परिस्थितींतहि एक प्रकारचें धैर्य मनामध्यें स्थिरावत राहतें. अर्थात् खेळांतील एकेका गोष्टींत जसें रंगून खेळावयाचें, त्याचप्रमाणें खेळाचे मनावर होणारे संस्कारहि जाणतेपणानें घेत राहिलें पाहिजे. तरच खेळांचा जीवनांत पदोपदीं फायदा झाल्यावांचून राहणार नाहीं.

खेळामध्यें एका विशिष्ट खेळापुरती निर्माण होणारी कणखर व अडचणींवर

मात करूं शकणारी अशी वृत्ति जर सतत जीवनांत रुजत गेली, तर पुढील आयुष्यांतील अडचणींशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य व प्रतिकूल परिस्थितीशीं झगडतांना कायम ठेवावयाचें धैर्य आपणांस सहज प्राप्त होईल. पण खेळामुळें निर्माण होणारे हे गुण अंगीं बाणण्यासाठीं शालेय जीवनांत सतत खेळत राहिलें पाहिजे आणि खेळांतील खेळाडूपणा जीवनांत सतत दरवळत राहिला पाहिजे.

# नव्या घराच्या उंबरठ्यांत

आजच्या मातापित्यांसमोर व खुद्द तरुण मुला-मुलींसमोर सर्वांत कठिण असा जर कोणता प्रश्न उभा राहत असेल, तर तो विवाहाचा. मुलांच्या विवाहाचा प्रश्न मातापित्यांच्या दृष्टीनें अर्थातच कठिण नसतो. पण समंजस व विचारी तरुणालाहि मनासारखा विवाह होणें हें किती कठिण आहे याची जाणीव झाल्यावांचून राहत नाहीं. पण आईबापांच्या व खुद्द मुलीच्याहि दृष्टीनें मुलींच्या विवाहाचा प्रश्न हा दिवसेंदिवस कठिणतर होत चालला आहे हें मात्र निर्विवाद आहे.

मुलगी जोंवर शाळेंत शिकत असते, तोंवर आईबाप निर्धास्त असतात. पण एकदां ती मॅट्रिक झाली कीं, त्यांच्या विवंचनेला सुरुवात होते. आणि विद्यालयांतील एकेक परीक्षा ती जसजशी उत्तीर्ण होत जाते, तसतसा त्यांच्या विवंचनेचा काटा वरवर सरकूं लागतो. मुलगी बी. ए. किंवा एम्. ए. झाली कीं तिच्या विवाहाविषयींची चिंता आईबापांच्या मनांत घरच करून राहते. वस्तुतः मुलीच्या विवाहाचा प्रश्न हा आईबापांना अनादिकालापासून कठिणच वाटत आला आहे. पण बालविवाहाची प्रथा जोंवर आपल्या मध्यमवर्गांतहि सरसहा चालू होती, तोंवर हा कठिणपणा मर्यादित होता. आईबाप आपल्या मतानें वर पसंत करीत असत. मुलीच्या पसंती-नापसंतीचा प्रश्नहि कधीं उद्‌भवत नसे.

पण जों जों विवाहाचें वय वाढूं लागलें, मुली शिकूं लागल्या, व त्यांची भावी पतीविषयींची पसंती हा एक महत्त्वाचा घटक वरसंशोधनकार्यांत होऊन बसला,

तों तों वरसंशोधन अधिक कठिण होऊं लागलें. तरीहि आजच्याइतका हा प्रश्न कधींच कठिण झाला नव्हता. कारण वधूवरांच्या आपापल्या भावी जोडीदारासंबंधींच्या आकांक्षा आतां अधिकच वाढल्या आहेत, आणि त्यामुळेंच त्या आकांक्षांची पूर्तता होण्याचें क्षेत्र अधिकाधिक मर्यादित होत चाललें आहे. शिकणाऱ्या मुली पूर्वी सामान्यतः सुखवस्तु कुटुंबांतूनच येत असत. त्यामुळें भावी पतीविषयींच्या आकांक्षांमध्यें आर्थिक सुस्थिति ही एक जी अपेक्षा असे तिची पूर्तता सामान्यतः सहज होत असे. आतां शिकणाऱ्या मुली अगदीं गरीब वर्गांतूनहि येतात. शिक्षणकालांत इतर सहाध्यायिनींप्रमाणें त्यांच्याहि आकांक्षा बऱ्याच वाढलेल्या असतात. शिक्षणामुळें व विशेषतः सुखवादी कादंबऱ्यांच्या वाचनामुळें वैवाहिक जीवनाविषयींच्या त्यांच्या अपेक्षा बऱ्याच प्रमाणांत स्वप्नरंजनी बनतात. याच त्यांच्या विवाहाच्या मार्गांत धोंड निर्माण करतात.

आईबापांनीं निवडलेल्या वराबरोबर विवाह करण्याची ज्यांची तयारी असते त्यांच्या बाबतींत आईबापांना विशेष प्रश्न पडत नाहीं. तरीहि शिकलेल्या मुलीला शिकलेला व साधारण सुस्थितींतला वर शोधून देण्यासाठीं त्यांना प्रयासच पडतात. परंतु मुलगी 'दाखविण्याची' प्रथा ज्या मुलींना व पालकांना आवडत नाहीं, एक जाणती, जागृत व्यक्ति या नात्यानें ज्या मुलींना ही प्रथा अत्यंत अपमानकारक वाटते, परंतु स्वतः आपला वर शोधून काढण्याइतकी जिला संधि मिळत नाहीं, अशा मुलींच्या बाबतींत मात्र विवाहाचा प्रश्न अतिशय कठिण होऊन बसतो. ज्या जोडीदाराबरोबर उभें आयुष्य काढावयाचें तो आपणांस पसंत असला पाहिजे, त्याचा आपला चांगला परिचय झाला पाहिजे, आपणां उभयतांचे स्वभाव व आवडीनावडी परस्परांना पसंत असल्या पाहिजेत असें ज्या मुलींना साहजिकच वाटतें, त्यांच्या विवाहाचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें आपल्या समाजांत अजून कांहींच सोय झाली नाहीं. सहशिक्षण असणाऱ्या विद्यालयांत मुलांमुलींचा कधींकधीं थोडाबहुत परिचय होतो, पण तोहि अपवादरूपच असतो. विवाहेच्छु व विवाहयोग्य अशा तरुणतरुणींना परस्परांचा परिचय व्हावा, निरनिराळ्या प्रसंगांतून एकमेकांच्या स्वभावांचें अधिक ज्ञान व्हावें व त्यांतून त्यांनीं परस्परपसंती करावी यासाठीं कसलीच सोय केलेली दिसत नाहीं. यामुळें आपला जोडीदार अगर आपली जोडीदारीण आपण परिचयानंतर निवडावी अशी तरुणतरुणींची जी

सहज अपेक्षा असते ती पुरी होणें कठिण होऊन जातें. आणि म्हणूनच मुलीला एकदां 'पाहूनच' मुलाला आपली पसंती-नापसंती कळवावी लागते. आणि 'पाहण्यास' आलेला मुलगा पसंत नसल्यास आपली ना पसंती व्यक्त करण्याची मुलीला जरी मुभा असली, तरी तिच्या निवडीचें क्षेत्र 'पाहण्यास' येणाऱ्या तरुणापुरतेंच मर्यादित राहतें.

आजची परिस्थिति ही अशी आहे. क्वचित् कांहीं प्रेमविवाह घडून येतात व क्वचित् ठिकाणीं मुलीला एखादा तरुण पसंत असल्यास तो तिला 'पाहायला' न जातांहि ती त्याला आपली इच्छा कळविते. पण हे आज तरी बऱ्याच प्रमाणांत अपवाद आहेत. बहुतांश मध्यमवर्गीय मुलांमुलींचीं लग्नें एकमेकांना 'पाहूनच' होत असतात. पूर्वीच्या विवाहापेक्षां एक प्रगतिपर गोष्ट मात्र निश्चितपणें दिसून येते. ती म्हणजे मुलीला मुलगा पसंत असल्याशिवाय तिचें सामान्यतः लग्न होत नाहीं. यामुळें संसाराच्या उंबरठ्यावर जेव्हां वधू-वर पाऊल टाकतात, त्या वेळीं परस्परांच्या पसंतीनेंच टाकतात, हें निश्चित आहे. प्रारंभींची ही परस्परां-विषयींची आवड जन्मभर कायम टिकविण्यासाठीं मात्र दोघांनाहि त्याग करावा लागेल, सहिष्णुता अंगीं बाणवावी लागेल व प्रसंगीं आपल्या अनेक आवडी-नावडींना मुरड घालावी लागेल. नुसती धंद्यांतील भागीदारी टिकवायची असली, तरी वरील गुण दाखवावे लागतात. मग जीवनाची भागीदारी टिकविण्यासाठीं व सफल करण्यासाठीं तर या गुणांची किती तरी वाढ करावी लागेल.

गेल्या कित्येक वर्षांत मनोविश्लेषणशास्त्राची माहिती शिक्षित समाजामध्यें पसरल्यामुळें, त्या शास्त्राचा सोइस्कर आधार घेऊन कित्येक विकृत व बेजबाबदार भावनांचें व प्रवृत्तींचें समर्थन करण्याचा प्रयत्न झाला. कांहीं कादंबऱ्यांतून, कांहीं लघुकथांतून व कांहीं लेखांतून लैंगिक नवमतवादाच्या नांवाखालीं विकृत भावनांचें जें समर्थन केलें गेलें व अस्थिरतेचें, रुचिपालटाचें व वैषयिकतेचें मोठमोठ्या व गोंडस नांवांखालीं जें कौतुक करण्यांत आलें त्यामुळें वैवाहिक जीवनावर फार मोठा आघात झाला. नव्या म्हणविणाऱ्या लोकांत फुलपांखरी मनोवृत्ति ही प्रगतिशाली समजली जाऊं लागली. पतीनें किंवा पत्नीनें जरा मना-विरुद्ध कांहीं केलें कीं, हा आपल्या व्यक्तित्वाचा अपमान झाला असें समजून पत्नीनें किंवा पतीनें परस्परांचा त्याग करणेंच इष्ट, अशा तऱ्हेच्या कल्पना फोफावूं

लागल्या. परस्परांसाठीं त्याग करणें, तडजोड करणें, संयम दाखविणें, सहिष्णुता व्यक्त करणें हे गुण जुन्या बुरसटलेल्या काळांतील आहेत, असें मानलें जाऊं लागलें.

गेल्या पन्नास-साठ वर्षांत अनेक अन्याय्य बंधनांतून, जुलमी रूढींतून मुक्त होण्याची समाजांतील निरनिराळ्या दलित वर्गांची व विभागांची जी धडपड चालू होती, तिच्यामुळें कदाचित् वर उल्लेखिलेली परिस्थिति अपरिहार्यपणें उद्यास आली असावी. अन्याय्य कां होईना, पण बंधनें तोडतांना जो उद्दामपणा निर्माण होतो त्यांतून वर वर्णिलेल्या भावनांचें व प्रवृत्तीचें कौतुक होऊं लागलें असावें. पण आतां निदान मध्यमवर्गांत तरी अन्याय्य रूढींचें निर्मूलन होऊन बरींच वर्षें लोटलीं आहेत, स्त्रीशिक्षणाचा बराच प्रसार झाला आहे व व्यक्ति या नात्यानें चांगलें जगण्यासाठीं ज्या गोष्टी हव्या असतात, त्यांतील बऱ्याच पदरांत पडल्या आहेत. तेव्हां शृंखला तोडतांना जी कांहींशी हताश व कांहींशी उद्दाम वृत्ति होते आणि शृंखल्या तुटल्यामुळें जी उच्छृंखलता आपणांस बेजबाबदार बनविते, त्यांतून बाहेर पडून शांतपणें, स्थिरपणें व खऱ्या मूल्याकडे नजर ठेवून वैवाहिक जीवनाचा विचार करणें आपणास शक्य झालें आहे. वैवाहिक जीवनांतील लहान लहान असमाधानाचें कौतुक करीत बसण्याचें सोडून देऊन, त्या असमाधानाचीं कारणें जाणून, तें नाहींसें करण्याचा प्रयत्न आतां करावयास हवा. उठल्या बसल्या हक्कांची भाषा सोडून देऊन जबाबदाऱ्यांकडे लक्ष अधिक द्यावयास हवें. परस्पर-सहकारानें, परस्पर आदरानें वैवाहिक जीवन जगावयाचें तर करावा लागणारा त्याग, बाळगावी लागणारी सहिष्णुता व करावी लागणारी तडजोड हीं जाणतेपणानें व्हावयास हवींत. असमाधान नुसतें दडपून नाहींसें होत नाहीं; कुरकुरत केलेला त्याग सफल होत नाहीं; केवळ अगतिकपणानें दाखविलेली सहिष्णुता परस्परांना मारक होते, व केवळ मानसिक दुर्बलतेमुळें केलेली तडजोड उभयतांच्या विकासाच्या आड येते.

आज साऱ्याच जगांत जिकडेतिकडे श्रद्धा ढासळत आहेत व मूल्यें अर्थशून्य होत आहेत. आणि या परिस्थितींतून नवीं मूल्यें घडविण्याचा व नवीं श्रद्धास्थानें निर्माण करण्याचा विचारवंत प्रयत्न करीत आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशीं झगडण्यासाठीं खरोखरच महान् मूल्यांचें बळ पाठीशीं हवें असतें.

वैवाहिक जीवनांतील मूल्यें जर आम्हीं लहानलहान कृतींतहि जिवंत ठेवलीं, तरच वैवाहिक जीवन अधिक सुखी, अधिक प्रामाणिक व अधिक विकासपोषक होऊं शकेल. आपलें स्त्रीत्व हा कमीपणा नसून ती एक शक्ति आहे याची जाणीव जर आमच्या तरुण, शिक्षित कुमारिकांना होईल, तरच त्या आपल्या जीवनाला योग्य तें वळण लावूं शकतील. आणि दुर्दैवानें मनासारखी परिस्थिति लाभली नाहीं, तरीहि आपल्या जीवनांत अर्थ निर्माण करूं शकतील.

पन्नास वर्षांपूर्वीं स्त्रीजीवनांत जी अगतिकता व जी असाहाय्यता जुनाट सामाजिक रूढींमुळें निर्माण झाली होती आणि हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्यांतून ज्याचें सुंदर व सजीव चित्रण झालेलें दिसत होतें, तें स्त्रीजीवन आतां जवळजवळ इतिहासजमा झालें आहे. किती तरी अधिक स्वातंत्र्य, अधिक अनुकूलता आजच्या स्त्रियांना प्राप्त झालेली आहे. अशा स्थितींत आर्थिक जीवनकलह अधिक कठिण झाला असला, तरी खोट्या व चुकीच्या सामाजिक प्रतिष्ठा सोडून दिल्यास आजहि शिक्षित तरुणींना आपलें जीवन जाणतेपणीं सफल करणें हें किती तरी अधिक सुलभ झालें आहे.

एकेका सामाजिक थरांतलें गृहजीवन नजरेसमोर आणलें कीं, हें अधिक स्पष्ट होईल. पूर्वीं मुलीला 'पाहण्यास' वराकडील मंडळी येत असत व मुलगी पसंत झाली कीं लग्न रीतसर ठरविलें जाई. पण आतां स्वतः वरच वधूला पाहण्यास येतो व त्याला वधू पसंत असली, तरी वधूला तो पसंत आहे कीं नाहीं हेंहि विचारलें जातें आणि तिची पसंती कळवल्यावरच लग्न ठरविण्यांत येतें. आजच्या मुलींना हा फरक विशेष वाटत नसेल. कारण नुसतें पाहून आपला पति पसंत करण्यापेक्षां त्याची आपली चांगली ओळख झाल्यानंतर पसंत करण्याची संधि आपणांस मिळावी अशी त्यांची साहजिकच वाढती अपेक्षा असते. ही अपेक्षा अर्थात् योग्य अशीच आहे. पण निदान आपणास वराच्या निवडीला जेवढें स्वातंत्र्य मिळालें आहे, तेवढ्या स्वातंत्र्याचा तरी आपण योग्य उपयोग करतों का, असा प्रश्न मुलींनीं आपल्या मनाला जरूर विचारावा. अर्ध्या तासाच्या पाहण्यानें वराविषयीं प्रथमदर्शनीं आपलें मत अनुकूल झालें कीं प्रतिकूल, एवढें अर्थात् प्रत्येक मुलगी जाणते. परंतु यानंतर त्याच्याविषयीं इतर सर्व माहिती गोळा करण्याची दक्षता जर मुली घेतील, तर भावी जीवांनतील पुष्कळ धोके टळतील. वेगवेगळ्या

लोकांकडून भावी वराची किंवा भावी वधूची माहिती मिळविणें हें वधूला व वराला भावी सौख्याच्या दृष्टीनें अत्यंत अवश्य आहे.

आजकाल भावी वधू-वरांची ओळख करून देऊन त्यांना परस्परांशीं बोलण्याची संधि देण्याइतकेहि पुष्कळ पालक सुधारले आहेत. अर्थात् या सर्व संधींचा फायदा घेऊन आपल्या भावी वराची परीक्षा करण्याइतकें कौशल्य मुलींनीं आपणामध्यें आणलें पाहिजे. आपलें सर्व भावी जीवन या निवडीवर अवलंबून आहे हें जाणून मुली जास्त जबाबदारीनें जर वराची निवड करतील तर वैवाहिक जीवनाविषयीं पहिली जबाबदारी त्या चांगल्या तऱ्हेनें पार पाडतील. कारण भावी पतीची निवड मीं केली आहे, एवढें ती खरोखर म्हणूं शकली, तर वैवाहिक जीवनांत येणाऱ्या अनेक अडचणींशीं ती जाणतेपणानें व अधिक अभिमानानें सामना करूं शकेल, सामान्यतः वधू-वरांत परिस्थितीची, आर्थिक स्थितीची व संस्कारांची समानता असणें हें त्यांच्या सुखाला पोषक ठरतें. श्रीमंताच्या मुलीनें बऱ्याच गरीब मुलाशीं लग्न करणें, टापटिपीच्या घरांतील मुलीनें गबाळ, अव्यवस्थित राहणीच्या घरांतील मुलाशीं लग्न करणें, किंवा अव्यवस्थित घरांतील मुलीनें नीटनेटक्या राहणीच्या घरांतील मुलाशीं लग्न करणें, जुनाट आचारविचारांच्या घरांतील मुलीनें अगदीं आधुनिक घरांतील मुलाशीं लग्न करणें, किंवा याच्या बरोबर उलट करणें हें सामान्यतः वैवाहिक जीवनांतील सुखाला मारक ठरतें व पतिगृहांतील परिस्थितीशीं जुळवून घेणें वधूला अतिशय कठिण होऊन बसतें.

या सर्व असमानतांच्या जोडीला राजकीय विचारसरणींतील असमानताहि येऊन बसली आहे. काँग्रेसपक्षीय, हिंदुमहासभापक्षीय, रा. स्व. संघीय, समाजवादी-साम्यवादी इत्यादि पक्षांतील कट्टर घरांतील मुलीनें जर दुसऱ्या कट्टर घरांतील मुलीशीं लग्न केलें तर तेंहि सुखावह होत नाहीं, असें अनेक उदाहरणांवरून दिसून येतें. कारण माहेरीं ज्या विचारांचा पगडा मुलीच्या मनावर बसला असेल त्या विचारांच्या विरुद्ध अशा वातावरणांत उभा जन्म काढणें हें तिला अतिशय कठिण होऊन जातें. अर्थात् वधू व वर एकाच विचारसरणीचे असले तर माहेरच्या व सासरच्या विचारसरणींचा त्यांच्या जीवनावर प्रतिकूल परिणाम होण्याचें कारण नाहीं.

वधू-वरांनीं एकमेकांना 'पाहण्याच्या' पद्धतींतहि वर निर्देशिलेली काळजी

घेणें अवश्य आहे. असा इशारा मला एवढ्यासाठीं द्यावासा वाटतो कीं, आज माझ्या भोंवतालीं व माहितींत असणाऱ्या अनेक मुलींचें जीवन या अशा असमानतेमुळें दुःखी व असमाधानी बनलेलें मला माहीत आहे. पाहूनच लग्न करावयाचें, तर निदान ही टाळतां येण्याजोगी असमानता तरी पालकांनीं कटाक्षानें टाळावी व मुलींनींहि या बाबतींत विशेष जागरूक राहावें, असेंच मी सांगेन. प्रेमविवाहांत ही असमानता टाळणें अर्थातच कठीण असतें. आणि ज्या प्रेमानें तरुण-तरुणी एकत्र येऊन आपलें जीवन एकमेकांत मिसळून देतात, तें त्यांचें प्रेम जर तितकें उत्कट राहिलें नाहीं, तर उभयतांच्या परिस्थितींतील असमानता त्यांनाहि जाचक झाल्यावांचून राहत नाहीं. पण तो एक स्वतंत्र प्रश्न आहे व त्यांतील सुखदुःखें व अडचणी हीं बरींच वेगळ्या प्रकारचीं आहेत.

माहेरच्या व सासरच्या परिस्थितीमध्यें अनेक गोष्टींची समानता आवश्यक आहे असें मी कां म्हणतें, तें अधिक स्पष्ट करतें. परिस्थितीमुळें व नोकरीधंद्यामुळें आज जरी अविभक्त कुटुंबपद्धति मोडकळीस आली आहे तरी ती नाहींशी झाली नाहीं हें विसरतां उपयोगी नाहीं. शहरगांवांत व विशेषतः मोठमोठ्या शहरांत राहणाऱ्या कुटुंबांत आज फारच थोडी मंडळी असतात हें खरें. तरीहि केवळ पतिपत्नी व मुलें एवढ्यांचाच समावेश करणारीं फारच थोडीं कुटुंबें शहरांतहि आढळतात. पत्नीच्या अडचणीसाठीं म्हणा किंवा दुसरें राहण्यास ठिकाण नाहीं म्हणून म्हणा, पण आई, आत्या, मावशी, काकी, बहीण, भाऊ, वडील यांपैकीं एक किंवा अनेक माणसें बहुतेक घरांतून आढळतात. त्यामुळें लग्न होऊन मुलगी आपल्या नव्या घरीं गेली कीं, पति व आपण एवढ्या दोनच व्यक्ति त्या नव्या घरांत तिला आढळत नाहींत. पतीचे आई-वडील, भाऊबहीण किंवा इतर नातेवाईक हे तेथें असतातच. त्याप्रमाणें पति मिळवता असला, तरीहि त्याचें कुटुंबांतील स्थान दुय्यम दर्जाचें आहे हेंहि तिला दिसून येतें. आर्थिक दृष्ट्याहि पतीला कुटुंबावर अवलंबून राहणें भाग आहे हेंहि तिला दिसतें. अशा परिस्थितींत सासरची सर्व आचारविचारपरंपरा हीच या नव्या घराची परंपरा आहे आणि हिच्याशीं जुळवून घेतां आलें नाहीं, तर आपलें जीवन असमाधानी होईल, हें कळण्यास मुलीला उशीर थोडाच लागतो? आणि माहेर-सासरच्या परंपरा बऱ्याचशा समान असल्या, तरच ही जुळणी आपणांस सहज शक्य

होईल व सुखावहहि होईल, हेंहि मुलीला ताबडतोब कळल्यावांचून थोडेंच राहील ?

आजची सामाजिक परिस्थिति अशी आहे कीं, मुलगी केवढीहि शिकलेली असो, ती जर पाहून लग्न करणार असेल, तर तिला या सर्व गोष्टींची जाणीव ठेवली पाहिजे. ही जाणीव दृष्टिआड करून व भावी वराच्या कुटुंबाशीं आपल्या कुटुंबाची सर्व महत्त्वाच्या बाबतींत समानता आहे किंवा नाहीं हें न पाहतां जर मुली व त्यांचे आईबाप लग्न ठरवितील तर ते आपल्या मुलीचें जीवन सुखी बनवूं शकणार नाहींत हें त्यांनीं जरूर लक्षांत ठेवावें. वर जरी स्वतंत्र नोकरीधंदा करणारा असला, तरीहि त्याच्या आचारविचारांचीं व संस्कारांचीं मुळें त्याच्या कुटुंबाच्या परंपरेंतच असतात. परस्परांवरील उत्कट प्रेमामुळेंच जीं विवाहबद्ध होतात, त्या दांपत्यांनाहि उभयतांची विचार व आचार यांची परंपरा अतिशय भिन्न किंवा विरोधी असल्यास, जीवन सुखानें घालविणें कठिण जातें. मग जे वधूवर परस्परांना पाहून विवाहबद्ध होतात त्यांचें जीवन तर अशा परिस्थितींतील विरोधामुळें किंवा अतिभिन्नतेमुळें किती असमाधानी होत असेल हें सांगावयास नकोच.

एका घरंदाज, घसघशीत, पण अव्यवस्थित घराण्यांतील सुशिक्षित मुलीचें लग्न एका अत्यंत टापटिपीच्या व अतिव्यवस्थेशीर अशा कुटुंबांतील सुशिक्षित व मिळवत्या मुलाशीं झालें होतें. उभयतांच्या घराण्यांतील आचारविचारपरंपरा अशा अतिशय भिन्न असल्यामुळें मुलीला दैनंदिन जीवनहि अतिशय दुःखाचें वाटत आहे. एका रा. स्व. संघीय घराण्यांतील सुशिक्षित मुलीचें एका काँग्रेसपक्षीय घराण्यांतील सुशिक्षित व मिळवत्या मुलाशीं लग्न झालें. इतर दृष्टींनीं जरी उभय कुटुंबांत समानता असली, तरी राजकीय विचारांच्या दृष्टीनें दोन्ही कुटुंबें बरींच जहाल असल्यामुळें मुलीच्या मनाची अतिशय कुचंबणा होत आहे.

आपल्या समाजांत सासू ही फार भयंकर संस्था आहे. चांगलीं सुशिक्षित मिळवतीं मुलेंसुद्धां कधींकधीं इतकीं आईच्या मुठींत असलेलीं आढळतात कीं, अशा मुलाशीं कोणत्याहि मुलीचें लग्न झालें, तरी ती मुलगी सुखी होण्याचा संभव मुळांतच नाहींसा होतो. कसें तरी जीवन जगणें एवढेंच तिला शक्य असतें. विधवा आईच्या एकुलत्या एक मुलाशीं आपल्या मुलीचें लग्न करून देण्यापूर्वीं

आईबापांनीं लाख वेळां विचार करावा. मनोविश्लेषणशास्त्राच्या दृष्टीनेंहि पाहिलें, तरी अशा मुलाचा आईवर इतका जीव असतो व आईच्या आज्ञेपुढें त्याला कोणाचेंहि म्हणणें इतकें निरर्थक वाटतें कीं, अशा मुलाशीं लग्न करणाऱ्या मुलीनें जाणून बुजून हें दिव्य पत्करलें तरच तिला कांहीं तरी सुखाची आशा राहील.

कुटुंबावर अतिशय अवलंबून राहण्याच्या परंपरेमुळें आमच्या तरुणांचें व्यक्तित्व इतकें कांहीं खुरटलेलें असतें कीं, त्यांच्याशीं लग्न करणें म्हणजे त्यांच्या कुटुंबांशीं लग्न करणें होय ही गोष्ट ध्यानांत ठेवूनच आमच्या मुलींनीं व त्यांच्या आईबापांनीं मुलींच्या विवाहाचा विचार केला पाहिजे. भल्याबुऱ्या परिस्थितीची पूर्ण कल्पना करून घेऊन, व आपल्या निवडीनें व आपल्या जबाबदारीवर तरुण मुली वैवाहिक जीवनांत प्रवेश करूं लागतील, तरच त्यांचें वैवाहिक जीवन सुखी व समाधानी होण्याचा पाया रचला गेला आहे असें म्हणतां येईल.

· २ ·

सध्याच्या आणि मागच्या पिढींतील सर्वसामान्य मुलींचीं लग्नें जुळविण्याचा प्रकार पाहिला कीं, असें दिसून येतें कीं, मुलींना आपल्या पिढीच्या परिस्थितींतला भेद समजत असतो, पण उमजत मात्र नाहीं. वय मोठें झाल्यावरहि पूर्ववत् दहा जणां-पुढें आपणांस दाखवण्यासाठीं जावें लागतें ही गोष्ट त्यांना फारशी पसंत नसते हें खरें; पण या प्रथेचा त्यांना उबग आला आहे, चीड आली आहे असें मात्र क्वचितच आढळून येतें. दुसरी एक आश्चर्याची गोष्ट अशी कीं, तरुण मुलीला वयोमाना-प्रमाणें पुरुषांविषयीं आकर्षण वाटूं लागावें हें साहजिक असतांहि, बहुतांश तरुण सुशिक्षित मुलींना अमुक एका पुरुषाविषयीं प्रेम वाटूं लागलें आहे असें सहसा दिसून येत नाहीं. अमुक एका तरुण पुरुषावर प्रेम जडलें आहे म्हणून लग्न करावयाची इच्छा उत्पन्न झाली आहे, असें क्वचित्च दिसतें. उलट लग्न करावयाचें एवढें ठरलें आहे, पण मला जो वर पसंत करील त्याच्याशीं मी लग्न करीन अशीच तरुण मुलींची या प्रश्नाबाबत वृत्ति दिसते. आणि ही त्यांची वृत्ति त्यांच्या आईवडिलांना अर्थात् पसंत असते. कारण मुलगी आपल्या मतानें पति शोधूं लागली तर आईबापांना तें मुळींच पसंत नसतें. आपल्या तोलाचा, मुलीला सुखांत ठेवणारा असा जावई साहजिकच त्यांना हवा असतो.

येथवर सगळें ठीक झालें. पण कोणाच्या दृष्टीनें? अर्थात् आईबापांच्या दृष्टीनें. आणि मुलीच्या दृष्टीनें? मुलगी शिकते. तिच्या जीवनाविषयींच्या आशाआकांक्षा वाढत असतात. नाटकें, कादंबऱ्या, लघुकथा यांच्या वाचनानें व चित्रपट पाहण्यानें तिच्या जीवनाच्या अपेक्षेंत एक प्रकारचा अवास्तव स्वप्नाळूपणा उत्पन्न होतो. 'आयुष्याचा जोडीदार असा हवा' अशा तऱ्हेचें भावी पतीचें चित्रहि ती मनांत रंगवीत असते. कोणी जाणतां रंगवीत असतील, तर कोणी अजाणतां, एवढेंच. आणि प्रत्यक्ष जीवनांत आयुष्याचा जोडीदार पसंत करण्याचा, म्हणजे विवाहाचा समय येऊन ठेपला कीं तिचीं हीं स्वप्नें मनांतल्या मनांतच विरतात. आपला वर शोधायला आपण जाणार तरी कुठें असा प्रश्न तिच्यासमोर उभा राहतो. या प्रश्नाच्या पुढें जाऊन एखादीचें एखाद्या तरुणावर प्रेम जडलें व त्याच्याशीं विवाहबद्ध व्हावें असें जरी तिला मनांतून वाटलें, तरी तरुणाच्या आर्थिक स्थितीमुळें ती थबकते. तो माझ्याच सारखा शिकणारा आहे. एक वर्षानें बी. ए. किंवा एम्. ए. होईल. त्यानंतर नोकरीधंदा मिळायला कांहीं काळ लागेल. तोंपर्यंत थांबायचें ठरविलें, तरी पुढची काय खात्री? त्याला चांगली नोकरी मिळेलच म्हणून कुणी सांगावें? आणि चांगली नोकरी मिळाली नाहीं तर मग?

या एकाच खडकावर बहुतांश तरुण मुलींचे 'स्वयंवरा'चे मनोरथ आपटतात. बरोबरीचा तरुण, विशेष आर्थिक सुस्थिति नसलेला असा असला कीं, त्याच्यावर प्रेम असतांहि त्याच्याशीं लग्न करून पहिलीं कांहीं वर्षें आर्थिक परिस्थितीशीं झगडा करण्यांत घालविण्यास बऱ्याच मुली तयार नसतात. आपल्या शिक्षणाला शोभेसें व आपल्या माहेरच्या प्रतिष्ठेला साजेसें असें स्थळ त्यांना पाहिजे असतें. प्रेमासाठीं व प्रेमानें प्राप्त होणाऱ्या तथाकथित मानसिक सुखासाठीं त्या आर्थिक सुस्थितीचा त्याग करण्यास तयार नसतात. त्यांना आणखी असेंहि वाटतें कीं, अट्टाहास करून आपण पसंत केलेल्या वराशीं जर आपण लग्न केलें आणि उद्यां कांहीं कारणामुळें आपलें पटलें नाहीं तर? मग तर माहेरचीं दारेंहि बंद होणार. तेव्हां ज्या प्रेमविवाहाचें भवितव्य आपणांस खात्रीचें वाटत नाहीं, त्यांत शिरून धोका पत्करण्यापेक्षां आईबाप पाहून देतील तें व आपणांस पसंत करील तें स्थळच स्वीकारणें आपल्या हिताचें होईल. लग्नानंतर कांहीं बिघडलें तर आईबाप आधाराला आहेतच. अशा तऱ्हेचा 'पोक्त' विचार करून बहुतेक तरुण मुली, प्रेमाचे

बंध जडले असल्यास ते सारे विवेकाच्या नांवावर तोडून टाकून आईबापांनीं आणून उभ्या केलेल्या वराच्या कंठांत आपली आयुष्यमाला घालण्यास सहजासहजीं तयार होतात.

सुशिक्षित मुलींनीं उघड्या डोळ्यांनीं जाणूनबुजून जर हा मार्ग स्वीकारला व स्वीकारलेल्या मार्गानें जाण्यास शरीर व मन तयार केलें तर त्यांचें आयुष्य प्रवाहपतितासारखें होऊनहि प्रामाणिक व आपल्या मर्यादा जाणणारें असें विवेकशील तरी होतें. परंतु मन प्रेमाकडे ओढ घेत आहे, आणि शरीर व आजवरच्या सुखवस्तु संवयी या प्रेमविवाहाचा थोडा कष्टाचा मार्ग स्वीकारण्यास तयार होत नाहींत, अशा स्थितींत, जेव्हां ह्या मुली केवळ मानसिक दुर्बलतेमुळें व निश्चयाच्या अभावामुळें, वाटेल त्या सुखवस्तु वराच्या गळ्यांत माळ घालायला सिद्ध होतात, आणि लग्नानंतर सतत आपला असंतोष व आपला आशाभंग यांचीच जोपासना करीत राहतात, तेव्हां त्यांच्या अप्रामाणिकपणाला व दुर्बल वृत्तीच्या कौतुकाला कोणतें नांव द्यावें हेंच कळत नाहीं. वारांगनेची वृत्ति असें नांव या वृत्तीला दिलें तर मुलींना तें फार कटु वाटेल हें मी जाणून आहें. पण वेश्याव्यवसायाकडे ज्या मुली किंवा स्त्रिया ओढल्या जातात, त्यांचा मानसशास्त्रदृष्ट्या अभ्यास करतां असें आढळून आलें आहे कीं, ज्या मुलींना कामाचा व कष्टाचा कंटाळा असतो आणि ज्यांना राहाणी मात्र सुखाची व चैनीची हवी असते, त्याच मुली बहुतांशानें वेश्यांमध्यें सांपडतात. केवळ सुखाच्या आणि चैनीच्या राहणीसाठीं जेव्हां स्त्री न आवडणाऱ्या पुरुषाचा जन्माचा सहवास पत्करते आणि पत्करल्यानंतरहि आपणास त्याच्याविषयीं प्रेम वाटत नाहीं, याच भावनेचें कौतुक करीत राहते आणि संसारांतल्या जबाबदाऱ्या या असंतुष्ट वृत्तीच्या नांवावर सतत टाळीत राहते, तेव्हां स्त्रीला कोणतें सार्थ नांव मिळतें हें वेगळें सांगण्याची गरज नाहीं.

दिवसेंदिवस आर्थिक परिस्थिति तर खालावत चाललीच आहे आणि शारीरिक दुर्बलताहि येत चालली आहे हें खरें आहे. पण माणसानें आजवर जी प्रगति करून घेतली आहे ती त्याच्या मनाच्या बळावरच—बुद्धीच्या व निश्चयाच्या बळावरच करून घेतलेली आहे, शरीरबळावर नव्हे. तेव्हां शरीरबळ कमी झालें, तरी सुशिक्षित मुलींनीं देखील जर मनाचें व निश्चयाचें बळ अंगीं बाणवलें नाहीं, तर जन्मभर असंतुष्टता, आशाभंग व दौर्बल्य हींच त्यांच्या पदरीं येतील, यांत शंका नाहीं.

अर्थात् या सर्व गोष्टींत मुलींचा जितका दोष आहे त्याहूनहि त्यांच्या आई-बापांचा दोष जास्त आहे, असेंच मी केव्हांहि म्हणेन. जीवनांतील खऱ्या मूल्यांची जर बाळपणापासूनच मुलांमुलींना ओळख दिली, आणि त्या मूल्यांसह जगण्यांतच आनंद आहे याची त्यांच्या आयुष्यांतच खात्री पटविली, तर हें प्रवाहपतितासारखें जिणें जगण्याची कोणत्याहि सुशिक्षित मुलीला इच्छा होणार नाहीं. पण मुलें सतत आपणांवर अवलंबून राहावींत असें बहुतेक आईबापांना वाटत असतें. आणि याच अवलंबनाच्या इच्छेनें मुलांमुलींचें स्वतंत्र, कणखर व निश्चयी व्यक्तित्व विकसूं देण्याची आईबापांना इच्छा नसते. तेव्हां खऱ्याखुऱ्या सुशिक्षित स्त्रीचें जीवन जगायची जिची इच्छा असेल तिला प्रथमपासूनच आपलें शरीर व मन हें कणखर बनविलें पाहिजे. नाहीं तर केवळ शारीरिक व मानसिक दुर्बलतेमुळें असंतोषाचें, विफलतेचें व अप्रामाणिकपणाचें जीवन जगण्याचा दुर्धर प्रसंग तिच्यावर ओढवेल.

अर्धशतकाहून अधिक काळ पुरुष मॅट्रिक किंवा बी. ए. सारख्या पदवीच्या परीक्षा शेकड्यांनीं व हजारांनीं पास होत होते. पहिल्या एकदोन पिढ्यांतील सुशिक्षित पुरुषांना जो मान व जी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती, तशाच तऱ्हेची प्रतिष्ठा प्रारंभींच्या सुशिक्षित स्त्रियांनाहि मिळत होती. कित्येकदां तर कांहीं विशेष योग्यता किंवा बुद्धीची चमक नसतांहि केवळ स्त्री पदवीधर आहे एवढ्या भरंवशावर बौद्धिक मानाची वांटेकरी होत असे. पण जसजशी सुशिक्षित स्त्रियांची संख्या वाढूं लागली, तसतशी त्यांच्याविषयींची समाजाची वृत्ति सुशिक्षित पुरुषा-विषयींच्या वृत्तीप्रमाणेंच होऊं लागली. परंतु कॉलेजच्या जीवनांत भावी आयुष्या-विषयींच्या अनेक आशाआकांक्षा बाळगणारे पुरुष जसे, प्रत्यक्ष आयुष्यांत कारकुनी किंवा मास्तरकी या समाजानें कमी प्रतीच्या मानलेल्या व्यवसायांत पडल्यावर, प्राप्त परिस्थितीशीं कसा तरी मेळ घालीत होते, त्याप्रमाणें सुशिक्षित स्त्रिया तितक्या प्रमाणांत करूं लागल्या नाहींत. पुरुषांच्या स्वतःविषयींच्या अफाट कल्पनांना प्रत्यक्ष धकाधकीच्या मामल्यांत जसा आवर बसतो, तसा तो स्त्रियांच्या बाबतींत तितका बसत नाहीं ही वस्तुस्थिति आहे. त्याचें कारणहि उघड आहे. पुरुषांना जीवनकलहासाठीं जशी बाहेरच्या जगांत धडपड करावी लागते, तशी स्त्रियांना गेल्या कांहीं वर्षांपर्यंत तरी करावी लागत नव्हती. त्यामुळें अहंकाराचे

कोपरे घासून जाण्याचा फारसा संभव नव्हता. घरांतल्या सुरक्षित वातावरणांत आपलीं काल्पनिक दुःखें सतत कुरवाळीत राहणें सुशिक्षित स्त्रियांना सहज शक्य होई. आपला जीवनाविषयींचा असंतोष व विफलता मनांतल्या मनांत सतत घोळवीत राहणें आणि या घोळविण्यांतून निर्माण होणाऱ्या भावनांचें कौतुक करीत बसणें हा दुर्दैवानें बऱ्याच सुशिक्षित स्त्रियांचा मानसिक व्यवसाय होऊन बसला होता.

आतां मात्र जीवनकलह दिवसानुदिवस अधिकाधिक कठिण होत चालला असल्यामुळें घरांतील सुरक्षित वातावरणांतून बाह्य जगांतील वास्तव वातावरणांत स्त्री जास्त जास्त खेचली जाऊं लागली आहे. इंटर-बी. ए.पर्यंत शिकून कुणा पगारदाराच्या किंवा श्रीमंताच्या भाग्याची धनीण होऊन दिवाणखान्यांत कोचावर सुखावणाऱ्या स्त्रियांची संख्या झपाट्यानें कमी होऊं लागली आहे. बी. ए.पर्यंत शिक्षण झालें तरी त्याचा उपयोग कोठें तरी कामधंद्यांत किंवा नोकरींत करणें बऱ्याच स्त्रियांना भाग पडूं लागलें आहे. लग्न होईपर्यंत वडिलांच्या संसाराला मदत करण्यासाठीं आणि लग्न झाल्यानंतर आपल्याच संसाराला हातभार लावण्यासाठीं बऱ्याच सुशिक्षित मुली नोकरी करूं लागल्या आहेत. आणि अशा तऱ्हेनें त्या जसजशा बाह्य जगांतल्या धकाधकीच्या जीवनांत शिरूं लागल्या आहेत तसतसा त्यांच्यांतील भावनात्मक दुर्बलपणा व हळुवारपणा कमी होऊं लागला आहे. आपलीं काल्पनिक दुःखें कुरवाळीत बसण्यास त्यांना वेळ मिळेनासा झाला आहे. आणि त्याचबरोबर त्यांच्या कार्यशक्तीला व कर्तबगारीला वावहि मिळूं लागला आहे.

मध्यम वर्गांतील वरच्या श्रेणींतल्या स्त्रियांना आर्थिक मदतीसाठीं नोकरीधंदा करण्याची जरुरी नसते. परंतु त्याचबरोबर घरांतलें थोडेंबहुत काम संपल्यानंतर मिळणाऱ्या रिकाम्या वेळाचा आपल्या कर्तृत्वासाठीं कसा उपयोग करावा व आपली मानसिक विफलता कशी दूर करावी याचा शोध त्यांना लागलेला नसतो. आणि त्यामुळें मानसिक दुर्बलतेच्या त्या आहारीं गेलेल्या आढळतात. त्यांच्या परिस्थितींत आर्थिक प्रतिकूलतेचें दडपण नसल्यामुळें आपल्या दुर्बलतेंतून बाहेर निघण्यासाठीं त्यांना स्वतःलाच निश्चयात्मक प्रयत्न करणें अवश्य असतें.

परंतु प्रतिकूल आर्थिक परिस्थिति असणाऱ्या मध्यम वर्गांतील थोड्या खालच्या श्रेणींतील सुशिक्षित मुलींचा मानसिक प्रश्न परिस्थितीच बऱ्याच प्रमाणांत

सोडवीत असते. घरांतील काम आणि बाहेरचा नोकरीधंदा यांच्या रामरगाड्यांत रिकामटेकड्या मानसिक हळुवारपणाला वाव राहत नाहीं. आणि त्यामुळें वरच्या श्रेणींतील सुशिक्षित मुलींपुढील प्रश्न यांना कधीं भेडसावीत नाहींत. परंतु त्यांच्या कार्यशक्तीला वाव मिळत असल्यामुळें त्यांच्यांत मानसिक विफलता जरी फारशी आढळत नसली, तरी आपल्या आर्थिक कलहाच्या जीवनांतून विनासायास मुक्त होण्यासाठीं त्या कित्येकदां जें जीवन पत्करतात, तें त्यांच्या व्यक्तिजीवनाला घातुक ठरतें. लग्न होण्यापूर्वी वडिलांच्या संसाराला यांतील पुष्कळ जणी नोकरी करून मदत करीत असतात. नोकरीचा बहुतेक सर्व पगार घरींच खर्चणें आवश्यक असल्यामुळें स्वतःच्या हौशीसाठीं खर्च करणें कठिण होऊन बसतें. दोन-तीन-चार वर्षें अशा तऱ्हेनें जाऊं लागलीं कीं, आपल्या हौशींना वाव तरी केव्हां मिळणार या विचारानें थोडाबहुत असंतोष त्यांच्यांत निर्माण होत असतो. निदान लग्न झाल्यावर तरी ही नोकरीची कटकट सुटेल अशा अपेक्षेंत त्या मनाचें समाधान करीत असतात. याच अपेक्षेमुळें या काळांत जरी एखाद्या साधारण स्थितींतील तरुणावर त्यांचें प्रेम जडलें, तरी त्याच्याशीं लग्न करण्याचा विचार मागें रेंगाळत राहतो. कारण पुन्हा लग्न झाल्यावर नोकरी करणें भाग पडणार हें त्यांना दिसतच असतें. अशा वेळीं त्यांच्या प्रेमाच्या उत्कटतेपेक्षां सुखासीन जीवन जगण्याची उत्कटता जास्त ठरली, तर त्या प्रेम बाजूस सारून एखाद्या श्रीमंत तरुणाशीं लग्न करण्याच्या खटपटीला लागतात.

जीवनाकडून ज्या मुलीच्या कांहीं बौद्धिक किंवा भावनात्मक अपेक्षा नसतात, तिनें सुखासीन जीवन जगण्यासाठीं एखाद्या श्रीमंत तरुणाशीं लग्न केलें, तर अर्थात् तिच्या जीवनांत या लग्नामुळें कांहीं प्रश्न उपस्थित होण्याचें कारण नसतें. परंतु ज्या मुलींमध्यें शिक्षणकालापासूनच बौद्धिक व्यवसायाविषयीं आवड असते किंवा उत्कट भावनात्मक जीवन जगण्याची ज्यांची वृत्ति असते त्या मुलींनीं आपल्या विवाहाविषयीं अधिक खोलवर विचार करणें जरूर असतें. लग्न झाल्या-वरहि एखादा विशिष्ट आवडीचा व्यवसाय किंवा कार्य करण्याची जिची विशेष इच्छा असते, ती जर एखाद्या अधिकाऱ्याची किंवा विशेष श्रीमंत माणसाची पत्नी होण्याची इच्छा धरील तर विवाहाच्या दिवसापासूनच तिच्या पुढें समस्या उभ्या ठाकतील. आपला बौद्धिक किंवा दुसरा आवडीचा व्यवसाय आणि भावी

पतीचा व्यवसाय व जीवन यांचा मेळ जमण्यासारखा आहे किंवा नाहीं याचा विचार तिनें केला पाहिजे. आपला व्यवसाय व आपल्या भावी पतीचा व्यवसाय यांच्यांत बाह्यत: विरोध दिसत असला किंवा त्यांचा साधारणपणें मेळ बसण्यासारखा नसला, तरी पतिपत्नींच्या परस्पर आदरामुळें व सहिष्णुतेमुळें जर असा मेळ बसणें शक्य झालें तर मात्र अशा विवाहामुळें तरुणीचें जीवन सुखकर होतें.

मनुष्यामध्यें पुष्कळदां परस्परविरोधी भावना व आवडीनिवडी असतात. त्यामुळें एका भावनेच्या अनुरोधानें जीवन आक्रमूं लागलें कीं कित्येकदां दुसऱ्या भावनेवर आघात होत असल्यामुळें ती उसळून बंड करूं लागते. आणि मग दोन भावनांच्या हेलकाव्यांत मनाची शोचनीय अवस्था बनून जाते. जोंपर्यंत मुलांमुलींचे बालपणींच विवाह होत असत आणि मुलें मोठीं झाल्यावर त्यांच्यांत विरोध निर्माण झाला तर त्यांतून निदान स्त्रीची तरी सुटका होत नसल्यामुळें प्राप्त परिस्थितींत समाधान मानून राहणेंच भाग असे, तोंपर्यंत जीवनाचा विचार करणें व कोणता मार्ग धरावयाचा तें ठरविणें या शब्दांना स्त्रीच्या शब्दकोषांत अस्तित्वच नव्हतें. परंतु आतां मुली लग्न करण्यापूर्वी वयानें मोठ्या व शिक्षणानें निर्णयक्षम बनत आहेत. एवढेंच नव्हे तर आर्थिक दृष्ट्याहि त्या स्वावलंबी बनत असल्यामुळें भावी जीवनाच्या भल्याबुऱ्या प्रकारांची जबाबदारी आईवडिलांवर टाकणें त्यांना शक्य राहिलें नाहीं. आणि विवाहाच्या मार्गावर टाकलेलें पाऊल मागें घेणें शक्य नसल्यामुळें, पाऊल टाकण्यापूर्वी खोलवर व शांतपणें विचार करून मग निर्णय घेणें एवढा एकच मार्ग त्यांच्यापुढें उरलेला असतो.

ज्या मुलींच्या जीवनाकडून बौद्धिक अपेक्षा नसतात, परंतु उत्कट भावनात्मक जीवन जगण्याची ज्यांची वृत्ति असते, त्या मुलींना आपल्या सखोल व उत्कट भावनांचा अधिक शांतपणें विचार करणें जरूर असतें. अशा मुलींचें जर साधारण स्थितींतील तरुणावर प्रेम जडलें, आणि आपणांस विवाहानंतर नोकरी करावीच लागणार या विचारामुळें जर त्या दुसऱ्या बऱ्या परिस्थितींतील तरुणाशीं लग्न करण्यास तयार झाल्या, तर जन्मभराच्या असंतोषाला आपण निमंत्रण देत आहोंत हें त्यांनीं पक्कें लक्षांत ठेवावें. कारण उत्कट भावनात्मक जीवनाचीच त्यांच्या मूळ प्रकृतीला अवश्यकता असल्यामुळें, प्रेम बाजूस टाकून केवळ आरामाच्या जीवनाचा त्यांनीं स्वीकार केल्यास दडपलेली प्रेमभावना वारंवार वर उसळून

येऊन त्यांचें जीवन दुःखमय करून टाकील. वस्तुतः जीवनांत प्रत्येकाला सुख पाहिजे असतें. परंतु जीवनांतील कोणती गोष्ट नसली तर चालेल आणि कोणती गोष्ट जीवनांत असल्यावांचून जीवन असह्य होईल, हें ज्याचें त्यानेंच ठरविलें पाहिजे. प्रेमविवाहहि असावा, पतीची आर्थिक सुस्थितीहि असावी आणि आपल्या बौद्धिक कार्याला भरपूर वावहि मिळावा असा त्रिवेणी संगम कोणत्या तरुणीला नको असेल? परंतु जेव्हां हा संगम जुळून येत नसेल तेव्हां माझ्या जीवनाला अत्यंत आवश्यक गोष्ट कोणती आहे, याचा आपल्या विचारविश्वांत व भावनाविश्वांत खोल खोल जाऊन शोध घेतला पाहिजे आणि जीवनाला आधारभूत होणाऱ्या गोष्टींसाठीं इतर अनवश्यक गोष्टींचा जाणतेपणानें त्याग करण्यास तिनें तयार झालें पाहिजे.

अर्थात् इतक्या शांत विचारानंतर घेतलेल्या निर्णयानंतरहि वैवाहिक जीवनाच्या कांहीं प्रसंगांत प्रेमाचें जीवन पत्करून सुखासीन जीवनाला पाठ फिरविल्याबद्दल तरुणीला उबग वाटेल यांत शंका नाहीं. संसार, मुलेंबाळें आणि नोकरी यांच्या रामरगाड्यांत भरडून जाणाऱ्या तरुणीला कदाचित् क्षणकाल असें वाटेल कीं, एखाद्या सुस्थितींतील तरुणाशीं लग्न केलें असतें, तर आपणांस हें दररोजचें कष्टाचें जीवन जगावें लागलें नसतें. या जीवनांत प्रेमाच्या आविष्काराला सुद्धां वेळ मिळत नाहीं.—पण हें असें वाटणें स्मशानवैराग्यासारखेंच असतें. तेवढा कष्टाचा काळ संपला कीं, आपल्या जीवनाची कृतार्थता तिला सुखवूं लागते. परंतु कष्टाच्या काळांत जर तिला सुखासीन जीवनाची आवश्यकता जाणवूं लागली तर तिनें आपल्या भोवतालच्या अनेक सुखासीन जोडप्यांच्या जीवनाकडे बारकाईनें पाहावें. म्हणजे तिला कळून येईल कीं, हे कष्ट पुरवले पण तें निष्प्रेम, कंटाळवाणें जीवन नको.

म्हणून प्रत्येक तरुणीनें आपल्या जीवनाला अत्यंत अवश्यक व आधारभूत असें काय आहे याचा खोलवर शोध करायला शिकलें पाहिजे व आपल्या जीवनांतील तें मूल्य जतन करूनच भावी जीवन आखलें पाहिजे. तरच परिस्थितीच्या कष्टांमध्येंहि तिला खरेंखुरें समाधान लाभेल.

# सासरची पाठवणी

तरुण मुलींच्या वैवाहिक जीवनाविषयीं विचार करूं लागलें कीं, किती तरी मुलींचीं संसारचित्रें माझ्या डोळ्यांपुढें उभीं राहतात. गरीब, मध्यम व श्रीमंत अशा सर्वच वर्गांतील जीवनचित्रें मला दिसतात. पण पंधरावीस वर्षांपूर्वीं वैवाहिक जीवनाचीं जीं चित्रें दिसत होतीं त्यांच्याशीं तुलना करूं पाहतां आजच्या चित्रांत मनाला अतिशय बोचणारीं अशीं कांहीं ठळक वैगुण्यें दिसून आल्यावांचून राहत नाहींत. अपवाद वगळल्यास सामान्यपणें एक गोष्ट चटकन् दिसून येते ती अशी कीं, शिकलेल्या मुलींच्या संसारापेक्षां कमी शिकलेल्या, बिनशिकलेल्या मुलींच्या संसारांत अधिक समाधान, अधिक हौस व आनंद आणि अधिक प्रमाणांत त्यागाची, तडजोडीची व सहिष्णुतेची वृत्ति आढळून येते. अनेक समंजस व विचार करणाऱ्या शिक्षित व अशिक्षित स्त्रियांशीं या बाबतींत चर्चा केली असतां माझ्यासारखाच त्यांचा अनुभव आहे असें आढळून आलें आहे.

ही परिस्थिति समाजाच्या भवितव्याच्या दृष्टीनें अतिशय निराशाजनक नाहीं, असें कोणीहि म्हणेल असें मला वाटत नाहीं. आजच्या शिक्षणाचा आणि त्या शिक्षणानें समाजांत रूढ केलेल्या कल्पनांचा असा परिणाम होत आहे कीं, आमचे तरुण नुसती कारकुनी किंवा मास्तरकी (आणि तीहि रडतखडत) करण्यावांचून दुसरें कोणतेंहि काम करण्यास नालायक बनत आहेत. साऱ्या जगांतील आणि आपल्या देशांतील राजकीय विचारांचा व आचारांचा प्रवाह

अनुक्रम ................ दि: ........
क्रमांक ................ बों: दि: ........

श्रीमंतांचे व सुखवस्तु वर्गाचे विशिष्ट हक्क काढून घेण्याकडे वाहत आहे आणि सर्वांनींच आपल्या श्रमानें उदरंभरण करावें अशा विचारांकडे समाज झुकत आहे. आणि तिकडे आमच्या आजच्या शिक्षणामुळें आमचे गरीब–श्रीमंत व खालच्या वा वरच्या वर्गांतील तरुण शरीरश्रमांचा अधिकाधिक कंटाळा करूं लागले आहेत. ऑफिसांतील किंवा शाळेंतील टेबलखुर्च्यांपाशीं बसण्याचेंच काम आपणांस मिळावें हीच त्यांची महत्त्वाकांक्षा बनत चांलली आहे. ज्यांत शरीरश्रम पडतील, साहसाच्या व कष्टाच्या गोष्टी कराव्या लागतील व नवे मार्ग व नवे प्रकार शोधून काढण्यासाठीं सामान्य सुखसोयींचा स्वच्छेनें त्याग करावा लागेल, अशा व्यवसायांत व कार्यांत पडण्याची इच्छा आजच्या तरुणांत फारच कमी दिसत आहे. शरीरश्रम नोकरांनीं करावयाचे व आम्हीं नुसते हुकूम सोडावयाचे, अशाच कल्पना आज तरुण मुलांत रूढ होत आहेत.

आणि याच सर्वसामान्य व सर्वमान्य कल्पनांचा पगडा अगदीं साहजिकपणें तरुण मुलींच्या मनावर फार झपाट्यानें बसूं लागला आहे. "लग्नापूर्वीं आम्ही दोघें शिकत होतों, आमचीं कामें जवळपास एकच होतीं; तेव्हां आतां लग्नानंतर त्यानें ऑफिसांत जावें व मी मात्र घरकाम करीत बसावें हें काय म्हणून? मीहि कोठेंतरी नोकरी धरीन आणि घरकामासाठीं नोकर ठेवीन. म्हणजे पुन्हा आम्ही दोघे एकाच पातळीवर येऊं." अशा तऱ्हेचे विचार आजकाल बऱ्याच शिक्षित नवविवाहित तरुणींमध्यें आढळून येतात. अर्थात् लग्नानंतर मुलींनीं नोकरी करणें किंवा संसाराला गरज असली, तर मुलें झाल्यानंतरहि नोकरी करणें किंवा केवळ आवड म्हणून नोकरी किंवा दुसरा एखादा व्यवसाय करणें याच्या विरुद्ध कोणाला कांहीं म्हणण्याचें मुळींच कारण नाहीं. मुख्य प्रश्न आहे तो वृत्तीचा व मूल्यांचा. 'घरकाम व शरीरश्रम हे हलक्या दर्जाचे आहेत, म्हणून मी ते करणार नाहीं व ते करण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून मी नोकरी करून पैसे मिळवीन व नोकर ठेवीन' ही वृत्ति एकंदर जीवनाला, आज समाजाचा जिकडे ओघ वाहत आहे त्या ओघाला, मारक अशी आहे. ती अशी मारक होण्याचें कारण हें आहे कीं, एकदां ही वृत्ति मनांत रुजली आणि उद्यां मूल झाल्यावर किंवा बाहेरच्या कामाचा व्याप संभाळणें कठिण झाल्यावर स्त्रीला परत घरांतच बहुतांश वेळ घालवावा लागला, तर घरकाम तिला अतिशय अप्रिय व त्रासदायक

वाटूं लागेल. त्रासत, कंटाळत व कुरकुरत ती घरकाम करूं लागेल व मुलें ही आपल्या स्वच्छंद जीवनांतील धोंड आहे असें समजून त्यांचाहि कंटाळा करूं लागेल.

अशा जीवनांत आनंद, समाधान, हौस व उत्साह यांचा लवलेश तरी कसा आढळेल? दुर्दैवाची गोष्ट अशी आहे कीं, आज थोड्याबहुत प्रमाणांत याच वृत्तीचें प्रदर्शन आज अनेक शिक्षित गृहिणींच्या संसारांत दिसून येतें. स्त्रीत्व हा आपणांस मिळालेला शाप आहे, तेव्हां हें शापित जीवन कसें तरी जगावयाचें अशा तऱ्हेची विकृत मनोवृत्तीहि अनेकींच्यांत दिसून येते. अर्थात् या वृत्तीचें कारण समाजांत मान्यता पावलेल्या मूल्यांतच सांपडतें. आज सुताराचा मुलगा असो कीं लोहाराचा, चांभाराचा, कुंभाराचा, महेतराचा किंवा शेतकऱ्याचा असो, तो एकदां शिकला कीं, साहजिकच आपल्या वाडवडिलांच्या व्यवसायांकडे परत जाऊं इच्छीत नाहीं. कारण सामाजिक प्रतिष्ठा आज ऑफिसें व शाळाकॉलेजें यांच्या भोंवतींच वावरत आहे. वर उल्लेखिलेल्या व्यवसायांतील माणसांना आजच्या सामाजिक जीवनांत मानाचें स्थान नाहीं म्हणूनच त्यांतील शिकलेला मुलगा पुन्हा कांहीं आपल्या व्यवसायाकडे ढुंकूनहि पाहत नाहीं. हीच प्रवृत्ति आज शिकलेल्या मुलींमध्येंहि दिसून येते. शिकल्यानंतर त्या पुन्हा स्त्रीच्या व्यवसायाकडे जाण्याचा कंटाळा करतात आणि विवाहानंतर त्यांना तो व्यवसाय करणें भागच पडलें, तर त्रासत चिडत कसा तरी तो करीत राहतात.

शिकलेल्या मुलींच्या प्रवृत्तींच्या मागें खोल खोल जाऊन कारणें शोधण्याची गरज मला विशेष भासते. कारण हीं कारणें समाजांतील विचारवंतांच्या व नेत्यांच्या समोर जितकीं जास्त ठळकपणानें मांडलीं जातील, तितकीं तीं नाहींशीं करण्यासाठीं जोरदार प्रयत्न होऊं शकेल. रोगाचीं कारणें तशींच कायम राहूं देऊन रोगावर इलाज सांगणारा माणूस एक तर मूर्ख असेल किंवा भोंदू असेल. मला असा अर्धवट इलाज सांगावयाचा नाहीं. शिकलेल्या मुलींच्या मनाला काय बोचतें, त्यांची हौस, आवड व उत्साह यांचे झरे कोण आटवून टाकतें, हें त्यांच्याबरोबरच जाऊन शोधून काढल्याशिवाय मीं जर उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला तर तो उभयतांची वंचना करणारा होईल. कांहीं बिघडलेंच नाहीं, कांहीं बोचतच नाहीं, अशी खोटी कल्पना करून घेऊन जर मी बोलूं लागलें,

तर माझ्या शब्दांचा खुद्द माझ्यावरहि कांहीं परिणाम होणार नाहीं. मग इतरांवर होणें दूरच राहिलें. म्हणून आपल्या शिकलेल्या तरुण मुलींना मला हेंच सांगावयाचें आहे कीं, तुमच्या अडचणी मला कळतात, तुम्हांला काय बोचतें, काय अडवितें, काय हतबुद्ध करून टाकतें तें मला जाणवतें. आज समाजांत दुर्दैवानें रूढ झालेल्या कल्पनांमुळें व प्रतिष्ठांमुळें तुम्हांला स्त्रीजीवन शक्य तितक्या प्रमाणांत केवळ पुरुषांसारखें करून टाकावेंसें वाटत आहे हें खरें. पण आज समाजांत रुजलेल्या या कल्पना व प्रतिष्ठा चुकीच्या आहेत, व्यक्तीच्या खऱ्याखुऱ्या विकासाला मारक आहेत असें जर तुम्हांला समजून आलें, तर आपल्या जीवनाकडे एका नव्या चैतन्यमय दृष्टिकोनांतून तुम्हांला खात्रीनें पाहतां येईल.

शाळेंत किंवा विद्यालयांत शिकणारी तरुण मुलगी लग्न करून सासरीं येते, ती नाना तऱ्हेच्या आशाअपेक्षा घेऊन येते. नुसती सुखवादी वृत्तीची ती मुलगी असली किंवा कष्टाच्या माहेरच्या वातावरणांतून येणारी असली, तर तिला सासरचें वातावरण विशेष प्रतिकूल वाटत नाहीं. दागदागिने, कपडेलत्ते, मोटार, बंगला या बाह्य साधनांनीं सुखी होणाऱ्या पुष्कळ मुली असतात. किंवा वैवाहिक जीवनाविषयीं विशेष अपेक्षा न बाळगणाऱ्या अशाहि पुष्कळ मुली असतात. तरीहि शाळाकॉलेजांतील स्वच्छंद, मोकळ्या व विद्याकलापूर्ण वातावरणांतून सांसारिक जबाबदाऱ्यांच्या व बंधनांच्या वातावरणांत एकदमच पडावें लागल्यामुळें ज्यांच्या मनाला एक प्रकारचा धक्का बसला आहे, अशा मुलींची संख्या कांहीं थोडी नाहीं. विशेषतः कथा, कादंबऱ्या, नाटकें यांच्या सतत वाचनामुळें संसारसुखाच्या दांपत्यजीवनाच्या इतक्या कांहीं अवास्तव व बहुतांश अशक्य अशा कल्पनांनीं तरुण मुलांमुलींचीं मनें भारलेलीं असतात कीं, प्रत्यक्ष जीवन तुलनेनें त्यांना अतिशय जड व नीरस भासूं लागतें.

अशी वस्तुथिति असल्यामुळें तरुणाला व तरुणीला विवाहित जीवन सुखानें, जबाबदारीनें व सन्मानानें जगावयाचें झाल्यास उभयपक्षीं थोडा त्याग, थोडी अधिक जाणीव, थोडें अधिक जुळवून घेण्याची निश्चयाची वृत्ति अंगीं बाणवून घेतल्याशिवाय भागणार नाहीं. कथाकादंबऱ्यांच्या स्वप्नमधुर व अवास्तव वातावरणांतून तरुणीनें जीवनाच्या वास्तव पातळीवर उतरण्याचा सतत यत्न केला पाहिजे. नेहमींचें नीरस जीवन जगावेंच लागतें, म्हणून तें कसें तरी ओढायचें

आणि कथाकादंबऱ्यांच्या संपूर्ण सुखदायी वातावरणांत मन रिझवायचें, हा दुभंगलेल्या जीवनाचा प्रकार निश्चयानें सोडून देण्याचा प्रयत्न तरुणी जोंपर्यंत करणार नाहींत तोंपर्यंत त्या आपलें स्वतःचें जीवन व आपल्या कुटुंबाचेंहि जीवनप्रवाहपतिता सारखेंच बनवून टाकीत राहतील. यासाठीं आमच्या शाळा-कॉलेजांतून, घरांतून व मुलींच्या वेगवेगळ्या शिबिरांतून शारीरिक श्रमांची अधिक सवय करून दिली पाहिजे. त्याचप्रमाणें परस्परांसाठीं नेहमींच्या जीवनांत थोडा थोडा हसत-खेळत त्याग करण्याची सवय लावून घेतली पाहिजे. कोणत्याहि विपरीत परिस्थितीशीं झगडून तिच्यावर मात करण्याची युयुत्सु वृत्तीहि तरुणींनीं आत्मसात् केली पाहिजे. लहान लहान अपेक्षाभंगांनीं निरुत्साही होणारें मन आणि लहान लहान आघातांमुळें खचून जाणारें मन, या गोष्टी यापुढें कौतुकाच्या न राहतां तिरस्करणीय मानल्या गेल्या पाहिजेत.

मला या ठिकाणीं एका इंग्रजी मासिकांत वाचलेल्या एका नमुनेदार प्रार्थनेची आठवण होते. "हे परमेश्वरा, परिस्थितींतील जें जें कांहीं बदलण्यासारखें नाहीं, तें शांतपणानें सहन करण्याची शक्ति दे. परिस्थितींत जें बदलणें शक्य व अवश्य आहे तें बदलण्याइतकें मनोधैर्य दे. आणि काय बदलणें अशक्य आहे आणि काय शक्य व अवश्य आहे हें समजण्याइतकें ज्ञान दे." पुष्कळदां आपण परिस्थितींत बदल करणें अशक्य असतांहि तें शक्य आहे अशी चुकीची कल्पना करून घेऊन उगीचच जिवाचा त्रागा करून घेत असतों. आणि कधींकधीं याच्याउलट जाऊन परिस्थितींत बदल करणें शक्य आणि अवश्य असतांहि 'येथें कांहीं होणें शक्य नाहीं,' अशी भ्रामक समजूत करून घेऊन प्रवाहपतिताचें जिणें कंठीत असतों.

नवोढा तरुणीचें पुष्कळदां असेंच होतें. आतां आपला विवाह झाला आहे, घराची सांपत्तिक स्थिति ही आहे, इतकीं माणसें कुटुंबांत आहेत आणि विवाहित जीवनाची जबाबदारी आपण स्वेच्छेनें पत्करली आहे, हें सारें माहीत असूनहि यापैकीं एकेका गोष्टीविरुद्ध ती बंड करून उठत असते. 'विवाहापूर्वीं मी मन मानेल तेव्हां मैत्रिणीकडे गप्पा मारायला जात असें, दुपारभर कादंबऱ्या घेऊन वाचीत असें, संध्याकाळीं मैत्रिणींबरोबर फिरायला जात असें आणि आतां बाहेर जायचें तर सासूबाईंना विचारून जावें लागतें, दुपारीं पुष्कळदां घरगुती कामेंच निघतात आणि संध्याकाळीं फिरायला जाण्याची तर सोयच नाहीं. कसें

कंठावें हें असें जीवन ?'—अशा तऱ्हेची विचारसरणी कित्येक मुलींची असते. पण असा विचार करण्याऐवजीं ती जर हें ध्यानांत आणील कीं, सोळा-अठरा वर्षांपर्यंतचें जीवन स्वच्छंद व बेजबाबदारीचें असणें साहजिक आहे. कारण तोंपर्यंत शरीराची व मनाची वाढ व्हावयाची असते. पण ही वाढ झाल्यानंतर संसाराची किंवा नोकरीधंद्याची जबाबदारी आनंदानें स्वीकारणें आणि उत्तम तऱ्हेनें ती पार पाडणें हेंच या दुसऱ्या अवस्थेचें भूषण असतें. सहा-सात महिन्यांपासून तों वर्ष-सव्वा वर्षापर्यंत रांगणाऱ्या मुलाचें आपण कौतुक करतों. पण दोन वर्षें उलटून गेल्यानंतरहि जर मूल रांगत राहिलें, तर त्याचें कौतुक न होतां त्यांच्यांत कांहीं उणीव आहे याचीच जाणीव त्याच्या भोवतालच्या माणसांना होते. शाळाकॉलेजांत मोकळेपणीं खेळणारीबागडणारी, नवनवे पोशाख करणारी किंवा अभ्यासांत रमून जाणारी मुलगी ही कौतुकाचा विषय बनते. पण एका मोठ्या घरांतील गृहिणी बनून कांहीं वर्षें लोटल्यानंतरहि जर ती स्त्री नुसती नटण्यामुरडण्यांत, तासन् तास कादंबऱ्या वाचण्यांत किंवा मन मानेल तसें फिरण्याभटकण्यांत वेळ घालवूं लागली, तर तिची पुरी मानसिक वाढ झाली नाहीं, आपली नवी जबाबदारी कळण्याइतकी नैसर्गिक प्रौढता तिच्यांत आली नाहीं, असेंच कोणीहि जबाबदार माणूस म्हणेल. एक तर थिल्लर, पोरकट किंवा अर्धवट या शब्दांनींच तिच्या या अवस्थेंतील वर्तनाचें वर्णन केलें जाईल.

पूर्वींच्या बहुतेक स्त्रिया फार लवकर किंवा क्वचित् अकालींहि प्रौढ बनत व आपल्या वयाच्या पलीकडच्याहि जबाबदाऱ्या उचलीत. आजच्या बऱ्याच स्त्रियांची बाल्यावस्था इतका काळ टिकते कीं, तारुण्याचीहि जबाबदारी पार पाडणें त्यांना कठिण होऊन बसतें, असें म्हणण्याची वेळ येत चालली आहे. आपलें प्रत्यक्ष वय असेल त्यापेक्षां आपलें वय फारच कमी आहे हें दाखविण्याच्या हव्यासामुळें कित्येक स्त्रिया जाणतां वा अजाणतां थिल्लर, पोरकट व बेजबाबदार गोष्टी तारुण्य उलटून गेल्यावरहि करीत राहतात. दुर्दैवानें अशाच स्त्रियांचा आदर्श तरुण मुलींना अधिक आकर्षक वाटत असल्यामुळें त्या याच मार्गाचें अनुसरण करूं लागतात.

बऱ्याच नवोढा तरुणींची मानसिक अवस्था ही अशी असते. आणि या अवस्थेंतून निश्चयानें बाहेर पडून नव्या जबाबदाऱ्या हंसतमुखानें स्वीकारण्याचा

प्रयत्न करणाऱ्या तरुणीला तिच्या पतीकडून फारच क्वचित् साहाय्य होतें ही या दुरवस्थेची दुसरी बाजू आहे. शाळाकॉलेजचें शिक्षण संपवून संसाराची जबाबदारी पत्करणाऱ्या तरुणांचीहि अवस्था बऱ्याच अंशीं तरुणींप्रमाणेंच असते. शाळा-कॉलेजच्या स्वच्छंद व मोकळ्या वातावरणांतून बाहेर पडतांच त्यांना नोकरीला किंवा धंद्याला जुंपून घ्यावें लागतें. पूर्वीच्या आयुष्याशीं तुलना करतां या नव्या अवस्थेंत त्यांना अर्थातच अनेक बंधनें स्वतःवर लादून घ्यावीं लागत असतात. पण तीं बहुतांश कामाचीं व व्यवसायाचीं बंधनें असतात. त्या कामाचें बंधन संपलें कीं, उरलेला वेळ मनाप्रमाणें घालविण्यास ते मोकळे असतात. तरुणीला जाचतें तें हेंच. हें योग्य कीं अयोग्य हा विचार वेगळा. पण असा विचार तिच्या मनांत येतो ही गोष्ट मात्र अनुभवाची आहे.

पुरुषाच्या शिक्षणोत्तर जीवनक्रमांत फरक होतो यांत शंकाच नाहीं. पण एका लोकमान्य, समाजमान्य जीवनक्रमांतून तो दुसऱ्या समाजमान्य जीवनक्रमांत शिरतो, एवढेंच. तरुणी मात्र विवाहपूर्व आयुष्यांतील समाजमान्य, शिष्टमान्य अशा शिक्षणांत व्यतीत होणारा जीवनक्रम सोडून, केवळ घरांत डांबून ठेवणारा जीवनक्रम पत्करते. मुलगी शाळाकॉलेजांत शिकत असतां कोणी ओळखीचा सद्गृहस्थ जेव्हां, 'मुलगी काय करते' असा सहज प्रश्न करतो, तेव्हां 'अमुक वर्गांत मुलगी शिकत आहे' हें सांगतांना पित्याचे डोळे कौतुकानें बोलूं लागतात. आणि तीच मुलगी लग्न होऊन सासरीं गेली कीं 'काय करते?' या प्रश्नाला उत्तर देतांना, 'कांहीं नाहीं, लग्न झालें आहे तिचें.' असें म्हणून तो स्वस्थ बसतो. मुलीलाहि हा जीवनांतला फरक, अशाच कारणांमुळें, वाटावा तितका स्पृहणीय वाटत नाहीं. शिकत राहण्याची अवस्था हीच आपल्या जीवनांतली सर्वोत्कृष्ट अवस्था व लग्न होऊन संसाराला जुंपलें जाणें हा स्त्रीच्या जीवनाचा शाप आहे, अशीच कांहींशी कल्पना बऱ्याच नवोढा तरुणींची यामुळेंच होत असते.

• २ •

या अनिष्ट वृत्तींतून आमच्या मुली बाहेर पडणें अवश्य आहे. एवढेंच नव्हे तर एका नव्या जाणिवेनें, नव्या उत्साहानें त्या बाहेर पडल्या पाहिजेत. ही नवी जाणीव कशी येणार? हा नवा उत्साह त्यांच्यांत कसा सळसळणार? हाच आज

गृहजीवनांतील सर्वांत कठीण पण अतिशय निकडीचा असा प्रश्न आहे. येथेंच दांपत्यजीवनांतील दुसऱ्या भागीदाराचा प्रश्न उभा राहतो. तरुणाला सुंदर, सुशिक्षित आणि चटकदार अशी तरुणी पत्नी म्हणून पाहिजे असते. परंतु तिच्या गुणांना पोषक किंवा तिच्या वृत्तीशीं संवादी असें वातावरण उत्पन्न करण्याचा तो थोडाहि प्रयत्न करीत नाहीं. पुष्कळ वेळां तो स्वतःच्या घरांतच स्वतंत्र नसतो. आर्थिक दृष्ट्याहि पूर्ण स्वतंत्र नसतो आणि मानसिक दृष्ट्याहि तो आईवडिलांच्या कह्यांत असतो. अशा पुरुषाची पत्नी म्हणून नव्या व सर्वस्वी अपरिचित अशा घरांत तरुणी प्रवेश करते. सासू, नणंद, जाऊ अशा नात्यांनीं त्या घरांतल्या स्त्रिया तिच्या संबंधी बनतात. नव्या सुनेचें, वहिनीचें किंवा जावेचें उठणें-बसणें, बोलणें-चालणें व बारीकसारीक गोष्टहि क्वचित् कुतूहलाचा किंवा कौतुकाचा विषय बनतात. पण बहुतेक ठिकाणीं त्या टीकेचाच विषय बनलेल्या आढळतात. नवोढा तरुणी सर्वस्वी नव्या घरांत येते, सर्वांच्या तीक्ष्ण दृष्टीचा विषय बनते आणि हजारों वर्षें चालत आलेल्या रीतिरिवाजांच्या व रूढींच्या बंधनांत अडकून पडते.

तसें पाहिलें तर घर सोडून आजकालच्या मुली कोठें दुसरीकडे जात नाहींत असें थोडेंच आहे ? कित्येक बोर्डिंगांत शिकण्यासाठीं जातात. किंवा थोड्याबहुत अपरिचित असणाऱ्या नातेवाइकांच्या किंवा मैत्रिणींच्या घरीं सुट्टींत जातात. पण तेथें त्यांना परतंत्रतेचा कधीं आभासहि होत नाहीं. परंतु सासरीं मात्र वस्तुसंग्रहालयांतील एखाद्या वस्तूप्रमाणें तिच्याकडे सारे कुतूहलानें बघत असतात. ती संग्रहालयांतील वस्तु तर खरीच, पण कांचेच्या पेटींतील वस्तु असते. कांचेचें दार उघडून मोकळेपणानें ती चालूं लागेल तर सर्वांना आश्चर्याचा आणि रागाचा धक्काच बसणार हें निश्चित. नवविवाहित तरुणीला ही जाणीव असते. म्हणूनच तिचें सुशिक्षित, स्वातंत्र्यप्रिय मन गुदमरून जातें. ज्याच्या नांवानें ती नव्या घरांत प्रवेश करीत असते, तो तिच्या या हळुवार भावनाविषयीं पूर्ण अनभिज्ञ असतो. आणि त्याला जाणीव झाली, तरी युगायुगाचे तथाकथित शालीनतेचे संस्कार ओलांडून तिला मोकळें वाटावें अशी कांहींच सोय तो करीत नाहीं. "मी श्रीमंत आहें, मला मोठी नोकरी आहे किंवा मी मोठा विद्वान् आहें. तेव्हां सुशिक्षित मुलगी पत्नी म्हणून मला मिळाली हें अगदीं सहजच आहे. माझ्यासारखा पति मिळाल्यानंतर आतां तिला आणखी कसल्या गोष्टीची गरज असणार ?" अशा आत्मसंतुष्ट

विचारांत पति मग्न असतो. 'आज पत्नी म्हणून जी तरुणी माझ्या घरांत आली, तिला मन आहे, कोमल भावना आहेत, नव्या नात्यांत ती गोंधळून, बुजून, गुदमरून गेली असेल,' असे विचार त्याच्या डोक्यांत क्वचितच येतात.

विवाह हा स्त्रीच्या आयुष्यांतील एक महत्त्वाचा क्रांतिकारक टप्पा आहे, या गोष्टीची जाणीव प्रत्येक पतीला जितक्या जास्तींत जास्त प्रमाणांत होईल, आणि ही जाणीव ठेवून तो आपल्या पत्नीचें नव्या घरांतील जीवन तितकें जास्त मोकळें आणि सहज करण्याचा प्रयत्न करील, तितक्या प्रमाणांत नवविवाहित तरुणीचा नवा गृहप्रवेश अधिक सहज व सुखाचा होईल. आणि मोकळ्या, स्वतंत्र पण जबाबदार जीवनाची मुहूर्तमेढ रोवणें तरुणींना शक्य होईल.

वैवाहिक असंतोषाचीं कारणें विविध स्वरूपाचीं असूं शकतात, याची कल्पना प्रत्यक्ष जीवनांतील उदाहरणांवरून तर येतेच; परंतु जीवनदर्शी अशा कादंबऱ्यां-तून व अमेरिकन डायव्होर्स कोर्टांतील विवाहविच्छेदांच्या अनेक कारणांवरूनहि येते. पति धूम्रपान करतो, घोरतो किंवा जेवतांना आवाज करून चावतो, अशा तऱ्हेच्या दिसण्यांत क्षुद्र अशा कारणांपासून तों व्यभिचार, मारहाण इत्यादि गंभीर स्वरूपाच्या कारणांपर्यंत सर्व तऱ्हेचीं कारणें विवाहविच्छेदांच्या मुळाशीं असलेलीं आढळतात. पतीकडून अगर पत्नीकडून वैवाहिक जीवनाला सर्वस्वी प्रतिकूल अशा तऱ्हेचें गंभीर वर्तन घडल्यास, त्या त्या प्रकाराचा स्वतंत्रपणेंच विचार करणें अवश्य आहे. म्हणून, वैवाहिक जीवनांतील सर्वसामान्यतः आढळ-णारीं व थोड्या प्रयत्नानें नाहींशीं होऊं शकणारीं अशींच असंतोषाचीं बीजें मी या ठिकाणीं घेणार आहें.

विवाह होऊन मुलगी सासरीं आल्यानंतर ती एका अगदीं वेगळ्या जीव-नाचा प्रारंभ करते. माहेरीं असतांना शाळा-कॉलेजांतील अभ्यास करणें व घरांत आईला आवश्यक ती मदत करणें याशिवाय सामान्यतः शिकणाऱ्या मुलींवर आणखी कसली जबाबदारी नसते. वर्षानुवर्ष शाळा व अभ्यास यांचा सराव असल्यामुळें, या बाबतींतील जबाबदारी मुली सहजपणें पार पाडूं शकतात. त्याच-प्रमाणें आईला घरकामांत मदत करणें हें बरेंचसें मुलीच्या खुषीवरच अवलंबून असल्यामुळें, लहर लागली तर काम केलें व कंटाळा आला तर आईला सांगून किंवा न सांगतांहि टाकून दिलें एवढीच या बाबतींतील मुलीची जबाबदारी

असते. पण सासरीं आल्यावर घर नवें, माणसें नवीं, नातीं नवीं व जबाबदाऱ्याहि नव्या असा हा अतिशय मोठा फरक मुलीच्या जीवनांत होतो. आजकाल शिकलेल्या सुना घरीं आल्या कीं, सास्वा थोड्या बिचकून वागतात व नव्या सुनेला प्रारंभीं तरी काम सांगण्यास कचरतात ही गोष्ट खरी आहे. तरीहि नव्या घरांत व नव्या नात्यानें आलेल्या मुलीला या नव्या घरांत व या नव्या माणसांबाबत आपल्या काय जबाबदाऱ्या आहेत, हें कळून घेणें फार अवश्यक असतें. नव्या घरांतील कोणतें काम आपणास करावयाचें आहे हें सुरुवातीला तिला कळत नसतें व तें हळूहळूच समजून घ्यावें लागतें.

पण एक नवें नातें तिनें जोडलेलें असतें. ज्या नव्या नात्याच्या स्वरूपावर तिच्या आयुष्याचें स्वरूप सामान्यतः अवलंबून असतें, त्या नव्या नात्यासंबंधींच्या जबाबदाऱ्या पहिल्या दिवसापासूनच ओळखणें अवश्य असतें. विवाहानंतरच्या काळांतील पति-पत्नीमधील नैसर्गिक आकर्षण अर्थात् पुष्कळ अडचणी आपोआपच नाहींशा करीत असतें. तरीहि आपल्या पतीला काय आवडतें, व काय आवडत नाहीं या गोष्टींचा सूक्ष्म अभ्यास जर पत्नीनें प्रथमपासूनच सुरू केला, तर त्या आवडींनावडींप्रमाणें वागणें व करणें तिला सुलभ होईल. आणि आपल्या आवडींनावडींचा आदर आपली पत्नी करीत आहे हें जाणून पतीचें पत्नीवरचें प्रेम व तिच्याविषयींचा आदर वाढत राहील.

पण ही वैवाहिक जीवनांतील संतोषासाठीं आवश्यक अशी गोष्ट असली, तरी येथेंच प्रथम सुशिक्षित पतिपत्नींमध्यें संघर्ष सुरू होत असतो. सुशिक्षित मुलीला वाटतें, पतीला अमुक तऱ्हेचे कपडे आवडतात, अमुक रंगांचे व अमुक तऱ्हेनें नेसलेले आवडतात खरे; पण मला ती नेसण्याची तऱ्हा व ते रंग आवडत नाहींत. मग मी माझ्या आवडी टाकून पतीच्या कां म्हणून स्वीकारूं? त्याचप्रमाणें पति व्यवस्थित असला व त्याला आपली खोली व्यवस्थित व नीटनेटकी असावी असें वाटत असलें आणि पत्नी अव्यवस्थित असली, तर ती असें म्हणू शकेल कीं, माझा हा अव्यवस्थितपणाचा स्वभाव आहे, मी तो बदलण्याचा प्रयत्न कां म्हणून करूं?

पति-पत्नींमधील संघर्षाचे प्रसंग अशा लहानसहान गोष्टींवरूनच उद्भवतात. परंतु ते सतत वाढत गेले कीं त्यांतूनच गंभीर स्वरूपाचा असंतोष निर्माण

होतो, किंवा परस्परांविषयीं उदासीनता निर्माण होते. इकडे पतीच्या आवडी-नावडींना मान तुकविण्यांत सुशिक्षित पत्नीला कमीपणा वाटतो. आपल्या व्यक्तित्वावर हा घाला आहे असें तिला वाटत राहतें. कारण शाळा-कॉलेजांत होणाऱ्या वाचनांत व अध्ययनांत निर्भेळ स्वरूपाचीं व्यक्तित्वाचीं मूल्यें गौरविलेलीं तिला आढळलेलीं असतात. स्त्रियांवर अन्याय होत आहेत, स्त्रियांना समाजांत व घरांत योग्य तें स्थान दिलें जात नाहीं व स्त्रियांच्या व्यक्तित्वाचा आदर केला जात नाहीं—अशा तऱ्हेचे विचार तिच्या कानीं वारंवार पडत असतात. आणि लग्न करून ती नव्या घरीं आली कीं तिला सुरुवातीलाच आढळून येतें कीं, येथें तर आपल्या आवडीनावडी बाजूस सारून इतरांच्या मनाप्रमाणें वागावें लागणार. विशेषतः आपल्या पतीच्या आवडीनावडींप्रमाणें आपणांला वागणें भाग पडणार आहे. आपलें व्यक्तित्व जर आपण गमावलें तर आपल्या शिक्षणाचा काय फायदा झाला ?

व्यक्तित्वाच्या या अविकसित कल्पनांमुळें पुष्कळदां नवविवाहित सुशिक्षित मुली पतीच्या आणि आपल्या आवडीनावडी जेथें जेथें भिन्न आहेत, तेथें तेथें आपल्याच आवडीनावडींना कटाक्षानें चिकटून राहून पतीच्या आवडीनावडींकडे मुद्दाम दुर्लक्ष करतात.—येथें कोणी असा प्रश्न सहजच विचारील कीं, पति व पत्नी या दोन्ही स्वतंत्र व्यक्ति आहेत, तेव्हां पत्नीनें आपल्या आवडी बाजूस सारून पतीच्याच आवडींना कां मान द्यावा ? पतीनें पत्नीच्या आवडींचा कां आदर करूं नये ?—प्रश्न अगदीं योग्य आहे. पण आपलें व्यक्तित्व प्रस्थापित करतांना आपणाला कोणत्या परिस्थितींत वागावयाचें आहे, व समाजाची घडण कशी आहे याचाहि विचार करणें अवश्य आहे. त्याचप्रमाणें कोणत्या गोष्टींचा त्याग केल्यानें खऱ्या व्यक्तित्वाला बाध येईल व कोणत्या गोष्टींचा त्याग केल्यानें व्यक्तित्वावर अनिष्ट परिणाम होणार नाहीं, याचाहि विवेक करण्यास प्रत्येक मुलीनें शिकलें पाहिजे.

आजचा समाज, आजच्या समाजांतील शक्ति व मूल्यें या सर्वांचा वास्तवतेनें विचार करतां एक गोष्ट स्पष्टपणें आपणांस दिसून येईल. ती म्हणजे, आजच्या समाजांत पुरुषांचें प्राधान्य आहे, समाजाची घडण पितृसत्ताक आहे आणि पुरुषांशीं स्त्रियांनीं जुळवून घेण्यावरच समाजांतील संतोष व समाधान अवलंबून आहे. याबरोबरच हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे कीं, आजच्या समाजांतील पुरुषांचें

प्राधान्य कमी करून स्त्रियांनाहि त्यांत अधिकाधिक मानाचें व जबाबदारीचें स्थान मिळवून देण्यासाठीं प्रत्येक सुशिक्षित स्त्रीनें प्रयत्न करणें हेंहि साहजिक आहे. वस्तुस्थिति व सुशिक्षित स्त्रियांच्या आकांक्षा यांचा समन्वय कसा करतां येईल व तो करतांना वैवाहिक समाधानाला कमींत कमी धक्का पोचण्याची काळजी कशी घेतां येईल हा आजच्या स्त्रियांपुढील महत्त्वाचा प्रश्न आहे. या ठिकाणीं एक गोष्ट मला कटाक्षानें सांगावीशी वाटते. ती ही कीं, ज्या स्त्रिया आपल्या वैवाहिक जीवनांत वरील दोन गोष्टींची जुळणी करण्याचा प्रयत्न करीत आल्या आहेत व ज्यांना ही जुळणी पुष्कळ मोठ्या प्रमाणांत साध्य झाली आहे, त्यांनाहि आपल्या अनेक आवडीनिवडींचा स्वेच्छेनें त्याग करावा लागला आहे व नव्या आवडी-नावडी तेवढ्याच स्वेच्छेनें निर्माण कराव्या लागल्या आहेत. ज्या ठिकाणीं पति समंजस, उदार व विवेकी आहेत, त्या ठिकाणीं त्यांच्या पत्नींना आपल्या आवडीनावडींचा कमींत कमी त्याग करावा लागला व त्यांच्या पतींनाहि पत्नींसाठीं कांहीं आवडीनावडींचा त्याग करावा लागला. हें सर्व मीं यासाठीं सांगितलें आहे कीं, व्यक्तित्वाचें स्तोम माजवून जेथें अपरिपक्व स्त्रिया क्षुल्लक गोष्टींसाठीं वैवाहिक असमाधान ओढवून घेतात तेथें त्या व्यक्तित्वासाठीं तसें करीत नसून योग्य ती जाणीव नसल्यामुळेंच तसें करतात हें स्पष्ट व्हावें.

प्रीतिविवाहांमध्येंहि सुशिक्षित पत्नीला पतीच्या मानानें थोडा अधिक त्याग करावा लागतो. ज्या ठिकाणीं पत्नीच्या कांहीं विशिष्ट आवडींनावडींसाठीं व व्यक्तित्वविकासाच्या कल्पनांसाठीं पतीला आपल्या घराचा व आप्तांचा त्याग करावा लागतो, त्या ठिकाणीं कांहीं काळानंतर याच कारणामुळें पतिपत्नींमध्यें असंतोष निर्माण झाल्याचीं उदाहरणें दिसून येतात. आणि केवळ थोडाबहुत असंतोष न राहतां संपूर्ण जीवन कटु करून टाकण्याइतका तो असंतोष वाढतो हेंहि दिसून येतें. आजच्या समाजाची घडण, आजची वस्तुस्थिति व आपल्या आकांक्षा आणि वैवाहिक जीवन यांचा समन्वय करण्याच्या आवश्यकतेकडे दुर्लक्ष केल्यास जीवनांत कधींच समाधान प्राप्त होणें शक्य नाहीं, ही गोष्ट सुशिक्षित स्त्रियांनीं कधींहि विसरतां उपयोगी नाहीं. जिला असें वाटत असेल कीं, माझें व्यक्तित्व इतकें मोलाचें आहे कीं, मी कोणासाठींहि त्याला जराहि मुरड घालणार नाहीं, त्या स्त्रीनें विवाहाकडे न झुकणें हेंच इष्ट आहे. परंतु

आपलें व्यक्तित्व हें विवाह व मातृत्व यांच्यामुळेंच खरोखर परिपूर्ण होऊं शकेल व प्रभावी होऊं शकेल, ही जाणीव ज्या सुशिक्षित स्त्रियांना स्पष्टपणें झालेली आहे, त्यांनीं वैवाहिक जीवनांत सहज त्याग करण्यास तयार झालें पाहिजे.

सुशिक्षित तरुणीनें यौवनाच्या उत्कटतेनें जर आपल्या वैवाहिक जीवनास प्रारंभ केला, तर या यौवनप्रवाहांत किती तरी बारीकसारीक भेद व अडचणी सहजच नाहींशा होऊन जातील. तरीहि, वैवाहिक प्रीतीचा पहिला भर ओसरल्यानंतर प्रवाहांत न दिसलेले खडक दृष्टीस पडतील यांत शंका नाहीं. म्हणूनच कांहीं कांहीं अशिक्षित पत्नीसुद्धां पतीच्या सर्व आवडी-नावडी, सवयी व आकांक्षा या सर्वांचें आपल्या नैसर्गिक चातुर्यानें निरीक्षण करून त्याप्रमाणें प्रारंभापासूनच वागतांना जशा दिसतात, त्याचप्रमाणें सुशिक्षित स्त्रियांनीं शिक्षणामुळें मिळालेल्या जाणिवेच्या साह्यानें पतीच्या सर्व गोष्टींचें निरीक्षण जर प्रथमपासून करून ठेवलें, तर पतीला सुखी करणें व पर्यायानें आपणहि सुखी होणें हें त्यांना सहज शक्य होईल. कपड्यालत्त्यांत, खाण्यापिण्यांत, राहणींत, आचारविचारांत— जेथें जेथें पतीच्या व आपल्या संवयींत पतीला बोचणारा भेद आढळेल, तेथें तेथें तो कमी करण्याचा प्रयत्न पत्नीनें प्रथमपासूनच हळूहळू केला तर, पतीच्या ध्यानांत येण्यापूर्वी किंवा त्याला बोचण्यापूर्वींच तो नाहींसा करतां येईल. कोणत्याहि दोन व्यक्तींत जसे भेद असतात तशाच स्वरूपाचे भेद असल्यास त्यांच्याबद्दल विशेष कांहीं वाटण्याचें कारण नाहीं. पण ज्या आपल्या गोष्टी पतीला बोचत आहेत असें पत्नीला दिसून येतें, त्या गोष्टींच्या बाबतींत तिनें लक्ष घातलें पाहिजे. आपली ती आवड, ती सवय, तो आचार किंवा तो विचार योग्य आहे आणि पतीची त्याविषयींची प्रतिकूलता ही गैरसमजावर किंवा गैरमाहितीवर आधारलेली आहे, असें जर पत्नीला दिसून आलें तर शांतपणें व चातुर्यानें तिनें पतीची त्या बाबतींत समजूत घालावी. बहुधा यामुळें पतीची त्या विशिष्ट बाबतींतील प्रतिकूलता दूर होऊन जाईल. परंतु दूर न झाली तर आणखी थोडा काळ जाऊं दिला पाहिजे.

या बाबतींत एक काळजी अवश्य घेतली पाहिजे. पतीला पसंत नसणाऱ्या पण वस्तुतः योग्य असणाऱ्या अशा एखाद्या आपल्या गोष्टीबद्दल जर पत्नीनें विशेष आग्रह धरला किंवा हट्ट धरला तर पतीची प्रतिकूलता वाढत जाण्याचाच

संभव जास्त हें तिनें लक्षांत ठेवलें पाहिजे. ओढाताणीनें गांठ अधिकच घट्ट होत जाते.

पत्नी अशिक्षित असो कीं सुशिक्षित असो, आपलीं कांहीं कांहीं कामें तिनें करावीं अशी पतीची अपेक्षा असते. दैनंदिन जीवनांतील पतीचीं अशीं लहान-सहान कामें काळजीनें व आठवणीनें करण्याची जर पत्नीनें दक्षता बाळगली, तर प्रथमपासूनच पतीच्या हृदयावर प्रभाव पाडणें हें पत्नीला अधिक सुलभ होईल. विवाहापूर्वी पतीच्या ज्या लहानसहान गोष्टींची काळजी त्याची आई घेत असे त्या गोष्टींची जबाबदारी विवाहानंतर आपोआप पत्नीकडे येते. तेव्हां हीं कामें करतांना हीं नुसतीं पत्नीचीं कामें नव्हत, तर हीं मातेचीं कामें होतीं हें ध्यानांत ठेवून एका वेगळ्या वत्सलतेनें पत्नीनें हीं कामें केलीं, तर कोणत्याहि प्रकारें कमीपणाची भावना तिच्या मनांत येणार नाहीं. स्त्री-पुरुषांचे समान अधिकार, समान अपेक्षा व समान वर्तन या कल्पना वैवाहिक जीवनांत सुशिक्षित पत्नीनें तपासूनच वापरल्या पाहिजेत. आई मुलांचीं कामें करते, पण ती मुलांपेक्षां कमी दर्जाची ठरत नाहीं. त्याचप्रमाणें पतीचीं कामें पत्नीनें केलीं कीं, तिचा दर्जा त्याच्यापेक्षां कमी प्रतीचा झाला असें मानण्याचें कारण नाहीं. आपण समाजांत अशीं उदाहरणें पाहतों कीं, पत्नी सर्व तऱ्हेचीं कष्टाचीं कामें करीत आहे, स्वतः पैसेहि मिळवून आणीत नाहीं, परंतु सर्व तऱ्हेचा खर्च करण्या न करण्याचा अधिकार तिला आहे, व पति आणि मुलें हीं सर्व तिचा आदर करीत आहेत. याच्या उलट, जेथें पत्नी कोणतींच कष्टाचीं कामें करीत नाहीं, पण जेथें तिला पतीचा व मुलांचा आदर प्राप्त झाला नाहीं, अशाहि घरचीं उदाहरणें आपण पाहतों. या बाबतींत माझ्या आजवरच्या निरीक्षणानें माझें असें ठाम मत बनलें आहे कीं, जी स्त्री पतीचीं सर्व लहानलहान कामें आस्थेनें वर्षानुवर्षे करीत असते तिचाच अधिकार पतीवर चालतो. एवढेंच नव्हे, तर स्वतंत्रपणें पैसा मिळवणाऱ्या पत्नीपेक्षांहि अशा स्त्रीचा अधिकार आपल्या पतीवर जास्त असतो व तिलाच घरांत मानाचें स्थान प्राप्त होत असतें. स्वतंत्रपणें नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्या पत्नीचें अति कामामुळें किंवा उदासीनतेमुळें आपल्या पतीच्या कामांकडे दुर्लक्ष झाल्यामुळें वैवाहिक जीवन असंतुष्ट झालेलें किंवा वैवाहिक जीवनांतील सुखांचा कायमचा अंत झालेला आपण कितीदां तरी पाहतों. एका अर्थानें

पत्नीची व मातेची अशी दोन्ही तऱ्हेची अपेक्षा पतीला पत्नीकडून असते हें विसरतां उपयोगी नाहीं.

लहान लहान असंतोषाचीं बीजें झाडाचें रूप धारण करण्यापूर्वीं मुळांतच नाहींशीं करून टाकण्यासाठीं पत्नीनें दक्षता बाळगली पाहिजे, असें मी म्हणतांच कांहीं जणी असा प्रश्न विचारतील कीं, 'विवाहांतील सुख जतन करण्याचें काम एकट्या पत्नीलाच कां उचलण्यास सांगतां? पुरुषांच्या हातून होणाऱ्या लहान-सहान व सहज टाळतां येण्याजोग्या चुकांमुळेंच कितीदा वैवाहिक जीवन दुःखी होऊन जातें....'

हें विधान मला पूर्णपणें मान्य आहे. पण मी सुद्धां तरुण स्त्रियांना उद्देशून लिहीत असल्यामुळें पत्नी या नात्यानें त्यांनीं कोणती काळजी घ्यावी एवढेंच सांगणें माझ्या विषयांत येतें. वस्तुतः आजच्या समाजाच्या व कुटुंबाच्या संक्रमण-कालांत वैवाहिक असंतोष टाळण्यासाठीं पुरुषालाच जास्त काळजी घेणें हें सहज शक्य होईल. विवाहानंतर पत्नी त्याच्या घरीं येत असते. तेव्हां नव्यानेंच आलेल्या आपल्या पत्नीला या नव्या घरामध्यें चांगल्या तऱ्हेनें रुळतां यावें यासाठीं त्यानेंच तिचा मार्ग निष्कंटक करून ठेवायला हवा. पण आपली ही प्राथमिक जबाबदारी जास्त महत्त्वाची आहे व ही एकदां आपण चांगल्या तऱ्हेनें पार पाडली कीं, पुढची जबाबदारी पत्नी स्वेच्छेनें व आनंदानें उचलूं शकेल, एवढी जाणीव आज फार थोड्या पुरुषांना असते. नोकरीधंदा किंवा व्यवसाय करून आपलें व आपल्या कुटुंबाचें पोषण करण्याची जबाबदारी आपणावर आहे, एवढेंच आजच्या तरुणाला माहीत असतें. परंतु विवाह केल्यानंतर एका नव्या व्यक्तीला आपण आपल्या घरीं आणीत आहोंत, तेव्हां या नव्या घरीं तिला येणाऱ्या अडचणी आपणच निवारल्या पाहिजे हें मात्र त्याला क्वचितच कळतें. आपण प्रारंभीं पत्नीच्या सुखाची एवढी काळजी बाळगली, तर ती विशेष आनंदानें पुढील आयुष्यांतील आपल्या सुखाची जबाबदारी स्वीकारील, ही गोष्ट आजच्या सर्वसामान्य तरुणाच्या डोक्यांतहि कधीं येत नाहीं. आणि याच जाणिवेच्या अभावामुळें कितीतरी टाळतां येण्याजोगे व आयुष्य कडु बनवून टाकणारे प्रसंग तरुणांच्या वैवाहिक आयुष्याच्या प्रारंभींच घडत राहतात.

वर वर्णिलेली जाणीव जर आजच्या तरुण पुरुषांना झाली, तर तरुण पत्नीचें

कार्य किती तरी सुलभ होईल आणि उभयतांचा संसारहि किती तरी पटींनीं अधिक सुखाचा होईल. पण आज जी कटु वस्तुस्थिति आहे ती विसरून चालणार नाहीं. लग्न करून आपल्या पत्नीवर जणुं कांहीं आपण उपकार केला आहे अशा तऱ्हेची भावना बऱ्याच तरुण पतींमध्यें दिसून येते. ज्यांना चांगली नोकरी आहे किंवा ज्यांचा व्यवसाय चांगला चालला आहे, त्यांना तर आपल्या सधनतेचा विशेषच उन्माद चढलेला असतो. आपल्या पैशाकडे पाहून कोणतीहि मुलगी आपल्या पायाशीं लोळण घेत येईल अशा तऱ्हेच्या अहंकारानें त्यांचें मन धुंद झालेलें असतें. ही झाली वधू-वर पाहून होणाऱ्या विवाहांतील परिस्थिति. प्रत्यक्ष प्रीति-विवाहांतहि किती तरी उदाहरणांत जवळजवळ अशीच भावना आढळून येते. विवाहापूर्वीच्या क्षणापर्यंत प्रियाराधन करणारा प्रियकर लग्नानंतरच्या क्षणापासून अधिकार गाजविणारा पति बनलेला अनेकदां आढळून येतो. आणि या एकदम घडून आलेल्या कायापालटामुळें हतबुद्ध झालेल्या पत्नीच्या अपेक्षांवर प्रारंभींच आघात झालेला आढळून येतो.

आज आपल्या समाजांत जी व्यवस्था आहे व जीं मूल्यें आहेत, त्यांमुळेंच पुरुषांची ही वृत्ति बनलेली आहे हें खरें. परंतु सर्व जगांतील कादंबऱ्यांतून वैवाहिक जीवनाचें जेथें जेथें चित्रण आढळतें, तेथें तेथें या पुरुषी वृत्तीचा प्रादुर्भाव झालेला नेहमींच आढळून येतो. तेव्हां गुरुत्वाकर्षणाच्या निसर्गसिद्ध नियमाप्रमाणें पुरुषांच्या मनोवृत्तीचा हा समाजसिद्ध नियम दृष्टीआड करून चालणार नाहीं. अस्तित्वांत असणारा समाज, अस्तित्वांत असणारी समाजव्यवस्था, यामुळें सिद्ध झालेली सर्वसामान्य पुरुषांची मनोवृत्ति, या सर्व गोष्टी गृहीत धरूनच तरुण स्त्रियांनीं आपलें वैवाहिक आयुष्य अधिक सुखी व अधिक संतोषदायक बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. व्यक्तिस्वातंत्र्य, हक्क व स्त्रियांच्या अपेक्षा इत्यादि कल्पनांचा वेळींअवेळीं घोष करून, ‘आपलें आयुष्य दुःखमय बनलें आहे व या आयुष्यांत आपल्या आकांक्षांना वाव मिळणें अशक्य आहे;’ अशा तऱ्हेचा आक्रोश करीत बसणें हें नुसतें मूर्खपणाचेंच नव्हे, तर दुर्बलतेचें लक्षण आहे. आपल्या मनासारखी सर्व परिस्थिति जुळवून देण्याचा या जगांत कोणी पत्कर थोडाच घेतला आहे? जागरूकपणानें आयुष्याचा जोडीदार निवडल्यानंतर येतील त्या अडचणींशीं सामना करून आपल्या जीवनांतील संतोष

जर सुशिक्षित पत्नींना मिळवितां आला नाहीं व आपल्या जीवनाचा विकास त्यांना करतां आला नाहीं, तर त्यांच्या शिक्षणाचा कांहीं एक फायदा झाला नाहीं, असेंच म्हणणें प्राप्त आहे.

तेव्हां परिस्थिति विशेष अनुकूल नाहीं म्हणून निराश न होतां, आपल्या शिक्षणाला आपलें चीज करण्याचा उत्तम अवसर मिळाला आहे या जाणिवेनें जर आमच्या तरुण मुली वैवाहिक जीवनांतील अडचणी नाहींशा करण्याचा प्रयत्न करतील, तर त्यांच्या पदरांत पुष्कळ मोठ्या सुखाचें व विकासाचें माप पडल्या-वांचून राहणार नाहीं, अशी माझी पूर्ण खात्री आहे.

. ३ .

विवाह ही तरुणींच्या जीवनांतील एक क्रांतिकारक घटना असते, ही गोष्ट सर्वमान्य आहे. आईबाप, भाऊबहीण व इतर जवळचे स्नेहीसंबंधी सोडून एका अगदीं नव्या व अपरिचित घरांत मुलीला प्रवेश करावा लागतो. हा नवा गृह-प्रवेश आजकालच्या कांहीं कांहीं लग्नांत मुलींना अतिशय सुखकारक होतो हें खरें. पण अशा भाग्यवान् मुली थोडयाच आढळतात. प्रीतिविवाहांत देखील घरगुती अडचणींमुळें किंवा आर्थिक असमर्थतेमुळें पुष्कळदा नवविवाहित मुलीला सासरीं राहावें लागतें, आणि तिलाहि अनेक वेळां ‘नको हें सासरीं राहणें’ असे वैतागाचे उद्गार काढण्याचा प्रसंग येतांना वारंवार आढळतो. लग्नामुळें पूर्वींच्या मैत्रीला किंवा पूर्वींच्या प्रेमळ संबंधांना अधिक उजळा यावयास पाहिजे. परंतु तें तर बाजूलाच राहून या मैत्रीचें किंवा प्रेमळ संबंधांचें कटुतेंत, द्वेषांत किंवा निदान उदासीनतेंत रूपांतर होतांना दिसतें.

हा असा फरक कां होतो? एक मुलगी दुसरीची मैत्रीण असतां, एक दुसरीची भावजय बनतांच त्यांच्यांतील मैत्रिणींचें मधुर नातें नाहींसें होऊन केवळ नणंद-भावजयीचेंच नातें कां राहतें? ‘पाण्यापेक्षां रक्त अधिक घट्ट असतें,’ या अर्थाच्या इंग्रजी म्हणीची सार्थता अशा वेळीं पटूं लागते. दोन व्यक्तींमधील सहज प्रेमळ संबंधांचा नात्याचा—रक्ताचा—संबंध बनला कीं, तें सहजतेचें नातें या नव्या रक्ताच्या नात्यांत पार विरघळून जातें. सहजतेच्या मित्रभावांत गोडवा असतो, उत्कटताहि असते; पण त्या भावनांना धरून ठेवणारें, कुठल्या तरी बाह्य, समाज-

मान्य व पक्क्या पाशांनीं बांधणारें असें कांहीं नसतें. नात्याचे संबंध यापेक्षां अगदींच वेगळ्या तऱ्हेचे असतात. ते पक्के बांधलेले, समाजमान्यतेचें शिक्का-मोर्तब मिळालेले असे असतात. आणि म्हणूनच त्यांना ठोकळ्यांचें रूप प्राप्त होतें. त्यांच्यांतील लवचिकपणा नाहींसा होऊन जातो. या नात्याचीं निव्वळ यंत्रें बनतात. सासरा, सासू, सून, नणंद, जाऊ, दीर, भावजय यांपैकीं कुठल्या तरी चौकटींत प्रत्येक स्त्री किंवा पुरुष जाऊन बसतो. या प्रत्येक चौकटींतल्या नात्यासाठीं समाजानें शतकानुशतकें ठरवून दिलेलें वर्तनच प्रत्येक व्यक्ति नकळत करूं लागते. सहजप्रेरणेच्या क्रिया जितक्या नकळत परंतु जितक्या अचूकपणानें होत असतात, तितक्याच नकळतपणानें व अचूकपणानें, यांपैकीं कोणताहि नात्याचा संबंध जुळून येतांच व्यक्ति त्या चौकटींतील वर्तनाच्या साच्यांप्रमाणें वागूं लागते. बहुतेक सगळ्या जवळच्या नात्यांचे हे असे पक्के सांचे बनले गेले असल्यामुळें, विवाहामुळें स्त्रीचें किंवा पुरुषाचें त्या त्या सांच्यांत रूपांतर झालें कीं ती ती व्यक्ति जणुं एखाद्या यंत्राप्रमाणें त्या त्या ठराविक क्रिया करूं लागते. विवाहापूर्वीचीं नातीं—आई, बाप, भाऊ, बहीण इत्यादींचीं—खरोखर रक्ताचीं असल्यामुळें त्यांच्यांत मनुष्यांना व इतर प्राण्यांना समान असणाऱ्या नैसर्गिक प्रेमाचा तरी भाग असतो. परंतु विवाहामुळें पती-खेरीज इतरांशीं जीं नातीं आपल्या समाजांत जोडलीं जातात, तीं सर्व नातीं कुटुंबें अविभक्त स्थितींत असतांना कांहीं समाजमान्य व आवश्यक परिस्थितीनें निर्माण केलेलीं असल्यामुळें, त्यांत सहजपणाचा सर्वस्वी अभाव आणि सर्वत्र सांचेबंदी हींच आढळून येतात आणि म्हणूनच सासरचें राहणें हा सासुरवास—तुरुंगवास असेंच समीकरण आजवर आपल्या समाजांत झालें आहें.

प्रांतांप्रांतांतील चालीरीतींचें निरीक्षण केलें, तर सासर म्हणजे एखादें भयंकर स्थान आणि माहेर म्हणजे प्रेमाचें, आनंदाचें, विसाव्याचें स्थान असेंच सगळी-कडे आढळून येतें. महाराष्ट्रांतील स्त्रीगीतांकडे ओझरतीहि नजर टाकली, तरी या परिस्थितीचें प्रतिबिंब ओवीओवींतून डोकावतांना दिसेल. देशासाठीं किंवा एखाद्या ध्येयासाठीं तुरुंगवास किंवा हालअपेष्टा सहन करणाऱ्या देशभक्तांना किंवा ध्येयवाद्यांना आपल्या ध्येयासाठीं आपण हाल भोगतों आहोंत याची जाणीव असल्यामुळें त्यांच्या कष्टांनाहि एक प्रकारचें सौंदर्य व एक तऱ्हेची सुसह्यता प्राप्त

होत असते. परंतु ज्या सर्वस्वी अपरिचित व्यक्तीला पति मानून मुलगी पतिगृहांत प्रवेश करते, त्याच्या प्रेमाची किंवा सहृदयतेची कांहींच खात्री नसतां मुलगी गृहप्रवेश करीत असते. आणि ती खात्री उभ्या आयुष्यांत कधींच पटत नसतांहि जेव्हां ती सासरीं जन्म काढते, तेव्हां बिचारीच्या दुःखकष्टांना सुसह्यता कोण प्राप्त करून देणार? तिच्या भाग्यानें पति निदान सामान्य सहृदयतेनें वागणारा निघाला, तरी तेवढ्या ओलाव्याच्या भरंवशावर ती सर्व कष्टाचा जन्म हसत हसत काढते.

क्षणभर सारें समाजशास्त्र दृष्टीआड केलें तर, सासरच्या हालअपेष्टांत शतकानुशतकें मुली कां जन्म काढीत आल्या व आईबाप त्यांना या खाईंत कां ढकलीत राहिले हें कोडें सुटेनासें होतें. गेल्या पिढींतील किंवा त्याच्याहि पलीकडील पिढींतील वृद्ध स्त्रियांकडून जेव्हां जेव्हां त्यांच्या आयुष्याची कहाणी ऐकण्याचा प्रसंग येतो, तेव्हां या 'सासर'नामक संस्थेनें किती असाहाय्य मुलींच्या जीवनांत अनावश्यक कटुता व परिहार्य दुःख निर्माण केलें आहे याची जळजळीत जाणीव होते. मुलांमुलींचे विवाह हे समाजधारणेला अवश्यक आहेत, हें मान्य. विवाहाचाच आवश्यक भाग म्हणून मुलांची जोपासना करणें व त्यासाठीं कष्ट करणें हेंहि समाजसुधारणेला आवश्यक आहे हेंहि मान्य. परंतु या आवश्यक गोष्टींसाठीं 'सासर'नामक जी भयानक संस्था आपल्या समाजांत नवविवाहित दांपत्यावर लादली गेली आहे व जी आपल्या अमानुषतेमुळें लक्षावधि तरुण पत्नींचीं व तरुण मातांचीं आयुष्यें सुखहीन बनवून टाकीत असते, तिची आवश्यकता काय हें अजून तरी माझ्या ध्यानांत आलेलें नाहीं.

परंतु सासर ही संस्था परंपरेमुळें आजहि आमच्या समाजांत रूढ आहे हें कटु सत्य कुणालाहि मान्य केलेंच पाहिजे. गेल्या पिढींत सासरच्या या भयंकरपणापासून स्वतःचा बचाव करण्यासाठीं नोकरीधंद्याचें निमित्त करून किती तरी तरुण जोडप्यांनीं आपले स्वतंत्र संसार थाटले. परंतु आर्थिक परिस्थिति दिवसेंदिवस कठिण होत चालल्यामुळें या पिढींतील तरुण जोडप्यांना पुन्हा अविभक्त कुटुंबपद्धतीचा नाइलाजानें आश्रय करणें भाग पडत आहे. आणि म्हणूनच विवाहपूर्व आयुष्यांतील मित्रत्वाचे व स्नेहभावाचे संबंध विवाहानंतर पुन्हां पूर्वींच्याच नात्यांच्या सांच्यांत पडले कीं, या नवविवाहित मुलींना आपण कसें

वागावें हें कळेनासें होतें. नवविवाहित दांपत्याला अडीअडचणींत कुणा तरी अनुभविक नातेवाइकाची गरज लागते हें कोणीहि अमान्य करणार नाहीं. एकाच्या मिळकतींत संसार चालत नसला तर दोन भावांनीं आपलीं कुटुंबें एकत्र आणणें उभयतांच्या फायद्याचें होतें हेंहि कोणी अमान्य करणार नाहीं. आर्थिक सोयीच्या दृष्टीनें पतिपत्नींना आपल्या कुटुंबांत आणखी कांहीं व्यक्तींची गरज लागते. या कारणांसाठीं अनेक मुलें विवाह झाल्यावर पत्नीसह आपल्या आईबापांच्या घरीं राहतात किंवा भाऊ भाऊ एकत्र राहतात. या एकत्र राहण्यांत परस्परांना परस्परांसाठीं थोडाबहुत त्याग करावाच लागतो. अर्थात् तो सहजपणानें करणें एवढी एकच गोष्ट उभयतांनीं वास्तविक करावयास पाहिजे. त्यासाठीं अनावश्यक गोष्टींचें लोढणें आपल्या गळ्यांत बांधून घेण्याचें कोणाला कारण नाहीं.

परंतु नात्यांच्या सांचेबंदीमुळें एवढ्यावर कधींच हें प्रकरण थांबत नाहीं. कित्येकदां आपल्या पतीची आई, वडील, भाऊ, बहीण हें नातें ध्यानांत घेऊन सासू, सासरा, दीर व नणंद यांच्याशीं सौजन्यानें वागण्यास मुलगी तयार नसते. आणि बहुतेक उदाहरणांत सासू, सासरा, दीर व नणंद, 'ही आपल्या मुलाची किंवा भावाची पत्नी आहे', हें नातें लक्षांत घेऊन सुनेशीं किंवा भावजयीशीं सौजन्यानें वागण्यास तयार नसतात. दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, शतकानुशतकांच्या नात्यांच्या सांचेबंदींतून मन मुक्त करून माणुसकीनें वागण्याचा प्रयत्न देखील ही मंडळी करीत नाहींत. जुन्या पिढींतील सासूसासऱ्यांना ही नवी जाणीव येणें कठिण आहे आणि जाणीव झाली, तरी तिच्या अनुरोधानें आपल्या वर्तनांत बदल करणें त्यांना अतिशय कठिण जाईल यांत शंका नाहीं. परंतु दीर, जावा, नणंदा हीं नातीं धारण करणारे स्त्रीपुरुष हे मात्र तरुण पिढींतीलच सामान्यतः असतात, तेव्हां त्यांना बदलत्या परिस्थितीची व नात्यांच्या बदलत्या स्वरूपाची जाणीव करून घेणें कठिण जाऊं नये. विशेषतः कुणाची तरी नणंद किंवा जाऊ बनणाऱ्या तरुण मुलींनीं आपलें किंवा आपल्या भावाचें लग्न झाल्यावर आपले पूर्वींचे मैत्रीचे संबंध नात्यानें कलुषित होणार नाहींत याची खबरदारी घेतली पाहिजे. लग्न केल्यावर आपल्या पतीशीं आपले संबंध नेहमीं प्रेमाचे राहावे यासाठीं मुलीनें ज्याप्रमाणें थोडी झीजहि सोसली पाहिजे व त्यागहि केला पाहिजे, त्याचप्रमाणें आपल्या पतीच्या जवळच्या नातेवाइकांशीं स्नेहाचे संबंध ठेवण्यास

तिनें झटलें पाहिजे आणि लग्न न झालेल्या मुलींनींहि, 'काम करायला आलेलें एक हक्काचें माणूस' ही आपल्या भावजयीकडे पाहण्याची पूर्वींची लांछनास्पद दृष्टि सोडून देऊन आपल्या भावाची पत्नी या आदराच्या व स्नेहाच्या जाणिवेनें पाहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. घरांतील इतर मंडळींशीं आपल्या पत्नीचे संबंध स्नेहाचे राहावेत यासाठीं सर्वांत जास्त जागरूक राहिलें पाहिजे पतीनेंच. परंतु आजची कटु वस्तुस्थिति अशी आहे कीं, बहुतेक घरीं नवविवाहित तरुणीलाच हें कार्य करावें लागतें. आणि सासरच्या मंडळींचें सहकार्य मिळालें नाहीं कीं तिची स्थिति अनुकंपनीय होऊन जाते. म्हणूनच नोकरीधंदा करणें आणि कुटुंबपोषणासाठीं पैसा आणून देणें याव्यतिरिक्त कुटुंबाविषयीं आपली कांही जबाबदारी आहे याची जाणीव अगोदर आमच्या तरुणांना झाली पाहिजे. आई, बहीण व पत्नी यांच्यांत प्रेमभाव नांदला, तरच आपलें कुटुंबजीवन सुखाचें होऊं शकेल हें पुरुषानें ओळखलें पाहिजे. परंतु प्रत्यक्षांत हेंच दिसतें कीं एक तर पुरुष या बाबतींत उदासीन असतो. नाहीं तर सर्वस्वी आईच्या किंवा पत्नीच्या कलानें वागून दुसरीचें जीवन दुःखमय करून सोडतो. कुटुंबजीवन सुखी करण्यासाठीं काय करावें व काय टाळावें याबद्दलच्या सूचना व उपदेश हीं गरीब बिचाऱ्या स्त्रियांनाच नेहमीं ऐकवलीं जातात. परंतु ज्याच्याशीं लग्न केल्यामुळें सासू, नणंद इत्यादि नातेवाइकांशीं तरुणीला आयुष्य घालवावें लागतें, तो नामानिराळाच राहतो आणि सर्व एकटीनेंच करण्याची पाळी मुलींवर येऊन पडते.

अशा प्रसंगीं आपल्या घरांतील मंडळीच्या स्वभावांची व गुणदोषांची सामान्य माहिती आपल्या पत्नीला करून देणें हें पतीचें अतिशय महत्त्वाचें कर्तव्य ठरतें. लग्न झाल्यावर पतिपत्नींना स्वतंत्र राहावयाचें असलें, तर एक वेळ या गोष्टीची तितकी गरज वाटणार नाहीं. पण बहुतांश मुलींना लग्नानंतर कांहीं काळ किंवा कधींकधीं जन्मभरहि स्वतंत्र घरांत राहण्याची संधि मिळत नाहीं. म्हणून आपल्या घरांतील मंडळींचा पूर्ण परिचय आपल्या पत्नीला करून देणें, कोणकोणत्या चुका कसकशा टाळाव्या याची आगाऊ कल्पना देणें व कोणकोणत्या गोष्टींनीं कोणाकोणाची मर्जी सहज सांभाळतां येईल याची माहिती देणें, हें वैवाहिक जीवनाच्या सुखासाठीं अतिशय आवश्यक आहे हें पतीनें लक्षांत ठेवलें पाहिजे.

दुर्दैवानें एवढा समंजसपणा दाखविणारे पति फारच क्वचित् आढळतात. तेव्हां आपल्या सासरची संपूर्ण माहिती मिळविण्याचें काम पत्नीलाच उचलावें लागतें. पतीकडून मिळेल तेवढी माहिती आणि आपल्या अवलोकनानें मिळवलेली माहिती एकत्र करूनच या नव्या जीवनांतील नव्या प्रवासाला तरुणीला प्रारंभ करावा लागतो.

या माहितीवर मी विशेष भर देतें तो अशासाठीं कीं, अशा माहितीमुळें सासरची मंडळी व नवविवाहित सून यांचे किती तरी अनावश्यक संघर्ष सहज टळूं शकतील. नवीन आलेली सून शिकलेली असूनहि आपल्या मतांची कदर करते, व आपल्या आवडीनावडींकडे लक्ष देते हें जर सासरच्या मंडळींना प्रथमच जाणवलें तर सूनहि आपली असें समजून ते तिला एक प्रकारची मान्यता देतात. ही सून म्हणजे मुलाला आपणापासून दूर घेऊन जाणारी चेटकी नसून, आम्ही मुलाचे जवळचे संबंधी आहोंत हें जाणून खेळीमेळीनें वागणारी गृहलक्ष्मी आहे, असें सासरच्या मंडळींना वाटूं लागतें. लग्न होऊन सासरीं गेल्यानंतर पहिल्या चारसहा महिन्यांतच सासरच्या मंडळींना आपलेंसें करण्याचा प्रयत्न नवविवाहित तरुणीनें करणें अवश्य असतें. कारण जो अनुकूल वा प्रतिकूल ग्रह नव्या सुने-विषयीं होणें शक्य असतें; तो पहिल्या कांहीं महिन्यांतच होत असतो.

आपण लग्न केलें म्हणजे पूर्वीच्या बालवधूप्रमाणें, दागिने मिळतील, चार दिवस ताशेवाजंत्र्याच्या आवाजांत व पक्वान्नांच्या घमघमाटांत मजेनें नटूनथटून घालविण्यास मिळतील, अशी अर्थातच कोणत्याहि मुलीची कल्पना असणें शक्य नाहीं. तरीहि विवाह करतांना एक नवें, अनेक जबाबदाऱ्यांचें व अनेकविध सुखांचें जीवन आपण स्वीकारीत आहोंत, या गोष्टीची असावी तशी जाणीव बऱ्याच सुशिक्षित मुलींना नसते. शाळेच्या किंवा कॉलेजच्या अनेक परीक्षा देण्याचें ज्ञान तिला अवगत झालेलें असतें. परंतु विवाह म्हणजे नवीं नातीं जोडणें, नव्या व अगदीं वेगळ्या अशा जबाबदाऱ्या पत्करणें आणि नव्या व अगदीं वेगळ्या सुखांचा अनुभव घेणें होय, या गोष्टीचें तिला असावें तेवढें ज्ञान नसतें. म्हणून जबाबदाऱ्याहि पार पाडतांना ती दुर्बल ठरते आणि नव्या सुखांचा अनुभव घेण्यांतहि ती दुर्बल ठरते. एवढ्यासाठीं आमच्या सुशिक्षित मुलींत विवाह करण्यापूर्वीं या सर्व जबाबदाऱ्यांची जाणीव जर उत्पन्न होईल आणि नव्या

सुखांचा आस्वाद घेण्याची उत्कटता त्यांच्यांत निर्माण होईल, तर वैवाहिक जीवन सुखी होण्याच्या मार्गांतील फारच मोठा अडथळा दूर झाला, असें म्हणतां येईल.

वराची निवड करतांना इतर सर्व आवश्यक ती समानता पाहण्यापूर्वी, भावी वधूवरांना परस्परांविषयीं आकर्षण वाटतें आहे किंवा नाहीं हें पाहणें अत्यंत आवश्यक आहे. कारण वैवाहिक जीवनाची सारी उभारणीच या अनाद्यनंत अशा परस्पर आकर्षणावर अवलंबून असते. हें आकर्षण उत्कट असलें तरच पतीच्या घरांतील त्याच्या निकट आप्तांबद्दल पत्नीला आपुलकी वाटणें सहज शक्य होईल व ती आपुलकी आपल्या चातुर्यानें व समंजसपणानें वाढवितां येईल. 'ही माझ्या पतीची आई, बहीण किंवा भावजय आहे, हे माझ्या पतीचे वडील, भाऊ किंवा इतर निकट आप्त आहेत,' असें जर पत्नीला मनापासून वाटलें, तरच तिला या सर्व सासरच्या मंडळींशीं प्रेमानें वागणें सुलभ होईल. परंतु पतीविषयीं प्रेम असूनहि सासरच्या मंडळींशीं प्रेमानें वागण्याचें व त्यांना आपलेंसें करून घेण्याचें चातुर्य पत्नींत नसल्यामुळेंहि कित्येकदां वैवाहिक जीवनांत असमाधान उत्पन्न होतांना दिसतें. कारण आपल्या पत्नीनें आपणांवर प्रेम करावें असें पतीला ज्याप्रमाणें वाटतें त्याचप्रमाणें आपल्या जवळच्या आप्तांशीं तिनें प्रेमानें, निदान चातुर्यानें वागावें व घरांतील संघर्ष टाळावे असेंहि पतीला साहजिकच वाटत असतें. आणि जोंपर्यंत नवविवाहित दांपत्यांना इतर अनेक मंडळींच्या घरांत आयुष्य काढणें अवश्य होऊन बसलें आहे, तोंपर्यंत तरी सासरच्या मंडळींशीं शक्य तितकें जुळतें घेणें व संघर्ष टाळणें हेंच अखेरीस पति-पत्नींच्या वैवाहिक जीवनाच्या सुखाच्या दृष्टीनें आवश्यक होऊन बसतें.

याशिवाय माणुसकीच्या दृष्टीनेंहि कांहीं भावनांचा व नात्यांचा आदर करणें हें प्रत्येक सुसंस्कृत व्यक्तीचें कर्तव्य ठरतें. ज्या आईबापांनीं आपल्या पतीचें भरणपोषण केलें व प्रेमानें त्याची जोपासना केली, त्या आईबापांचें ऋण फेडणें अवश्य असतें. पुत्राविषयीं व सुनेविषयीं ज्या त्यांच्या सामान्य व योग्य अपेक्षा असतात, त्या पूर्ण करणें हें माणुसकीच्याहि दृष्टीनें आपलें कर्तव्य आहे हें मुलींनीं ओळखलें पाहिजे. आपली भावजय जर आपल्या आईबापांचा अनादर करूं लागली तर आपणांस कसें वाटेल हा विचार त्यांनीं अवश्य करून पाहावा. अर्थात् सासूसासऱ्यांच्या, दीर-जावांच्या अथवा नणंदांच्या अन्याय्य अथवा अवा-

अनुक्रम २३eeo४ दि:
क्रमांक ११४८ नों: दि:



स्तव अपेक्षा असल्या, तर त्या पुऱ्या करण्याची जबाबदारी आपली नाहीं, हेंहि मुलींनीं समजून ठेवावें. परंतु आपलें हें मत व्यक्त करतांना इतरांचीं मनें न दुखविण्याची शक्य तितकी खबरदारी घ्यावी. अशा अवास्तव अपेक्षा पुरविणें आम्हांस शक्य नाहीं हें दर्शवितांना शक्य तेवढ्या चातुर्यानें, संयमानें व शांतपणानें जर मुली वागल्या, तर संघर्षाचे प्रसंग निदान चिघळणार तरी नाहींत हें खास. अशा वेळीं मनोविश्लेषण शास्त्राचें ज्ञान जर मुलींना असेल, तर या अवास्तव अपेक्षा कां निर्माण झाल्या हें त्यांना कळून येईल व हें कळल्यावर त्या व्यक्तींबद्दल राग न वाटतां अनुकंपा वाटूं लागेल.

सारांश, सासरच्या मंडळींशीं चातुर्यानें समंजसपणानें, व आपुलकीनें वागण्याचा प्रयत्न जर आमच्या नवविवाहित मुली करतील तर वैवाहिक जीवनांतील असमाधानाचें एक मोठें कारण त्यांनीं मुळांतच नाहींसें करून टाकलें असें निश्चितपणें म्हणतां येईल.

## •४•

अर्धशिक्षित किंवा सुशिक्षित स्त्रियांच्या जीवनांत एक गोष्ट नेहमीं खटकतांना आढळून येते. अर्थात् ज्यांचें शालेय किंवा विद्यालयीन जीवन अगदीं सर्वसामान्यपणें गेलेलें असतें, त्यांच्या बाबतींत हें विधान लागू होत नाहीं. परंतु शालेय किंवा विद्यालयीन जीवनांत एखाद्या क्षेत्रांत किंवा विषयांत थोड्याबहुत चमकून गेलेल्या मुली कांहीं थोड्याथोडक्या सापडत नाहींत. एखादी मुलगी विद्यार्थिजीवनांत चांगलीं चित्रें काढीत असते, एखादी शिवणकलेंत व भरतकामांत कुशल असते. हें जसें कलांच्या बाबतींत असतें त्याचप्रमाणें निरनिराळ्या बौद्धिक विषयांत प्रवीण असणाऱ्याहि मुली असतात. कोणी कठिण गणितेंहि लीलेनें सोडविते, कोणी संस्कृतांत पंडिता होण्याच्या मार्गावर असते, कोणी इंग्रजी भाषा सहज आत्मसात् करते, तर कोणी विज्ञानांत आपली गति दाखविते. वयाच्या मानानें सुंदर कविता करणाऱ्या, लघुकथा लिहिणाऱ्या किंवा प्रबंध लिहिणाऱ्या मुलीहि मधूनमधून आढळतात. निरनिराळ्या खेळांत प्रवीण असणाऱ्या मुलीहि दिसून येतात. यांपैकीं एखादी किंवा अनेक नैसर्गिक देणग्या ज्यांना मिळालेल्या असतात, त्या मुलींच्या देणग्यांचा विकास होण्यासारखें

वातावरण त्यांना विद्यार्थिजीवनांत मिळत असतें. त्याबरोबरच त्या त्या विषयांत, कलेंत किंवा क्षेत्रांत नांव मिळविलेल्या लोकांचीं चरित्रेंहि त्यांच्या अवलोकनांत येतात. तारुण्यांतील दुर्दम्य आशावादानें त्यांचीं हृदयें भरून गेलेलीं असतात. आपल्या गुणांचा विकास असाच उत्तरोत्तर होत चालला आहे आणि प्रथितयशांच्या शेजारींच आपलेंहि नांव झळकत आहे अशा मोहक स्वप्नांत त्या साहजिकच दंग होतात.

विद्यार्थिजीवन संपलें कीं त्यांची ही गोड समाधि भंग पावूं लागते. प्रखर वस्तुस्थितीची त्यांना हळूहळू जाणीव होऊं लागते. विद्यार्थिजीवन हें कांहीं विशिष्ट काल लाभणारें संरक्षित सुंदर जीवन आहे, त्यांतील कल्पना, भावनामूल्यें आणि अपेक्षा हीं त्या वातावरणांतच सार्थ असतात, या गोष्टीची जाणीव वाढत जाते. विद्यार्थिजीवनांत बरीं चित्रें काढणारीला एकदम इंग्रज, इटालिअन व डच चित्रकारांचीं नांवें बहाल करणें, गाणारीला कमींत कमी हिराबाई बडोदेकर समजणें, बौद्धिक विषयांत प्रवीण असणारींना त्या विषयांतील ख्यातनामांच्या पंक्तींत बसविणें आणि काव्य-कथा रचणाऱ्यांना केशवसुत-गोविंदाग्रज किंवा आपटे-जोशी यांच्या जोडीला नेऊन ठेवणें—या गोष्टी नेहमीं घडत असतात. कौतुक करणाऱ्या मैत्रिणी वयानें लहान आणि विद्यार्थिजीवनाच्या संरक्षित वातावरणामुळें त्यांच्या कल्पना अवास्तव व अतिरंजित बनलेल्या. तेव्हां त्यांनीं थोडीबहुत देणगी असणाऱ्यांना नकळत हरभऱ्याच्या झाडावर चढविलें, तर तें अगदीं साहजिक असेंच आहे. पण या स्तुतीच्या धुंदीनें चढून गेलेल्या मुली बाहेरचा थंड वारा लागतांच उतरून गेल्या तर सारें कांहीं ठीक होतें. कांहीं जणींच्या बाबतींत प्रत्यक्षाची जाणीव हें कार्य आपोआप करून टाकते. परंतु अनेक जणींच्या बाबतींत ही जाणीव आंत जाऊन पोंचत नाहीं. या जाणिवेनें आंत जाऊन आपलें मनोरम जग उद्ध्वस्त करूं नये यासाठीं त्या कळत न कळत मोठमोठ्या भिंती या जगाभोंवतीं उभ्या करतात. आणि यामुळेंच पुढील आयुष्यांत कांहीं तरी खटकत राहतें.

विवाह झाल्यानंतर कांहीं काळ पहिल्या नवलाईच्या भरांत त्या वाहत जात असतात. पण एखादें-दुसरें मूल होऊन संसाराचा बोजा जास्त जास्त अंगावर पडूं लागला कीं, बाह्य परिस्थिति त्यांच्या या मनोरम जगाभोंवतींच्या भिंती पोंखरूं लागते. भिंती कोसळून तें जग केव्हां उघड्या सूर्यप्रकाशांत येतें, तेव्हां

त्याच्या भोंवतीं दुसऱ्या भिंती उभारण्याचा प्रयत्न मुली करूं लागतात. असंतोषाला तोंड फुटतें तें येथूनच.

"शाळेंत मी किती चांगलीं चित्रें काढीत होतें. संधि मिळाली तर मोठ्या प्रदर्शनांत ठेवण्यालायक माझीं चित्रें होतील असें मास्तर मला नेहमीं म्हणायचे. पण या संसाराच्या जंजाळांत आणि मुलाबाळांच्या रामरगाड्यांत कधीं हातीं ब्रश धरायला मिळेल तर शपथ. आमचें आयुष्य हें असेंच जायचें."—अशा तऱ्हेचे प्रकट किंवा अप्रकट उद्‌गार नेहमीं ऐकूं येतात. गाण्यांत, इतर कलांत किंवा बौद्धिक विषयांत प्रवीण असणाऱ्या मुलीचीहि अशीच स्थिति होत असते. आणि मग आपल्या विफलतेचें खापर त्या कुणावर किंवा कशावर तरी सतत फोडीत राहतात व आपली विफलता कुरवाळीत राहतात.

पण या अशा किंचित् उदास, स्वप्नाळू व विफलता जपून ठेवणाऱ्या मुलींच्या आयुष्यांत सकसपणा, पूर्णपणा व निरोगीपणा येऊं शकत नाहीं. यावर या मुली काय प्रश्न विचारूं शकतील याचा मला अंदाज आहे. त्या म्हणतील, 'खरोखरच आमच्या नैसर्गिक देणग्यांना अवसर मिळाला नाहीं म्हणून आम्ही अशा मागासलों. ज्या गोष्टीची आम्हांला इतकी आवड होती, जिच्यांत आमची प्रगतीहि झाली होती, त्या गोष्टीपासून आम्ही वंचित झालों, तरी आम्हांला वाईट वाटूं नये काय? आणि ती गोष्ट पुन्हा करण्याचा आम्हीं निकराचा प्रयत्न करूं नये काय? आमच्या त्या आवडत्या कलेपासून आम्ही वंचित झालों, याचा तीव्र खेद वाटल्याशिवाय आमच्या हातून पुढील प्रयत्न होणें शक्य आहे का? मग आमच्या या खेदाला, या विफलतेच्या जाणिवेला नांवें कां ठेवतां? तिच्यावर असे कठोर कोरडे कां उडवतां?'—या तऱ्हेच्या मुलींच्या दृष्टीनें पाहिलें, तर त्या प्रामाणिकपणानें असेंच उत्तर देतील. पण त्या प्रामाणिक आहेत एवढें कबूल केल्यानें प्रश्न सुटतो असें थोडेंच आहे? येथून तर प्रश्नाला सुरुवात होते. आणि हा प्रश्न त्यांच्याबरोबरच मी सोडविणार आहें.

जीवनांतील अवघड प्रश्न हे नुसते समजून घेतल्यानें कधींच सुटत नसतात. त्यांतील एकेक धागा हळुवार हातानें उलगडावा लागतो. खूप जटा झालेले केस विंचरून त्यांची वेणी घालण्यासारखें हें काम आहे. जटा खूप झालेल्या असतात. मुलगी आईला फणीहि लावूं देत नाहीं. जटा नुसत्या खालच्या केसांतच नव्हे,

वरपासून झालेल्या असतात. अशा वेळीं केसांचा लहानसा पेड घेऊन, केसांच्या मुळांच्या बाजूचे केस डाव्या हातानें दाबून, जटा काढतांना होणारें दुःख थांबवावें लागतें. अशा तऱ्हेनें पेडा-पेडानें हळुवार हातानें जटा एकदां काढल्या गेल्या व सुंदर वेणी घातली गेली कीं मुलगी आनंदानें हसते. जीवनांतल्या प्रश्नांत या अशाच जटा झालेल्या असतात. मोठ्या दात्यांची फणी घेऊन भावनांच्या पुंजक्यांना दुःख न होईल अशा बेतानें केस विंचरावे लागतात. पण या प्रकारांत गुंता काढणारीला गुंता झालेलीचें सहकार्य हवें असतें. तसें पाहिलें, तर जीवनांतील अवघड प्रश्नांपासून कोण मुक्त आहे ? पण ज्याप्रमाणें दररोज केस विंचरल्यानें गुंता अधिक होण्याचें टळतें, त्याचप्रमाणें आपल्या मनांतील रिकाम्या विचारांची व अतिरंजित भावनांची उगीचच होणारी गुंतागुंत जर आपण वेळच्या वेळींच नीट करीत राहिलों तर त्रास देण्याइतकी तीव्रता तिला कधींच प्राप्त होणार नाहीं.

नैसर्गिक देणग्यांच्या विकासाला पुढील आयुष्यांत अवसर मिळत नाहीं म्हणून कष्टी होणाऱ्या मुलींनीं मोकळेपणानें आपल्या पुढील प्रश्नाचा विचार केला तर किती तरी कष्टदायक गोष्टी आपोआप गळून जातील. अर्थात् ह्या प्रकारांत स्वतःविषयींच्या अवास्तव अहंभावनेला धक्का मिळणार आहे एवढें त्यांनीं ध्यानांत ठेवावें. दुसरें हेंहि लक्षांत घेतलें पाहिजे कीं, एकदां सारें समजल्यानें मनांतील विफलतेचें दुःख एकदम नाहींसें होणार नाहीं. प्रथम दुःख नाहींसें झाल्यासारखें वाटेल. पण थोडयाच दिवसांत दुःखाचें भांडें पुन्हा थेंबें थेंबें भरू लागेल. पुन्हा पुन्हा नव्यानें परिस्थितीचा विचार करावा लागेल, विचार करून समजल्यावर दुःख नाहींसें होईल आणि पुन्हा भांडें भरूं लागेल. पण दुःखांची व विफलतेची तीव्रता सारखी कमी कमी होत जाईल. आणि अखेर परिस्थितीची यथार्थ जाणीव आणि आपल्या कल्पना-अपेक्षा यांची सांगड जुळली कीं एक प्रकारच्या पूर्णतेनें, अभंगपणानें, निरामयतेनें जीवनास प्रारंभ करतां येईल.

या मुलींचें म्हणणें मीं वर दिलेंच आहे. आपल्या नैसर्गिक देणग्यांच्या आधारावर आपणांस आपल्या कलेंत किंवा विषयांत निश्चितपणें फार मोठी प्रगति करतां आली असती, हा त्यांच्या म्हणण्याचा एक भाग आहे. दुसरा भाग असा कीं, आम्हांला जें करतां येणें सहज शक्य होतें तें न मिळाल्यामुळें व त्यामुळें आमच्या व्यक्तीकरणाला वाव न मिळाल्यामुळें आमचें व्यक्तित्वहि अविकसितच

राहिलें आहे. त्या म्हणण्यांतील तिसरा भाग असा कीं, अविकसित व्यक्तित्वामुळें आम्हांला तीव्र दुःख होत राहिलें, तरच आमच्या हातून मध्येंच कुंठित झालेल्या विषयांत प्रगति होऊं शकेल.

यांतील एकेका भागाचा विचार करूं लागलों कीं गुंतागुंतीचा जास्त चांगला उलगडा होईल. पहाट झाली कीं ज्याप्रमाणें सगळे गाणारे पक्षी आपल्या गीताची लकेर छेडतात, आणि सारें वातावरण मुखरित करून सोडतात, त्याचप्रमाणें तारुण्याच्या पहाटेच्या वेळीं थोडीबहुत नैसर्गिक देणगी असणाऱ्या मुलींच्या कलेला, बुद्धीला किंवा नैपुण्याला बहर येत असतो. परंतु बऱ्याच जणींच्या बाबतींत हा नैसर्गिक देणग्यांचा बहर, मुळांतील त्याची तीव्रता कमी असल्यामुळें अल्पजीवी ठरतो. परंतु शालेय जीवनाचा शेवट लवकरच होत असल्यामुळें नैसर्गिक देणग्यांचें हें अल्पजीवित्व त्या वेळीं कुणाच्या ध्यानांत येत नाहीं. याच मुली जर पुढें कॉलेजांत गेल्या, तर पुष्कळांच्या बाबतींतलें हें नैसर्गिक देणग्यांच्या बहराचें अल्पजीवित्व तेव्हांच लक्षांत येतें. मुलगीहि त्या नैसर्गिक देणगीचा यापुढें अहंकार धरीत नाहीं. आणि तिच्या बाबतींतला हा प्रश्न तेथेंच कायमचा सुटला जातो.

परंतु कॉलेजांत न जाणाऱ्या मुलींना असें वाटत राहतें कीं, घरांत अनुकूल वातावरण व अवसर मिळत नसल्यामुळेंच आपली देणगी खुंटून जात आहे. कॉलेजांत गेल्यावरहि ज्यांच्या नैसर्गिक देणग्यांचा विकास होत राहतो, त्यांना साहजिकच आपल्या देणग्यांचा विशेष अभिमान वाटूं लागतो. त्या देणग्यांच्या विकासासाठीं आपण काय काय करायचें तेंहि ह्या मनांत ठरवून ठाकतात.— एक दिवस त्यांचें लग्न होतें आणि विवाहोत्तर आयुष्यांत त्यांच्या या देणग्यांचा मागमूसहि कोठें आढळत नाहीं.

'आम्हांला अवसर मिळाला असता, तर आमच्या देणगीचा आम्हीं नक्की विकास केला असता', असें म्हणणाऱ्यांपैकीं बहुतेक जणी पहाटे गाणाऱ्या पक्ष्यांच्याच जातीच्या असतात, ही वस्तुस्थिति ध्यानांत घेण्यास त्यांनीं शिकलें पाहिजे. कारण संधि कोण कुणाला देणार? शाळाकॉलेजांतलें बिनजबाबदारीचें स्वच्छंद आयुष्य एकदां संपलें कीं, आपापल्या सामर्थ्याप्रमाणें व परिस्थितीप्रमाणें जबाबदाऱ्या स्वीकारण्यास व त्या पार पाडण्यास प्रत्येक व्यक्तीनें शिकलें पाहिजे. ही व्यक्तीकडून

अगदीं सामान्य स्वरूपाची अपेक्षा असते. पुरुषानें नोकरीधंदा करून कुटुंबाचें पोषण करण्याची जबाबदारी उचलावयाची असते आणि स्त्रीनें संसाराची व मुलाबाळांची. हा झाला सामान्य सिद्धांत. यापलीकडे जाण्याची ज्या पुरुषाची किंवा स्त्रीची इच्छा असेल, तिनें अधिक कष्ट करण्यास, अधिक त्याग करण्यास तयार व्हावें लागतें. ज्या पुरुषांना आपल्या कलेची किंवा विषयाची इतकी तीव्र ओढ असते, ते नोकरीधंदा सांभाळून उरलेला सर्व वेळ आपल्या आवडीच्या विषयांत घालवीत असतात. किंवा पोटाचा व्यवसाय व आवडीचें कार्य यांचा मेळ बसणें शक्य नाहीं असें ज्यांना वाटतें, ते लग्न न करतां आपल्या आवडत्या विषयालाच सर्वस्वीं वाहून घेतात. आणि त्यासाठीं सामान्य सुखी जीवनाचाहि स्वेच्छेनें त्याग करतात. शाळेच्या किंवा कॉलेजच्या जीवनांत आवडीच्या विषयांचा विकास करण्यास जी संधि मिळते तेवढीच संधि सामान्यतः प्रत्येक शिक्षिताला विनायास मिळते. त्यापुढील संधीसाठीं त्याला किंवा तिला स्वतःलाच कष्ट करणें अवश्य असतें. 'कुणी तरी मला संधि द्यावी म्हणजे मी आपल्या देणगीचा विकास करीन,' ही भाषाच मुळांत दुर्बलतेची व अज्ञानाची द्योतक आहे. ज्याला किंवा जिला आपल्या आवडीच्या विषयाच्या विकासाची तीव्र ओढ आहे, त्याला परिस्थितीच्या रामरगाड्यांतूनच यासाठीं वेळ काढावा लागत असतो. ज्यांना हें करतां येत नाहीं त्यांनीं त्यांनीं आपल्या आवडीच्या विषयांची प्रौढी मारण्यांत कांहीं अर्थ नाहीं. हें कटु सत्य कणखर मनानें जर आपण समजून घेतलें तरच या प्रश्नाचा यापुढील विचार आपणांस शांतपणें व नम्रपणें करतां येईल. आपल्या अहंकाराला बसणारा हा पहिला धक्का आपण मन घट्ट करून सहन केला पाहिजे. तरच पुढचा मार्ग शोधण्यास आपलें मन तयार होईल.

आपल्या नैसर्गिक देणग्यांचा अवास्तव अभिमान बाळगून त्यांना संधि न मिळाल्याबद्दल असंतुष्ट राहणाऱ्या मुलींना मी मॅडम क्यूरींचें, त्यांच्याच मुलीनें—ईव्ह क्यूरीनें—लिहिलेलें चरित्र वाचण्यास सांगेन. रेडिअमचा शोध व इतर अनेक शोध लावणारी जगप्रसिद्ध वैज्ञानिक म्हणून मॅडम क्यूरींचें नांव जगप्रसिद्ध आहे. पण शालेय जीवनांत विज्ञानाची आवड असणाऱ्या या स्त्रीला आपला हा आवडीचा व्यवसाय जन्मभर कायम ठेवण्यासाठीं किती कष्ट करावे लागले व किती गोष्टींचा त्याग करावा लागला, हें खरोखर मनन करण्यासारखें आहे. मॅट्रिकच्या परीक्षेंत

अनेक बक्षिसें पटकावणाऱ्या या मुलीला पुढचें विज्ञानाचें शिक्षण घेण्यासाठीं पॅरिसला जाणेंच प्राप्त होतें. पण वडिलांच्या बेताच्या आर्थिक स्थितीमुळें उच्च शिक्षणाचे मनोरथ कांहीं काळ तिला मनांतच ठेवावे लागले. पण त्यासाठीं तयारी मात्र तिनें लागलीच सुरू केली. या सतरा वर्षांच्या मुलीनें एका दूरच्या कुटुंबांत पुरीं सात वर्षे गव्हर्नेसची नोकरी करून आपल्या पुढील शिक्षणासाठीं पैसे सांठविले. आणि सात वर्षें लहानमोठ्या सर्व हौशीच्या गोष्टींचा त्याग केला. नंतर पॅरिसमध्यें शिक्षण घेतांना कितीदां तरी फीसाठीं पैसे राहावे म्हणून तिनें उपासमार काढली. आणि उच्च पदवी उत्तम प्रकारें प्राप्त करून बाहेर पडतांच श्री. क्यूरी या वैज्ञानिकांशीं तिनें विवाह केला, तरी सांपत्तिक दृष्टीनें तिला परिस्थितीशीं अखंड झगडतच राहावें लागलें. घरांतलें काम व मुलींचें काम सांभाळून दररोज सहासात तास रेडिअमचे प्रयोग करण्यांत मॅडम क्यूरी मि. क्यूरींबरोबर आपला वेळ खर्च करी. पण घरांतील आवश्यक कामांखेरीज इतर सामाजिक समारंभांत, भेटीगांठींत मुळींच वेळ घालवायचा नाहीं हेंहि तिनें मनाशीं पक्कें ठरवून टाकलें. कपड्यालत्त्यांवरचा खर्चहि तिनें कमींतकमी करून टाकला होता. आणि तिच्या आवडीचा विषय जो विज्ञान त्याच्या व्यासंगावरच आपला सर्व उरलेला वेळ ती खर्च करीत होती. आणि हें एकदोन वर्षें नव्हे, तर उभ्या आयुष्यभर.

मॅडम क्यूरीचें उदाहरण हें अर्थात् अतिशय थोर व्यक्तीचें आणि एका श्रेष्ठ वैज्ञानिकेचें आहे. तिची विज्ञानाची ओढ अतिशयच होती. आणि श्री. क्यूरीशीं जेव्हां तिचा परिचय झाला व लग्नाची याचना करण्यांत आली, तेव्हां श्री. क्यूरींवर प्रेम असतांहि, हे वैज्ञानिक व आपणांसहि विज्ञानक्षेत्रांतच काम करावयाचें आहे हें लक्षांत घेऊन व त्याबद्दल विचारविनिमय करूनच तिनें लग्नाला संमति दिली. म्हणूनच घर व संसार सांभाळून तिला विज्ञानाच्या क्षेत्रांत एवढी प्रचंड कामगिरी करतां आली.

आमच्या मुलींना मात्र विद्यार्थिजीवनांतील आवडीच्या विषयांचा लग्नाच्या वेळीं नेमका विसर पडतो. एखाद्या व्यक्तीवर प्रेम जडलें आणि त्या भरांत लग्न करतांना या गोष्टीचा कांहीं काळ विसर पडला, तर तें समजूं शकेल. परंतु प्रेमविवाहांतहि मुलींनीं आपल्या आवडीच्या विषयांना व कार्यांना विवाहानंतर

कितपत अवसर मिळेल याचा अगोदर विचार करावयास हवा. जीवनांत प्रेमाची जशी आवश्यकता आहे तशी कर्तृत्वाचीहि आवश्यकता आहे हें विसरतां कामा नये. विवाहानंतरचा पहिला बहर थोडा ओसरल्यानंतर जेव्हां पति व पत्नी या वास्तविक जगांत उतरतात, तेव्हां त्याच्या किंवा तिच्या कर्तृत्वाला योग्य अवसर परस्परांनीं मिळवून दिला नाहीं, तर असंतोषाला व कलहांना प्रारंभ होतो. आणि अखेरीस कायमच्या विफलतेंत या सर्वांचें पर्यवसान होतें.

ज्या मुलींना विशेष नैसर्गिक देणग्या असतात व आयुष्यांत कांहीं विशिष्ट कार्य करण्याकडे ज्यांची ओढ असते, त्यांच्याच बाबतींत हें सर्व लागू पडण्यासारखें आहे. यांतील ज्या मुलींचे वर सांगितल्याप्रमाणें प्रेमविवह। होत नाहींत, त्यांना तर मिळेल त्या परिस्थितींत आपल्या कामाला थोडाबहुत वेळ काढण्याइतकी मनाची निश्चयात्मकता ठेवावयास हवी. माझा अशा स्त्रियांच्या बाबतींतला अनुभव असा आहे कीं, खरोखरच संसाराच्या रामरगाड्यांतून त्या आपल्या कामासाठीं वेळ काढूं शकतात. अर्थात् त्यासाठीं त्यांना अधिक कष्ट करावे लागतात. कांहीं हौशी बाजूला ठेवाव्या लागतात. या स्त्रियांना परिस्थिति मनासारखी मिळते असें नाहीं, परंतु असेल त्या परिस्थितींतून त्या आपलें डोकें वर काढतात. खरीखुरी व उत्कट अशी जर कार्याची किंवा व्यासंगाची ओढ असली, तर खडकावरहि थोडी माती घेऊन उगवणाऱ्या रोपाप्रमाणें आपलें अस्तित्व ती प्रस्थापित करते. भरपूर जागा, मुबलक प्रकाश व सकस माती मिळाली तर त्या रोपाचा मोठा डौलदार वृक्ष होईल. पण खडकावरहि तें बी टाकलें, तरी तेथेंहि लहानसें रोपटें बनून तें कांहीं काळ आपला विकास करून घेईलच.

पण एवढाहि विकास ज्यांना संसाराच्या रामरगाड्यांत करून घेतां आला नाहीं, त्यांनीं खुशाल हें समजावें कीं, आपणांस विशिष्ट कार्याची ओढ आहे असें वाटत होतें किंवा विशिष्ट विषयांत वा कलेंत विशेष विकास करतां येईल असें वाटत होतें, ती आपली निव्वळ लाडकी कल्पनाच होती. कधींकाळीं शाळेंतील जीवनांत थोडीबहुत देणगी आपणांस मिळालीहि असेल. पण जीवनांत टिकण्याइतका कस किंवा कणखरपणा तिच्यांत नव्हता. अर्थात् ही जाणीव करून घेणें हें सोपें काम नाहीं. आपल्या अहंभावनेला यामुळें केवढा तरी धक्का बसतो! ज्या देणगीच्या किंवा आवडीच्या अस्तित्वामुळें आपण आपल्या मनाला रिकाम्या वेळांत

खुलविलेलें, झुलविलेलें असतें, जिच्या क्षीण अस्तित्वकल्पनेवर आपण गगनचुंबी मनोरे बांधलेले असतात आणि जिच्यामुळेंच आपण आपल्या जीवनाची सार्थकता होणार असें समजत होतों, ती देणगी किंवा ती आवड आपल्यांत उरली नाहीं, हें कटु सत्य मनाला सांगतांना अतिशय अवघड वाटतें. जवळच्या व जिव्हाळ्याच्या माणसाच्या मृत्यूची वार्ता कळतांच आपणांस जो दुःखाचा किंवा विलक्षण असाहाय्यतेचा अनुभव येतो, तोच अशा वेळींहि येतो. कांहीं काळ सगळें संपल्यासारखें वाटतें. जीवनांत अर्थच उरला नाहीं असें वाटूं लागतें.

पण हें स्मशानवैराग्य अल्पकाळच टिकतें. हळूहळू मनावरचा एक प्रकारचा भार नाहींसा होतो. कारण मनाशीं बाळगलेल्या स्वतःविषयींच्या अवास्तव कल्पना प्रत्यक्षांत कधींच पुऱ्या होण्यासारख्या नसल्यामुळें जीवनाला त्यांचा सारखा भारच वहावा लागत असतो. या भारामुळें जीवनांतील इतर आवश्यक गोष्टींकडे थोडेंबहुत दुर्लक्ष होत राहतें. आणि काल्पनिक तें कल्पनेंतच राहतें व प्रत्यक्षांतलेंहि नीट होऊं शकत नाहीं, यामुळें मनाची विफलता अधिकच वाढत जात असते. एकदां काल्पनिकाचें ओझें उतरलें कीं मन मुक्त होतें. एखादा आजार येऊन गेल्यानंतर जरी अशक्तता वाटली, तरी रोगमुक्ततेमुळें जो आनंद वाटतो, तसाच आनंद या नव्या जाणिवेमुळें प्राप्त होतो. अशी मुक्त झालेली स्त्री आपल्या संसाराकडे सहजच अधिक लक्ष देऊं लागते. मुलाबाळांकडे अधिक उत्साहानें लक्ष पुरवूं लागते. 'माझें स्वयंपाकघर अव्यवस्थित असलें, घर-अंगण अस्वच्छ किंवा गबाळ असलें, मुलाबाळांचे कपडे नीटनीटके नसले, घरांतील वस्तूंची टापटीप व व्यवस्था अभावानेंच तळपत असली तरी मला कुठें फुरसत आहे या गोष्टींकडे लक्ष देण्याची? मी मोठी चित्रकार, गायिका, लेखिका, कवि, कार्यकर्ती, वैज्ञानिक इत्यादि होणार आहें. अजून फारसें जुळलें नाहीं, तरी संधि मिळायचा अवकाश, एकदम तुम्हांला दिसून येईल. विशेष प्रतिभेच्या स्त्रीला संसाराकडे विशेष लक्ष कसें देतां येणार?' अशा प्रकारच्या अवास्तव, मोहक कल्पनांमुळें कालपर्यंत जी स्त्री सगळीकडे दुर्लक्ष करीत होती, तीच आज त्या अवास्तव कल्पनांचें ओझें पार उतरल्यामुळें एका नव्या, उत्साहपूर्ण दृष्टीनें आपल्या जीवनाकडे पाहूं लागते. आणि नेहमींच्या जीवनांतच ती आपल्या उत्साहानें नवें जीवन भरूं लागते. आणि तिच्या कर्तृत्वाच्या आटोक्यांत असणाऱ्या क्षेत्रांत जेव्हां

ती याप्रमाणें काम करूं लागते, तेव्हां तिच्या मनाला पूर्ण समाधान होण्यासारखें काम भराभर तिच्या हातून घडूं लागतें. कालपर्यंत अव्यवस्थित व गचाळ असणारें घर जेव्हां तिच्या नव्या कर्तृत्वाच्या भरांत नीटनेटकें व सुंदर बनतें आणि त्या नीटनेटक्या व सुंदर घरांत आपलीं मुलें व आपला पति यांना किती आनंद, किती समाधान वाटतें आहे हें जेव्हां ती आपल्या डोळ्यांनीं पाहते, तेव्हां तिच्या विफलतेचें सारें धुकें क्षणार्धांत वितळून जातें आणि जीवनसाफल्याचें सौख्य ती अनुभवूं लागते.

हें परिवर्तन कल्पनेनें रंगविलेलें नाहीं. हा अनुभव आहे. कुणाचा अनुभव आहे हें सांगण्याची गरज नाहीं. येथें अर्थात् एक सावधगिरीची सूचना देणें अवश्य आहे. स्वतःविषयींच्या अवास्तव कल्पना एकदा वितळल्या म्हणजे त्या कायमच्या नाहींशा झाल्या असें समजूं नये. पुनः पुन्हा त्या डोकें वर काढतात. आणि पुनः पुन्हा आपणांस त्यांच्या अवास्तवतेची व व्यर्थतेची जाणीव करून घ्यावी लागते. अर्थात् पहिल्या जाणिवेनंतर पुढचें काम पुष्कळच सुलभ होतें. आपली अहंभावना दुसरीकडे दुखावली कीं, आपण नकळत या जुन्या कल्पनांचा आश्रय घेतों खऱ्या. पण प्रखर व निश्चयायात्मक जाणिवेच्या साह्यानें आपलें मन आपणांस पुन्हा विमुक्त करतां येतें. आणि या मुक्त मनानें आपल्या जीवनांतील लहान लहान कामांतून जीवनसाफल्याचा आनंद चाखतां येतो.

# घराचा नवा पाया

आज साऱ्याच जगांत मानवामानवांतील अन्याय्य भेद कमी कमी करण्याकडे विचारांचा व आचारांचा ओघ वाहत आहे. सर्वसामान्याला मिळतील तेवढ्याच पैशांत राहणें आणि सर्वसामान्याप्रमाणें प्रत्येकानें कांहीं तरी शरीरश्रम करणें, हेंच जीवन सर्व समाजाला समाधानी, सुखी व प्रगतिपर बनवूं शकेल असाच विश्वास समाजवाद, लोकशाही, साम्यवाद—सर्वच विचारप्रणालींमधून व्यक्त करण्यांत येत आहे. पण या तऱ्हेच्या जीवनाची आवश्यकता आजच्या श्रीमंत सत्ताधारी व सुखवस्तु समाजाला विचारदृष्ट्या पटली असली, तरी अजून या वर्गाचे आचार जुनेच आहेत आणि या जुन्याच आचारांभोंवतीं त्यांची आवड घुटमळत आहे. याच विसंगत परिस्थितीमुळें खालच्या समजल्या गेलेल्या वर्गातील मुलें आपल्या जातिबांधवांवरील अन्यायाबाबत आक्रोश करीत असतांनाहि एकदां शिकून त्या 'खालच्या' वर्गातून 'वर' आल्यावर पुन्हा तीं जुनीं कामें करण्याचा कंटाळा करतात. त्याचप्रमाणें शूद्रांच्या पंक्तींत बसविल्या गेलेल्या स्त्रियाहि एकदां शिकल्या कीं, पुन्हा आपल्या जुन्या व्यवसायाकडे जाण्याचा बहुधा कंटाळा करतात आणि तो व्यवसाय करणें भाग पडल्यावर एका हीनगंडानें त्या पछाडल्या जातात.

अनेक शिक्षित मुलींचे संसार बारकाईनें पाहिल्यानंतर माझें हें त्यांच्यासंबंधींचें निदान बनलें आहे. आणि इतर अनेक समंजस व विचारशील गृहिणींशीं याबाबत चर्चा केल्यानंतर तर माझें हें निदान अधिकच पक्कें बनलें आहे. स्त्रियांचें पुरुषीकरण

करणें हा शिक्षणाचा हेतु नव्हे, हें विचारदृष्ट्या सर्व जणी कबूल करतात. शिक्षणामुळें स्त्री उत्तम पत्नी, उत्तम माता व उत्तम नागरिक बनावी ही शिक्षणाविषयींची अपेक्षा सगळ्याच जणी जाहीर व्याख्यानांत किंवा उघड भाषणांत जोरानें बोलून दाखवितात. पण अंतर्यामीं कांहीं तरी वेगळीच कल्पना आकारास येत असते. ही आंतली अस्पष्ट, अव्यक्त कल्पनाच अनेक शिक्षित मुलींच्या वैवाहिक जीवनांतील उत्साहाचे झरे आटविते व त्यांच्या कायमच्या असमाधानाचें कारण होऊन बसते. 'आपण पुरुषांच्या बरोबरीनें शिकतों, कित्येकदां त्यांच्यापेक्षां जास्त बौद्धिक कर्तृत्व दाखवितों, पण अखेर आपणांस कमीपणाचें, कमी मानाचें जीवनच जगावें लागतें—' अशा तऱ्हेचा जो हीनगंड शिक्षित स्त्रियांमध्यें निर्माण झाला आहे, तो नाहींसा केल्याशिवाय त्यांचें जीवन सुखी व उत्साहमय होणें शक्य नाहीं.

हा हीनगंड कसा नाहींसा होऊं शकेल? असहकारितेच्या पहिल्याच रणशिंगाबरोबर गांधीजींनीं जसा साध्या राहणीचा आणि शरीरश्रमाचा आदर्श साऱ्या जनतेपुढें ठेवला आणि त्याला मोठमोठ्या श्रीमंतांकडून, बुद्धिमंतांकडून प्रतिष्ठा मिळवून दिली, त्याचप्रमाणें आतांहि खरोखर पुन्हा नव्यानें सर्व तऱ्हेच्या शरीरश्रमाला कोणी तरी मोठ्या नेत्यानें प्रतिष्ठा मिळवून देण्याची वेळ आली आहे. पण थोर थोर नेते या कामासाठीं कटाक्षानें पुढें आले नसले, तरी समंजस व विचारशील अशा सुशिक्षित स्त्रियांनीं संघटितपणें या कामासाठीं पुढें येणें हें शक्य नाहीं का? उत्तम पत्नी, उत्तम माता व उत्तम नागरिक होणें हेंच शिक्षित स्त्रियांचें अत्युच्च ध्येय आहे हें सुशिक्षित स्त्रियांना विचारदृष्ट्या मान्य आहे, पण हें नुसतें विचारांना पटलेलें ध्येय व्यवहारांत आणण्यासाठीं करावे लागणारे कोणतेहि शरीरश्रम हेहि या ध्येयाच्या तेजानेंच उजळले जातील, त्यांनाहि त्या ध्येयाची प्रतिष्ठा प्राप्त होते, अशा श्रद्धेनें जेव्हां अनेक सुशिक्षित स्त्रिया वागूं लागतील, तेव्हांच त्यांच्या आचरणाचा इतरांवर प्रभाव पडेल. ही जबाबदारी विशेषतः घराबाहेरचेंहि काम करणाऱ्या सुशिक्षित स्त्रियांवर अधिक आहे. सर्वसामान्य शिक्षित मुलगी संसारांत पडल्यानंतर घराबाहेरच्या कार्याकडे व उद्योगांकडे आशाळभूत नजरेनें पाहते. आपल्या शिक्षणाचा उपयोग आपणांस बाहेरच्या कार्यांत करावयास मिळाला नाहीं याचें शल्य तिला थोडेंबहुत बोचत राहतें. पण घराबाहेरचें कार्य करणारी किंवा नोकरी करणारी सुशिक्षित स्त्रीहि

आपल्या घरांतील कार्य आनंदानें, उत्साहानें व एका प्रतिष्ठेच्या जाणिवेनें करीत आहे, असें दृश्य जेव्हां ती पाहते, तेव्हां तिलाहि आपल्या नित्याच्या जीवनांतील कामाचें महत्त्व जाणवतें, व त्यांतील मूल्यांचा हळूहळू उमज पडूं लागतो.

ही अगतिकता नव्हे, ही जाणीव आहे. पक्ष्यासारखे आपणांस पंख नाहींत, म्हणून आपणांस उडतां येत नाहीं, याबद्दल शोक करणारा माणूस मूर्खच म्हणावा लागेल. पंख नसले तरी आपणांस भक्कम पाय आहेत आणि कुशल हात आहेत हें जाणून त्या हातापायांच्या द्वारां आपणांस किती कामें करतां येतील इकडे जो आपलें लक्ष घालतो, त्याच माणसाला खरी जाणीव आहे असें म्हणतां येईल.

स्त्रीजन्म हा शाप आहे, पुरुषांसारखें मन मानेल तसें जीवन आपणांस जगतां येत नाहीं, असें म्हणून शोक करीत बसणारी व आपलें जीवन असंतुष्ट बनवून टाकणारी स्त्री ही एका विकृत हीनगंडानें पछाडलेली स्त्री होय. याच्या उलट पत्नी, माता व गृहस्वामिनी या नात्यानें जीं सुखें प्राप्त होतात व जें कर्तृत्व दाखविण्यास मिळतें त्यावरच दृष्टि केंद्रित करून जी त्यांतून अधिकाधिक सफलता मिळवूं शकते, त्याच स्त्रीला शिक्षणानें खरीखुरी जाणीव दिली, खरीखुरी दिव्य दृष्टि दिली, असें म्हणतां येईल. आज समाजाला जीं मूल्यें खरोखर प्रगतीप्रत नेतील व माणसाचें मनुष्यत्व अभंग ठेवतील त्या मूल्यांची प्रस्थापना करण्यास थोर नेते पुढे न आले तर न येवोत, आम्ही सुशिक्षित स्त्रिया आमच्या आचरणानें त्या मूल्यांची प्रस्थापना करूं, या आत्मविश्वासानें आम्ही पुढें सरसावलें पाहिजे. कोणतेंहि काम नव्यानें करणाऱ्यांना कष्ट सोसावे लागतात, अप्रतिष्ठा व अपमानहि सहन करावा लागतो. पण आपल्या मूल्यांवर जर आपली जाणती निष्ठा असली तर या कष्टांचा व अपमानांचा मनावर विशेष परिणाम होत नाहीं. स्वातंत्र्यासाठीं झालेल्या आंदोलनांत किती तरी श्रीमंत व सुशिक्षित स्त्रीपुरुषांनीं कष्टाचें व त्यागाचें जीवन हसत हसत घालविलें. कारण स्वातंत्र्य मिळविण्याच्या उत्कट इच्छेनें त्यांचीं मनें उजळून निघालीं होतीं. आज आपण समाजांत नव्या मूल्यांची प्रस्थापना करण्याच्या ध्येयानें संपूर्णपणें प्रेरित होऊन जीवन जगूं लागलों, तर घरांतलें नित्याचें काम, जबाबदाऱ्या, चिंता व कष्ट हीं आपणांस किती तरी हलकीं वाटतील.

आमच्या तरुण शिक्षित गृहिणी या नव्या निष्ठेनें जर जीवनाकडे पाहूं लागतील

तर पुरुषांपेक्षां आपलें काम कोणत्याहि प्रकारें कमी नाहीं, उलट अधिक जबाबदारीचें व अधिक समाजपोषक आहे याची त्यांना जाणीव झाल्यावांचून राहणार नाहीं. ‘माझा पति व मी कालपर्यंत शिकत होतों. एकाच तऱ्हेचें मोकळें, स्वच्छंद जीवन जगत होतों. पण आज लग्न झाल्यावर तो आपल्या नोकरीसाठीं, धंद्यासाठीं किंवा व्यवसायासाठीं दिवसभर घराबाहेर वावरत आहे आणि मी मात्र स्वयंपाक, धुणीं, भांडीं, झाडझूड इत्यादि हलक्या शरीरश्रमाच्या कामांत वेळ घालवीत आहें. व्यर्थ माझें शिक्षण!’ अशा तऱ्हेचे विचार, जाणीव झालेल्या व निष्ठेनें स्फुरलेल्या गृहिणीच्या मनांत येणार नाहींत. ती असेंच म्हणेल कीं, ‘लग्न झाल्यावर आम्हीं दोघांनीं वेगळ्या जबाबदाऱ्या पत्करल्या आहेत. पैसे मिळविण्यासाठीं तो *कुणाचें तरी* काम करीत आहे—पण मी *माझें* घर स्वच्छ व नीट-नीटकें ठेवण्यासाठीं श्रम करीत आहें. आम्हां दोघांसाठीं चांगलें सुग्रास अन्न तयार करण्यासाठीं वेळ देत आहें. डॉक्टराचें, एंजिनीयराचें, मास्तराचें व कारकुनाचें काम वेगवेगळें असतें. जो आपल्या क्षेत्रांत चांगलें काम करील त्याचाच खरोखर लौकिक होतो. माझें काम कुणाच्याहि कामापेक्षां कमी दर्जाचें नाहीं. उलट, घर व त्यांतील वातावरण स्वच्छ, नीट-नेटकें व आनंदी ठेवणारी गृहिणी ही, बाहेरची नोकरी किंवा धंदा करणाऱ्या कोणत्याहि पुरुषापेक्षां अधिक महत्त्वाची आहे.

‘आपणच आपले सर्वांत घोर शत्रू बनतों किंवा आपण आपले सर्वांत श्रेष्ठ मित्र बनतों’ या अर्थाचे गीतेंतील श्लोक आपण क्षणभरहि दृष्टीआड करतां उपयोगी नाहीं. आज आमच्या तरुण, शिक्षित गृहिणी स्वतःच स्वतःच्या शत्रू बनल्या आहेत. कारण चुकीच्या सामाजिक प्रतिष्ठांमुळें त्यांना आपलें जीवन तृणवत् वाटत आलें आहे. आतां आम्हींच आमचे मित्र बनण्यास शिकलें पाहिजे. आपणच आजवर आपल्या स्वतःचा तेजोभंग करीत होतों, आपलीच अप्रतिष्ठा करीत होतों, आपलाच अपमान करीत होतों व या स्वतःच्याच शत्रुत्वामुळें जीवन असमाधानी व निरुत्साही बनवून टाकीत होतों. आतां आपण आपलें मित्रत्व संपादन केलें पाहिजे. स्त्रीत्वाची, सुशिक्षित स्त्रीत्वाची किंमत आम्हींच अगोदर ओळखली पाहिजे. आमचें महत्त्व, आमचें भाग्य, आमच्या जबाबदाऱ्या व आमचें कर्तृत्व या सर्वांची आम्हींच जाणीव करून घेतली पाहिजे. आम्हीच पुरुषांनाहि खऱ्या सामाजिक मूल्यांचें दर्शन घडवूं, खोट्या मूल्यांच्या मागून

जाणाऱ्या पुरुषांना खऱ्या मूल्यांचा साक्षात्कार घडवूं अशा निष्ठेनें आम्हीं आपलें जीवन उजळलें पाहिजे.

आमच्या स्त्रीत्वाच्या महत्त्वाची आम्हांला खरीखुरी जाणीव झाली, म्हणजेच आम्ही वर मान करून उत्साहपूर्ण दृष्टीनें संसाराकडे व समाजाकडे पाहूं शकूं. स्त्रीच्या महत्त्वाची जाणीव घरांतल्या पुरुषांना व समाजालाहि निर्भयपणें पटवूं शकूं. या निष्ठेनें जीवनांत उत्साह संचारला कीं, वैवाहिक जीवनांत येणाऱ्या अडचणींशीं आम्ही सहजपणें सामना करूं शकूं. आणि ही नवी शक्ति व नवा उत्साह अंगांत सळसळूं लागला कीं, घरांतल्या कामाबरोबर बाहेरचेंहि आवडीचें काम जास्त कार्यक्षमतेनें करूं शकूं. या आपल्या स्त्रीत्वाचा जो हीनगंड आमच्यामध्यें निर्माण झाला आहे, तो या नव्या जाणिवेनें प्रथम नाहींसा केला पाहिजे. हा हीनगंड नाहींसा करून स्त्रीत्वाचें महत्त्व, भाग्य व जबाबदाऱ्या यांच्या जाणिवेनें आम्हीं आपली दृष्टि शुद्ध केली कीं, मग वैवाहिक जीवनांतील लहानमोठ्या प्रश्नांचा आपणांस सहजपणें विचार करतां येईल.

आजकाल सामान्यपणें अनेक नव्या किंवा जुन्या व गरीब किंवा श्रीमंत कुटुंबांतील नवविवाहित मुलींकडे दृष्टि फेकली किंवा चारचौघीजणींत अशा मुलींच्या आवडींनावडींविषयीं, कर्तृत्वाविषयीं किंवा हौशीविषयीं चर्चा चाललेली ऐकली कीं, कांहीं तरी खटकल्यासारखें वाटतें. हौशीनें, कौतुकानें, रसरशीतपणें जीवन जगणाऱ्या मुली दिवसेंदिवस कमी कमी प्रमाणांत आढळूं लागल्या आहेत. एका पिढीपूर्वींच्या स्त्रिया आपलें नित्य काम, सणवार, लग्नकार्यें इत्यादि कामें मोठ्या हौशीनें, आवडीनें व खूप परिश्रम घेऊन करतांना आढळत होत्या. आजहि कांहीं मुली घरदार उत्तम ठेवतात, शिवणें, विणणें, भरतकाम नित्य नवें व हौसेनें करीत असतात. मुलांबाळांचीं कामें, त्यांच्या हौशी पुरविणें हें सारें आवडीनें करीत असतात. कांहीं जणी घराबाहेरील कामांमध्येंहि आपल्या सवडीप्रमाणें व पात्रतेप्रमाणें आनंदानें भाग घेत असतात.

पण अशा हौशीनें जीवन जगणाऱ्यांची संख्या कमी कमी होत चालली आहे असें दिसून येऊं लागलें आहे. नवविवाहित मुलीला सणावारांचें कांहीं काम करण्यास सांगितलें तर, "आमचा नाहीं बाई या सणावारांवर विश्वास, उगीच वायफळ गोष्टींत वेळ दवडायचा, दुसरें काय?" असें उत्तर देऊन त्या काम

टाळतात. लहान मुलांसाठीं सुंदरशीं झबलीं शिवण्यास सांगितलें, किंवा कांहीं विणण्या-शिवण्यास सांगितलें कीं, "मला नाहीं असल्या क्षुल्लक गोष्टींत वेळ घालवायला आवडत. कपडे साधे असले काय, आणि रेशमाचें भरतकाम केलेले असले काय, अंगांत घालण्याशीं काम. आणि लोकरीचा स्वेटर विणून वेळ घालविण्यापेक्षां आयता बाजारांतला आणलेलाच बरा." असें उत्तर देऊन त्या मोकळ्या होतात. पहिलेंवहिलें मूल असलें आणि त्याची आंघोळ, खाणेंपिणें कपडेलत्ते हे नीट न ठेवल्याबद्दल जरा एखादीला हटकलें कीं, "त्रास आहे बाई या मुलांचा. उभा दिवस यांच्या पायीं खर्च होतो." असें त्रासून म्हणून मुलाच्या पाठींत एखादा धपाटा मारून ती आपला राग व्यक्त करते.

या तऱ्हेच्या उत्तरांवर पूर्ण विश्वास ठेवून या मुलींना घरांतल्या कोणत्याच गोष्टींची आवड नाहीं असें घटकाभर मानलें व घराबाहेरचें कोणतें कार्य करण्यास सांगूं लागलों, तर तेथेंहि हाच अनुभव येतो. कोठलेंहि काम न करण्यासाठीं त्यांच्या ठराविक सबबी असतात. एक तर त्यांचा 'त्या कामावर विश्वास नसतो' किंवा त्यांना तो 'वेळेचा अपव्यय' वाटतो, किंवा त्यांना 'तें काम येत नसतें.' या दोनचार सबबींच्या गोळ्यांनीं त्या तुमच्या कोणत्याहि सूचनांचा पार धुव्वा उडवून टाकतात. कधींकधीं बाहेरच्या कामांत किंवा खेळांत कुशल व हौशी असणाऱ्या मुली आढळतात. परंतु नुसत्या त्या हौशींच्या जोरावर जगणें शक्य नसतें. एखाद्या सामजिक कार्याला किंवा व्यवसायाला पूर्णपणें वाहून घेणाऱ्या स्त्रिया अर्थात् या वरील सदरांत येत नाहींत.

सुग्रणपणानें स्वयंपाक करणें, नीटनेटकें व सुंदर घर ठेवणें, मुलेंबाळें वाढविण्याची योग्य ती काळजी घेणें आणि घर हें मुलांबाळांच्या, पतीच्या व सर्व माणसांच्या विकासाला व आनंदाला कारणीभूत होईल असें राखणें, ही गोष्ट बऱ्याच मुलींना अगदीं नापसंत नसली तरी थोडीबहुत नावडीची व त्रासाची वाटूं लागली आहे. आम्ही चारसहा इयत्ता शिकलों आणि तरीहि आम्हीं जुन्या स्त्रियांप्रमाणें 'रांधा वाढा उष्टीं काढा' व 'चूल आणि मूल' करीत बसावें काय?—असा प्रश्न त्यांच्या मनांत उठलेला स्पष्ट दिसून येतो. सारे सणवार जुने, मग आम्ही नव्या मुलींनीं तेच चालू ठेवायचे काय? अशी दुसरी शंका त्यांच्यासमोर उभी राहते. आणि या व अशा तऱ्हेच्या शंकांना समाधानकारक उत्तर न

सापडल्यामुळें आणि या सर्व गोष्टी कराव्या लागत असल्यामुळें, त्या कशा तरी रडतखडत व त्रासत कंटाळत त्या करीत राहतात.

वस्तुतः पाहिलें तर सर्वसामान्य नवविवाहित मुलींना संसाराची हौस वाटावी, मुलांबाळांची आवड असावी, तशी ती आजकालच्या मुलींनाहि आंतआंत असतेहि. परंतु समाजांत ज्या गोष्टी सुशिक्षित स्त्रियांच्या म्हणून समजल्या जातात, त्यांची या मुलींच्या मनावर साहजिक मोहिनी पडते. कांहीं गोष्टी नव्या पद्धतीच्या मानल्या जातात आणि कांहीं जुन्या समजल्या जातात, याचा या मुलींवर परिणाम होत राहतो. ज्या नव्या सुशिक्षित स्त्रिया मानल्या जातात, त्यांच्या प्रत्यक्ष किंवा तथाकथित आवडीनावडींच्या व रीतिरिवाजांच्या तालावर बऱ्याच नव्या मुलींचीं मनें नाचूं लागतात. घरांत स्वयंपाकी नसणें व स्वतःला दोन्ही वेळचा स्वयंपाक करावा लागणें ही गोष्ट जणुं कांहीं दुर्दैवाची गोष्ट आहे व नाइलाज म्हणून कशी तरी रेटणें भाग आहे ही वृत्ति जी मुलींमध्यें निर्माण होते, ती सुशिक्षितपणाच्या व नवेपणाच्या अशा भ्रामक कल्पनांमुळें. मुलांसाठीं स्वतंत्र ‘ आया ’ किंवा गडी नसणें व स्वतःलाच मुलांच्या सर्व गोष्टी कराव्या लागणें हीहि वरीलप्रमाणें बऱ्याच मुलींना नाइलाज म्हणून त्रासत-कंटाळत करण्याची गोष्ट वाटते. या सर्व विवेचनांत दोष कोणाचा आहे हा विचार न करतां, परिस्थिति कशी आहे, कोणते दोष निर्माण झाले आहेत आणि ते नाहींसे करण्यासाठीं काय केलें पाहिजे, इकडेच मुख्यतः लक्ष देण्याचें मीं योजिलें आहे. कारण दोषाचा वाटा एकेकावर लादून परिस्थितींत सुधारणा होणें शक्य नाहीं. म्हणून स्थूल मानानें एवढें सांगतां येईल कीं, गृहजीवनाविषयींच्या बऱ्याच भ्रामक व घातुक कल्पना ‘ नवेपणा ’ व ‘ सुशिक्षितपणा ’ या नांवांवर रूढ झाल्या आहेत. त्या रूढ होण्यास सुशिक्षित स्त्रियांचें गृहजीवन कितपत कारणीभूत झालें आहे हा प्रश्न सध्यां बाजूलाच ठेवणें बरें होईल. या भ्रामक व घातुक कल्पनांनीं तरुण मुलींवर परिणाम झाला आहे ही गोष्ट यांत महत्त्वाची आहे. आणि यामुळें हौशीनें व आवडीनें जीवन जगण्याऐवजीं त्रासत–कंटाळत जीवन रेटण्याकडेच त्यांचा कल झुकत आहे, हीहि गोष्ट ध्यानांत घेण्यासारखी आहे.

कांहीं नवविवाहित तरुण मुलींशीं या बाबतींत सहज बोलणें झालें असतां मला असें आढळून आलें कीं, त्यांना संसारांत हौस व आवड वाटली, तरी पूर्वींच्या

स्त्रियांच्या मानानें पाहतां थोडेंबहुत काम केल्यानेंहि त्या थकतात आणि त्यामुळें त्या इतर गोष्टींत त्रासतात किंवा कंटाळतात. सामान्यतः पति-पत्नी व एकदोन मुलें एवढ्या आटोपशीर संसारांत दोन्ही वेळ स्वयंपाक व मुलांचें काम यांतून स्त्रीला फुरसतीचा वेळ मिळण्यास कांहींच हरकत नसावी. परंतु एवढ्याच कामांत दमून गेल्यामुळें यानंतर हौशीनें कांहीं करावें असें वाटण्याइतकें त्राण पुष्कळ मुलींत उरत नाहीं. विवाहपूर्व जीवनांत ज्या मुलींना कामाची सवय असते, त्यांना विवाहोत्तर जीवनांत कामाचें ओझें वाटत नाहीं व त्यांच्या जीवनांतील हौस व आनंद हीं कायम राहतात असा अनुभव आहे. शरीरश्रमाची पूर्वतयारी असल्यावर नवेपणाच्या व सुशिक्षितपणाच्या भ्रामक कल्पनांच्या पगड्यामुळें बऱ्याच नव-विवाहित मुलींमध्यें संसाराविषयीं जो कंटाळा उत्पन्न झालेला दिसतो, त्याचा पायाच नाहींसा होईल.

नवेपणा व सुशिक्षितपणा यांच्याविषयीं ज्या कांहीं भ्रामक व घातुक कल्पना रूढ आहेत, त्यांचें निराकरण करणें ही दुसरी पायरी आहे. आमचीं मुलेंमुलीं कशीं निपजतात हें बऱ्याच अंशीं आम्हां मातापित्यांवर आणि समाजांतील मातापित्यांनींच प्रचलित केलेल्या सामाजिक मूल्यांवर अवलंबून असतें. राजकारणांत, समाजकारणांत किंवा अर्थकारणांत पुढारी म्हणून समजल्या जाणाऱ्या ज्या व्यक्ति असतात, त्यांचें जसें जीवन असतें तेंच बहुतेकांना हवेंसें वाटतें. ते घालतात तसे, त्या आकाराचे व रंगांचेच कपडे फॅशन म्हणून प्रचलित होतात. त्यांचें खाणेंपिणें, आहारविहार, आवडीनावडी, खेळ-करमणूक या सर्वच गोष्टींना फॅशनचें रूप प्राप्त होतें. नेहरूशर्ट, शेरवानी हे पोशाखांतील प्रकार जसे अनु-करणीय बनतात, त्याचप्रमाणें अनेक सुंदर, सुशिक्षित व धनवान स्त्रियांच्या पोशाखांचें व रीतीभातींचें नकळतच अनुकरण होत असतें. एखादें लहानसें उदाहरण घ्यावयाचें तर, टेबलावर जेवणें हें बऱ्याच सुशिक्षित व पुढारलेल्या लोकांच्या घरीं रूढ झाल्यामुळें पाटावर जेवण्यास बसणें हें पुष्कळांना जुनेपणाचें व मागासलेपणाचें चिन्ह वाटूं लागलें आहे.

मध्यमवर्गीय मुलींची दृष्टि सामान्यपणें त्यांच्याच जवळपासच्या वर्गांतील सुखवस्तु व सुशिक्षित स्त्रीकडे अनुकरणासाठीं वळते. नागपूरचेंच उदाहरण घेतल्यास सामान्यतः असें दिसून येतें कीं, शहरांतील तरुण मुली शहरांतल्याच

सुखवस्तु, सुशिक्षित व पुढारलेल्या स्त्रियांकडे अनुकरणाच्या दृष्टीनें नकळत पाहत असतात. आणि धंतोली, कॉंग्रेसनगरच्या तरुण मुली तेथल्याच पुढारलेल्या स्त्रियांकडे पाहत असतात, सिव्हिल लाइन्सच्या स्त्रियांकडे नव्हे. प्रत्येक शहरांत व गांवांत अशीच थोडीबहुत परिस्थिति असते. अनुकरणीय म्हणून समजल्या जाणाऱ्या स्त्रिया हौसेनें व सहजपणानें स्वयंपाक करतांना आढळल्या किंवा मुलाबाळांचीं लहानसहान कामेंहि आस्थेनें व कौतुकानें करतांना दिसल्या किंवा आल्यागेल्याचें आदरातिथ्य आपले अनेक व्यवसाय सांभाळून आनंदानें करतांना दिसल्या, म्हणजे तरुण मुलींना केवढें आश्चर्य वाटतें व किती समाधान वाटतें हें मीं पुष्कळ वेळां पाहिलेलें आहे. सुशिक्षित मुलींनीं गृहजीवनाच्या या सर्व गोष्टी हौसेनें व आनंदानें कराव्या, एवढेंच नव्हे तर, गृहजीवन अधिक सुंदर, सुखदायी व प्रगतिपर करण्यासाठीं आपलें सर्व शिक्षण खर्चावें, असें आमच्या सुशिक्षित पुढारी भगिनींना वाटतें हें निश्चित. परंतु यासाठीं जाणतेपणानें कांहीं विशेष प्रयत्न झाला पाहिजे. तरच तरुण मुलींच्या आयुष्याचें तारूं योग्य मार्गानें चालेल व त्या स्वतःबरोबर समाजाचाहि विकास करूं शकतील.

जुन्या काळीं प्रत्यक्ष अनुभवानें पदरीं पडेल तेवढेंच गृहविज्ञान स्त्रियांना अवगत असे. आईचें, काकूचें किंवा सासूचें, जावेचें प्रत्यक्ष उदाहरण जेवढें शिकवील तेवढें त्यांचें संसाराचें व मुलाबाळांच्या काळजीविषयींचें ज्ञान असे. आतांच्या मुलींचीं क्षितिजें विस्तारलीं. जीवन अधिक सुखकर, अधिक आरोग्यकारक आणि अधिक सुंदर करण्यासाठीं गृहजीवनाचे शास्त्रशुद्ध पाठ आजकालच्या मुलींना गृहविज्ञानाच्या द्वारां दिले जातात. शिवणाच्या, विणण्याच्या आणि भरतकामाच्या तऱ्हातऱ्हा मुलींना शिकविल्या जातात. या सर्व कामांचे प्रत्यक्ष नमुने त्यांच्याकडून करविले जातात. पण या साऱ्या ज्ञानाचा प्रत्यक्ष जिवंत प्रयोग जेव्हां करण्याची वेळ येते, तेव्हां मात्र काय होतें कुणास ठाऊक, पण ही ज्ञानगंगा सरस्वती-प्रमाणें वाळवंटांत लुप्त मात्र झालेली दिसते.

पूर्वीच्या काळाशीं तुलना केली, तर आज लग्न होऊन जाणारी मुलगी पुष्कळ प्रमाणांत मोकळ्या व स्वतंत्र अशा वातावरणांत जाते. तिच्या हौशीला, तिच्या कर्तबगारीला वाव मिळण्यासारखीच परिस्थिति तिला बहुतांशानें प्राप्त होते. शाळेंत गृहविज्ञानाचा अभ्यास आणि विवाहानंतर तें गृहविज्ञान प्रत्यक्षांत उतर-

विण्यास पुष्कळ अनुकूल परिस्थिति असा सुंदर संयोग घडून येत असतांहि आमच्या किती तरी मुली या अनुकूल परिस्थितीचा काडीइतकाहि फायदा घेतांना दिसत नाहींत. आणि 'शिकून काय केलं आम्हीं?' असे उद्गार काढीत आपल्या ज्ञानाचें काय करावें अशा चिंतेंत मग्न झालेल्या दिसतात.

मला मोठें नवल वाटतें तें अशाच मुलींचें. 'कमरेला कळसा आणि गांवाला वळसा' या म्हणीची मला अशा वेळीं आठवण होते. उभ्या हायस्कूलच्या शिक्षणांत जें कांहीं ज्ञान त्यांनीं प्राप्त करून घेतलेलें असतें, त्याचा उपयोग संसारांत पदोपदीं करण्यासारखा असतांहि या आंधळ्या मुली 'आतां कुठें बरं उपयोग करावा?' या विचारांत गालावर तळहात ठेवून बसतात. म्हणूनच स्वयंपाकघरांतील कामाच्या कोणत्याहि सोयींत आमच्या स्त्रियांना म्हणण्यासारखी कोणतीहि सुधारणा करतां आली नाहीं. स्वयंपाकपाणी, धुणें, झाडलोट, एकंदर घराची व्यवस्था व स्वच्छता या सगळ्या गोष्टी गडीमाणसांच्या क्षेत्रांतल्या, आम्ही नुसतें कोचखुर्च्यांवर बसून कसली तरी चर्चा करायची, अशीच कांहीं जणींची कल्पना झालेली दिसते. कांहीं जणी इतक्या 'बौद्धिक' नसतात. पण आळसामुळें किंवा कसलीच महत्त्वाकांक्षा समोर नसल्यामुळें त्या आला दिवस बसल्या जागीं पुढें ढकलीत असतात, एवढेंच. केवळ आपण शिकलेल्या आहोंत एवढ्याच गोष्टींत त्या कृतार्थता मानीत असतात. शिक्षण हें एक साधन आहे, साध्य नव्हे; या साधनाच्या साह्यानें आपणांस अधिक चांगल्या जीवनाचें साध्य मिळवावयाचें आहे ही साधी गोष्टहि त्या सोयिस्करपणें विसरतात. बुद्धीला, कर्तबगारीला या गृहक्षेत्रांत वाव नाहीं अशी त्यांची समजूत झालेली असते. कामगारांच्या प्रश्नांची चर्चा करणें, शेतकऱ्यांच्या, शिक्षकांच्या, निरनिराळ्या प्रकारच्या नोकरांच्या प्रश्नांची चर्चा करणें किंवा या व्यावसायिकांच्या संघटना करणें हें काम प्रतिष्ठित व 'बौद्धिक' दृष्ट्याहि सन्माननीय समजलें जातें. या क्षेत्रांत काम करण्यास मोठमोठे बुद्धिवान् व कर्तृत्ववान् तरुण पुढें सरसावतात. पण स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा करणें, ते प्रश्न सोडविण्यासाठीं व त्यांच्या अडचणी निवारण्यासाठीं संस्थांच्या द्वारां प्रयत्न करणें हें काम मात्र आमच्या सुशिक्षित तरुण मुलींना केवळ 'बायकी'च वाटतें, ही आश्चर्याची व खेदाची गोष्ट आहे.

इतर स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा करणें व अडचणी निवारण करणें तर राहोच,

पण आपल्या घरांतील नित्याचें जीवन सुखकर, आरोग्यकारक व सुंदर करण्याच्या दृष्टीनेंहि जेव्हां आमच्या तरुण मुली कर्तृत्वहीन ठरतात, तेव्हां क्षणभर विचार पडतो कीं, शिक्षणानें आम्ही काय साधणार आहोंत? घरकामाचा कंटाळा, जबाबदारीचा कंटाळा, नुसत्या चैनीचीच आवड आणि अहंकाराची मात्र प्रचंड वाढ—याच गोष्टी जर सुशिक्षित मुलीहि मोठ्या प्रमाणावर आपल्या जीवनांत दाखविणार असतील तर शाळांतील शिक्षणाच्या उपयुक्ततेबद्दल विचारवंतांना मूलग्राही विचारच करावा लागेल. सुदैवानें याच शिक्षणक्रमाच्या साच्यांतून बाहेर पडलेल्या बऱ्याच मुली परिस्थितीमुळें म्हणा किंवा नैसर्गिक आवडीमुळें म्हणा, नीटनेटका व क्वचित् कर्तबगारीचा संसार करून दाखवितात, ही समाधानाची गोष्ट आहे. पण परिस्थिति भाग पाडील तेव्हांच सुशिक्षित मुलींनीं आपलें कर्तव्य दाखवावें ही कांहीं मोठीशी स्पृहणीय गोष्ट नाहीं.

तारुण्याचा उत्साह आणि सळसळ आणि शिक्षणामुळें मिळालेलें मार्गदर्शन यांच्या संयोगामुळें एकेका सुशिक्षित मुलीचा संसार डोळ्यांचें पारणें फेडणारा झाला पाहिजे. तिचें स्वयंपाकघर, तिचें माजघर, दिवाणखाना, खोलीन् खोली तिच्या गृहकौशल्याची साक्ष पटविणारी असली पाहिजे. आणि खरोखरच जी सुशिक्षित गृहिणी या सर्व कामांत मन घालील तिला 'याचि देहीं याचि डोळां' आपल्या कर्तबगारीचें चीज झालेलें पाहावयास मिळेल. हस्तकौशल्याला आणि एकंदर कर्तबगारीला घरांत जास्त वाव मिळतो, तसाच बुद्धीला मुलांच्या विकासांत भरपूर वाव मिळतो. मानसशास्त्राची मोठी प्रयोगशाळा उघडून मानसशास्त्रज्ञ नाना प्रयोग करीत बसले, नाना तऱ्हेचीं मोजमापें घेत बसले कीं, आम्हांला ती मोठी बौद्धिक कामगिरी वाटते. पण घरांघरांत मुलांच्या शारीरिक व मानसिक विकासाची जी चालतीबोलती प्रयोगशाळा उघडली गेलेली असते, तेथील प्रयोगांचें अवलोकन करणें, नोंद करणें, अध्ययन करणें आणि नवनवे प्रयोग करीत राहणें हें मात्र बौद्धिक कार्य आहे असें आमच्या सुशिक्षित मुलींना वाटत नाहीं. कारण या प्रयोगशाळेवर समाजमान्यतेचा छाप अजून बसलेला त्यांना आढळत नाहीं. अखेर सगळ्या गोष्टींचें असेंच आहे. सरकारमान्यता तरी पाहिजे, नाहीं तर निदान समाजमान्यता तरी पाहिजे. मगच आम्हांला कोणत्याहि कार्याचें महत्त्व पटणार. कोणी तरी समाजमान्य व्यक्तींनीं किंवा संस्थांनीं अमुक

एक गोष्ट चांगली आहे म्हणून शिक्का मारला, तर तीच गोष्ट घरांघरांतून मान्यता पावूं लागते.

एकदोन वर्षांपूर्वीं धारवाडी किंवा इरकली लुगडीं किंवा खणांच्या चोळ्या अगर पोलके अंगावर धारण करणें म्हणजे जुनाटपणाचें, मागासलेपणाचें चिन्ह समजलें जाई. असा पोषाख करणाऱ्या स्त्रीला ख्रिस्तपूर्व शतकांतच टाकलें जाई. पण नंतर एकदम कोठें कळ फिरली कोण जाणे, पोषाखांत नवनव्या फॅशन्स चालू करणाऱ्या स्त्रीनेत्यांनीं धारवाडी, इरकली किंवा अशांसारख्याच खणांच्या चोळ्या व पोलके घालण्यांस सुरुवात केली. धारवाडी, इरकली वगैरे पेठांचीं पांचवारी लुगडीं त्यांच्या फॅशनेबल देहलतिकांवर खुलूं लागलीं. आणि हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांत या फॅशनेबल स्त्रियांनीं हे खण आणि हीं लुगडीं एकदम समाजमान्य करून टाकलीं! पोशाखाचा प्रश्न जीवनमूल्यांच्या दृष्टीनें पाहिला तर क्षुल्लक ठरतो. परंतु तो दिशा दाखवूं शकतो. समाजमान्य झालेल्या व नेत्या म्हणून समजल्या जाणाऱ्या स्त्रियांनीं जर नीटनेटक्या संसाराला स्वतःच्या उदाहरणांनीं समाजमान्यता प्राप्त करून दिली, तर नुसत्या संसारांत पडणाऱ्या स्त्रियांना किंवा त्यांच्यानंतरच्या मुलींना आदर्श संसाराची महत्त्वाकांक्षा वाटूं लागेल यांत मला तरी शंका वाटत नाहीं. येथें प्रश्न आहे तो तरुण मुलींचा नव्हे, तर प्रौढ सुशिक्षित स्त्रियांचा. आणि त्यांच्यापेक्षांहि जास्त जबाबदारी याच पिढींतील सुशिक्षित, विचारवंत आणि नेतृत्वगुणांनीं युक्त अशा तरुण मुलींची आहे. हजारोंनीं मुली मॅट्रिक पास होतात, आणि शेंकड्यांनीं बी. ए. पास होतात. पण त्यांतील आपल्या पिढीचें नेतृत्व करणाऱ्या अर्थात् थोड्याच असतात. त्यांच्यावर ही जबाबदारी अधिक आहे.

ज्या वेळेला मी पाश्चात्यांच्या दृष्टिकोनांतून आपल्या हिंदी जीवनाचें अवलोकन करूं लागतें, तेव्हां केवढें खेदकारक व लांछनास्पद दृश्य दृष्टीस पडतें! पाश्चात्यच कशाला, पण जेव्हां पुण्यामुंबईकडून परत नागपूरला यावें, तेव्हां नागपूरसारखें अव्यवस्थित, गचाळ व घाणेरडें शहर उभ्या हिंदुस्थानांत तरी सांपडेल किंवा नाहीं याची शंका वाटूं लागते. शहरांतील प्रत्येक नागरिकाचा व विशेषतः समंजस व शिक्षित नागरिकाचा हा दोष आहे. आणि या बहुतांश नागरिकांना स्वच्छ व सुंदर जीवन जगण्याची इच्छाच नाहीं हें या सर्व परिस्थितीचें मूलभूत कारण

अनुक्रम २३९११८ दि: १७.७.९१
क्रमांक ११४.८ नों: दि: १९
२२/९/९१

आहे. कारण नगरपालिकेनें आपलें कर्तव्य चांगल्या प्रकारें बजावलें नाहीं हें गृहीत धरलें, तरीसुद्धां घरांघरांतील नागरिक आपलें घर कसें ठेवतात यावरून नागरिकांच्या जीवनदृष्टिकोनाची पूर्ण कल्पना येऊं शकते.

आपण हिंदुस्थानांतील लोक अतिशय दरिद्री आहोंत हें मला पूर्णपणें मान्य आहे. पण दुर्दैव हें कीं, आम्ही पैशांनीं दरिद्री आहोंत एवढेंच नव्हे, तर स्वच्छता व सौंदर्य यांच्या दृष्टीनेंहि दरिद्री बनलों आहोंत. सारख्याच दरिद्री शेतकऱ्यांच्या झोपड्या व आंतील व्यवस्था यांतील फरक, त्याचप्रमाणें गरीब मध्यमवर्गांतील दोन घरांतील व्यवस्थेचा फरक आपण कितीदां तरी पाहिला असेल. तीच लहानशी झोपडी, पण एका घरांतील गृहिणी सारवून-सुरवून लख्ख ठेवते; चारपांच भांडीं, पण तीं घासून चकचकीत ठेवते; झोंपडींत जें काय अंथरूणपांघरूण, जीं गाडगींमडकीं असतील तीं नीटनेटकीं मांडून ठेवते. जें फाटकें लुगडें अंगावर असेल तें नीटसपणें नेसते. त्यामुळें तिच्या झोपडींत शिरतांच एकप्रकारचें गरिबींतलें स्वच्छतेच व सादयाचें वातावरण अनुभवास येतें. तिच्या घरीं कोचखुर्च्या असाव्या, दिवाणखाना, जेवणघर इत्यादि वेगवेगळ्या खोल्या त्यांतील योग्य त्या सामानानें भूषविलेल्या असाव्या अशी वेड्यासारखी अपेक्षा अर्थात् कुणीच करीत नाहीं. पण आहे ती झोपडी, आहे तेंच सामान स्वच्छ, व्यवस्थित व नीटसपणें मांडून ठेवलें तर त्या गरीब झोपडींतहि सौंदर्याचा साक्षात्कार होतो आणि मनाला प्रसन्न वाटतें.

या सर्व सांगण्याचा अर्थ एवढाच कीं, आम्ही गरीब म्हणून आम्हांला घर सुंदर व स्वच्छ ठेवणें शक्य नाहीं, अशी सबब ज्या गृहिणी सांगतात, त्या केवळ आपल्या आळसावर आणि अस्वच्छ व अव्यवस्थित राहणीवर पांघरूण घालूं पाहतात. आज जें जें घर अस्वच्छ व अव्यवस्थित आहे त्या घराच्या त्या लांछनास्पद स्थितीची जबाबदारी बहुतांश गृहिणीवरच आहे. पण अस्वच्छ व अव्यस्थित घर हें आपणांस लांछन आहे असें आमच्या गृहिणींना वाटूं लागलें, तरच हें लांछन दूर करण्याचा त्या प्रयत्न करतील. नाहीं तर भोंवतालच्या सर्वकष घाणींत व अव्यवस्थितपणांत त्या आपलेंहि घर बुडवून टाकतील.

आम्ही घरींदारीं सांगतों व ऐकतों कीं, आम्ही आतां स्वतंत्र देशाच्या नागरिक आहोंत. भारताचे पंतप्रधान पं. नेहरू यांचा अमेरिकेंत व कानडांत

ठिकठिकाणीं होणारा अभूतपूर्व सन्मान वाचून आमचें अंतःकरण गौरवानें भरून जातें. पण ज्या भारताच्या पंतप्रधानांचा परदेशांत इतका गौरव चालला आहे, त्या भारताच्या घरांघरांतलें दृश्य त्या पाश्चात्यांना दिसलें तर वर मान करण्याची सोय तरी राहील का, याचा विचार मात्र कुणीच करतांना दिसत नाहीं. महागाई वाढत चालली आहे अशी कुरकूर करतांनाहि अत्यंत अनावश्यक गोष्टींत आम्ही असलेल्या पैशांची उधळपट्टी करतों आणि दररोजचें जीवन अधिक दरिद्री—पैशानें व वृत्तीनेंहि—बनवितों. भाचीचें, पुतणीचें, भाचेसुनेचें किंवा पुतणसुनेचें डोहाळेजेवण किंवा मंगळागौर केलीच पाहिजे; बाळंतविडा दिलाच पाहिजे, लग्नाचा व मुंजीचा अहेर केलाच पाहिजे ही आमची दृष्टि अजून कायम आहे. त्यामुळें नको त्या ठिकाणीं लुगडीं, पातळें, मोजेजोड, टोप्या आणि पेटीचें धन होऊन बसणारीं चांदीचीं अगर स्टेनलेसचीं निरुपयोगी भांडीं आम्ही आपल्या पदराला खार लावून देत-घेत राहतों. अशा तऱ्हेनें मध्यमवर्गीय संसारांतील सारी शिल्लक खर्च झाली कीं आवश्यक त्या गोष्टींसाठींहि आमच्या-जवळ पैसे उरत नाहींत. आणि मग कसें तरी दरिद्यासारखें, अस्वच्छ, अव्य-वस्थित जीवन आम्ही घालवीत राहतों. कधीं तरी एखाद्या प्रसंगावर वेडीवाकडी व आपल्याला न पेलणारी उधळपट्टी करण्यासाठीं आपण सारें जीवन अप्रसन्न वातावरणांत जगतों.

ही परिस्थिति आम्हां स्त्रियांना खरेंच आवडते का ? कीं रूढींचे गुलाम होऊन आपण या गोष्टी करीत राहतों ? माझा स्वतःचा तर अनुभव असा आहे कीं, रूढींच्या गुलाम म्हणून नव्हे, तर स्वतःला या गोष्टी आवडतात म्हणूनच स्त्रिया त्या करीत राहतात. परलोकासाठीं जसें सारखें पुण्य संपादन करीत राहायचें, त्याचप्रमाणें इतर कोठें तरी उधळण्यासाठीं त्या पैपैशांनीं बचत करीत राहतात. कधीं स्वतः नीटनेटकीं लुगडीं नेसणार नाहींत; मुलांबाळांना चांगले कपडे घालणार नाहींत; घरांतलीं पाट, ताट, भांडीं सारीं जणुं मार खाल्लेलीं अशीं जन्मभर वापरतील; धड गाद्या, स्वच्छ पांघरुणें हीं तर त्यांच्या शब्दकोषांतहि आढळणार नाहींत, मग मच्छरदाण्यांची तर गोष्टच बोलावयास नको; कपडे ठेवण्यास कधीं एखादी चांगलीशी आलमारी घेणार नाहींत; थोडाबहुत फुटलेला आरसा आणि अर्धेअधिक दाते गेलेली फणीच वापरतील; कुठल्या तरी जुन्यापुराण्या

८५४९

कळकटमळकट कुंकवाच्या डब्या वापरून आपलें सौभाग्य जपत राहतील; कोणी आलें-गेलें तर एखादी फाटकी सतरंजी किंवा तुटकी चटईच त्यांच्या स्वागतासाठीं अंथरतील—आणि मुलाचें लग्न निघालें कीं हजार पानांची पंगत बसवतील; चारचार पक्वान्नें करतील; सुनेला गोठपाटल्या, तोडे, चंद्रहार, खड्याच्या वाकी इत्यादि जडजूड सोन्याच्या अलंकारांनीं नखशिखांत मढवून टाकतील; ज्यांनात्यांना मोठमोठे अहेर करतील. आणि एकंदरींत लग्नाचा थाट उडवून देतील.—आणि ती लग्नाची नव्हाळी ओसरली म्हणजे, मग ती गोठपाटल्यादि अलंकारांनीं नटलेली सून पुन्हा त्या पूर्वीच्या दरिद्री, अस्वच्छ, अव्यवस्थित घरांत, त्या मोडक्या-तोडक्या वस्तूंच्या संसारांत व दरिद्री वृत्तीच्या माणसांत, जुळलें तर तेवढ्याच दरिद्री वृत्तीनें व न जुळलें तर असंतुष्ट वृत्तीनें वावरूं लागते.

हें असें आहे आमचें मध्यमवर्गीयांचें जीवन. आमच्या सर्व शिक्षित, समंजस व विचारवंत म्हणविणाऱ्या स्त्रीपुरुषांना अत्यंत लांछनास्पद वाटावें असें हें जीवन आहे. जन्मभर दरिद्री, अस्वच्छ, अव्यवस्थित घरांत व मोडक्यातोडक्या, फुटल्यातुटल्या वस्तूंमध्यें दरिद्री, अप्रसन्न व अमंगळ वृत्तीनें राहावयाचें आणि तोंडानें वल्गना मात्र स्वतंत्र नागरिक जीवनाच्या करावयाच्या. मीं हें सारें जीवन मुद्दामच इतक्या उघड्या तपशीलासह दिलें आहे. कारण त्यांतील अमंगळतेची जर आम्हांला लाज वाटली, तरच कदाचित् तें जीवन सुधारण्याचा आम्ही प्रयत्न करूं. केवढीहि अस्वच्छता, केवढीहि अव्यवस्था व केवढाहि सौंदर्याभाव आम्ही जर 'आम्ही आपलीं साधीं माणसें आहोंत,' या खोट्या शब्दांमागें दडविण्या-इतक्या निर्लज्जपणाच्या व बधिरतेच्या थराला गेलों असूं, तर आमचा उद्धार करणें प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाहि शक्य होणार नाहीं. याच अमंगळ जीवनांत ज्यांची चाळिशी उलटली आहे, त्यांना कांहींहि सांगणें व पटविणें कठीणच आहे. पण ज्यांचीं मनें अजून इतकीं बधिर झालीं नाहींत, ज्यांची दृष्टि इतकी अंध झाली नाहीं, त्या तरुण मुलींना तरी वारंवार सांगावेंसें वाटतें कीं, 'पोरींनो, जीवनाचा प्रत्येक क्षण न् क्षण सुंदर व मंगल होईल अशा तऱ्हेनें आपल्या जीवनाची व संसाराची मांडणी करा. म्हणजे कोणत्याहि क्षणीं मृत्यूनें झडप घातली तरी, 'मी माणसाचें—सुसंस्कृत माणसाचें स्वच्छ व सुंदर जीवन जगलें' असें तिला म्हणतां येईल. एवढेंच नव्हे, तर 'माझ्या पतीच्या, माझ्या मुलांच्या जीवनांत मीं

निर्मलता व सौंदर्य आणलें, निर्मल व सुंदर घराचें वातावरण त्यांना दिलें, ' हाहि अनुपम आनंद तिला उपभोगायला मिळेल.

हौशीला, आवडीला जीवनांत स्थान नाहीं असें कोण म्हणेल? पण जीवनाचा लचका तोडून ती हौस भागविणें हें विकृत मनाचें लक्षण आहे. गरिबीच्या संसारांतहि मंगळागौर, डोहाळजेवण, बारसें, इत्यादि प्रसंगांना स्थान आहेच. पण त्यांचें आक्रमण नेहमींच्या सुखी व सुंदर संसारावर फारसें होऊं देतां उपयोगी नाहीं. आज असें आक्रमण फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. आणि नेहमींचें जीवन तेवढ्याच प्रमाणांत दरिद्री, अस्वच्छ व असुंदर होत चाललें आहे. स्वच्छ व सुंदर घर व राहणी ही आपल्या संसाराची आवश्यक स्थिति आहे, ही गोष्ट जर तरुण मुलींच्या मनांत पूर्ण बाणली, तरच त्या आहे त्या परिस्थितींतहि आपलें घर स्वच्छ व सुंदर राखूं शकतील आणि अशाच जीवनाचे संस्कार आपल्या मुलांबाळांवर करूं शकतील. आमच्या गृहिणींनाच जर अस्वच्छ व सौंदर्यशून्य घरें असह्य वाटूं लागलीं, तर गांवहि स्वच्छ व सुंदर करण्यासाठीं त्या खात्रीनें झटतील. अस्वच्छतेकडून मला स्वच्छतेकडे ने, असुंदराकडून मला सौंदर्याकडे ने, अमंगलाकडून मला मांगल्याकडे ने, ही आकांक्षा आमच्या सर्व गृहिणींना स्फुरो!

# स्वयंविकासी मुलांचें वैभव

अजून आमच्या घरांत अनेक नवविवाहित तरुणीच्या अडचणींचें निवारण करण्यासाठीं आई, सासू किंवा अशाच नातलग स्त्रिया तयार असतात. पहिल्या प्रसूतीसाठीं माहेरीं जाणें ही प्रथा सुदैवानें आपणांत अजून रूढ आहे. परंतु ज्या मुलीला आई नाहीं व माहेरीं आपलेपणानें वागविणारें कुणी नाहीं आणि सासरींहि असें कुणी नाहीं त्या मुलीनें काय करावें? दिवसेंदिवस अशाच मुलींची संख्या वाढत चालली आहे. कारण वाढत्या महागाईमुळें आईवडील नसतांहि इतर माहेरची मंडळी जी मुलीला पहिल्या प्रसूतीसाठीं बोलावीत असत, त्यांना आतां ही जबाबदारी स्वीकारणें अशक्य होत चाललें आहे. आणि म्हणूनच नवविवाहित तरुणीला संसाराच्या जबाबदाऱ्या प्रथमपासूनच स्वीकाराव्या लागत आहेत. तसें पाहिलें तर आजकालच्या नवविवाहित तरुणी या वयानें अठरा-एकोणीस वर्षांवरील असल्यामुळें त्यांना या जबाबदाऱ्या थोड्या शिक्षणानें व सवयीनें सहज पार पडतां याव्या. पण प्रत्यक्षांत मात्र असें दिसून येतें कीं, कांहीं जणी जरी त्या जबाबदाऱ्या चांगल्या रीतीनें पार पाडीत असल्या, तरी बऱ्याच तरुण मुली या जबाबदाऱ्यांच्या भाराखालीं पिचलेल्या व क्षीण झालेल्या दिसतात. शिकलेल्या व बिनशिकलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या मुलींचा भरणा या दोन्ही वर्गांत असतो. पण ठोकळमानानें असें म्हणतां येईल कीं, विवाहाविषयीं ज्या मुलीला आवड असते, संसार व मुलेंबाळें यांची ज्या मुलीला हौस

असते, ती मुलगी शिकलेली असो किंवा बिनशिकलेली असो, ती आपल्या जबाबदाऱ्या चांगल्या तऱ्हेनें पार पाडते आणि संसाराच्या भाराखालीं कधींच पिचून जात नाहीं. पण ज्या मुलींना लग्न करावेंसें वाटतें, परंतु वैवाहिक जीवनाची ज्यांना आवड व हौस नसते, त्या मुलींना मात्र त्या जीवनाच्या प्रत्येक गोष्टीचा भार वाटूं लागतो. आणि या भार वाटण्यामुळेंच, वैवाहिक जीवनाची प्रत्येक जबाबदारी येऊन पडली, तरी ती समजदारपणानें व आनंदानें पार न पडतां कशीबशी सहन करण्याकडेच या मुलींचा कल असतो.

नवविवाहित तरुणीनें जर हें लक्षांत ठेवलें कीं हें घर माझें आहे; हें नीट, व्यवस्थित ठेवणें हें माझें काम आहे—नव्हे, माझें सद्भाग्य आहे, तर तिला घरांतलें काम त्रासदायक न वाटतां सुखदायक वाटूं लागेल. त्याचप्रमाणें, गरोदरपणाचीं प्रथम लक्षणें दिसूं लागतांच 'आतां आपण माता होणार, स्त्रीजीवनाचें सार्थक होणार, एक अत्युच्च प्रतीचा अनुभव आपणांस प्राप्त होणार,' अशी भावना जर तिच्या मनांत निर्माण झाली, तर डोहाळ्यांचा शारीरिक त्रास कितीहि झाला, तरी तिचें मन प्रफुल्लित राहील आणि या प्रफुल्लित मनाचा परिणाम होऊन तिचा शारीरिक त्रासहि कमींत कमी होईल. प्रसूतीसाठीं जी मानसिक व शारीरिक पूर्वतयारी करावयास हवी, ती जाणत्या स्त्रियांकडून किंवा पुस्तकांच्या द्वारा जर भावी मातांनीं समजावून घेतली, तर तिला प्रसूतीचा कमींत कमी त्रास होईल. आणि मुलाची काळजी घेण्याबाबत जितकें कांहीं आगाऊ माहीत करून घ्यावयास पाहिजे, तितकें माहीत करून घेतल्यास मुलांच्या आजारांतहि तिची वृत्ति शांत राहील. निस्तरण्यापेक्षां निवारणें बरें, या म्हणीप्रमाणें मुलांना आजार न होऊं देण्याचीच जर तिनें काळजी घेतली तर तिचा व मुलाचा पुष्कळच त्रास वांचूं शकेल. पण हें सर्व करण्यासाठीं तिला संसाराची व मुलांची आवड असली पाहिजे व त्यासाठीं कोणतेहि कष्ट हसत सहन करण्याची इच्छा पाहिजे.

पण आज दुर्दैवानें अनेक घरांत अशा निरोगी मनाच्या, नैसर्गिक आवडीच्या मुली सापडत नाहींत. वैवाहिक स्थितीविषयीं असमाधान वाटण्यासारखीं अनेक कारणें सध्यांच्या परिस्थितींत असतीलहि. परंतु परिस्थिति ही पूर्ण मनासारखी अशी फारच क्वचित् माणसांच्या वांट्यास येते. आज वैवाहिक जीवनाला खास

प्रतिकूल अशी कोणती परिस्थिति आहे असें म्हणतां येणार नाहीं. नाहीं म्हणावयास एक नवीन प्रतिकूलता निर्माण झाली आहे खरी. प्रत्येक तरुणीच्या व तरुणाच्या वैवाहिक जीवनाविषयींच्या अपेक्षा व आकांक्षा इतक्या कांहीं विलक्षण वाढल्या आहेत कीं, त्या पुऱ्या होणें सर्वस्वी अशक्य आहे. प्रत्येक तरुणाला आपली पत्नी ही एखाद्या कादंबरींतील नायिकेप्रमाणें सर्वगुणसंपन्न हवी असते आणि तरुणीला आपला पति नायकाप्रमाणें पाहिजे असतो. या आकांक्षांच्या निकषावर घासल्या-मुळें साहजिकच प्रत्येकीला वैवाहिक जीवन नीरस वाटतें आणि मग त्यांतील साऱ्या जबाबदाऱ्या ती केवळ निर्जीवपणें पार पाडीत राहते.

तेव्हां वैवाहिक जीवनांतील जबाबदाऱ्या आनंदानें पार पाडण्यास आवश्यक असणारी अशी वृत्ति तरुणींनीं विचारानें आपणांत बाणविली नाहीं, तर संसार हा त्यांना भारवतच वाटत राहील. पण ही हौशीची वृत्ति असणाऱ्या नवविवाहित तरुणींपुढें ज्या अडचणी उभ्या राहतात त्या निवारण्यासारख्या असतात. सांसारिक जीवनांतील गरोदरावस्था, प्रसूति, बालसंगोपन यांसारख्या अवस्थांसाठीं जाणते-पणानें पूर्वतयारी करणें हा ही अडचण निवारण्याचा उत्तम मार्ग होय. याच मुली शाळेंत असतांना वार्षिक परीक्षा आली कीं अभ्यासाची विशेष तयारी करीत होत्या. पण संसारांतहि परीक्षा असतात व त्यांची चांगली पूर्वतयारी करावी लागते हें त्यांना माहीत नसतें. शाळेंत शिकलेल्या गृहशास्त्राचें ज्ञान या दृष्टीनें अपुरें असतें, हें ध्यानांत ठेवून आपली तयारी वाढविण्यास त्यांनीं लागलें पाहिजे. म्हणजे मुलांचे कांहीं आजार त्यांना टाळतां येतील आणि कांहीं आजारांची तीव्रता कमी करतां येईल.

पण हें सारें तरुण मातांच्या दृष्टीनें झालें. तरुण पित्यांवरहि जबाबदारी असते ही गोष्ट त्यांच्या मनांवर बिंबविणें हें अधिक कठिण पण अधिक आवश्यक आहे. कारण आजच्या सामान्य कुटुंबांत पति–पत्नी व मुलें एवढींच माणसें असतात. मुलांच्या आजारांत पत्नीला विश्रांति देण्यासाठीं आपण कांहीं भार आपणांवर सहजपणानें उचलला पाहिजे हें आमच्या तरुण मुलांच्या कानींच पडलें नाहीं असें दिसतें. कांहीं समंजस, सहृदय तरुण हा भार उचलतांना आढळतात. पण अशांची संख्या फार कमी आहे. 'आम्ही बाहेरचें काम करीत आहोंत, पोटा-पाण्याचा धंदा करीत आहोंत, तेव्हां आणखी घरचें आम्हीं करावें अशी अपेक्षा

करूं नका. आम्हांला देखील विश्रांति नको का?' अशा तऱ्हेचें समर्थन तरुणांकडून होण्याचा संभव आहे. पण यावर माझें असें उत्तर आहे कीं, 'सामान्यपणें तुम्ही आपलीं बाहेरचीं कामें सांभाळलींत म्हणजे पुरे आहे. पण घरांत पत्नी आजारी असतांहि तुम्ही जर आपल्या पुरुषत्वाच्या जोरावर तिलाच काम करायला लावाल व स्वतः घरकामाला मुळींच हात लावणार नाहीं, तर पतिपत्नीसंबंधामध्यें जो आपलेपणा व सहानुभाव निर्माण व्हावयास पाहिजे त्याला तुम्ही मुकाल. आणि कदाचित् पत्नीलाहि. त्याचप्रमाणें मूल आजारी असतां मुलाच्या शुश्रूषेची कांहीं जबाबदारी जर तुम्हीं आपणांवर घेतली नाहीं, तर घरकाम, मुलाची शुश्रूषा व मानसिक ताण यांमुळें पत्नीच आजारी पडण्याची शक्यता बळावेल. आणि मुलाच्या निमित्तानें परस्परांना साह्य करण्याची जी संधि तुम्हांला मिळेल तिला तुम्ही मुकाल.'

मला वारंवार असें वाटतें कीं तरुण मुलींना सांगण्यासारखें जरी पुष्कळ असलें, तरी त्यांच्याबरोबरच तरुण मुलांनाहि सांगितलें गेलें नाहीं, तर पति व पिता या नात्यानें आपली जबाबदारी पार पाडण्यास व पर्यायानें खरें संसारसुख अनुभविण्यास ते सर्वस्वीं असमर्थ बनतील. स्त्री शिकलेली असली, तरी तिनें घरांतील सर्व तऱ्हेचीं कामें करावीं अशी साहजिकच अपेक्षा केली जाते. पण पुरुषाकडून मात्र अडचणीच्या प्रसंगींहि या घरकामास हातभार लावण्याची अपेक्षा केली जात नाहीं. पत्नी जरी थकलीभागलेली असली तरी तिनें कामें करीतच राहिलें पाहिजे आणि पतीनें मात्र रिकामटेकडेपणानें बसून राहिलें पाहिजे अशी अपेक्षा पुरुषांची असते. काम न करणारा माणूस श्रीमंतींत लोळतांना पाहिला कीं, काम करणाऱ्या गरिबाला जसा तो अन्याय वाटतो व तें शल्य त्याला बोचत राहतें, त्याचप्रमाणें शिकलेल्या स्त्रिया जरी कामें करीत असल्या तरी त्यांच्या पतींनीं जर त्या कामांत अडीअडचणींत मदत केली नाहीं तर हें विषमतेचें शल्य त्यांना सतत बोचल्यावांचून राहणार नाहीं हें त्यांनीं निश्चित समजावें.

शतकानुशतकांच्या विशिष्ट समाजरचनेमुळें पुरुषांना आपली वागणूक एकदम बदलतां येणार नाहीं हें मान्य. परंतु वागणूक बदलली पाहिजे, बदलणें हें माणुसकीचें लक्षण आहे, पूर्वीप्रमाणेंच श्रमाच्या व घरगुती कामांना हात न लावणें हें पुरुषार्थाचें लक्षण मानतां उपयोगी नाहीं, एवढी जरी जाणीव पुरुषांनीं

करून घेतली, तरी त्यांच्या वागणुकींत इष्ट तो फरक घडून येऊं शकेल. आणि पत्नीशीं अनेक गोष्टींत सहकार्य करण्याच्या क्रियेंतच त्यांना संसारसुखाचा अधिकाधिक अनुभव येऊं शकेल.

कांहीं कांहीं गोष्टींचें स्मरण एक कोटि वेळां जरी दिलें गेलें असलें, तरी पुन्हा आणखी तितक्याच वेळां व वारंवार करून देणें आवश्यक असतें. जीवनाच्या कोलाहलांत, आशा-अपेक्षाभंगांत, वाढत्या कष्टांत कांहीं अतिशय मौल्यवान अशा गोष्टी उपेक्षेच्या गर्तेंत जाऊन पडतांना दिसतात. प्रत्येक मनुष्याच्या व विशेषतः स्त्रीच्या जीवनांतील अतिशय मौल्यवान् गोष्टींपैकीं तिचीं मुलें हीं असतात, हें विधान पुनरुक्तीचें वाटलें, तरी त्याचें पुनःस्मरण करणें व करविणें आज आवश्यक होऊन बसलें आहे. सर्वसाधारण कुटुंबांतील साधारण शिक्षण घेतलेल्या नव-विवाहित तरुण स्त्रिया विवाहोत्तर जीवनांतील हौशीच्या कार्यक्रमांत साहजिकच दंग होऊन जातात. मुलें झाल्यावर कांहीं जणी मुलांची काळजी कशी घ्यावी या संबंधीं कटाक्षानें माहिती करून घेऊन शक्य तितक्या चांगल्या सवयी मुलांना लावतात. त्यांना पोषक होईल असें खाणेंपिणें सुरू करतात. त्यांचे कपडे स्वच्छ, नीटनीटके व सुंदर असावेत यासाठीं परिश्रम करतात. एवढेंच नव्हे तर आपल्या मुलांचें मानसिक आरोग्यहि चांगलें राहावें यासाठीं प्रयत्न करतात.

अधिक सुखवस्तु कुटुंबांतील व सुशिक्षित अशा कांहीं स्त्रियाहि आपल्या शारीरिक व मानसिक आरोग्याचें संवर्धन करण्याचा प्रयत्न करतात. परंतु मुलांची शारीरिक व मानसिक दृष्ट्या काळजी वाहणाऱ्या स्त्रिया दिवसेंदिवस कमी कमी होत चालल्या आहेत कीं काय अशी शंका येऊं लागते. आर्थिक दृष्ट्या सुखवस्तु, निदान बऱ्यापैकीं परिस्थितींतल्या अशा कांहीं तरुण मुलींची आपल्या मुलांशीं वागण्याची रीत व मुलांसाठीं त्या करीत असलेलें काम हीं पाहिलीं कीं, ही शंका बळावूं लागते.

वस्तुतः, प्रत्येक निरोगी स्त्रीला मुलांची आवड असते आणि मुलांसाठीं ती आनंदानें कष्ट सोशीतहि असते. असें असतांना स्त्रियांना जर मुलांचा कंटाळा आलेला दिसला, आपल्या सुखाच्या, आकांक्षांच्या व कामांच्या आड मुलें येतात या कल्पनेनें जर त्या मुलावर सतत त्रासत-चिडत राहिल्या, तर कुठें तरी कांहीं तरी बिघडलें आहे हें समजलें पाहिजे. जुन्या स्त्रिया मुलांकडे बरेंच कमी लक्ष देतांना

आढळत हें खरें असलें, तरी अविभक्त कुटुंबांतील पंचवीस माणसांच्या रामरगाड्यांत त्यांना मुलांकडे फारसें लक्ष देण्यास वेळ मिळत नसे, ही गोष्ट विसरतां कामा नये. परंतु तेथेंहि वेळ मिळत असून देवपूजा, सणावारांचें अवास्तव स्तोम, लग्नाकार्यांना लहान मुलांना घेऊन जावयाचा सोस या कारणांमुळें लहान मुलांची देखील आबाळ होतांना आढळून येत असे.

आजच्या तरुण स्त्रियांच्या मार्गांत वर उल्लेखिलेल्या अडचणी फारशा येत नाहींत. परंतु दुसऱ्या कांहीं नव्या अडथळ्यांची रास त्यांच्या मार्गांत जमा झालेली दिसते. मुलांचें काम बरेंचसें चिकाटीचें व जिकिरीचें असतें हें अत्यंत प्रेमळ आई देखील कबूल करील. परंतु मुलाविषयींचें प्रेमच सारे कष्ट सहन करण्यास तिला शक्ति देतें. स्त्रियांच्या अनेक करमणुकींच्या, आवडींच्या, हौशीच्या आड मुलांचें काम येतें हेंहि नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. मूल अंगावर असतांना आईला खाण्यापिण्यांत बराच संयम पाळावा लागतो. मूल लहान असतां फिरण्यास व सिनेमा-नाटकांस जाणें किंवा अशाच दुसऱ्या करमणुकीच्या कार्यक्रमांना जाणें हें तिला बरेंच मर्यादित करावें लागतें. आणि केवळ करमणुकीचा, अमर्याद सुखोपभोगाचा मार्गच स्वीकारावयाचा असें कोणीं ठरविलें तर मुलें ही भयंकर मोठी धोंड आहे असें वाटल्यावांचून राहणार नाहीं हें निश्चित आहे.

परंतु पाश्चात्य देशांत या मार्गानें बऱ्याच तरुण स्त्रिया झपाट्यानें जात असलेल्या आपण ऐकत असलों, तरी तेथेंहि या कर्तव्यशून्य व सुखोपभोगरत मार्गाचा भयंकरपणा व समाजविघातकता विचारवंतांना पुरेपूर पटली आहे. आणि त्या मार्गापासून तरुण स्त्रीपुरुषांना परावृत्त करण्यासारखे लेख तेथें लिहिले जात आहेत; तशी चळवळ सुरू झाली आहे. या दुसऱ्या महायुद्धकाळांत सैन्यांत, आरमारांत, वायुदलांत व इतर युद्धकालीन मोठमोठ्या धंद्यांत व नोकऱ्यांत बरेंचसे तरुण मोठ्या पगारावर लागले. कांहीं काळ पैशाचा पाऊस पडला. अर्थात् चैनीची वृत्तीहि त्याबरोबर वाढली. आणि बऱ्यापैकीं मध्यमवर्गातील स्त्रीपुरुषांची वृत्ति आतां पाश्चात्यांप्रमाणें सुखोपभोगाच्याच मार्गावर जाणार काय अशी थोडीबहुत भीति वाटण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली होती. परंतु युद्ध थांबल्यावर हें औटघटकेचें पैशाचें राज्य नाहींसें झालें, आणि सर्वजण बहुतांशानें स्वस्थानीं परत आले.

वरच्या मध्यमवर्गातील, संख्येनें थोड्याशा अशा या उदाहरणांचा उल्लेख येथें अशासाठीं केला आहे कीं, तीं संख्येनें कमी असतील, पण प्रभावाच्या दृष्टीनें फार मोठीं ठरतात. कमींत कमी कष्ट व जास्तींत जास्त पैसा ही जशी आज बहुतांश लोकांची वृत्ति झाली आहे, त्याचप्रमाणें कमींत कमी कर्तव्यें व जास्तींत जास्त हक्क आणि कमींत कमी जबाबदाऱ्या व जास्तींत जास्त चैन या दिशेनें आज बहुतेक सारा समाज चालूं लागला आहे. ही उघड वस्तुस्थिति नाकारण्यांत कांहीं अर्थ नाहीं. असें हें वारें सगळीकडे खेळत सल्यामुळें मुलांच्या शारीरिक व मानसिक विकासाकडे जाणतेपणानें लक्ष पुरविण्यापेक्षां मुलाचें अगदीं अवश्यक तेवढेंच काम कसेंबसें आटोपून त्याची अडचण कशी दूर होईल व आपणास मन मानेल ती चैन करण्यास कशी मिळेल इकडेच बऱ्याचशा तरुण मुलींचें लक्ष केवळ अज्ञानामुळें व अपरिपक्वपणामुळें लागलेलें दिसतें.

त्यांचें आपल्या मुलांवर प्रेम नसतें असें मुळींच नाहीं. त्यांना मुलांची आवड नसते असेंहि नाहीं. परंतु तरुणपणाच्या हौशींमुळें, कधीं केवळ आळसामुळें व कधीं बौद्धिक कार्याच्या आवडीमुळें त्यांचें मुलांकडे दुर्लक्ष होत राहतें. मुलाच्या शारीरिक विकासाच्या दृष्टीनें ज्या गोष्टी करणें अवश्य असतें त्या करावयाच्या राहून जातात. ज्या टाळणें अवश्य असतें त्या टाळण्याकडेहि दुर्लक्ष होतें. मूल निसर्गक्रमानें वाढत जातें. त्याच्या मानसिक विकासाकडे, त्याच्या सवयींकडे, जीवनांतील मूल्यांविषयींच्या त्याच्या कल्पनांकडे तर सामान्यतः सगळीकडेच दुर्लक्ष केलें जातें. आणि मुलें व मुली मोठीं झालीं कीं, कांहीं टाळतां येण्यासारखे शारीरिक दोष, अनिष्ट सवयी व मानसिक विकृति यांचें जेव्हां प्रथम दर्शन होतें, तेव्हां जाणत्या आईला अतिशय दुःख होतें. वाढत्या वयांत हे दोष काढून टाकणें कठिण होऊन बसलेलें असतें. आणि ते काढण्यासाठीं लागणारी मानसशास्त्राची यथायोग्य माहिती फारच थोड्या जणींना असते.

तरुणपणाची हौस, करमणुकीची आवड, बौद्धिक कार्याची आतुरता या गोष्टी मध्यम वयांत कमी झाल्यामुळें किंवा तृप्ति मिळाल्यामुळें आतां मुलांकडे पाहण्याची तिची दृष्टि बदललेली असते. मुलामुलींत केवळ दुर्लक्षामुळें उत्पन्न झालेले दोष पाहून तिला आपल्या चुकीची जाणीव होते. कारण कांहीं थोड्या लोकांचें जीवन जरी लहानमोठ्या कार्यांनीं सर्वस्वी व्यापलेलें असलें तरी सर्वसामान्य

स्त्रीपुरुषांच्या जीवनांत कुटुंबांतील व्यक्तींच्या सुखदुःखांनाच अधिक महत्त्व असतें. त्यामुळें मुलें गुणी निघणें याहून अधिक आनंदाची गोष्ट त्यांना वाटत नाहीं. आणि मुलें अवगुणी निघणें याहून अधिक दुःखाची गोष्ट त्यांना बोचत नाहीं. हें अर्थात् अतिशय स्वाभाविक असेंच आहे.

बाळपणांतच मुलांवर जे संस्कार होतात तेच बहुतेक जन्मभर त्यांच्यावर प्रभाव गाजवीत राहतात. विशेषतः मुलांच्या वयाच्या सहासात वर्षांपर्यंत ज्या ज्या गोष्टी, ज्या ज्या आनंदाच्या वा दुःखाच्या घटना घडतात, त्या मुलाच्या मनावर पक्क्या कोरल्या जातात. त्यांतील ज्या वाईट असतील त्या विसरण्याचा किंवा त्या पुसून टाकण्याचा मुलांचा अजाणतां प्रयत्न चाललेला असला, तरी त्या कायमच्या पुसून जात नाहींत, हा मानसशास्त्राचा नियम आज सर्वमान्य झालेला आहे. यामुळें मुलाच्या बाळपणांतच जितके उत्तम संस्कार त्याच्यावर होतील, जितक्या उत्तम सवयी त्याला लागतील किंवा जितकें प्रेमाचें व विकासपोषक वातावरण त्यास मिळेल, तितकें अतिशय आवश्यक असतें. ज्यांना 'प्रॉब्लेम चिल्ड्रेन' किंवा विकृत मनोवृत्तीचीं मुलें असें नांव दिलें जातें, त्यांच्यांत मनोविकृति कां निर्माण होते? या प्रश्नाचें उत्तर 'प्रेमाचा अभाव' असें मानसशास्त्रज्ञ देतात. ज्या घरांत मुलें लाडानें नव्हे, तर प्रेमानें वागविलीं जातात, त्या घरांतील स्त्रीपुरुषांना मुलांच्या बाबतींत पश्चात्ताप करण्याची सहसा पाळी येत नाहीं.

या दृष्टीनें विचार करतांना मला नुकत्याच एका इंग्रजी मासिकांत वाचलेल्या गोष्टीचें स्मरण होतें. एका अनाथालयाच्या लोखंडी दरवाजापाशीं कांहीं मुलें खेळत होतीं. त्यांना बिचाऱ्यांना घर ना दार, आई ना बाप, कधींकधीं त्यांतील कांहीं मुलें दारापाशीं उभीं राहून रस्त्यावरून जाणाऱ्या-येणाऱ्या मुलांकडे पाहत राहत. आपापल्या आईबापांबरोबर जाणाऱ्या त्या भाग्यवान् मुलांचा त्यांना किती हेवा वाटे! आपल्यालाहि एखादी आई भेटली आहे आणि खऱ्याखुऱ्या घरांत आईबापांच्या प्रेमळ उबेंत आपणांस राहायला मिळालें आहे, अशीं आशादायक स्वप्नें जागेपणींहि त्यांच्या मनांत तरळत. खेळतां खेळतां एका नऊ वर्षांच्या लॉरी नांवाच्या अनाथ मुलाला दाराजवळ येऊन बाहेरून डोकावत असलेला एक मुलगा आढळला. 'माझें नांव जॉन. मी खेळायला आंत येऊं का?' त्या बाहेरच्या मुलानें लॉरीला विचारलें. लॉरीला फार राग आला. 'तुला घरदार

आहे, आईबाप आहेत. तूं कशाला आमच्यांत येतोस? फक्त अनाथ मुलांनाच काय तें येथें खेळतां येतें. तूं चालता हो पाहूं.' त्यानें रागानें उत्तर दिलें आणि तो खेळण्यासाठीं निघून गेला.

पण जॉन हलला नाहीं. तो सारखा त्यांना हांका मारीत राहिला. अखेर एकानें त्याला दारावर चढून आंत येण्यास मदत केली. आंत आल्यावर सारे भेदभाव विसरले गेले. सगळ्यांचे खेळ सुरू झाले. अंधार होत आला तरी जॉन घरीं जाण्याची गोष्ट काढीना. रात्रभर तो आनंदानें त्या अनाथालयांतच राहिला. सकाळ झाल्यावर अखेर लॉरीनेंच त्याला म्हटलें, 'घरीं तुझे आईबाबा वाट पाहत असतील. तूं लवकर जा आतां.'

'मला तर वाटतें कीं, माझे आई-बाबा इथेंच राहण्याची मला परवानगी देतील.' जॉननें उत्तर दिलें.

लॉरी चकितच झाला. 'आमचे आईबाबा असते तर आपण तर बुवा धावतच परत गेलों असतों. अन् तेहि माझ्या येण्याची सारखी वाट पाहत राहिले असते ही माझी खात्री आहे.' लॉरीनें मोठ्या आत्मविश्वासानें उत्तर दिलें.

जॉनच्या डोक्यांत एक कल्पना आली—'हें पहा, मी तुझ्या जागीं राहतों. अन् तूं माझ्या ऐवजीं घरीं जा. माझे आईबाबा मला इथें राहूं देतील.'

लॉरीचा अर्थात् या सूचनेवर विश्वास बसला नाहीं. पण आपणांस आई-बाबा असावे या गोष्टीची त्याला इतकी तळमळ लागली होती कीं, त्यानें जॉनचें म्हणणें कबूल केलें. दोघे जॉनच्या घरीं पोचले. दारापाशीं त्यांना बरीचशी गर्दी आढळली. एक पोलिसहि उभा होता. जॉन दिसतांच त्या दोघांना घाईघाईनें आंत नेण्यांत आलें. जॉनचे वडील ओरडले, 'कुठें गेला होतास इतका वेळ? आम्हाला वाटलें, तुला कुणी पळविलें कीं काय?' जॉनची आई त्याच्याजवळ येऊन बसली. जॉननें वडिलांना उत्तर दिलें, 'मी तर अनाथालयांत गेलों होतों. मी आतां तेथेंच राहणार आहें. नाहीं तरी तुम्हांला मी नकोच आहें. माझ्याऐवजीं हा लॉरी घरीं राहील. आणि मी जाईन अनाथालयांत. मला तिथेंच राहणें आवडतें.'

जॉनच्या वडिलांचा चेहरा रागानें लाल झाला.

'तूं म्हणतो आहेस तरी काय?' जॉनच्या आईनें रडत रडत विचारलें.

‘हें पाहा, मी इथें राहणार आहें. आणि जॉन माझी जागा घेणार आहे.’ लॉरीनें भीतभीत उत्तर दिलें.

‘एकूण तूं ही कल्पना जॉनच्या डोक्यांत घुसवलेली दिसते.’ जॉनचे वडील लॉरीकडे वळून गरजले.

‘छे, छे! मीं नाहीं कांहीं सुचवलें. आणि आतां तर मीं आपला बेत बदलूनच टाकला आहे. इथल्यापेक्षां अनाथालयच बरें.’ असें म्हणत म्हणत लॉरी काढता पाय घेऊं लागला.

जॉनच्या वडिलांचा चेहरा एकदम उतरला. रागाची जागा दुःखानें घेतली. दुःखानें व शरमेनें त्यांचा चेहरा काळवंडला. एकदम काय झालें कोणास ठाऊक, वडिलांनीं जॉनला पोटाशीं धरलें. आई-वडिलांच्या डोळ्यांतून अश्रू खळाळूं लागले.

लॉरीला अनाथालयांत पोचविण्यांत आलें.

आपल्या लहानपणाचा हा प्रसंग लॉरी कधीं विसरला नाहीं. आपल्या मित्रापाशीं बोलतांना या प्रसंगाचें वर्णन करून सांगितल्यावर तो म्हणाला, ‘लवकरच माझें लग्न होणार आहे. मला मुलेंबाळें होतील. आणि माझ्या मुलांवर मी इतकें प्रेम करीन कीं, आपण आईबापांना हवेसे वाटतों असें त्यांना सतत वाटत राहील. आईबापांचें प्रेम नसणें म्हणजे केवढें दुर्दैव आहे याची माझ्याइतकी कुणाला कल्पना असणार?’

घर नीटनेटकें राहावें, सुव्यवस्थित असावें असें आपणांस साहजिकच वाटत असतें. आपल्या घरांत वक्तशीरपणानें व शिस्तीनें सारे व्यवहार चालावे असेंहि आपणांस वाटत असतें. आपलीं मुलें प्रेमळ, विनयशील, समंजस व आज्ञाधारक व्हावींत हीहि आपली रास्तच अपेक्षा असते. आणि या अपेक्षांवर जेव्हां जेव्हां व जेथें जेथें आघात होतो, तेव्हां तेव्हां व तेथें तेथें आपणांस राग येणें किंवा दुःख वाटणें हें अर्थातच अत्यंत नैसर्गिक आहे. पण नैसर्गिक भावना कांहीं विवक्षित प्रसंगीं जेव्हां संयमाचा बांध फोडून बाहेर आवेगानें उसळतात, तेव्हां मात्र ‘सावधान’ म्हणून मनाला जागें करणें अवश्य होतें. जेवणाच्या वेळेला रागावणें हें आपल्या स्वतःच्या, मुलाबाळांच्या व घरांतील माणसांच्या शारीरिक व मानसिक हिताच्या दृष्टीनें कसें अयोग्य आहे हें आपणांस अनुभवानें माहीत

असतें. पण राग अनावर होऊन एखादे वेळीं अपवादानेंच जर आपण अशा वेळीं बोललों, तरच तें क्षम्य होईल. पण वारंवार त्याच त्या चुका हातून होत राहिल्या तर त्या चुकीच्या सदरांतून निघून निष्काळजीपणाच्या, बेपर्वाईच्या सदरांत जाऊन पडतात हें आपण विसरतां कामा नये.

आपला राग इतका का लाडका आहे कीं, घराच्या सुखाच्या आड प्रतिपदीं येत असतांहि आपण तो आवरूं शकणार नाहीं? आपली स्वच्छता, आपली व्यवस्था, आपली शिस्त या गोष्टी इतक्या श्रेष्ठ आहेत का, कीं मुलांच्या आनंदाची, मोकळेपणाची, प्रेमाची पायमल्ली करून त्यांनाच डोक्यावर नाचवावें? आपणांस घर, अंगण, वस्तून् वस्तु, खोलीन् खोली स्वच्छ ठेवावीशी वाटली तर तें उत्तमच आहे. पण या आवश्यक गोष्टी करीत असतां, या बाह्य चांगल्या गोष्टींपेक्षां आंतील गुणांना व भावनांना अधिक महत्त्व आहे, याचा मात्र आपण क्षणभरहि विसर पडूं देतां कामा नये.

आपण खोली आवरण्याच्या अगदीं भरांत आलों आहोंत, डोक्यावर पदर ओढून घेऊन धुळीपासून रक्षण करण्याचा प्रयत्न चालला आहे, साऱ्या खोलींतील वस्तू जागा बदलून कोठें तरी मजेंत जाऊन बसल्या आहेत, अशा वेळीं मुलानें धांवत येऊन कांहीं तरी कौतुकाची गोष्ट दाखवावी. 'आई, मी भोवरा पहा कसा हातावर घेतों, जरा पहा तर!' असें म्हणत नाचतनाचत यावें किंवा 'शेजारच्या अरुणच्या पतंगाची अशी काटाकाटी केली,' असें म्हणत पतंगांच्या युद्धाचें रसभरित वर्णन करीत यावें, किंवा मुलीनें 'आई मी चिमणी बघ तर कशी काढली' असें म्हणत एक कागद नाचवीत यावें आणि जागा बदलून बसलेल्या एखाद्या वस्तूवर त्याचा पाय पडावा किंवा तिनें पाय अडखळून तेथेंच लोटांगण घालावें. अशा वेळीं आईच्या संयमाची परीक्षाच होत असते. लक्षावधि गॅलन पाणी एखाद्या धरणानें धैर्यानें अडवून धरावें, तद्वतच आईला आपल्या कामाच्या ऐन भरांत, कामांत अडथळा व गोंधळ निर्माण करणाऱ्या मुलांच्या आगमनाचा अतिशय राग येत असतांहि धैर्याचें व संयमाचें अत्युच्च शिखर गांठून, किंचित् उत्तेजित पण प्रयत्नानें शांत केलेल्या स्वरांत म्हणावें लागतें, 'अरे, मी आतां कामांत आहें. मग तुझं सगळं पाहीन. अगदीं सगळं.'

क्रोधाचें अफाट पाणी अडविणारें संयमाचें धोरण अगोदरच बांधलेलें असलें,

तरच क्रोधाच्या, त्रासाच्या लाटांवर लाटा उसळत धरणावर धडक्या मारीत असतांहि आवाज शांत राहूं शकतो. नाहीं तर रागाचा कडकडाट, एखाद्या मुलाच्या पाठींत धपका आणि मुलांचें घाबरून पळून जाणें एवढया गोष्टी घडलेल्या दिसतात. कौतुकानें कांहीं तरी दाखविण्यास आलेलीं मुलें घाबरून हिरमुसलीं होऊन दूर निघून जातात. त्यांच्या कौतुकाच्या, हौशीच्या भावनेवर आघात होतो. आणि असे एकेक आघात गोळा होऊन दडपलेलीं, घाबरलेलीं संकोची मुलें घरांत वावरत राहतात.

एखादी आई म्हणेल, 'पण कां हो, आई अशी कामांत आहे असें दिसत असूनहि मुलांनीं कां येऊन त्रास द्यावा? का त्यांना थोडा वेळ थांबतां नसतें आलें? आणि अशा वेळीं मूल आलें, तर त्यानें वांट्याला आलेला राग सोसायलाहि तयार झालें पाहिजे. मुलांची कुचंबणा होते, त्यांच्या भावनेवर अपघात होतो, आणि आम्हांला नाहीं वाटतें त्रास होत? आम्हीं काय स्थितप्रज्ञ व्हावें?'—आई कामांत मग्न आहे म्हणून मुलांनीं त्रास देऊं नये हें म्हणणें ठीक आहे. पण मुलें जर एखाद्या वेळीं कौतुकानें कांहीं दाखवायला किंवा सांगायला आलीं तर? तींहि बिचारीं आपल्या त्या भोवऱ्याच्या, पतंगाच्या किंवा चिमणीच्या आनंदांत दंग असतात. अशा वेळीं तुम्ही तरी त्यांच्यावर वसकन् ओरडून त्यांचा कां विरस करावा? आईचें दुसरें म्हणणें असें कीं, 'त्यांना थोडें थांबतां नसतें आलें?' मी विचारूं का प्रतिप्रश्न? मूल धावत कांहीं सांगण्यास आलें असतां, तुम्हांला नसती का हातांतली केरसुणी थोडा वेळ ठेवतां आली? तुम्ही क्षणभर थांबून, मुलांना नंतर कांहीं वेळानें येण्यास कां नाहीं सांगूं?

आईचें तिसरें म्हणणें असें कीं, 'अशा तऱ्हेनें वेळकाळ न पाहतां मुलें आलीं तर त्यांनीं रागाचे शब्द आनंदानें सोसले पाहिजेत.'—माझें म्हणणें असें आहे कीं, मुलांना वेळकाळ समजत नाहीं हें खरें आहे. पण आम्हांला तरी वेळकाळ समजतो का? कौतुकानें फुलल्या डोळ्यांनीं धावत येऊन आम्हांला कांहीं सांगणाऱ्या, दाखविणाऱ्या आमच्याच मुलांवर जेव्हां 'माझ्या कामांत व्यत्यय आणला' एवढ्याच सबबीवर आम्ही रागावतों, त्रासतों, तेव्हां आम्हांला तरी वेळकाळ समजतो का? तशीं नुसतीं मुलें मध्येंमध्यें घुटमळूं लागलीं, तर रागानें त्यांना जाण्यास सांगणें यांत विशेष वावगें कांहीं होणार नाहीं हें कबूल. पण

मुलांच्या आनंदाच्या, हौशीच्या, कौतुकाच्या प्रसंगीं जर आम्ही केवळ स्वतःच्या त्रासाकडे लक्ष देऊन त्यांच्यावर रागावूं लागलों, त्रासून चिडून त्यांचा पुरा विरस करूं लागलों, तर आमच्यासारख्या दुर्दैवी, असमंजस आया आम्हीच असें कबूल करणें प्राप्त आहे.

'बूंदसे गई वो हौदों से नहीं आती' ही हिंदींतली म्हण कांहीं कांहीं प्रसंगीं अक्षरशः लागू पडते. जेथें आई स्वच्छता, व्यवस्था, शिस्त यांच्या नांवाखालीं आपल्या मुलांच्या मनांवर वेळीं-अवेळीं आघात करीत असते, तेथील मुलें दाबलीं-दडपलेलीं, संकुचित, घाबरट अशींच राहतात. आणि कित्येक वेळां मोठेपणीं आपल्या मुलांवर सतत रागावून लहानपणच्या दडपणाचा सूड उगवूं पाहतात. मुलांच्या प्रत्येक चांगल्या कृतीला उत्तेजन देणें, तिचें योग्य तें कौतुक करणें, यामुळेंच मुलांचा विकास होत असतो. हें आईवांचून कोण करूं शकेल? मुलें म्हणजे आईबापांच्या जीवनोद्यानांतील नाना तऱ्हेचीं रोपें आणि लता आहेत. त्यांना योग्य तें खतपाणी देणें, अवश्य तेवढें ऊन लागूं देणें, कडक उन्हाळा असला तर त्यांच्यावर छाया करणें--आणि एवढें सर्व करूनहि त्यांचा विकास खुंटत असेल तर त्याचीं कारणें शोधून त्यांवर उपाय करणें हेंच आई-बापांचें काम नाहीं का? माझ्या मुलांनीं विशिष्ट तऱ्हेचेच कपडे घातले पाहिजेत, विशिष्ट तऱ्हेनेंच वागलें पाहिजे, विशिष्ट अभ्यासक्रमच घेतला पाहिजे, विशिष्ट धंदा किंवा व्यवसायच केला पाहिजे असा अत्याग्रह जर आईबापांनीं धरला, तर मोकळ्या वृत्तीचीं, आनंदी, स्वयंविकासी व स्वयंप्रकाशी अशीं मुलें निपजणें अशक्यच आहे. आईबापांच्या मनांप्रमाणें कांहीं ठराविक आकारांचे ठोकळे घडविण्याचें श्रेय मात्र त्यांच्या पदरांत पडेल.

माझीं मुलें अगदीं माझ्या आज्ञेंत आहेत, आमच्या विचारांवांचून दुसरे विचार ते मनांत आणीत नाहींत, आम्ही सांगूं तोच मार्ग ते निमूटपणें स्वीकार-तात, आम्ही सांगूं त्याच मुलाशीं अगर मुलीशीं तीं आनंदानें लग्न करतात, अशा आईबापांच्या वांट्याला, मोठ्या छायेंत वाढणाऱ्या खुरटलेल्या झुडपांची शोभा पाहण्याचेंच भाग्य येतें. पण सदाचाराचे सामान्य नियम पाळून इतर सर्व दृष्टींनीं आपल्या स्वतंत्र, जिज्ञासु बुद्धीप्रमाणें वागणारीं-विकसणारीं मुलें आपलीं म्हणण्याचें भाग्य त्यांना कधींच लाभणार नाहीं. मोठ्या वृक्षाच्या छाये-

खालील नव्हे, तर मोठ्या वृक्षाच्या बरोबरीनें उंच उंच आकाशांत मस्तक नेणाऱ्या, चारी दिशांना डौलदार फांद्या पसरविणाऱ्या आणि भरघोस फुलांचे गुच्छ विकासाच्या बहरांत फांद्यांफांद्यांवर डोलविणाऱ्या पूर्ण विकसित वृक्षांचें विशाल सौंदर्य पाहण्याचें भाग्य त्यांना लाभणार नाहीं.

आजवर घरोघर कशींहि मुलें वाढविलीं गेलीं असोत, यापुढें मात्र प्रत्येक जाणत्या, समंजस आईनें आपलीं मुलें म्हणजे जणुं पेटींत ठेवण्याची आपली धनदौलत ही कल्पना मनांतून पार घालवून दिली पाहिजे. आतां स्वतंत्र हिंदुस्थानांत आम्हांला नुसतीं आज्ञाधारक, वरच्यांच्या आज्ञांची निर्बुद्ध अंमलबजावणी करणारीं मुलें वाढवायचीं नाहींत. स्वयंविकासी, स्वयंप्रज्ञ, स्वयंप्रकाशी मुलें वाढविलीं जाण्यास योग्य वातावरण आतांच प्राप्त झालें आहे याची जाणीव आम्ही आतां करून घेतली पाहिजे. जाणतेपणानें हें कार्य करायला पाहिजे. आणि त्यासाठीं पदोपदीं थोडथोडा त्याग, थोडथोडा संयम, थोडथोडी विनोदबुद्धि, थोडथोडा खेळकरपणा व थोडथोडी सहिष्णुता, हींहि अंगीं बाणविलीं पाहिजेत. सांगितलेली गोष्ट मुलानें ताबडतोब ऐकली नाहीं कीं आपणांस साहजिकच राग येतो. आज्ञेचें पालन कां झालें नाहीं याच्या कारणाकडे ओझरतीहि नजर न टाकतां आज्ञापालन झालें नाहीं एवढ्या एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करून आम्ही रागाला मोकळें रान करून देतों.

प्रयोगशाळेंत आपण एखादा प्रयोग करीत असावें, कांहीं तरी चूक झाल्यामुळें प्रयोग जमूं नये आणि रागानें आपण तो प्रयोग विसकटून टाकावा, हें कृत्य जितकें शहाणपणाचें होईल, तितकेंच पुष्कळ वेळां आपलें मुलांच्या बाबतींतलें वर्तन होत असतें. आपण सारीं मुलें एकाच मुशींत ओतून एकाच घडणीचीं बनवूं पाहत असतों. याचें कारण अगदीं उघड आहे. मुलांना मोकळें वाढूं देणें, त्यांची स्वतंत्र बुद्धि वाढीस लावणें यासाठीं आपणांस बरीच गैरसोय सहन करावी लागते. मनालाहि अनेक वेळां संयमाचे धडे द्यावे लागतात. नम्र वृत्ति स्वीकारून एखाद्या प्रयोगाप्रमाणें मुलांच्या कृतींचें अवलोकन करावें लागतें, आपल्या आकलनाच्या पलीकडच्या त्यांच्या कृति असल्या तर वाचनानें व विचारानें त्या समजावून घ्याव्या लागतात; आणि एक झाड न वाढतां आसपासचें तनकटच वाढत असेल तर तें निश्चयी वृत्तीनें पण दमादमानें काढून टाकावें

लागतें. शेतकरी किंवा बागवान आपल्या शेताची किंवा मळ्याची व त्यांतील पिकांची किंवा फळभाज्यांची निगा राखील व मशागत करील, तेवढ्या कष्टाळूपणानें, जाणतेपणानें व मुलांच्या योग्य विकासाकडेच लक्ष देऊन आई-बापांनाहि मुलें वाढवावीं लागतात. आणि योग्य मशागतीनंतर भरगच्च पीक किंवा फळें-भाज्या यांचें उत्पन्न आलें म्हणजे शेतकऱ्याला किंवा मळेवाल्याला जो आनंद होतो, तसाच मुलांचा योग्य विकास झाल्यानंतर आईबापांना होतो. क्वचित् प्रसंगीं अवर्षणानें किंवा अतिवर्षणानें पिकें बुडालीं, तरी आपण मशागतींत कांहीं चुकारपणा केला नाहीं याचें समाधान जसें शेतकऱ्याला मिळूं शकतें, त्याचप्रमाणें मुलें योग्य विकास झाल्यानंतरहि एखाद्या रोगाला बळी पडलीं किंवा अशाच आपत्तीला बळी पडलीं तरी आपण आपलें कार्य उत्तम प्रकारें केल्याचें समाधान आईबापांना मिळूं शकतें.

मूल जन्मल्यापासून त्याचा पूर्ण विकास होईपर्यंत त्याच्या शारीरिक व मानसिक वाढींत मध्यें अशा अवस्था येतात कीं, ज्या वेळीं आंतील वाढ झपाट्यानें होत असल्यामुळें बाह्य गोष्टींकडे मुलाचें आपोआपच संपूर्ण दुर्लक्ष होत असतें. शरिराच्या वाढीकडे पाहिलें, तर दुसऱ्या वर्षींच मुलाच्या इंद्रियांचा विकास होत असल्यामुळें, अधिकाधिक वस्तु हाताळण्याची, नित्य नव्या गोष्टी करून पाहण्याची त्याला आंतूनच अनावर इच्छा होत असते. मुलाच्या इंद्रियांचा, स्नायूंचा विकास व्हावा म्हणून निसर्गच या प्रेरणेच्या रूपानें त्याच्याकडून या कृति करवीत असतो. पण त्या पहिल्यावहिल्या कृति असल्यामुळें वारंवार चुकत राहणारच. भांडें उचलतांना मुलें तें पाडतात, कांचेची वस्तु फोडतात, असें आपण म्हणतों. पण नव्यानेंच भांडें उचलणाऱ्या मुलाची क्रिया एकदम पूर्ण होऊं न शकल्यामुळें भांडें त्याच्या हातांतून पडतें हें आम्हीं आयांनीं जाणून घेतलें पाहिजे. शारीरिक विकासाची जशी गोष्ट तशीच मानसिक विकासाचीहि असते. विकासाचा क्रम, त्यांचें कार्य कसें होतें, कशामुळें विकासकार्याला मदत होते, आणि कशामुळें तें कार्य खुंटतें याची माहिती आम्ही आयांनीं जास्त उत्सुकतेनें, जास्त आवडीनें करून घेतली पाहिजे. तरच आपल्या मुलांच्या विकासाला हातभार लावण्याचें श्रेय व समाधान आपणांस प्राप्त होईल.

शांत वृत्तीच्या, अभ्यासू सवयीच्या मुलावर जबरदस्ती केल्यानें त्याच्यांतून

नेतृत्वगुणांचा विकास करतां येणार नाहीं. आणि 'तूं मागेंमागेंच राहतोस, तुला कांहीं बाहेरचें येत नाहीं' अशा शब्दांनीं हिणविल्यानेंहि त्याचा पुढारी बनणार नाहीं. आंबा, चिंच, पेरू केळीं, हीं फळें आपापल्या परीनें चांगलीं असतात. पण चिंचेचा आंबा किंवा पेरूचें केळें करूं धजणारा जसा मूर्खच ठरेल, त्याप्रमाणें मुलांचे मुळांत कोणते गुण-दुर्गुण आहेत, कोणत्या प्रवृत्ति आहेत, याचें सूक्ष्म अवलोकन आईनें केलें पाहिजे. तरच प्रत्येक मुलाच्या गुणांचा तिला विकास करतां येईल आणि अवगुण कमींत कमी मर्यादेंत राखतां येतील. पण, 'मला माझ्या अंगणांत केळी पाहिजे होत्या, पण आलीं पेरूचीं झाडें' असें म्हणून त्या पेरूंचीं केळीं करीत बसण्याचा वेडेपणाचा अट्टाहास करण्यापेक्षां, आहेत त्यापेक्षां अधिक मोठे, अधिक गोड, कमी बियांचे असे पेरूच कसे वाढवितां येतील याची माहिती आईनें मिळविली पाहिजे.

शास्त्रज्ञाची विनम्र वृत्ति, अखंड जिज्ञासा आणि कष्टाळूपणा यांच्या साह्यानें आई जर मुलांच्या विकासाला मदत करील, तर विफलता किंवा असंतोष तिला कधींच अनुभविण्यास मिळणार नाहीं हें निश्चित.

### . २ .

नवविवाहित तरुणींना ज्याप्रमाणें स्वतःच्या आशाआकांक्षांविषयींचे, मुलांबाळांच्या काळजीविषयींचे व सांसारिक जीवनांतील नव्या नात्यांच्या संबंधांचे शेंकडों प्रश्न जाचीत असतात, त्याचप्रमाणें मध्यमवयस्क स्त्रियांना आपल्या वाढणाऱ्या किंवा वाढलेल्या मुलांविषयींचे प्रश्न चिंतातुर करीत असतात. मुलें लहान असतांना त्यांच्याविषयींच्या काळज्या बऱ्याचशा शारीरिक असतात. आणि मुलांच्या खस्ता खातांना जरी त्या वेळीं शारीरिक कष्ट बरेच झाले, तरी मनापुढें फारशीं प्रश्नचिन्हें उभीं राहत नाहींत. पण मुलें मोठीं झालीं, हायस्कूलच्या किंवा कॉलेजच्या मर्यादेंत आलीं कीं, आईपुढें प्रश्नचिन्हांचा डोंगरच उभा राहतो. "लहानपणीं बाळ किती व्यवस्थित होता म्हणून सांगूं! पुस्तकें, पाटी, कपडेलत्ते सगळें कसें ठाकठीक ठेवीत असे. मला कामांत मदत तरी किती करायचा! पण आतांशा काय झालें आहे देव जाणे. कुठें पुस्तकें, कुठें कपडे, कशाचा कशाला पत्ताच नाहीं. आणि कामें सांगितलीं तरी जणुं त्याच्या कानावर

शब्द जाऊन आदळतच नाहींत. ओरडून सांगितलें कीं तेवढ्यापुरतें काम करतो.—यांना चांगल्या संवयी तरी कशा लावायच्या कुणास ठाऊक! आणि सारखें बोलत राहिलें कीं म्हणतात, 'आई, तूं आजकाल रागावतेस. आम्ही मोठेपणीं सगळें नीटनेटकें करूं'—एवढ्या मोठ्या शिकणाऱ्या मुलांपुढें आपण बोलायचें तरी काय?"—अशा अर्थाचे वैतागाचे उद्‌गार अनेक मध्यमवयस्क आयांच्या तोंडून वारंवार ऐकूं येतात.

हें असें कां होतें? लहानपणीं स्वच्छतेच्या, व्यवस्थितपणाच्या सवयी ज्या मुलाला किंवा मुलीला लागल्या, तिच्यांत किंवा त्याच्यांत या वाढत्या वयांत असा विलक्षण फरक कां होतो? आईवडिलांचें किंवा वडीलधाऱ्या माणसांचें बोलणें त्यांच्या कानांतून आंतपर्यंत कां पोंचत नाहीं? एकाएकीं त्यांना हा बहिरेपणा कशामुळें येतो? कालपर्यंत आपल्या मनाप्रमाणें वागणारीं मुलें आज एकदम कांहींच कसें ऐकेनाशीं होतात?—प्रत्येक विचारी आईच्या मनासमोर ही प्रश्नमालिका खात्रीनें उभी राहत असते. आणि या प्रश्नांचीं समाधानकारक उत्तरें गवसलीं नाहींत कीं आई एका प्रकारच्या गोंधळाच्या, निराशेच्या वृत्तीनें व्यापली जात असते.

वयाच्या बारा-तेरा वर्षांनंतर मुलगा किंवा मुलगी वयांत येत असते. शारीरिक फरकांबरोबरच मानसिक फरकहि त्यांच्यामध्यें होत असतात. मुलींच्या बाबतींत तर शारीरिक फरक फारच स्पष्ट स्वरूपांत होत असल्यामुळें, तिच्यावर या फरकांचा अधिक परिणाम होत असतो. कालपर्यंत सतत धावणारी, पळणारी मुलगी या वयामध्यें होणाऱ्या अचानक फरकांमुळें बरीच गोंधळून जाते. आपल्या खेळण्याच्या स्वातंत्र्यावर हें एक नवें बंधन आलें आहे, आपल्या स्वच्छंद हिंडणाफिरणाऱ्या पायांमध्यें ही बेडी पडली आहे, अशा तऱ्हेची रागाची भावना तिच्या मनामध्यें निर्माण होते. अर्थात् मुलींच्या वृत्तीवर, शारीरिक सुदृढतेवर व मानसिक समंजसपणावर या रागाची उत्कटता बरीचशी अवलंबून असते. पूर्वीपासून शांत व सहनशील वृत्तीची जर मुलगी असेल तर ती या नव्या फरकानें चिडत नाहीं व आपला जीवनक्रम नीट जुळवून घेते. पण हूड व स्वच्छंद मुलीला मात्र हा फरक बराच जाणवतो आणि त्यामुळें उत्पन्न होणारी चीड कधीं कधीं तिच्या मनांत खोल घर करून राहते.

या नव्या फरकाचा नकळतपणें ती प्रतिकार करीत असते. आणि या प्रतिकाराचाच एक प्रकार म्हणून कोणाचीहि आज्ञा न ऐकणें, निदान तत्काळ न ऐकणें हें सुरु होतें. अर्थात् यांतील कांहींहि ती जाणूनबुजून करीत नसते. नैसर्गिक वाढीच्या क्रमांत ज्याप्रमाणें तिच्या शरिरांत फरक घडून येतात, त्याचप्रमाणें हा मानसिक प्रतिकार निसर्गच करवीत असतो. वडील माणसांच्या आज्ञेची अवहेलना करावी अशी मुलीची इच्छा नसते. पण आंत कांहीं तरी होत असतें, कांहीं तरी वाटत असतें. आणि त्या वाटण्यांत नकळत तिचें मन गुंगलें असल्यामुळें तिला कांहीं ऐकूं येत नाहीं.

बारातेरा वर्षांपासून सतरा-अठरा वर्षांपर्यंत मुलांमुलींची अशी विलक्षण वृत्ति बनून राहते. पांचसहा वर्षें सतत अशी वृत्ति सहसा राहत नाहीं. परंतु या काळांत केव्हां ना केव्हां मुलांच्या या वृत्तीचा धक्का आई-बापांना जाणवतो. पूर्वींच्या काळीं या वयांतील मुलगी सासरींच असे. त्यामुळें सासरच्या बांधील दिनक्रमांत व करारी नेमनियमांच्या चक्रांत तिच्या या नैसर्गिक आविष्काराला फारसा वावच मिळत नसे. पण आतां मुलींना पूर्वींच्या मानानें पुष्कळ स्वातंत्र्य प्राप्त झालें आहे. त्यांच्या व्यक्तिविकासालाहि आज जास्त अवसर मिळत आहे. आणि म्हणूनच विकासक्रमांत होणाऱ्या शारीरिक व मानसिक आविष्कारांचें रूप जास्त स्पष्ट स्वरूपांत आजच्या मुलांमुलींत पाहावयास सांपडतें. या वाढीच्या वयांत शरीरांत सतत फरक घडून येत असतात. आणि त्याचबरोबरच सबंध संज्ञासंस्थेवर (nervous system) त्यांचा परिणाम होत असतो. घटकेंत शांत तर घटकेंत अस्वस्थ. घटकेंत आनंदी तर घटकेंत म्लानवदन. घटकेंत उत्साही तर घटकेंत उत्साहशून्य—अशी पावसाळ्याच्या प्रारंभींच्या आकाशाप्रमाणें या वाढाळू मनांची स्थिति होत असते. कालपर्यंत चिरपरिचित असणारीं आपलीं मुलें आज एकाएकीं अपरिचित भासूं लागतात. पण मुलांच्या या काळांतील सतत बदलत्या वर्तनामुळें आपणांला कांहीं काळ गोंधळल्यासारखें झालें, तरी एक गोष्ट मातांनीं लक्षांत ठेवली पाहिजे. निसर्गक्रमानुसार मुलांमुलींच्या शरिरांत व मनांत, भावनांत, कल्पनांत, अपेक्षांत आंतूनच फरक होत असतो. या नव्या फरकाला किंवा विकासाच्या या स्वरूपाला जपण्यासाठीं निसर्ग मनाभोवतीं जणुं एक प्रकारची तटबंदीच निर्माण करीत असतो. या तटबंदीआड मुलांमुलींचें मन

असल्यामुळें आईवडिलांच्या आज्ञा चटकन् त्यांच्या कानांत शिरत नाहींत. शिरल्या तरी तत्काळ त्याप्रमाणें कृति हातून होत नाहीं. आणि आम्हां मातांना वाटतें, मुलें अवज्ञा करूं लागलीं, बेफिकीर झालीं.

मुलांचें हें वर्तन निसर्गक्रमानुसार होत असतें ही एक बाजू झाली. आणि मातांना या वर्तनाचा त्रास होत असतो ही दुसरी बाजू झाली. या दोन बाजूंची नीट जुळणी होणें अवश्य आहे हेंहि सर्वांना मान्य होईल. मग ही जुळणी कशी करायची ? प्रचंड वेगानें फिरणाऱ्या निसर्गक्रमाच्या चक्रांत सांपडलेल्या मुलांमुलींकडून या जुळणीची अपेक्षा जर आम्हीं केली, तर आमच्या हातीं कांहींच लागणार नाहीं. तेव्हां कोठल्याहि चक्रावर न फिरणाऱ्या अशा मातांनींच ही जुळणी साधण्याचा प्रयत्न करणें अवश्य आहे, हें ओघानेंच आलें. मग काय करायचें आम्हीं ? मुलांना कामें सांगणें बंद करायचें का ? त्यांच्यावर कोणतीच जबाबदारी टाकणें बंद करायचें का ? त्यांना एखाद्या आजारी माणसाप्रमाणें समजायचें काय ? मन मानेल तसें वागण्यास मोकळें सोडायचें काय ? असे नाना तऱ्हेचे प्रश्न मातांच्या डोळ्यांपुढें उभे राहतील. पण वर दिलेल्या चारहि प्रश्नांचीं उत्तरें 'नाहीं' अशींच द्यावीं लागतील. मुलांना आजारी समजावयाचें नाहीं, त्यांना मन मानेल तसें वागण्यास मोकळेंहि सोडायचें नाहीं. त्यांच्यावर जबाबदारी टाकण्याचें बंद करायचें नाहीं आणि कामें सांगण्याचेंहि बंद करायचें नाहीं. पण हें सारें करीत असतां मुलांमध्यें चालू असणाऱ्या मानसिक परिवर्तनाची सतत जाणीव मात्र ठेवली पाहिजे. आणि समंजसपणानें, सहृदयतेनें व प्रेमळपणानें मुलांशीं वागत राहिलें पाहिजे.

काम एकदा चुकलें, नव्हे, शंभरदा चुकलें तरी पुन्हा एकशें एकाव्या वेळीं शक्य तितक्या शांतपणें व प्रेमळपणानें करण्यास मुलांना सांगितलें पाहिजे. अतिशय कामांत गुंतलेल्या माणसाशीं किंवा उत्कट भावनेच्या चक्रांत फिरणाऱ्या माणसाशीं ज्या सहृदयतेनें आपण वागूं त्याच वृत्तीनें या वाढाळू मुलांमुलींशीं आपण वागलें पाहिजे. कारण निसर्गानें फार मोठीं कामें या वयांत मुलांमुलींच्या शरीरांवर टाकलेलीं असतात, आणि अज्ञात पण उत्कट भावनांच्या चक्रांत हीं मुलें नकळतपणें गरगरत असतात. आणि म्हणूनच या काळांत मुलांना कामावांचून ठेवणें योग्य नसतें. कारण मुलें स्वच्छंद वागूं लागलीं व कामावांचून राहिलीं तर

निसर्गाच्या आवेगांत कुठल्या कुठें तीं वाहत जातील आणि मग त्यांना ओढून किनाऱ्यावर आणणें अशक्य होऊन जाईल. विकासाच्या सागरांत वाढाळू मुलें फेकलीं गेलेलीं असतात. मधूनच प्रचंड लाटा उसळतात, मधूनच भोवरे निर्माण होतात, मध्येंच जोराची भरती येत असते आणि मध्येंच झपाट्याची ओहटीहि लागत असते. पण या सागरांतच राहून उत्तम प्रकारें पोहण्यास मुलांना शिकायचें असतें. सागराचें रुद्र स्वरूप पाहून जर आम्ही त्यांना किनाऱ्याशीं घट्ट बांधून ठेवूं लागलों, तर त्यांना सागरांत पोहण्याची कला कधींच साध्य होणार नाहीं आणि जन्मभर किनाऱ्याशीं घट्ट बांधून घेऊन अविकसित, निर्बंधमय असें आयुष्य त्यांना काढावें लागेल. किंवा दुसऱ्या टोकाला जाऊन आम्ही त्यांना स्वच्छंदपणें वाहूं दिलें, तर कोठल्या भोंवऱ्यांत तीं गडप होऊन जातील तें कळणार नाहीं. म्हणून किनाऱ्यावर उभें राहून दोरी बांधून त्यांना पोहण्यास शिकविलें पाहिजे आणि हें पक्कें होतांच सागरांत कुशलतेनें पोहण्यास शिकविलें पाहिजे.

म्हणून वाढाळू (adolescent) मुलांमुलींच्या मनांतील प्रचंड पण अज्ञात अशा लाटांचें आंदोलन लक्षांत ठेवून आपण त्यांच्याशीं प्रेमानें वागलों तरच आपलें म्हणणें त्यांच्या कानीं पडेल, मनांत शिरेल व कृतींत उतरेल. रागानें केलेली आज्ञा तर त्यांच्या कानांत शिरणारच नाहीं. रागाचा शब्द उच्चारला जातांच निसर्ग आपली तटबंदी एकदम पक्की करून टाकतो. मुलांमुलींच्या मनांत अज्ञात, अस्पष्ट अशा भावनांचें, विचारांचें व अपेक्षांचें तांडव चालू असतें. त्यामुळे तींहि गोंधळलेलीं असतात. आपणांस असें कां वाटतें, असें कां होतें याची त्यांना कल्पना नसते आणि नकळत, कसल्या तरी अदृश्य ओढीनें कृति होत असतात. त्यामुळें तीं थोडीं भेदरलेलीं असतात. अशी गोंधळलेली, भेदरलेली, अनिर्वाच्य अशी त्यांची अवस्था असते. म्हणून या अवस्थेंत त्यांना मार्गदर्शन करणारी, त्यांची अवस्था समजून घेऊन त्यांच्याशीं प्रेमळपणानें वागणारी अशी व्यक्ति त्यांना हवी असते. नैसर्गिक विकासाच्या हेलावणाऱ्या सागरांत त्यांना प्रेमाचा व जाणतेपणाचा आधार पाहिजे असतो. त्यांच्या मतानें घेऊन प्रेमळपणानें कोणी त्यांना काम सांगितलें तर ते आनंदानें करतात. पण रागाच्या, चिडीच्या, तिरस्काराच्या एखाद्या शब्दानेंहि लाजाळूच्या झाडाप्रमाणें त्यांचीं पानें चिमतात. आपलें सारें व्यक्तित्व नकळतपणें आपल्या पोटाशीं घेऊन त्याच्याभोवतीं जणुं

एखादा पक्का कोशच ते बांधतात. आणि आम्ही त्यांना रागाच्या शब्दांनीं अधिकाधिक वेगानें आंतआंत, कोशांत शिरण्यास लावतों.

वाढाळू मुलांमुलींच्या मानसिक परिवर्तनाची आम्हीं मातांनीं जर जास्त सहृदयतेनें जाणीव करून घेतली तर त्यांची-आपली जुळणी करण्यासाठीं पहिलें पाऊल टाकणें आपणांस सुलभ जाईल.

पण प्रत्यक्ष जीवनांत जेव्हां वाढणाऱ्या मुलांच्या वृत्तींतील व वर्तनांतील नित्य नवे प्रश्न मातांपुढें झपाट्यानें उभे राहतात, तेव्हां नुसत्या तात्त्विक पार्श्वभूमीनें काम भागत नाहीं. मुलांची वाढ होत असते, त्यांच्या मनांत नाना परिवर्तनें होत असतात, एका अज्ञात ओढीनें त्यांच्या कृति होत असतात, आणि या अवस्थेंत त्यांची ही स्थिति सहृदयतेनें समजून घेऊन त्यांच्याशीं प्रेमळपणानें वागणारीं माणसें, असलीं तरच या वर्धमान मुलांचें तारू तारुण्याच्या खवळलेल्या सागरांतून नीटपणें वल्हविणें शक्य होतें. हें सारें माहीत असूनहि प्रत्यक्ष जीवनांत हे प्रश्न निर्माण झाले कीं माता गोंधळून जातात. कारण त्यांच्या मुलांमुलींविषयीं कांहीं विशिष्ट अपेक्षा असतात. कांहीं अपेक्षा त्यांना माहीत असतात. पण कांहीं तर त्यांना स्वतःलाहि अज्ञात असतात. म्हणून मातांच्या या अज्ञात पण उत्कट अपेक्षा आणि मुलांचें एका अज्ञात ओढीनें, बेदरकारपणें वाहत जाणारें जीवन यांची जुळणी कशी करतां येईल, हा खरोखर प्रश्न असतो.

मुलगा किंवा मुलगी बुद्धीनें चांगली आहे, निरनिराळ्या खेळांत प्रवीणता मिळविण्यासारखी आहे, गायन किंवा वादन चांगलें करू शकेल एवढी तिच्यांत पात्रता आहे, असेच आणखी इतर गुण तिच्यांत आहेत. आईला साहजिकच वाटतें, कीं मुलीनें या गुणांचा विकास करून नांव मिळवावें आणि अमक्या गुणी मुलाची किंवा मुलीची आई म्हणून लोकांनीं आपला नामनिर्देश करावा. मुलामुलींचा त्या त्या विद्येंत किंवा कलेंत विकास व्हावा म्हणून आई शिकविण्याची व्यवस्था करते. दररोज सकाळसंध्याकाळ तो तो अभ्यास केला किंवा नाहीं याची ती चौकशी करते आणि केला नसल्यास कटाक्षानें तो करण्यास लावते. आईला वाटत असतें, मुलांच्या विकासाकडे मी केवढें लक्ष पुरवीत आहें!—आणि अचानक एके दिवशीं तिला आढळून येतें कीं, त्या विद्येचा किंवा कलेचा

अभ्यास करण्याचा मुलगा कंटाळा करतो किंवा सरळसरळ नकार देतो. आई आश्चर्यानें थक्क होऊन हा काय प्रकार झाला याचा विचार करूं लागते. मुलामुली-विषयींचें आपलें स्वप्न भंगलें या कल्पनेनें ती निराश होऊन जाते. रागानें मुलांना बोलूं लागते आणि आपला अभ्यास करण्याची मुलांना सक्ती करूं लागते. आई-मुलांचा विरोध सुरू होतो. जों जों आई रागानें बोलूं लागते, सक्ती करूं लागते, तों तों हा विरोध वाढतच जातो. आणि इतकें झाल्यावरहि जर आईनें सर्व परिस्थितीचा शांतपणें विचार करून मार्ग स्वीकारला नाहीं तर आई-मुलांतील या विरोधाचें तेढींत पर्यवसान होण्याचा संभव असतो.

अशा प्रसंगीं आईनें काय करणें योग्य होईल? मुलांच्या अंगांत विद्या व कला यांचीं बीजें वसत असतांना, त्यांचा विकास करण्यासाठीं सांगण्याचें सोडून द्याव-याचें काय? मग हींच मुलें किंवा इतर लोक म्हणतील कीं, आईनें मुलांच्या गुणांच्या विकासाकडे लक्ष पुरविलें असतें, तर त्या त्या विद्येंतील किंवा कलेंतील गुणवान् लोकांमध्यें या मुलांची गणती झाली असती. मुलांच्या गुणविकासाकडे आग्रहानें, कटाक्षानें लक्ष पुरवावें तर मुलेंच त्याच्या आड येतात; आणि सारें नशिबावर सोडून द्यावें तर आईनें लक्ष पुरविलें नाहीं म्हणून लोकांकडून आणि जवळच्याहि माणसांकडून ठपका येतो, अशी गोंधळाची अवस्था बिचाऱ्या आईची होते. त्यांतल्या त्यांत आई सुशिक्षित असली कीं, तिच्याकडून समाजाच्या, मुलांच्या व घरांतील इतरहि माणसांच्या विशेष अपेक्षा असतात. म्हणूनच सुशिक्षित मातांची स्थिति या बाबतींत अनुकंपनीय होऊन जाते. परंतु सहृदयता व जाणीव हीं दोन्ही जर त्यांनीं आपल्या मनांत सतत जागृत ठेवलीं, तर या अपेक्षांच्या परीक्षेंतून उत्तीर्ण होणें त्यांना खास कठिण जाणार नाहीं.

बरेच दिवस आपल्या अभ्यासाच्या किंवा आवडीच्या विषयामागें लागलेल्या मुलानें जर कंटाळा दाखविला, तर कांहीं काळ त्याला सुट्टी घेऊं द्यावी. कितीहि चांगली किंवा आवडती गोष्ट असली, तरी तिचाहि कधीं कधीं कंटाळा येतोच हें विसरतां कामा नये. पण मुलानें अशी सुट्टी घेतली असतां, नैसर्गिक विकासाच्या आवेगांत उत्पन्न होणारा हा कंटाळा कायमचें ठाण मांडून बसूं नये, इकडे मात्र आईनें लक्ष पुरविलें पाहिजे. आपला विषय किंवा आपली कला सोडून कांहीं काळ मुलगा दुसऱ्या विषयांत काळ घालवूं लागला तरी त्याच्या वृत्तीकडे सतत

लक्ष पुरविलें पाहिजे. कंटाळ्याचा भर ओसरून गेल्यावर त्या त्या विषयाबाबत किंवा कलेबाबत सहजपणें इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टींत उल्लेख करावा. त्या विषयांतील किंवा कलेंतील व्यासंगी किंवा ख्यातनाम माणसाबद्दल ओघाओघानें सांगत राहावें. त्या विषयांतील किंवा कलेंतील गोडी पुन्हा उसळून वर यावी एवढ्याच बेताचे हे प्रयत्न असावे. पण ते उघड असूं नयेत. किती दिवसांपासून सोडला आहेस. ती अमक्याची मुलगी पहा दररोज मास्तरपाशीं शिकते आणि पहिल्या परीक्षेंत ती पाससुद्धां झाली. तूं मात्र बसली आहेस तशीच.' अशा तऱ्हेचे उद्‌गार चुकूनहि आईनें काढतां कामा नये. मध्यंतरीं स्थगित झालेली गोडी पुन्हा जागविण्यासाठीं मुलामुलींचा अधिक्षेप न करतां किंवा त्यांची स्पर्धा-वृत्ति न चाळवितां, त्या विषयांतील किंवा कलेंतील आनंद बोलण्यांत सहज व्यक्त झाला पाहिजे. आणि हे उल्लेख सतत होतां कामा नयेत.

मुलामुलींमध्यें जर खरोखरच त्या विषयाची किंवा कलेची विशेष गोडी असेल तर ती अशा वागण्यानें उसळून आल्याशिवाय राहणार नाहीं. आणि याउपरहि ती वर उसळून आली नाहीं, तर आपल्या मुलांत किंवा मुलींत खरोखर ती गोडी वसतच नाहीं हें कटु सत्य पचविण्यास आम्हीं मातांनीं शिकलें पाहिजे. कारण मुलांमध्यें एकेका गुणाचा उद्रेक झालेला पाहिला कीं, आम्हां मातांना वाटूं लागतें कीं, 'आतां केवढी गुणी निघणार आहेत माझीं मुलें!' सुतानें स्वर्गाला जाण्याचा मार्ग स्वीकारून आम्ही मुलांच्या भविष्याविषयींचीं केवढीं मनोरम स्वप्नें रंगवीत असतों. आणि आमच्या या स्वप्नांचा भंग मुलांनीं केला कीं, आम्ही निराशेनें आंधळ्या होऊन मुलांना वाटेस तसें बोलूं लागतों. अशी वस्तुस्थिति असल्यामुळेंच हें वर उल्लेखिलेलें कटु सत्य पचविण्याची आम्हांला सतत तयारी केली पाहिजे. कारण असें केलें तर निदान मुलें व आम्ही यांच्यामधील प्रेमळपणाचा संबंध तरी कायम राहतो आणि मुलामध्यें केव्हांहि एखाद्या गुणाचा अंकुर फुटूं लागलेला दिसला कीं, त्याची वाढ करणें या प्रेमळपणाच्या जोरावर आणि या परस्परजाणिवेच्या भरंवशावरच शक्य होतें. याच्या उलट मुलामध्यें अमुक गुण किंवा कला वाढीला लागलीच पाहिजे; कंटाळा, तात्पुरती नावड हीं सर्व धोक्यानें बाजूला सारून त्या त्या अभ्यासाची त्याला सक्ती केलीच पाहिजे, असा जर दृष्टिकोन आईनें ठेवला तर तो गुण किंवा ती कला तर वाढीला

लागतच नाहीं, परंतु मुलांच्या मनांत आईविषयीं इतकी कांहीं खोल अढी निर्माण होते कीं, पुढें केव्हांहि मुलाच्या गुणांचें संवर्धन करण्याचा प्रसंग आला, तर या अढीचाच सर्वांत मोठा अडथळा निर्माण होतो.

हें मुलांमध्यें वसणाऱ्या गुणांच्या विकासाबद्दल झालें. मुलांच्या नेहमींच्या वर्तनाबद्दल किंवा शिष्टाचारानें वागण्याबद्दलहि आईला या वयांत वारंवार बोलण्याचा, रागावण्याचा प्रसंग येतो. बारातेरा वर्षांपूर्वीं जीं मुलें व्यवस्थित, नीटनेटकीं, शांत, मनमोकळीं, आज्ञाधारक, विनयशील, स्वावलंबी किंवा परोपकारी असतात त्यांच्यांतच पुष्कळदां बारा ते अठरा या वाढीच्या वयांत अव्यवस्थितपणा, धडपड, कुढेपणा, उद्धटपणा, अहंकार, परावलंबन व बेफिकीरपणा इत्यादि अगदीं विरुद्ध गुणांचा आविष्कार दिसून येतो. हा असा आविष्कार पाहतांच मुलांत पूर्ववत् गुण आणण्यासाठीं आई सतत रागावते व कांहीं तरी भयंकर होत आहे अशा तऱ्हेचें वातावरण न कळत निर्माण करते. ती जितकी अधिकाधिक रागावते, तितका तितका मुलांच्या या दुर्गुणांचा आविष्कार अधिक उत्कट होत जातो व दीर्घ कालपर्यंत चालू राहतो. मुलांमधील या नव्या दुर्गुणांच्या आविष्कारानें आईनें दुःखी होणें हें साहजिक आहे. हे दुर्गुण काढून टाकण्याकरितां आपण प्रयत्न केला पाहिजे, असें तिला वाटणें हेंहि साहजिक असतें. पण हा प्रयत्न कसा करावयाचा हें मात्र तिनें समजून घेतलें पाहिजे. आणि सर्वांत अगोदर एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, हे जे नवीन अनिष्ट आविष्कार दिसूं लागले आहेत ते दिसण्यांत अनिष्ट असले तरी वाढीच्या वयांत जीं शारीरिक व मानसिक परिवर्तनें मुलांमध्यें होत असतात, त्यांचीच ही प्रतिक्रिया आहे. मुलांचें जें व्यक्तित्व या वयांत विकास पावत असतें त्यानें आपल्याभोंवतीं हें कांट्यांचें कुंपण घातलेलें आहे. हे कांटे आम्हांला बोचत राहिले, तरी या कांट्यांमागें एक नवें व्यक्तित्व विकासत आहे. तें चांगल्या तऱ्हेनें विकसण्यासाठीं निसर्गानेंच हें काटेरी कुंपण निर्माण केलें आहे आणि व्यक्तित्वविकास पूर्ण झाला कीं हें कुंपण हळूहळू नाहींसें होऊन जाणार आहे, या गोष्टींची सतत जाणीव जर मातांनीं आपल्या मनांत जागवीत ठेवली, तर त्यांच्या मनाला अकारण खेद होणार नाहीं. आणि याच जाणिवेच्या साह्यानें या कुंपणामागील आपल्या मुलांशीं कसें वागायचें हें आपणांला जास्त स्पष्टपणानें समजूं लागेल.

या ठिकाणीं अर्थात् एक गोष्ट विसरतां उपयोगी नाहीं. मुलांमधील हे नवीन दुर्गुण जरी निसर्गक्रमानुसारच निर्माण झाले असले, तरी ते मर्यादेंत राहतील व अधिक उग्र होणार नाहींत या गोष्टींकडे आईनें लक्ष दिलें पाहिजे. मुलाला कांजिण्या किंवा गोवर झाल्यावर 'व्हायचींच हीं दुखणीं' असें म्हणून आई जर मुलाच्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करूं लागली तर या आजारांचें न्यूमोनियांत रूपांतर होण्यास वेळ लागणार नाहीं. हीं दुखणीं होणें नैसर्गिक असलें तरी तीं विकोपास जाऊं नयेत यासाठीं जसा प्रयत्न करावयाचा असतो व रोगाचे जितके दिवस ठरलेले असतात तितके दिवस शांतपणें पण लक्षपूर्वक वाट बघायची असते, त्याचप्रमाणें या दुर्गुणांच्या आविष्कारांचें आहे. मुलांचे हे नवे निर्माण झालेले दोष जितके मर्यादेंत ठेवतां येतील तेवढा प्रयत्न करणें हें आईचें मुख्य काम असतें. त्या दोषांबद्दल वारंवार जर आई मुलाला बोलत राहिली, टोचीत राहिली, तर कांजिण्यांच्या फोडांना टोचल्यानें जसें दुखणें चिघळेल, तसेंच हेंहि मानसिक दुखणें चिघळेल. या वाढीच्या काळांत मुलांना जर मनासारखें काम भरपूर देत राहिलें, तर त्या कामांत गुंतल्यामुळें त्यांचे दोषहि फारसे जोरावणार नाहींत. मुलें किंवा मुली या वयांत जितक्या रिकाम्या राहतील, तितका त्यांच्या दोषांचा जोर होईल. म्हणून होतां होईल तों उपयुक्त कामांत किंवा तें न रुचलें तर थोड्याबहुत अनुपयुक्त व्यवसायांत व खेळांत मुलांचें मन गुंतविण्याचा आईनें प्रयत्न करावा. आवडत्या व्यवसायांत गुंतलेलीं मुलें साहजिकच आनंदांत राहतात. परंतु तासन् तास कादंबऱ्या वाचीत राहणें किंवा वाटेल त्या चित्रपटास सारखें जात राहणें हें मात्र जितकें कमी करतां येईल तितकें करावें. शिवण, भरतकाम, विणकाम, गायन, वादन, खेळ, अभ्यास इत्यादींपैकीं व्यवसायांत मुलांना गुंतविणें आईला जेवढें शक्य होईल, तेवढया प्रमाणांत मुलांना बोलण्याचा प्रसंग तिच्यावर कमी येईल.

वाढीला लागलेल्या मुलांमुलींच्या मनःस्थितीचें हें निदान जर आया लक्षांत ठेवतील, तर मुलांमुलींच्या या वयांतील दोषांनीं त्या घाबरून जाणार नाहींत. आणि मुलांच्या या विकासकार्याला हातभार लावण्याचें श्रेयहि त्यांना मिळेल. सारें माहीत असूनहि रागीट किंवा उतावीळ स्वभावामुळें आई मुलांना कधींकधीं टाकून बोलेल हें अगदीं सहज शक्य आहे. परंतु हें वरील निदान जर तिच्या

मनांत ठसलें असेल, तर राग शांत होतांच ती मुलांशीं प्रेमळपणानें वागेल व रागामुळें मायलेकरांत निर्माण झालेलें अंतर एका क्षणांत नाहींसें करून टाकील. हाच आईचा प्रेमळपणा मुलांना सगळ्या संकटांत उपकारक होईल. जाणत्या प्रेमळ आईला कोणताहि प्रश्न कठीण नाहीं.

माता या नात्यानें स्त्रीच्या जीवनसाफल्याचा प्रारंभ पहिल्या मुलाच्या जन्मापासून होतो हें खरें. परंतु मुलांचें बालपण, वाढतें वय आणि अखेर पूर्ण विकसित असें वय या सर्व अवस्थांतून मूल जात असतांना मातेच्या त्याच्याविषयींच्या अपेक्षा आणि तो त्या अपेक्षांची करीत असलेली पूर्तता यांवरच तिच्या माता या नात्यानें खऱ्याखुऱ्या जीवनसाफल्याचा आनंद अवलंबून असतो. मूल गर्भावस्थेंत असल्यापासूनच मातेच्या मातृत्वभावनासागरावर लहरी उठूं लागतात. आणि मुलाच्या जन्माबरोबर या सागराला पहिल्यानें पौर्णिमेच्या रात्रीची भरती येते. मातृत्वसाफल्याचा हा आनंद मूल लहान असतांना अविभाज्य असतो. तेथें अपेक्षाभंगहि उद्भवत नाहीं आणि अपेक्षा आणि अपेक्षापूर्तीचाहि प्रश्न उत्पन्न होत नाहीं. आई आणि बालक यांची अविभाज्य अशी युतीच त्या वेळीं असते.

मूल बोलूंचालूं लागलें कीं, प्रथम आईच्या प्रभावक्षेत्रांतून तें थोडथोडें बाहेर पडूं लागतें. परंतु मूल चालण्या-धावण्याच्या नित्य नव्या कौतुकास्पद क्रिया करीत असल्यामुळें आईला तें दूर जाणें सुखकरच वाटत असतें. मूल शाळेंत जाऊं लागतें आणि तें दूर जात असलें, तरी मूल शिक्षणासंबंधीं आईच्या अपेक्षा पुऱ्या करीत असल्यामुळें आईची अपेक्षापूर्ति होतच राहते. पुढें मुलांमुलींना मित्रमैत्रिणी येतात; दिवसाच्या कांठीं फारच थोडा वेळ मूल आईच्या जवळ असतें. परंतु मुलाच्या शैक्षणिक विकासाकडे लक्ष देऊन आई मुलाच्या या दुरावण्याकडे दुर्लक्ष करते. पण याच काळामध्यें मुलांमध्यें व आईमध्यें, नव्या व जुन्या पिढीमध्यें खटक्याचे प्रसंग निर्माण होतात. आणि येथूनच आईच्या अपेक्षाभंगाला प्रारंभ होतो. ‘आजवर मुलगा किंवा मुलगी हीं माझीं होतीं; माझ्या इच्छेला, माझ्या आवडीला तीं मान देत होतीं. आतां माझ्या इच्छेची, आवडीची, अपेक्षांची त्यांना पर्वा वाटेनाशी झाली आहे. आम्हीं रात्रीचा दिवस करून यांच्या खस्ता खाव्या, आपल्या हौशी यांच्या सुखाखातर बाजूला साराव्या आणि मोठें झाल्यानंतर यांनीं मात्र आमच्या हौशींची, आमच्या त्यांच्याविषयींच्या अपेक्षांची

पर्वाहि करूं नये! पूर्वींचीं मुलें आईबापांच्या आज्ञेंत असत. आईबापांना सुख देण्यासाठीं झटत. पण आजकाल मुलांना आईबाप म्हणजे कोण्या झाडाचा पाला! मुलांच्या कष्टांपायीं आम्हीं आपलें तारुण्यहि गमवावें आणि प्रौढ वयांतहि आम्हांला मुलांकडून सुख मिळूं नये...'—अशा तऱ्हेचे उद्‌गार किती तरी प्रौढ मातांकडून ऐकूं येतात.

आपल्या कल्पनेप्रमाणें, अपेक्षेप्रमाणें मुलें न वागलीं तर आईला खेद होणें हें साहजिक आहे. मोठेपणीं मुलांनीं आईच्या सुखदुःखांकडे लक्ष पुरविलें नाहीं तर आईला दुःख होणें हेंहि अतिशय स्वाभाविक आहे. पण मुलांच्या विकासाकडे, त्यांच्या प्रवृत्तींकडे व त्यांच्या कृतींकडे एका वेगळ्या दृष्टीनें जर आम्ही माता पाहावयास शिकलों तर खेद व दुःख जरी पूर्णपणें टाळतां आलें नाहीं, तरी एक जाणतें समाधान मात्र आपल्या पदरीं पडूं शकेल अशी माझी खात्री आहे. ही वेगळी दृष्टि कोणती? मूल तान्हें असतांना आपण जेथें त्याला ठेवूं तेथेंच तें राहत होतें. जें त्याला खाऊंपिऊं घालूं तेंच तें खातपीत होतें. तें संपूर्णपणें आपल्यावर अवलंबून होतें. मुलाच्या या संपूर्ण अवलंबनाचा आपणांस कधींकधीं त्रास वाटत होता. परंतु सामान्यपणें त्यांतून एक प्रकारच्या अननुभूत आनंदाची प्रतीतीहि आपणांस होत होती. हळूहळू मुलाचें हें अवलंबन कमीकमी होत चाललें. मुलाचें स्वतंत्र जीवन विकसूं लागलें. तरीहि सामान्यतः तें आपणांवरच अवलंबून असे. प्रत्येक गोष्टींत मुलानें आपणांस विचारावें व आपल्या सल्ल्याच्या बाहेर त्यानें जाऊं नये असें आपणांस वाटत होतें. आपली मुलाकडे बघण्याची दृष्टि नुसती प्रेमळ मातेची होती.

पण मूल हें मूलच कसें राहणार? आपलाच तरुण मुलगा किंवा मुलगी हीं नुसतीं माझीं अपत्यें नाहींत, तर या स्वतंत्र व्यक्ति आहेत हें ओळखण्यास आम्हीं शिकलें पाहिजे. आपलीं तरुण विकसित मुलें या स्वतंत्र व्यक्ति आहेत. त्यांना स्वतःच्याच अशा आवडीनावडी व आशाआकांक्षा आहेत. कधींकधीं त्या आपल्या आवडीनावडीशीं व आशाआकांक्षांशीं संवादी राहतील तर कधींकधीं विरोधीहि बनतील. स्वतंत्र व्यक्ति म्हटल्यानंतर त्या व्यक्तीच्या विचारांचें किंवा भावनांचें आपणाशीं संवादीत्व किंवा विसंवादीत्व हीं गृहीतच धरलीं पाहिजेत. परंतु त्याचा परिणाम प्रेमावर होण्याचें कांहीं कारण नाहीं. मुलें मोठीं झाल्या-

वरहि आपल्या आकांक्षांप्रमाणें वागलीं, तर आईला जास्त आनंद व्हावा हें साहजिक आहे. पण मुलें आपल्या आकांक्षांविरुद्ध वागलीं, तरी जोंपर्यंत तीं स्वतःच्या विशिष्ट आकांक्षांनुसार वागत आहेत, तोंपर्यंत मुलांच्या त्या वेगळ्या जीवनक्रमाबद्दल आईला खेद किंवा दुःख वाटण्याचें वस्तुतः कांहीं कारण राहूं नये.

मुलगा डॉक्टर व्हावा, एंजिनिअर व्हावा, मोठा वैज्ञानिक व्हावा किंवा सरकारी अधिकारी व्हावा, कलावंत व्हावा, अशांसारख्या अपेक्षा आईच्या असतात. परंतु मुलाचें स्वतंत्र व्यक्तित्व त्याला वेगळ्या दिशेनें नेत असतें. आईला वाटतें, मुलानें आपल्या अपेक्षेचा भंग केला. अमक्या अमक्याची आई असें मोठ्या अभिमानानें म्हणवून घेण्याची संधि तिला मिळत नसल्यामुळें ती खट्टू होते. पण मूल हें माझ्या अपेक्षांच्या पूर्तीचें साधन नव्हे, ती एक स्वतंत्र व्यक्ति आहे, या स्वतंत्र व्यक्तीला माझ्या अपेक्षापूर्तीचें साधन बनविण्यांत मी त्या व्यक्तीचा भयंकर अपमान करीत आहें, ही जाणीव जर आईला होईल, तर अपेक्षाभंगाचें दुःखहि तिच्या वांट्यास येणार नाहीं आणि या नव्या जाणिवेच्या साह्यानें आपल्या मुलाच्या जीवनाचें हृद्गत ती जास्त आत्मीयतेनें समजूं शकेल. मातेचें जीवन-साफल्य या प्रेमाच्या जाणिवेंतच आहे; या प्रेमळ जाणिवेंतून निर्माण होणाऱ्या अमर्याद क्षमाशीलतेंत आहे.

ही जाणीव निर्माण होण्यापूर्वीं आई म्हणूं शकेल कीं, मुलांच्या कष्टांपायीं आम्हीं आपलें तारुण्य गमावलें आणि आतां प्रौढ वयांतहि त्यांच्याकडून सुखाची अपेक्षा नाहीं. ही जाणीव होण्यापूर्वीं आई म्हणेल कीं, पूर्वींचीं मुलें आईबापांच्या कशीं आज्ञेंत असत. आईबाप सांगतील तशीं वागत. पण ही जाणीव झाल्यावर आईच्या लक्षांत येईल कीं, मुलांसाठीं तारुण्य घालविलें तें मुलांवर उपकार करण्यासाठीं नव्हे. आंतील मातृत्वाची ओढ आम्हांला त्यांचे कष्ट आनंदानें उपसण्यास भाग पाडी. मुलांचे कष्ट काढतांना आम्हांला जो एक वेगळाच आनंद होत असे, त्या आनंदामुळेंच आम्हीं हे कष्ट सोसले. या कष्टांमुळें मुलांवर उपकारांचें ओझें करून ठेवून मोठेपणीं एखाद्या खाष्ट सावकाराप्रमाणें त्या उपकारांची फेड करून घेण्यासाठीं नव्हे. ही नवी जाणीव झाल्यावर आईला हें कळून येईल कीं आईबापांच्या संपूर्ण आज्ञेंत वागणारीं मोठीं मुलें हीं मुळीं वाढलेलींच नाहींत. या स्वतंत्र विकसित व्यक्ति झाल्याच नाहींत. आईबापांच्या

धाकामुळें किंवा अवास्तव लाडांमुळें खुरटलेलीं अशीं हीं मुलें असतात. अशा मुलांची मी आई आहें हें म्हणणें अभिमानाचें नसून खेदकारक आहे. माझ्यांत आणि माझ्या मुलांत एका पिढीचें अंतर आहे, तेव्हां त्याचे-माझे विचार, भावना, मूल्यें यांत फरक असणें हें स्वाभाविक आहे व योग्यहि आहे. त्याचे विचार, त्याच्या भावना, त्याचीं मूल्यें हीं जर मीं मातेच्या प्रेमळपणानें जाणून घेण्याचा सतत प्रयत्न केला, तर त्याच्या-माझ्यामधील अंतर कमी-कमी होत जाईल आणि जेवढें राहील, तेंहि दूरपणाचें अंतर राहणार नाहीं, वेगळेपणाचें राहील.

गेल्या कांहीं वर्षांत आपल्या देशांत व सबंध जगांतच विचारांचीं, भावनांचीं व मूल्यांचीं जीं वेगवान् संक्रमणें चालू आहेत त्यांमुळें नव्याजुन्या पिढींतील अंतर व दूरपणा फारच वाढलेला दिसत आहे. तरुण पिढीचें सर्व बरोबरच आहे किंवा सर्व चुकीचें आहे असें कोणीच म्हणणार नाहीं. पण जगांतील वाढत्या वेगामुळें ही तरुण पिढी संभ्रमित झालेली आहे. घरांघरांत जुन्यानव्या पिढींतील कलह दररोज निर्माण होत आहेत आणि कटुता वाढवीत आहेत. नवीन पिढीची दृष्टि ही केव्हांहि पुढेंपुढेंच राहणार. तारुण्यामुळें तिच्यांत अपरिपक्वताहि पुष्कळ असणारच. पण या तरुण पिढीला या गोंधळलेल्या स्थितींत प्रेमळ, क्षमाशील व जाणत्या दृष्टीचें मार्गदर्शन पाहिजे आहे. या नवीन पिढींतील मुलें हीं कोणत्या ना कोणत्या आईचींच मुलें आहेत. या मुलांना हवा असलेला प्रेमळपणा, क्षमाशीलता व जाणीव हीं आम्ही मातांनींच अंगीं बाणवलीं पाहिजेत. ही नवी जाणीव अंगीं बाणविण्याची क्रिया अर्थात् दीर्घ काळाची आहे. पण तिच्यासाठीं जर आज प्रयत्न झाला, तर आपल्या मुलांना त्यांच्या संभ्रमित अवस्थेंत ती मार्गदर्शक होऊं शकेल आणि आपणांसहि या विलक्षण बदलत्या काळांतील कठिण प्रसंगांत एकप्रकारचें शांत, सखोल व जाणतें समाधान प्राप्त करून देऊं शकेल यांत मला तरी तिळमात्र शंका नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि ........ ..........
क्रमांक ........................ नों. दि. ..............

# नऊ वर्षांनंतर

नऊ वर्षांपूर्वी नागपुरच्या 'भवितव्य' साप्ताहिकांतून 'गृहजीवनांतून विशाल जीवनाकडे' या शीर्षकानें ही लेखमाला मीं सुरू केली होती. १९४९ सालीं जेव्हां ही लेखमाला लिहिण्यास मीं प्रारंभ केला, तेव्हां हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यास जवळजवळ दोन वर्षें होत आलीं होतीं. दीर्घकाळ अपेक्षिलेलें स्वातंत्र्य प्राप्त होतांच आतां जीवनाच्या सगळ्या क्षेत्रांत झपाट्यानें प्रगति करतां येईल, असा गोड आशावाद त्यावेळीं मनांत उसळत होता. तरीहि स्वातंत्र्यानंतरच्या त्या पहिल्या दोन वर्षांत प्रगतीचीं पावलें अतिशय मंद गतीनें पडत आहेत ही उणीव बोचल्याशिवाय राहत नव्हती. म्हणून समाजाचा अतिशय महत्त्वाचा घटक जें कुटुंब त्याच्यामध्यें जर प्रगतीच्या जाणिवेनें परिवर्तन करतां आलें, तरच समाजाची प्रगति झपाट्यानें व स्थिर स्वरूपाची होऊं शकेल, असें मला इतरांबरोबर तीव्रतेनें वाटूं लागलें.

आज आठ वर्षांनंतर तो पहिला आशावाद बराच क्षीण झाला आहे. पण कुटुंबांमध्यें परिवर्तन झालें पाहिजे ही त्यावेळची जाणीव आजहि तेवढीच तीव्र आहे. गेल्या आठ वर्षांत कुटुंबाचें कुटुंबत्व व गृहिणीचें गृहिणीत्व अधिक शिथिल होत चाललें आहे. या गोष्टीची कटु जाणीव झाली आहे. काल्पनिक प्रगतीच्या मागें धांवतां धांवतां प्रगतीचें व मूल्याचें अधिष्ठान जें कुटुंब तें खिळखिळें होत आहे याचा विसर पडत चालला आहे कीं काय असें वाटूं लागलें

आहे. स्त्रीच्या व विशेषतः शिक्षित स्त्रीच्या जीवनांत ज्या अडचणी आठदहा वर्षांपूर्वीं कांहींशा कमी प्रमाणांत उभ्या राहत होत्या, त्यांचें प्रमाण आतां पुष्कळच वाढल्यासारखें दिसत आहे. म्हणून माझ्या मर्यादित अनुभवाच्या दृष्टिकोणांतून या अडचणी निवारण्याचे किंवा त्या कमी त्रासदायक बनविण्याचे जे उपाय मी तेव्हां सुचविले होते, ते आतांहि उपयोगीं पडतील असें मला वाटतें.

गेल्या पन्नास वर्षांत स्त्रीशिक्षण बरेंच वाढलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे. पण शिक्षणाकडून आपण जें अपेक्षिलें, तें फारच अल्प प्रमाणांत पदरीं पडलें, हें विसरतां येत नाहीं. शिक्षणामुळें जीवनांतील जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारें पार पाडतां येतील, अडचणींशीं कणखर वृत्तीनें सामना करतां येईल, कठीण प्रश्नांचें स्वरूप जाणून घेतां येईल आणि या ज्ञानाच्या आधारानें ते प्रश्न सोडवितां येतील; पत्नी, माता, गृहिणी व जबाबदार नागरिक या नात्यांचीं कर्तव्यें शिक्षित स्त्रीला उत्तम तऱ्हेनें पार पाडतां येतील,—अशा कितीतरी अपेक्षा शिक्षणापासून समाजसुधारकांनीं व शिक्षणदात्यांनीं केल्या होत्या. पण अनुभव असा येत गेला कीं, शिक्षित स्त्री कांहीं बाबतींत इतरांपेक्षां अधिक तयार झाली, तरी जीवनांतील प्राथमिक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या जाणिवेनें व कणखरपणानें पार पाडण्याच्या दृष्टीनें ती इतरांपेक्षां अधिक दुर्बल ठरूं लागली. कारण स्त्रीला शिक्षण मिळालें तें विशिष्ट विषयांचें व कलांचें, जीवनाच्या कलेचें नव्हे. जीवनाच्या कलेंत तिला प्रवीण करणें हें खरोखर अतिशय कठीण काम आहे यांत शंकाच नाहीं. कारण शिक्षित स्त्रीचे प्रश्न सतत निर्माण होत होते. ते जाणून घेऊन, सध्यांच्या कुटुंबव्यवस्थेंत व समाजव्यवस्थेंत ते कसे सोडविणें शक्य आहे याचा विचार होण्यासाठीं कांहीं काळ जाणें अवश्यच होतें. शिक्षण ही सर्व प्रश्न सोडविणारी व अडचणी निवारणारी जादूची कांडी नव्हे, हें सत्य उमगावयासच दोनचार पिढ्या जावयास पाहिजे होत्या. या दोनचार पिढ्यांतील शेकडों शिक्षित स्त्रियांच्या अनुभवाच्या आधारावरच आतां जीवन समाधानी, प्रगतिशाली व समृद्ध बनविण्यासाठीं काय जाणून घेणें अवश्य आहे, काय अंगीं बाणवून घेणें अवश्य आहे व काय कणखरपणानें सहन करणें अवश्य आहे, हें सांगणें आतां शक्य झालें आहे.

जीवन ही कला आहे. नुसत्या माहितीच्या व ज्ञानाच्या आधारावर ती

साधतां येत नाहीं. ती साधायला खरोखर थोड्या प्रमाणांत साधनाच अवश्य असते. कसें तरी जीवन जगायचें असलें, तर अर्थातच या गोष्टीची गरज नसते, पण शिक्षित स्त्रियांनीं कसेंतरी जीवन न घालवितां जाणत्याचें जीवन जगावें अशी आपली अपेक्षा असते. म्हणूनच शालेय जीवनापासूनच पुढच्या जबाबदारीच्या जीवनाची पूर्वतयारी करावयास हवी. ही पूर्वतयारी कांहीं कठिण आहे असें मुळींच नाहीं. पण पुढील जीवनाची जाणीव ठेवली व पूर्वतयारी करायलाच हवी हें अवधान सतत ठेवलें, तर हंसत खेळत ही पूर्वतयारी होऊं शकते. जें पूर्वतयारीच्या बाबतींत खरें, तेंच जबाबदारीच्या प्रौढ जीवनाच्या बाबतींतहि खरें आहे.

पूर्वतयारी करतांना नेमकें काय करावयास हवें, काय टाळावयास हवें, कोणत्या अवास्तव व भ्रामक कल्पनांना तिलांजलि द्यावयास हवी, या गोष्टीची जाणीव गेल्या पंचवीसतीस वर्षांतील शिक्षित स्त्रियांच्या जीवनांतील अडचणींवरून व नव्यानें उभ्या राहिलेल्या समस्यांवरून आतां होऊं लागली आहे. पण ती अजून फार थोड्या स्त्रियांच्या विचारांत व आचारांत उतरली आहे. तेव्हां या स्त्रियांच्या अनुभवावरून या गोष्टी वेंचून घेऊन त्या सर्व स्त्रियांपुढें मांडल्या, तर पुष्कळजणी त्यांच्यापासून लाभ घेतील असें मला वाटतें. वैयक्तिक जीवनांत मीं अनेक मुलींना व स्त्रियांना या सूचना व हे उपाय सांगितले आहेत व त्यांना त्यांच्यापासून फायदाहि झाला आहे. मी स्वतःहि इतरांपासून अशा सूचना ग्रहण केल्या आहेत व आचरणांत आणण्याचा प्रयत्न केला आहे.

एक गोष्ट मला कटाक्षानें आजहि सांगावीशी वाटते. ती अशी कीं, स्त्रियांचे हक्क व अधिकार या शब्दांवरील जोर कमी करून स्त्रियांचीं कर्तव्यें व जबाबदाऱ्या यांच्याकडे आम्हीं आतां अधिक लक्ष पुरविलें पाहिजे. पूर्वी परंपरेनें आणि मोठ्या कुटुंबांतील वडिलधाऱ्या स्त्रियांच्या आचरणांतून कर्तव्यांची व जबाबदाऱ्यांची शिकवण नकळत मिळत होती. आतां ती सोय जवळजवळ नाहींशी होत चालली आहे. म्हणूनच स्वतः विचार करून कर्तव्यें समजून घेणें अवश्य झालें आहे. स्वातंत्र्याच्या व अधिकाराच्या भ्रामक कल्पनांनीं डोकीं बिघडूं न देतां खऱ्याखुऱ्या स्वतंत्र व प्रौढ स्त्रीच्या जाणिवेनें स्वतःवर अवश्य तीं बंधनें स्वेच्छेनें घालण्यास आम्हीं शिकलें पाहिजे. शारीरिक किंवा मानसिक दुर्बलता

ही कौतुकाची गोष्ट न मानतां कमीपणाची मानण्यास शिकलें पाहिजे. म्हणजे मनाच्या कमकुवतपणामुळें शिक्षित स्त्रियांच्या जीवनांत ज्या अकारण व काल्पनिक समस्या निर्माण होतात, त्यांचा पायाच नाहींसा होईल.

भारताला स्वातंत्र्य मिळून अकरा वर्षें झालीं, तरीहि भारतीय पुरुष काय किंवा स्त्रिया काय, तें स्वातंत्र्य पेलायला शिकल्या नाहींत हें खेदानें कबूल करणें प्राप्त आहे. माझा विषय स्त्रियांपुरता मर्यादित असल्यामुळें स्त्रियांनीं हें स्वातंत्र्य पेलण्यासाठीं काय समजून घ्यावयास हवें व तें कसें आचरणांत आणावयास हवें याबद्दल कांहीं सूचना व विचार मीं मांडले आहेत. माझा अनुभव मर्यादित आहे. पण 'जें जें आपणांसि ठावें। तें तें इतरांसी शिकवावें' या समर्थांच्या उक्तीनुसारच तो अनुभव मीं स्त्रियांसमोर ठेवला आहे. त्या त्यापासून थोडातरी लाभ घेवोत एवढीच उत्कट इच्छा आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम २३८८४ दि: ...
क्रमांक ...९९४८... नों दि: ...

REFBK-0009751

८८५९.

पूर्वी आर्थिक व सामाजिक असाहाय्यतेमुळें घर हा स्त्रियांचा तुरुंग बनला होता. त्या तुरुंगाचीं दारें केव्हांच उघडलीं. उलट आज मात्र, समाजाची धारणा करणाऱ्या गृहसंस्थेला आणि कुटुंबसंस्थेला सुरुंग लागण्याचा धोका निर्माण झाला आहे.

'घर आणि अंगण'मध्यें सौ. विमलाबाई देशपांडे यांनीं जिव्हाळ्यानें विचार केला आहे, तो याच नव्या गंभीर संकटाचा. त्यांचें सारेंच विवेचन खडखडीत वास्तववादावर आधारलेलें आहे. हळव्या भावविवशतेच्या आहारीं गेलेल्या, आपल्या सामाजिक व व्यक्तिगत जबाबदाऱ्या विसरलेल्या आणि प्रतिष्ठा व व्यक्तिस्वातंत्र्य यांच्या फसव्या मूल्यांमागें धावणाऱ्या मराठी स्त्रीसमोर त्यांनीं स्त्रीत्वाची खरी प्रतिष्ठा आणि स्त्रीचें जीवनसाफल्य यांचें स्पष्ट, रेखीव चित्र 'घर आणि अंगण'मध्यें ठेवलें आहे.

# आ गा मी
# प्र का श नें

**प्रतिमा**
गुजराती व हिंदी

**नृत्यपूजा**
रवींद्रनाथ टागोरांच्या नाटकाचा अनुवाद
कृष्णाबाई मोटे

**शेजवलकरांच्या प्रस्तावना**
त्र्यंबक शंकर शेजवलकर

**उत्तररामचरित**
विमलाबाई देशपांडे

**अनामिकाची चिंतनिका**
पु. य. देशपांडे

**शंभर वर्षांपूर्वी**
एक खेडवळ आत्मकथन
संपादिका : दुर्गा भागवत

**सुश्लोक**
विनायक महादेव दांडेकर

**बहुरूपी** प्रकाशन, ९ सनी साइड, माटुंगा, मुंबई १९